**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ.शी.**: कोकण विकासाकडे शासनाचे सातत्याने होणारे दुर्लक्ष

**मु.शी.**: कोकण विकासाकडे शासनाचे सातत्याने होणारे दुर्लक्ष या विषयावर ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री हुसैन दलवाई, अनिल तटकरे, विजय सावंत, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री राजन तेली, जयंत प्र.पाटील वि.प.स.यांचा प्रस्ताव

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"कोकणाला 720 किलोमीटर समुद्रकिनारा लाभलेला असून हा भाग पर्यटनांची मोठी संधी असतांना सुध्दा दुर्लक्षित असणे, किना-यावर मत्स्यव्यवसाय मोठया प्रमाणावर सुरु असून डिझेलवर सबसिडी, मच्छिमारांना जाळी व अन्य सोयी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, पर्सनेटची जाळी टाकून या राज्यातील पारंपरिक मच्छिमारांना व्यवसायापासून वंचित ठेवण्याचे सुरु असलेले प्रयत्न, कोकणाला अत्यंत अल्प प्रमाणात निधी उपलब्ध होणे, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) अंतर्गत कोकणाला स्वतंत्र वैधानिक मंडळ द्यावे, असा दोन्ही सभागृहात एकमताने निर्णय होऊन सुध्दा त्यावर अद्याप कार्यवाही न होणे, रस्ते, आरोग्य, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि सिंचन या विभागात मोठा अनुशेष असणे, सिंचनाच्या संदर्भात 1200 कोटी पेक्षा जास्त अनुशेष असतानाही कोकणातील तिलारी, ताळंबा, महंमदवाडी, अर्जून पाटबंधारे प्रकल्पांवर पुरेसा निधी न दिल्यामुळे सिंचन प्रकल्प व इतर प्रकल्प अडचणीत येणे, सन 1980 मध्ये मुंबईपासून गोव्यापर्यंत सागरी महामार्ग तयार करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला परंतु 25 वर्षे होऊनही या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे या प्रकल्पावरील पूल, रस्ते यांची कामे अपूर्ण अवस्थेत असणे, मुंबई महामार्ग 17 ची आजची असलेली भयावह परिस्थिती, राज्यातील इतर महामार्गाचे चौपदरीकरण होत असतात परंतु कोकणाच्या महामार्गाच्या कामाकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोकणामध्ये एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात येणे, परंतु पर्यटनास आवश्यक पायाभूत सोई-सुविधा अपुऱ्या निधीमुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

PFK/ KTG/ KGS/ 11:00

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी......

उपलब्ध होऊ न शकणे, शासनाने कोकणातील विकासांसाठी एकूण 5311.07 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करणे, त्यानुसार सन 2009-2012 साठी 1032.06 कोटी याप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविणे, ज्यानुसार 2009 या वर्षासाठी घ्यावयाच्या 2908.26 कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहिर करणे, परंतु आता पर्यंत फारच अल्प प्रमाणात निधी प्रत्यक्ष देणे त्यामुळे बरीच कामे अर्धवट स्थितीत असणे, त्यामुळे हा भाग जाणून बुजून दुर्लक्षित ठेवण्यात येत असल्याची भावना कोकणातील जनतेत निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

महोदय, मी प्रथम वरुण राजाला कोटी कोटी प्रणाम करतो. राज्यामध्ये चांगल्या प्रकारे पर्जन्यवृष्टी होत आहे. विशेषकरुन कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी तसेच रायगड या तिनही जिल्ह्यांमध्ये गेल्या आठ दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. नद्यांना पूर आलेले आहेत तसेच गावागावांत अनेक ठिकाणी पाणी साचलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचेच उदाहरण द्यावयाचे असेल तर कोट्यवधी रुपयाचे नुकसान या पावसामुळे झालेले आहे आणि तीच परिस्थिती रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

कोकणामध्ये यावर्षी पर्जन्यवृष्टी चांगली झालेली आहे. दर वर्षी कोकणामध्ये साधारणत: 200 ते 250 इंच पाऊस पडत असतो. अशी परिस्थिती असतांनाही एप्रिल, मे आणि जून महिन्यांमध्ये कोकणात पाण्याचे दुर्भिक्ष असते. कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडत असला तरी त्या ठिकाणी पाण्याच्या साठवणुकीचे नियोजन नसल्यामुळे पावसाचे सर्व पाणी समुद्रात वाहून जाते व त्यामुळे कोकणात दरवर्षी एप्रिल, मे आणि जून महिन्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. या महिन्यांमध्ये कोकणातील जनतेला पाण्यासाठी पायपीट करावी लागते असते. कोकणातील पाण्याचे दुर्भिक्ष वर्षानुवर्षापासून सुरु आहे. संपूर्ण महाराष्ट्रात यावर्षी चांगला पाऊस झालेला आहे.परंतु ज्या ठिकाणी धरणे आहेत त्या धरणांच्या भागात पाऊस पडलेला नसल्यामुळे बहुतेक धरणे कोरडीच आहेत.

माझ्या माहिती प्रमाणे रायगड जिल्हयात 1970 मध्ये काळ प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली होती. ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग या ठिकाणी धरणे आहेत परंतु या धरणाच्या पाण्याचा उपयोग या ठिकाणच्या शेतक-यांना करता येत नाही. या ठिकाणचे सर्व पाणी मुंबई आणि आजुबाजूच्या शहरांना पिण्यासाठी दिले जात असते. या ठिकाणचा शेतकरी या पाण्याकडे फक्त बघू शकतो परंतु तो त्या पाण्याचा उपयोग करु शकत नाही. या ठिकाणच्या शेतक-याला, आदिवासीला पाणी दिसते परंतु तो पाण्याचा उपयोग करु शकत नाही अशी परिस्थिती आहे. रायगड येथे जो काळ प्रकल्प झालेला आहे त्याचीही परिस्थिती तशीच आहे. मानगाव व पेण या ठिकाणी दुबार शेती घेतली जाते. काळ प्रकल्पाचे पाणी औद्योगिक वसाहतीसाठी मोठया प्रमाणात वापरले जात असल्यामुळे या काळ प्रकल्पाच्या धरणाचा जास्त उपयोग शेतीसाठी होत नाही. उत्तर कोकण तसेच दक्षिण कोकण येथे दोडा, तिलारी, कुडाळ, महमदवाडी तसेच राजापूर येथे जवळपास 40-50 लघू आणि मोठे पाटबंधा-यांचे प्रकल्प आहेत. खरे म्हणजे कोकणातील सिंचनासाठी शासनाने मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. परंतु असे असतांनाही शासनाने कोकणातील सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. तिलारी धरणाचे काम आता जवळपास पूर्ण झालेले आहे. हा प्रकल्प ज्यावेळेस सुरु झाला त्यावेळेस या प्रकल्पाचे एस्टिमेट 54 कोटी रुपयांचे होते परंतु आतापर्यंत या प्रकल्पावर 1200 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. काळंबा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

धरणाचे काम जवळपास 25 टक्के झालेले आहे परंतु या धरणाचे काम वन संज्ञेखाली येत असल्याने या कामामध्ये अडचणी निर्माण झालेल्या असल्यामुळे या कामाची पाहिजे तशी प्रगती झालेली नाही. तसेच या काळंबा प्रकल्पासाठी शासनाने पाहिजे त्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होतो तो निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. अशी कोकणाच्या सिंचनाची संतापजनक स्थिती आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, कोकणामध्ये सध्या 94 पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प सुरू आहेत. एकूण खर्च 4720 कोटींचा असून 2,52,111 हेक्टर जमीन सिंचना खाली येणार आहे. एकूण अनुशेष 1352 कोटी रूपयांचा आहे. सिंचनामध्ये 7.70 टक्के इतका अनुशेष आहे. एकूण अनुशेषाच्या तुलनेत कोकणाचा अनुशेष 5.70 टक्के इतका आहे. राज्याच्या तुलनेत कोकणात मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होते. राज्यात 60 टक्के पर्जन्यवृष्टी होते. त्यापैकी 40 टक्के पर्जन्यवृष्टी कोकणामध्ये होते. देशाचे सिंचनाचे प्रमाण 40 टक्के असून महाराष्ट्राचे सिंचनाचे प्रमाण 17 टक्के असून 40 टक्के पर्जन्यवृष्टी असणाऱ्या कोकणात 5 टक्क्यापेक्षा कमी सिंचन व्यवस्था असल्याचे विदारक चित्र आज पहायला मिळते. आज सभागृहात माननीय वित्त मंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे त्यांनी कोकणाच्या विकासाठी मार्ग सुचविला पाहिजे. शेवटी माननीय वित्त मंत्र्यांची नाळ कोकणातील जमिनीशी जुळलेली आहे. त्यामुळे त्यांनी आज मिळालेल्या संधीचे सोने करून कोकाणातील जे प्रकल्प अडचणीत आलेले आहेत, त्यांना निधी देऊन ते प्रकल्प पूर्ण कसे होतील ते पहावे.

सभापती महोदय, कोकणाला 720 कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. सदर समुद्र किनारा हा या राज्याचे ऐश्वर्य आहे. 720 कि.मी.लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर मच्छिमार व्यवसाय वाढू शकतो. पर्यटन होऊ शकते. ज्या ज्या राज्यांना समुद्र किनारा लाभला आहे त्या त्या राज्यांच्या पर्यटनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. 720 कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असून देखील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात विदारक चित्र आहे. आज आपल्या राज्यात पर्यटन खाते आहे काय ? असा प्रश्न मला विचारला तर मी म्हणेन नाही. आता सभागृहात पर्यटन राज्यमंत्री श्रीमती वर्षा गायकवाड उपस्थित आहेत. काल पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. पर्यटनाच्या विकासासाठी आणि प्रचारासाठी त्यांच्या विभागाने किती रूपयांची मागणी केली होती ? फक्त पाच कोटी रूपयांची. केरळ, राजस्थान, कर्नाटक या राज्यांकडे आपण बघा. ही राज्ये शेकडो कोटी रूपयांची तरतूद करून पर्यटनाकडे समृद्धीचे साधन म्हणून पहात आहेत. त्यामुळे कोट्यवधी रूपयांची तरतूद पर्यटनाला प्रमोट करण्यासाठी त्या राज्यांमध्ये करण्यात येत आहे. आज MTDC ला M.D.च नाही. एवढेच नव्हे तर ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी ....

पर्यटन विभागला सचिव देखील नाही. MTDC साठी कार्यालय नाही. लोकांनी स्वत:च्या जबाबदारीने पर्यटन करावे असा शासनाचा मानस आहे का ?

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झाल्यानंतर भारत सरकारने दरवर्षी रूपये 65.5 कोटी या प्रमाणे पाच वर्षासाठी 250 कोटी रूपये मंजूर केले. सदर निधी हा गावाला, तालुक्याला घेऊन जाण्यासाठी दिलेला नाही. सदर निधी कोकणातील पर्यटनामध्ये वाढ व्हावी म्हणून दिलेला आहे. तेव्हा आपण या 250 कोटी रूपयाचे काय नियोजन केले आहे ? याबाबत शासनाचे काय धोरण आहे ? सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा घोषित केल्याचे आपण फक्त ढोल वाजवित आहोत. पण त्यावर किती निधी खर्च शासनाने खर्च केला आहे हे सांगावे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी..

आपण आतापर्यंत पर्यटनावर किती खर्च केला ? पर्यटनामुळे राज्याला चांगली समृध्दी मिळू शकते. मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊ शकतो. परंतु याकडे शासनाचे पूर्णपर्ण दुर्लक्ष झालेले आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये बंदराचा प्रश्न आहे. शासनाने रेवस, दिघी, जयगड, आनंदवाडी इत्यादी बंदरांचा विकास करण्यासाठी एम.ओ.यु.केले. पण पुढे त्याचे काय झाले माहीत नाही. माननीय श्री.शरद पवार हे केंद्रात कृषी मंत्री असून मत्स्य विषयक खाते देखील त्यांच्याकडे आहे. दोन वर्षापूर्वी माननीय वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी एका कार्यक्रमात कोकणातील देवगड, आनंदवाडी, रेड्डी, जैतापूर, मिरकरवाडा, दिघी, रेवस इत्यादी बंदराचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळालेला आहे असे जाहीर केले. परंतु दुर्दैवाने या बंदरांचा अजूनपर्यंत विकास झालेला नाही. गेल्या पाच-सहा वर्षात केंद्र सरकारकडून निधी मिळूनही आपण ते पैसे खर्च करु शकलो नाही. आजच्या लोकसत्ता वर्तमानपत्रात एक बातमी आहे की, व्हीडिओकॉन कंपनीचे सर्वेसर्वा श्री.धूत यांनी म्हटले आहे की, कोकणामध्ये बंदरांना स्कोप आहे. याठिकाणी पर्यटन राज्यमंत्री प्रा.वर्षा गायकवाड येथे उपस्थित आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, पूर्वी कोकणात समुद्रमार्गे जावे लागायचे. भाऊच्या धक्क्यावरुन बोटी सुटायच्या. त्यावेळी प्रा.वर्षा गायकवाड यांचा जन्मदेखील झाला नव्हता. या बोटीचा अलिबाग-रत्नागिरी-जयगड-जैतापूर-देवगड-आचरा-मालवण-रेड्डी-वेंगुर्ला आणि नंतर गोवा असा मार्ग असायचा. परंतु आता ती बोट इतिहास जमा झालेली आहे. आज सर्व बंदरे गाळांनी भरलेली आहेत. हा गाळ उपसण्यासाठी ड्रेजर घेणार आहोत असे जाहीर करण्यात आले. हा कार्यक्रम कोण एक्झीक्युट करणार आहे ? याची मेरीटाईम बोर्डाकडे एजन्सी आहे काय ? असे अनेक प्रश्न समोर आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी..

सभापती महोदय, गेल्या आठ दिवसांपासून पावसाने कोकणाला झोपडून काढले आहे. कोकणातील रेल्वेसेवा पूर्णपणे ठप्प झालेली आहे. मोठ्या प्रमाणावर जमीन खचून रेल्वेमार्ग उद्ध्वस्त झालेले आहेत. प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यांना पुढे जाता येत नाही की, पाठीमागे जाता येत नाही. दोन्ही बाजूने रेल्वेमार्ग बंद झालेला आहे. सरकारने त्यांची सोडवणूक करण्याकरिता एस.टी सोडल्या आहेत. आज बोट वाहतूक सुरु असती तर प्रवाशांची पर्यायी व्यवस्था झाली असती.

सभापती महोदय, सन 1980 पासून आपण सागरी महामार्गास सुरुवात केली. परंतु गेल्या तीस वर्षात आपण सागरी महामार्ग पूर्ण करु शकलो नाही. जवळ जवळ 70 कि.मी.चा रस्ता पूर्ण व्हावयाचा आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकणी ..

माननीय वित्त मंत्री सभागृहात उपस्थित आहेत , त्यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. कोकणातील सागरी महामार्गाच्या संदर्भात त्यांनी या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील मोठया पुलांसाठी जवळजवळ एक हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले आहे. तसेच हा निधी उभा करुन कोकणातील सागरी महामार्ग लवकर तयार होईल अशा प्रकारचे चित्र त्यांनी कोकणातील जनतेसमोर उभे केलेले आहे. या कामासाठी लागणारा एक हजार कोटी रुपयांचा निधी नाबार्डच्या माध्यमातून उभा करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले आहेत, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, या मोठया पुलाच्या कामासाठी नाबार्डकडून निधी मिळाल्यानंतर हे काम पूर्ण करण्यासाठी एक टाईम बाऊन्ड कायर्क्रम आखून ही सर्व कामे त्वरित पूर्ण करण्यात यावीत. सभापती महोदय, कोकणासाठी जे पॅकेज जाहीर करण्यात आले होते, त्यामध्ये या विषयाचा समावेश करण्यात आलेला नाही. कोकणातील पॅकेजच्या संदर्भात मी नंतर बोलणार आहे.

सभापती महोदय, गेल्या तीस वर्षापासून सागरी महामार्गाचे काम राज्यामध्ये पूर्ण होऊ शकले नाही. 2500 कोटी रुपये खर्च करुन पुणे - मुंबई एक्सप्रेस वे हा दोन -तीन वर्षात पूर्ण करण्यात आला होता. परंतु कोकणातील सागरी महामार्गाचे काम मात्र गेल्या 30 वर्षात पूर्ण होऊ शकले नाही, ही शोकांतिका आहे, असे मला दुर्देवाने म्हणावेसे वाटते. तेव्हा कोकणातील सागरी महामार्गाचे काम लवकरात लवकर कसे पूर्ण् होईल, याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष देण्याची बाब देखील महत्वाची आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी कोकणासाठी अनेक कार्यक्रम जाहीर केलेले आहेत . त्यांनी जी काही कामे आणि जे कार्यक्रम जाहीर केलेले आहेत ते पूर्ण व्हावेत यासाठी त्यांनी चार पाच वर्षे वित्त मंत्री याच पदावर कायम रहावे, असे मला सांगावयाचे आहे जर ते पाच वर्षे वित्त मंत्री पदावर राहिले तर कोकणातील सर्व कामे पूर्ण होतील . सध्या श्री.सुनील तटकरे यांच्याकडे वित्त मंत्र्यांचे पद देण्यात आलेले आहे, परंतु काही कारणास्तव फेर बदल झाल्यानंतर कदाचित त्यांच्याकडील वित्त मंत्र्यांचे खाते काढून घेण्यात येईल आणि त्यांना दुसरे खाते दिले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अड.गुरुनाथ कुलकणी ..

जाईल अशा प्रकारे सध्याच्या  वित्त मंत्र्यांकडील हे खाते काढून घेतल्यास त्यांनी जी काही कमिटमेन्ट दिलेली आहे, ती त्यांना पूर्ण् करता येणार  नाही. तेव्हा त्यांनी दिलेली कमिटमेन्ट पूर्ण होण्यासाठी त्यांनाच चार पाच वर्षे वित्त मंत्री या पदावर कायम ठेवण्यात यावे,. त्यांनी पाच वर्षे वित्त मंत्र्याच्या पदावर कायम राहून कोकणातील संपूर्ण बॅकलॉग दूर करावा आणि त्यानंतरच त्यांना दुस-या कोणत्याही खात्यात जावयाचे असेल तर जावे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या नंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. मुंबई ते गोवा हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 सध्या मृत्यूचा सापळा बनलेला आहे. मोठ मोठे ट्रक्स आणि ट्रॉलर्स या राष्ट्रीय महामार्गावरुन जात येत असल्यामुळे व हा रस्ता अरुंद असल्यामुळे अपघात होऊन कुटुंबेच्या कुंटुबे अपघातात मृत्युमुखी पडून संपूर्ण कुटुंबच नामशेष होते. या रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहतूक सुरु असून रस्ता अरुंद असल्यामुळे तो रस्ता चौपदरी करण्याचा कायर्क्रम आखण्यात आलेला नाही. झाराप ते पत्रादेवी या 21 किलोमिटरच्या रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु असून येत्या सात आठ महिन्यात हे काम पूर्ण होईल अशी मला आशा आहे. परंतु पळसपे ते इंदापूर या 84 किलोमिटर लांबीच्या रस्त्याचा जो दुसरा पॅच आहे,त्या कामास सुरुवात करण्यासाठी टेंडर्स मागविण्यात आली आहेत, असे शासनाकडून सांगण्यात आले परंतु ते काम सुरु  झाल्याचे दिसून येत नाही.तेव्हा सध्या ज्या गतीने हे काम करण्यात येत अहे, ती गती पहाता हे काम करण्यासाठी आणखी तीस वर्षे लागतील असे मला वाटते.  हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे आणि कोकणवासियांना मृत्यूच्या सापळयापासून वाचविण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे .त्यासाठी राष्ट्रीय महामार्गासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देऊन लवकरात लवकर या रस्त्याचे रुंदीकरण करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरपफरे

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा पर्यटन विकाससंबंधी आहे.आज राज्यामध्ये महत्वाकांक्षी नसलेले पर्यटन खाते आहे, फक्त कामाच्या पाटया टाकण्याचे काम त्याठिकाणी केले जाते. सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांमध्ये पर्यटनाचा प्रसार करण्यासाठी या विभागाला फक्त 5 कोटींची तरतूद करण्यात आली. त्यावरुन हे खाते पर्यटनाच्या दृष्टीने कोणती उपाय योजना करणार आहे, याचा टाळेबंद दिला आहे. कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. परंतु आजपर्यंत कोणत्याही प्रकारच्या सुविधा पुरविण्यासाठी बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर व्हावयास पाहिजे ते दुर्दैवाने झाले नाही. माझ्या माहितीप्रमाणे टाटा कन्सल्टन्सीने सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यटनाचा विकास करण्यासाठी एक प्रस्ताव सादर केकला अहो. त्यामध्ये 119 ठिकाणी मोठया प्रमाणामध्ये पर्यटन विकास करु शकतो याची माहिती दिली आहे. त्यामधील काही स्पॉट घेण्यात आले राहिलेल्या स्पॉटसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी तत्कालीन पालकमंत्री व राज्यमंत्री श्री. सुनील तटकरे यांच्या काळात कोकणाला 300 कोटींचे पॅकेज देण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्हयातील पर्यटन विकासाकरिता 30 कोटी रुपये दिले होते. पर्यटनाला चालना मिळण्यासाठी हा निधी देण्यात आला. परंतु कोकणातील सावंतवाडी,आंबोली, तारकर्ली, धामापूर येथील स्पॉट डेव्हलप करण्यासाठी आपण हा निधी देत नाही.त्याठिकाणी फक्त एजन्सी नेमण्यात आलेली नाही म्हणून हे खाते अडून राहिले आहे. त्याचप्रमाणे चार ते पाच हॉटेल्सचे प्रस्ताव देण्यात आले होते. त्यापैकी मोचेमाड येथे हॉटेल उभारणार, शिरोडा येथे ताज हॉटेल उभारणा, कुणकेश्वर येथे ओबेरॉय हॉटेल उभारणार अशाप्रकारचे प्रस्ताव देण्यात आले होते. परंतु यापैकी एकही हॉटेल उभारले गेले नाही. तेव्हा इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्यासाठी आपण जर खर्च करणार असाल तर हा पर्यटन विभाग या जिल्हयाला एक वरदान ठरणार आहे.परंतु दुर्दैवाने या जिल्हयाकडे लक्ष दिले जात नाही, अत्यंत दुर्लक्षित असलेला हा जिल्हा आहे. या संदर्भात शासनाला अधिक लक्ष द्यावे लागेल असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, सन 2008-09 च्या अर्थसंकल्पामध्ये आंगेरी बेट येथे विजयदुर्गपासून 100 कि.मी. वर आत समुद्राच्या तळाशी निरनिराळे प्रवाळ, मासे पहावयास मिळतात. त्याठिकाणी समुद्रामध्ये 3 मीटर खोल एक भिंती कित्येक वर्षापासून आहे. तिचे संशोधन करण्यासाठी 5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तुमच्या पर्यटन विभागासाठी स्वतंत्र सचिव नाही, तुम्ही व्यवस्थापकीय संचालक सुध्दा भाडयाने घेतला आहे. तुमच्या खात्यामध्ये काम करण्यासाठी कोणतेही अधिकारी नाहीत. त्यामुळे या 15 कोटींपैकी एकही पैसा खर्च होऊ शकला नाही. डॉ. सारंग कुलकर्णी हे आता कामा पहातात. त्याठिकाणी महाराष्ट्र शासन आणि पर्यटन विभागाने नाहीतर सारस्वत बँक व पुणे विद्यापीठाने जॉईन्ट व्हेंचरने पूर्णपणे संशोधन केले आहे. त्यामुळे या कामाचे क्रेडिट तुम्हाला मिळणार नाही. सिंधुदुर्ग जिल्हयाला उभे करण्यासाठी जे लोक काम करीत आहेत त्यांनाच क्रेडिट दिले पाहिजे. तुम्ही हजारो कोटी रुपये त्यांना दिले तरी ते या कामाकडे दुर्लक्ष करीत आहेत, ही पर्यटन विभागाची शोकांतिका आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या प्रश्नासंबंधी माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे नेहमी प्रश्न मांडीत असतात. आज त्याठिकाणी शासनाने ग्रामीण रुग्णालये अत्यंत सुरेख बांधली आहेमत परंतु त्याठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र नाही. ही परिस्थिती कित्येक वेळा या सभागृहामध्ये मांडलेली आहे. तरीही या गोष्टींकडे दुर्लक्ष केले जात आहे. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्हयातील सर्व आरोग्याच्या यंत्रणा शिथिल झाल्या आहेत याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 11:30

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

अशा परिस्थितीत याबाबतीत सुध्दा शासनाने लक्ष द्यावयास पाहिजे. माननीय वित्त मंत्र्यांनी मेडिकल कॉलेज रायगड, अलीबागला नेले तरी आमची हरकत नाही आम्ही त्यांचा दुस्वास करीत नाही. पण कोकणात मेडिकल कॉलेज द्यावयाचे असेल तर ते रत्नागिरीला देण्यात यावे. अशी आम्ही या सभागृहात कित्येक वर्षापासून मागणी करीत आहोत. रायगड हे मुंबईपासून जवळ आहे. ठायापासून जवळ आहे. म्हणून रत्नागिरीला मेडिकल कॉलेज दिले पाहिजे ही भूमिका आम्ही या ठिकाणी सातत्याने मांडीत आहोत. म्हणून रत्नागिरीला मेडिकल कॉलेज देण्याची भूमिका राज्य शासनाने घ्यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये निरनिराळया विभागामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षामंडळे आहेत. त्याप्रमाणे रत्नागिरीला एक परीक्षामंडळ देण्यात आलेले आहे असे गेल्या चार वर्षापासून सांगण्यात येत आहे. इतकेच नाही तर यासाठी तेरा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. पंधरा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे असे सांगण्यात आले. पण अद्यापही त्याठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षामंडळ देण्यात आलेले नाही. यासाठी रत्नागिरी येथे जागा मिळत नाही अशा पध्दतीने सांगण्यात येत आहे. अशा पध्दतीने कोकणवासियांची चेष्टा करण्यात येत आहे. म्हणून शासनाने याबाबतीतील निर्णय घ्यावा अशा प्रकारची माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कोकणात 17339 लघु आणि मघ्यम उद्योग आहेत. त्यापैकी 12624 लघु उद्योग सुरु आहेत आणि 4000 उद्योग बंद पडलेले आहेत.त्यामुळे तेथील कामगार बेचिराख झालेले आहेत. त्यांचे जीवन उदध्वस्त झालेले आहे. आज या इंडस्ट्रिअल इस्टेटमध्ये उत्पादन वाढायला पाहिजे होते व उत्पादनवर प्रक्रिया सुरु असायला पाहिजे होती पण आज कुडाळमधील इंडस्ट्रिअल इस्टेटच्या जमिनी बंगले बांधण्यासाठी खरेदी करण्यात येत आहेत. ज्यांच्याकडे पैसे आहेत ते पैसे देऊन या जमिनी बंगले बांधण्यासाठी घेत आहेत. असे चित्र निर्माण झालेले आहे ते बदलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एका बाजूला हे उद्योग बंद पडलेले असताना दुसऱ्या बाजूला खाण प्रकल्प मोठया प्रमाणात माझ्या जिल्हयात येत आहेत. अनेक खाणींना परवानगी देण्यात येत आहे. त्यांचा एमओयू करण्यात येत आहे. आज या ठिकाणी एक हजार कोटी रुपयाचा एमओयू करण्यात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी......

आलेला आहे. कोणाची जमीन आणि कोणा बरोबर व्यवहार करण्यात येत आहे. आज गोव्यामध्ये खाणी व्यवसाय बंद करण्यात आलेला आहे. या खाण व्यवसायाने तेथील डोंगर बेचिराख झालेले आहेत. कर्नाटकच्या सरकारमधील दोन रेड्डी बंधुनी विदध्वंस सुरु केलेला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून राजीनामा घेण्यात यावा असे लोकायुक्तांना सांगावे लागले. ते प्रकरण दिल्ली पर्यंत गेलेले आहे. त्यांच्या हाय कमांडकडे गेलेले आहे. दोन रेड्डी बंधुनी संपूर्ण बेलारी जिल्हयात विद्ध्वंस केलेला आहे. गोव्याचा खाण व्यवसाय बंद झालेला आहे आणि तो आमच्याकडे दादागिरी करुन, जबरदस्तीने आणण्यात येत आहे. आमचे जीवन उद्ध्वत करण्यात येत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करण्यात येत आहे. जंगलसंपत्ती नष्ट करण्यात येत आहे. म्हणून आमचा याला विरोध आहे. याला आमचा विरोध आहे हे तरी शासनाने मान्य करावे. जबरदस्तीने कोकणात खाणी आणण्यात येत असतील तर ते बंद झाले पाहिजे. कोकणात आम्हाला काही नको. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयाचा आणि रत्नागिरी जिल्हयाचा विकास कसा व्हावा याबाबतचा चार सूत्री कार्यक्रम यापूर्वीच ठरलेला आहे. 1) पर्यटन 2) मच्छिमारी 3) फलोत्पादन 4) शेती. या चार सूत्रीवर संपूर्ण कोकणचा विकास करण्यात येईल. अशा पध्दतीची इंडस्ट्रिअल पॉलिसी तयार करण्यात आलेली आहे म्हणून नको ते उद्योग कोकणात आणण्यात येऊ नयेत. सभापती महोदय, आज संपूर्ण संधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यावरणाचे संतुलन आहे. कुठेही पाऊस पडला नाही तर सिंधुदुर्ग जिल्हयात पाऊस पडणार. शंभर टक्के पाऊस पडणार.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

त्या ठिकाणी हा जो समतोल आहे तो बिघडवू नका.

सभापती महोदय, गेल्यावर्षी कोकणात मंत्रिमंडळाची बैठक घेतली त्यावेळी कोकणाला पॅकेज दिले. त्या बैठकीसाठी माननीय मुख्यमंत्र्यांसह 23 मंत्री आले होते. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी आले होते. माननीय वित्तमंत्री आले होते. त्यावेळी आम्हाला 5311 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. ते पॅकेज किती फसवे आहे ते मी सांगू इच्छितो. कोकणाला 5311 कोटी रुपयांचे जे पॅकेज दिले त्यापैकी 2009 मध्ये 2908.26 कोटी द्यावयाचे होते तसेच 2009-2010 मध्ये 1317 कोटी कोकणासाठी द्यावयाचे आहेत. बाकीचे पैसे मुंबई आणि आजूबाजूच्या मेट्रोपोलिटन रिजनच्या विकासासाठी आहेत आणि तो खर्च कोकणाच्या पॅकेजमध्ये दाखविलेला आहे. सन 2010-2011 मध्ये 1370 कोटी रुपये द्यावयाचे आहेत आणि 2011-12 मध्ये 1032 कोटी रुपये द्यावयाचे आहेत. एकूण पॅकेज 5311 कोटी रुपयांच्या पॅकेजमधून 2967 कोटी रुपये गेले तर 1334 कोटी रुपये राहतात. कोकणातील इरिगेशन प्रकल्पासाठी 1500 कोटी रुपये आहेत. कोकणातील इरिगेशनसाठी आणि मेट्रो रिजनसाठी एकूण 2900 कोटी रुपये गेले तर 1334 कोटी रुपये कोकणातील चार जिल्ह्यांना तीन वर्षासाठी निरनिराळ्या कार्यक्रमासाठी देणार आहेत. त्यामुळे कोकणाला दिलेले पॅकेज फसवे आहे. अर्थसंकल्पामध्ये अन्य ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या कोकण पॅकेजमध्ये घातलेल्या आहेत. कोकणातील लोकांच्या ज्या व्यथा आहेत, ज्या अडचणी आहेत त्याबाबत या ठिकाणी कित्येक तास बोललो तरी वेळ अपुरा पडणार आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. कारण आमचे अन्य सहकारी या प्रस्तावावर बोलणार आहेत. कोकणासंबंधीचा हा प्रस्ताव मी सभागृहामध्ये चर्चेसाठी मांडलेला आहे. आपण मला संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेल्या प्रस्तावावर आता सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण बोलतील.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या चर्चेसाठी उत्तरासह दुपारी 12.45 वाजेपर्यंतचा वेळ ठेवलेला आहे. या ठिकाणी कोकणाच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा होत आहे आणि सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत किंवा अन्य सन्माननीय सदस्य जे मुद्दे उपस्थित करणार आहेत त्यासंदर्भात सर्व विभागांच्या वतीने मी उत्तर देणार असल्यामुळे मला उत्तरासाठी 40 ते 45 मिनिटे लागतील. त्यादृष्टीने वेळेचे नियोजन व्हावे अशी माझी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणाला पैसे मिळत नाहीत पण या ठिकाणी कोकणासंबंधी बोलण्याची संधी सुध्दा मिळणार नाही काय ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण या चर्चेची वेळ वाढवावी. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. निधी किती मिळणार हा पुढचा भाग झाला परंतु या ठिकाणी कोकणाची चर्चा झाली पाहिजे.

**तालिका सभापती** : आज दिवसभर भरपूर कामकाज आहे.

श्री. रामदास कदम : ते पुढे ढकलावे. आज पहिल्यांदा कोकणासंबंधीची चर्चा होत आहे. पहिल्यांदा कोकणाला वित्तमंत्री मिळाले आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, कोकणासंबंधी पहिल्यांदा विधान परिषदेमध्ये चर्चा होत आहे आणि त्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना विधान परिषदेमध्ये यावे लागले.

श्री. रामदास कदम : त्यासाठीच तुम्ही मला पाडले.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत आधी मला बोलण्याची संधी द्यावी अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल तटकरे ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये कोकणाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी अतिशय पोटतिडीकीने व अभ्यासपूर्ण भाषण करुन कोकणातील समस्या याठिकाणी मांडलेल्या आहेत. या चर्चेसाठी वेळ कमी असल्यामुळे मी मुद्यांची पुनरावृत्ती न करता केवळ 4-5 मुद्यांना स्पर्श करणार आहे. कोकणाला 720 कि.मी. समुद्रकिनारा लाभला आहे. या 720 कि.मी.पैकी जवळजवळ 500 कि.मी.समुद्र मी ज्या मतदार संघातून निवडून आलो आहे त्या रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या भागामध्ये येतो. कोकणातील शेती, पर्यटन, मच्छिमारी, फलोत्पादन यासंबंधी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून उल्लेख केला आहे. यासंदर्भात जबाबदारीने सांगितले पाहिजे की, या चार सूत्रानुसार कोकणाचा विकास व्हावा ही जी भावना सभागृहात मांडली आहे त्याचा बोजवारा उडाल्याचे दिसत आहे. त्यामुळे 720 कि.मी.चा समुद्रकिनारा हा कोकणासाठी शाप आहे की वरदान असा माझ्यासारख्याला प्रश्न पडतो. साधारणपणे 15-20 वर्षापूर्वी हा समुद्रकिनारा कोकणाला वरदान वाटत होता. परंतु आजची कोकणाची अवस्था पाहिली तर कोकणाला हा समुद्रकिनारा लाभला नसता तर बरे झाले असते अशी म्हणण्याची वेळ आली आहे. इतकी भयानक अवस्था कोकणाची झालेली आहे. कोकणाच्या समुद्रकिना-याची वेगवेगळया माध्यमातून चर्चा केली जाते. कोकणामध्ये देशी, विदेशी पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. अगदी अलिबागपासून ते हरिहरेश्वर पर्यंत पर्यटक येत असतात. त्याचप्रमाणे कोकणामध्ये सध्या औद्योगिकीकरण होत आहे. त्यासाठी समुद्रमार्गे मालाची वाहतूक होत आहे. रायगड जिल्हा हा मुंबईपासून जवळ असल्यामुळे कोकणामध्ये औद्योगिकीकरण मोठया प्रमाणावर होत आहे. हे औद्योगिकीकरण आयपीसीएलच्या माध्यमातून झाले आहे, इस्पात कंपनीच्या माध्यमातून झालेले आहे. आता गोयंका कंपनीचा कारखाना येत आहे. या कारखान्यासाठी कच्चा माल समुद्रमार्गे येत असल्यामुळे कोकणातील मच्छिमार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

2......

NTK/ KTG/ KGS/

श्री.अनिल तटकरे.....

सभापती महोदय, कालच मी माझ्या मतदार संघामध्ये गेलो होतो. त्यावेळी मला धरमतर खाडी प्रकल्पबाधित पेण, अलिबाग मच्छिमार संघर्ष समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. त्या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, "1994 सालापासून निप्पॉन डेन्रो इस्पात कंपनी, डोलवी येथे स्थापन झाली. या कंपनीला लागणा-या कच्च्या व पक्क्या मालाची व साधन सामुग्रीच्या ने-आण करण्यासाठी जमिनीच्या रस्त्याच्या माध्यमाऐवजी महाराष्ट्र शासनाने दि.16.1.2001 च्या अधिसूचनेप्रमाणे जनतेची सुनावणी, तक्रारी व पर्यावरणाच्या स्थानिक, नैसर्गिक अडी-अडचणीचे कोणत्याही प्रकारे सर्वेक्षण न करता एकतर्फी अधिसूचना काढण्यात आली. त्यामुळे धरमतर खाडीतून मोठमोठया बोटी, जहाजे, बार्जेस इत्यादी वाहतूक हया निप्पॉन डेन्रो कंपनीकरिता होऊ लागली. धरमतर खाडी आणि पेण तालुक्यातील स्थानिक शेतक-यांचा मुख्य धंदा शेती, मिठागरे व पारंपारिक मच्छिमार व्यवसाय हे पिढयान्पिढया करीत आलेले आहेत त्याचा -हास होण्याच्या मार्गावर आहे." पेण तालुक्यातील जवळपास 25 गावांना या वाहतुकीचा फटका बसत आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनिल तटकरे....

मी सर्व गावांची नावे वाचून दाखवित नाही. या गावातील शेतक-यांचा मुख्य धंदा मिठागरे आणि मच्छिव्यवसाय हा आहे. तसेच जमिनीवरील भात शेती हा व्यवसाय पूर्णत: पावसावर असलंबून असल्यामुळे तो फक्त 4 महिने चालतो. मिठागराचा व्यवसाय हा समुद्राच्या भरती ओहटीवर अवलंबून असल्यामुळे हा व्यवसाय साधारणपणे सहा महिने चालतो. मात्र समुद्रामध्ये मच्छिमारी करणे आणि मच्छी विकणे हा व्यवसाय बाराही महिने चालतो. हा व्यवसाय आग्री आणि कोळी समाज करीत आहेत. देशाच्या,राज्याच्या आणि जिल्ह्याच्या विकासाकरिता या जिल्हयामध्ये औद्योगिकीकरण होऊ घातलेले आहे. खाजगी कंपन्यांच्या माध्यमातून या परिसरामध्ये रासायनिक व अन्य कारखाने मोठ्या प्रमाणावर आलेले आहेत. मोठ्या जहाजांच्या सततच्या वाहतुकीमुळे बाहयकाठे फुटलेले आहेत आणि मच्छिमारांच्या व्यवसायावरही परिणाम झालेला आहे. समुद्रात निर्माण होणारे मच्छिचे बिजोत्पादन, मच्छिउत्पादन हेही थांबले आहे. बाह्यकाठे फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरते व त्यामुळे भात शेतीचे नुकसान होते. त्याचबरोबर हे पाणी खाजण जमिनीत शिरल्यामुळे मिठागरांच्या कोंडया फुकट जातात.. मिठागर आणि मच्छिमारीचा जो काही पारंपरिक व्यवसाय आहे त्याची वासलात लागलेली आहे, हे मी आपल्याला थोडक्यात या ठिकाणी सांगितलेले आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी आग्री आणि कोळी बांधवाचा उल्लेख मुद्दाम या ठिकाणी करु इच्छितो. शेवटी आमच्या आग्री-कोळी संस्कृतीला आमच्या कोकणामध्ये विशेषत: महाराष्ट्रामध्ये एक वेगळया प्रकारचे महत्व आहे. या कोळी बांधवांची, महादेव कोळींची फार मोठी चेष्टा विविध माध्यमातून चाललेली आहे. मी जे सांगू इच्छित आहे ते थोडे विषयांतर झाल्यासारखे होईल. कारण आज सामाजिक न्याय विभागाच्या विषयावर चर्चा नाही याची मला जाणीव आहे. आमच्या कोळी बांधवांना अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. आता जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या मतदारसंघाची फेररचना होत असताना जातीच्या लोकसंख्येच्या आधारावर राखीव मतदारसंघ केले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून कोळी समाजाचे फार मोठे योगदान महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये आहे. या कोळी समाजाची फार मोठी ऊपेक्षा या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनिल तटकरे...

आरक्षणाच्या माध्यमातून शासनाने चालविलेली आहे. हा एक वेगळा चर्चेचा विषय होऊ शकेल. आता त्यासंबंधीची चर्चा करण्याचा हा प्रस्ताव नाही. परंतु अनुसूचित जमातीसाठी आरक्षण करीत असताना महादेव कोळी या अनुसूचित जमातीच्या लोकांना त्या आरक्षणाचा लाभ मिळत नसेल तर या कोळी बांधवांची अशी क्रूर चेष्टा यापूर्वी कधी झालेली कुणाला माहीत नसेल. आमच्याकडील खरापे या गावातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येमुळे तो मतदारसंघ अनुसूचित जमातीसाठी राखीव झाला. परंतु तेथील लोकांना अनुसूचित जमातीचे दाखले मिळत नाहीत. अशा त-हेने एकीकडे या कोळी बांधवांचा पारंपरिक व्यवसाय उद्ध्वस्त करायचा आणि दुसरीकडे राजकीय माध्यमातून कोळी समाज जे काही प्रतिनिधीत्व करीत आहे त्यालाही फाटा द्यायचा, अशा प्रकारचे दुहेरी धोरण शासनाकडून अवलंबिले जात आहे. तेव्हा याबाबतीत शासनाने काही वेगळा विचार करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, मी पुन्हा मूळ मुद्यावर येतो. पर्यटनाच्या माध्यमातून आपणाला कोकणाचा विकास करावयाचा आहे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाच्या विकासाच्या संदर्भात फार मोठे विवेचन केले. कोकणाच्या विकासाच्या बाबतीत खारलँड, पत्तन आणि मेरिटाईम बोर्ड ही तीन खाती स्वतंत्रपणे काम करतात. या खात्यांची अवस्था फार शोचनीय आहे. मेरिटाईम बोर्डाचे एकमेव ऑफिस कर्नाक बंदरला आहे. त्याठिकाणी सीओ बसतो आणि .तीन जिल्ह्यासाठी एक कार्यकारी अभियंता काम करतो. बांद्या पासून चांद्यापर्यन्त असलेला तीन जिल्हयाचा विभाग आणि या विभागातील आमचा शेतकरी तक्रार घेऊन कुठे जाणार ? मध्यंतरी आम्ही या तीन विभागांची बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी स्टाफच्या अडचणी सांगितल्या. त्या अडचणी भयावह आहेत. या तीन विभागाना पुरेसा स्टाफ नाही, ठिकठिकाणी कार्यालये नाहीत. यानिमित्ताने मला शासनाला अशी सूचना करावीशी वाटते की, या तिन्ही जिल्ह्यामध्ये विभागीय कार्यालय स्थापन करण्याच्या दृष्टीने दक्षता घ्यावी जेणेकरुन खारलँडचा जो प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण होतो तो सुटण्यास मदत होईल. या सभागृहातील कोकणातील सदस्यांची संख्या जवळपास 50 टक्क्याच्या वर गेलेली आहे. त्यामुळे आमचा कोकणाचा सर्वपक्षीय आवाज मोठा असल्यामुळे कोकणाला निश्चितपणे न्याय मिळेल याची मला खात्री आहे.

..3..

श्री.अनिल तटकरे...

कोकणामध्ये आंबा आणि काजू ही पिके फार मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. आंबा आणि काजू हे एकेकाळी कोकणाचे वैभव म्हणून समजले जात होते. परंतु त्या वैभवालाच आज दृष्ट लागल्यासारखी दिसते. अपुरा पाऊस, लहरी हवामान यामुळे आंबा पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. दुसरे म्हणजे कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यापासून रायगड जिल्ह्यापर्यन्त जे काही औद्योगिकीकरण होत आहे. यामुळे कोकणाच्या शेतीवर आणि कोकणाच्या वैभवाच्या गोष्टीवर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी. लहरी हवामानामुळे कोकणातील शेतीचा बट्टयाबोळ होतो. पश्चिम महाराष्ट्रा ज्याप्रमाणे वेगवेगळया पिकाच्या बाबतीत भूमिका घेतलेली आहे, मग ते द्राक्षाचे पीक असू द्या किंवा ऊसाचे पीक असू द्या, ..

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल तटकरे.........

त्यादृष्टीने भूमिका घेण्यात यावी. ज्याप्रमाणे उर्वरित महाराष्ट्राबाबत घेतली जाते तशी भूमिका कोकणातील शेतकऱ्यांसाठी घेतली जावी अशी आग्रहाची मागणी यानिमित्ताने करतो.

सभापती महोदय, पर्यटन, शेती, मासेमारी आणि फलोत्पादन या चार विषयाबरोबर आणखी एक महत्वाचा विषय मांडावयाचा आहे. या विषयाच्या अनुषंगाने वेगवेगळया माध्यमातून, वेगवेगळया व्यासपीठावर चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी सांगितले की, कोकणाला अर्थमंत्री लाभले आहेत. त्यांनी जी चिंता व्यक्त केली तसे होणार नाही. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी पाच वर्षासाठी अर्थखाते माननीय अर्थमंत्र्यांकडे सोपविले असल्यामुळे उर्वरित चार वर्षाच्या काळात माननीय अर्थमंत्र्यांच्या माध्यमातून कोकणाला न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुन्हा एकदा कोकणाच्या बाबतीत सहानुभूतीने आणि जागरुकतेने लोकप्रतिनिधींशी संपर्क ठेवून कोकणाला न्याय द्यावा आणि कोकणासाठी वैधानिक विकास मडळाची मागणी यापूर्वी अनेकदा झालेली आहे त्या मागणीबाबत पाठपुरावा करावा एवढी आग्रहाची विनंती या निमित्ताने करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-------

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/

११:५०

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी कोकणाच्या विकासाबाबत म.वि.प.नियम २६० अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे सत्ताधारी बाकावर बसत असले तरी ते सत्तेची कास धरणारे आहेत. आपल्याच पक्षाचे सरकार सत्तेवर आहे म्हणून सरकारच्या चुकावर पांघरुण घालण्याची भूमिका ते कधीही सभागृहात घेत नाहीत. त्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांना मी मनापासून पाठिंबा देतो.

सभापती महोदय, पहिल्यांदाच कोकण विकासाचा प्रस्ताव या सभागृहात चर्चेला आलेला नाही. मागील तीन-चार अधिवेशनात ज्याप्रमाणे कोकणात शिमग्याला जाऊन शिमगा करुन, पालखी नाचवून आपण परत येतो तशीच अवस्था या कोकण विकासाच्या प्रस्तावाची या सभागृहात झालेली आहे. सत्ताधारी आणि विरोधी बाकावरचे कोकण प्रांतातील सन्माननीय सदस्य कोकण विकासाच्या नावाने सभागृहात शिमगा करतात. कधी माननीय मुख्यमंत्री तर कधी माननीय अर्थमंत्री पालखी नाचवतात आणि आम्ही पुन्हा पुढच्या वर्षी लाल डब्यातून शिमगा करायला कोकणात जातो. यावेळी उपस्थित केलेल्या चर्चेचा फरक इतकाच आहे की, स्व.सी.डी.देशमुखांचे पदस्पर्श ज्या भागातील मातीला झाले त्याच भागातील अर्थमंत्री या राज्याला लाभले आहेत. त्यांच्यामध्ये सी.डी.देशमुखांचा बाणा आला असेल तर कोकणाला न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त करता येईल एवढे मात्र खरे आहे. कोकण विकासाच्या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने नेहमीच माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय अर्थमंत्र्यांनी वृत्तपत्रात हेडलाईन घेतली, फोटो छापून आले, पॅकेज जाहीर झाले आणि पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी स्थिती झालेली आहे. यावेळच्या प्रस्तावाच्या निमित्ताने अपेक्षा आहे की, सी.डी.देशमुखांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जो बाणा दाखविला, पं.जवाहरलाल नेहरु यांच्याशी या प्रश्नावरुन जी टक्कर घेतली अशी क्षमता या कोकणातील अर्थमंत्र्यांकडे आहे. त्यांच्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आलेल्या आहेत, कोणत्याही दादागिरीला बळी न पडता माननीय अर्थमंत्री कोकणासाठी किती तिजोरी रिक्त करतात? हा खरा प्रश्न आहे. कोणाचीही दादागिरी चालणार नाही अशी भूमिका स्वीकारुन कोकणासाठी निधीची तटबंदी केली तर कोकणाचे प्रश्न निश्चितपणे मार्गी लागतील. या प्रस्तावावर यापूर्वी सन्माननीय

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/

११:५०

श्री.विनोद तावडे.......

ज्येष्ठ सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचा उद्या वाढदिवस आहे, असे असताना ते आज मुद्दाम कोकण विकासाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उपस्थित राहिले आहेत. इतर अनेक सन्माननीय सदस्य या प्रस्तावावर विचार मांडणार आहेत. त्यामुळे प्रस्तावातील सर्व मुद्यांबाबत न बोलता मी फक्त पाटबंधारे या विषयावर माझे लक्ष केंद्रीत करणार आहे.

सभापती महोदय, पाटबंधारे या विषयाबाबत कोकणातील वस्तुस्थिती काय आहे? या संदर्भातील माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. कोकणामध्ये ९० पाटबंधारे प्रकल्पांची कामे प्रस्तावित आहेत. यामध्ये ४ मोठे, ११ मध्यम आणि ७५ लघुपाटबंधारे प्रकल्पांच्या कामांचा समावेश आहे. या ९० प्रकल्पांपैकी ७७ प्रकल्प अद्यापही अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रस्तावित किंमतीमध्ये ९६७ टक्के इतकी वाढ झालेली आहे.

नंतर एल.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

26-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-1

PFK/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. भोगले...... 11:55

श्री. विनोद तावडे ....

ते पूर्ण होण्याची कुठलीच शक्यता दिसत नाही. नियोजनाच्या वेळी सर्व प्रकल्पांची अंदाजे किंमत 957.44 कोटी होती. या प्रकल्पांवर आतापयंत 4209 कोटी एवढा खर्च झाला असून सर्व प्रकल्पांसाठी आणखी 6012.76 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. त्यामुळे हा पैसा मूळ किंमतीच्या 967 टक्के एवढा जास्त आहे. यातील किती पैसा माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे हे तटबंदी करुन उभा करु शकतात हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यातून कोकणात जास्त पाऊन पडत असला तरी पाण्याचे दुर्भिक्ष्य मात्र आजही पहायला मिळते आहे. कोकणातील तीन प्रकल्पत त्या घसई, पंचनदी आणि पांडेरी हे किती उशिराने पूर्ण झाले हे पाहिले तर घसई प्रकल्प 31 वर्षांनी पूर्ण झाला, दुसरा पंचनदी प्रकल्प 26 वर्ष उशिराने पूर्ण झाला आणि पांडेरी हा प्रकल्प 11 वर्षे उशिराने पूर्ण झालेला आहे. हे उशिराचे प्रमाण किती आहे याचा अंदाज येण्यासाठी मी नावानिशी उशिराची सुध्दा आकडेवारी दिली. उर्वरित 11 प्रकल्पांची अंदाजे 24.19 कोटी किंमत होते परंतु त्यात 158 टक्के वाढ होऊन काम सुरु झाले. या सर्व प्रकल्पामध्ये भातसा प्रकल्पाचे उदाहरण घेतले असता त्यातील कामे अजुनही शिल्लक असून ती सन 2015 पर्यंत चालतील. सूर्या प्रकल्पाचे काम 19 वर्षे विलंबाने होत असून ते सन 2013 पर्यंत पूर्ण होणार आहे. तिलारी प्रकल्पाचे 16 वर्षे विलंबाने म्हणजे 2012 मध्ये पूर्ण होईल आणि टाळंबा प्रकल्पाचे काम मात्र सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांचा नातू सभागृहात येईल तेव्हा देखील पूर्ण होईल की नाही अशी परिस्थिती दिसते. कोकणातील मोठे, मध्यम आणि लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत बोलावयाचे तर लघु पाटबंधारे प्रकल्प 75 असून त्यातील 13 प्रकल्प पूर्ण झाले व 62 प्रकल्प अपूर्ण आहेत. त्यांची मूळ किंमत 417 कोटी होती ती आता 2026 कोटीपर्यंत वाढलेली आहे. लघु पाटबंधाऱ्यापैकी तळवट प्रकल्पाला 19 वर्षे विलंब झालेला आहे त्यामुळे मूळ 64 लाखाचा हा प्रकल्प आता 22 कोटीपर्यंत गेला आहे. या प्रकल्पांना चार-पाच वर्षे विलंब नाही तर 20-22 वर्षे विलंब झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे या प्रकल्पाबाबत सातत्याने मागणी होऊनही ते पूर्ण होऊ शकले नाहीत. युतीच्या काळात कोकण पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना झाली व त्या माध्यमातून कर्ज रोखे काढण्यात आले होते. मुंबईतील अनेक चाकरमान्यांनी आपला सेवानिवृत्तीतून मिळणारा पैसा शेअर्समध्ये न गुंतविता या सरकारी रोख्यांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री. विनोद तावडे ........

गुंतविला. त्यांची अपेक्षा अशी होती की कोकणातील पाटबंधारे प्रकल्प या माध्यमातून पूर्ण होऊन कोकणाला त्याचा फायदा होऊ शकेल. पण हा पैसा कोठे गेला हेच समजत नाही. मध्यंतरी कृष्णा खोऱ्याचा पैसा लातूरमध्ये गेल्याचे समजले होते. कधी कधी हा पैसा इतक्या ठिकाणी फिरतो की तेच लक्षात येत नाही. कोकणातील प्रकल्पाच्या कामासाठी मात्र तो मिळत नाही. त्याचा परिणाम राज्यात स्वतंत्र विदर्भाची मागणी होते तेव्हा त्या मागणीला विरोध होतो. मघाशी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी पर्यटनाचा मुद्दा उपस्थित केला होता. गेल्या चार वर्षात शासनाच्या तिजोरीतून पर्यटन विकासासाठी एक पैसाही कोकणात गेला नाही, केवळ केंद्रशासनाच्या माध्यमातून आलेलाच निधी कोकणाकडे गेला......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

कोकणाच्या पर्यटनाचा पैसा अकलूजला गेला आहे. अकलूजला फाऊंटन, नदीवर घाट बनवण्यासाठी कोकणाच्या पर्यटनाचा पैसा गेलेला आहे. शीवसृष्टीसाठी कोकणाच्या पर्यटनाचा पैसा खर्च करण्यात आलेला आहे. पर्यटन मंत्र्याच्या गावामध्ये कोकणाच्या पर्यटनाचा पैसा गेला आहे. कोकणामुळेच या देशाला डॉलर मिळणार आहे. कोकणाच्या पर्यटनामुळेच आपल्या देशाला डॉलर मिळू शकतो. कोकणातील पर्यटन, मत्स्य व्यवसाय, आंबा या व्यवसायातून आपल्याला डॉलर मिळू शकतो. परंतु कोकणाच्या पर्यटनाचा पैसा पर्यटन मंत्र्याने आपल्या गावाला नेलेला आहे. असे असतांना कॅबिनेट मिटिंगमध्ये यासंदर्भात बघ्याची भूमिका घेतली जाते. कोकणातील एक मंत्र्याने तरी या विषयाच्या संदर्भात कॅबिनेट मिटिंगमध्ये विषय काढला का ? कोकणातील पर्यटनामुळे सर्वातजास्त पैसा मिळू शकेल व त्यामुळे कोकणाच्या पर्यटनाचा पैसा अकलूजमध्ये नेऊ नका असा आवाज एकाने तरी काढला का ? त्यावेळेस सर्व गप्प बसले होते. मग कशाला कोकणाचे नाव काढता ? आपल्याला कोकणाचे नाव काढण्याचा तरी हक्क आहे काय ? कोकणाच्या पर्यटनासाठी राज्य शासनाने एक पैसा देखील दिलेला नाही हे मी या ठिकाणी जबाबदारीने बोलतो आहे. कोकण हा पर्यटनासाठी सर्वात चांगला भाग आहे. कोकणाच्या पर्यटनासाठी आम्हाला चांगल्या रस्त्यांची, पिण्याचे पाणी आणि विजेची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग मध्ये 22 मेगावॅट, रत्नागिरीमध्ये 77 मेगावॅट आणि रायगडमध्ये 150 मेगावॅट विजेची गरज आहे. महाराष्ट्राला जास्तीत जास्त वीज कोकणाच्या प्रकल्पातूनच मिळते. कोकणाचे पर्यटन फाईव्ह स्टार हॉटेलमुळे होत नाही तर छोटया मोठया घरातून पर्यटनाचे काम केले जात असते परंतु वीज नसल्यामुळे या लोकांना डिझेलवर जनरेटर चालविणे परवडत नाही. पर्यटनाला चालना द्यावयाची असेल प्रथम कोकण लोडशेडींग मुक्त करण्याची आवश्यकता आहे. कोकणाला फार कमी विजेची आवश्यकता असतांना सुध्दा आम्हाला आवश्यक तेवढा वीज पुरवठा उपलब्ध करुन दिला जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, हरीहरेश्वर येथे शासनाने 5 कोटी रुपये खर्च केले आहेत. परंतु या पैशामधून देवळाजवळच्या जागेवर व्हीआयपीच्या पार्किंगसाठी समुद्रात भराव टाकून जागा तयार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

केली व त्यावर हे पैसे खर्च करण्यात आले. परंतु हरीहरेश्वर येथील मंदिराकडे जाणारे रस्ते चांगले केले तर चांगले झाले असते. पर्यटन स्थळाच्या जवळ जाण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार केले व त्यासाठी शासनाने पैसा दिला तर कोकणातील पर्यटनाला वेग येऊ शकेल, चालना मिळू शकेल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी फाईव्ह स्टार हॉटेलच्या संदर्भात विचार व्यक्त केले आहेत. परंतु कोकणात फाईव्ह स्टार हॉटेल का तयार होत नाही यासाठी मी स्वत: त्यांच्याबरोबर चर्चा केलेली आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही हॉटेल बांधू पण हॉटेलसाठी मुबलक पाणी कोठे आहे ? चांगले रस्ते कोठे आहे ? पाणी नाही, वीज नाही अशी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी बेसीक इन्फ्रास्टक्चर नसल्यामुळे फाईव्ह स्टार हॉटेल कोकणात उघडू शकत नाही. शासनाने इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले तर कोकणामध्ये छोटे,मोठे व्यावसायिक जाऊ शकतील. आम्हाला प्रादेशिक वाद आणावयाचा नाही. पण या सभागृहात वेळोवेळी चर्चा उपस्थित करुन काजू तसेच इतर फळावर प्रक्रिया करणारे कारखाने सहकारी तत्वावर 1:9 या प्रमाणात मान्य करुन घेतले. यातील 10 प्रकल्प नियोजन खात्याने मान्य केले. यातील 1 प्रकल्प लांजाचा आहे व 9 प्रकल्प कोकण सोडून इतर भागातील आहेत. सांगली, सातारा, कोल्हापूर येथील हे 9 प्रकल्प आहेत. यासंदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयांकडे सतत पाठपुरावा केलेला आहे. कोकणातील प्रोजेक्ट हे सर्व दृष्टीने परिपूर्ण असतांना त्यांना मान्यता मिळत नाही. तुम्ही कोकणावर अन्याय का करता ? ऊस पीकाला संरक्षण आहे, कपाशीला संरक्षण आहे असे असतांना कोकणात तयार होणा-या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग एवढया उशिराने सुरु केले असले आणि त्यात सुध्दा कोकणाचे फळ प्रक्रियावरील प्रकल्प पश्चिम घाटाकडील मंडळी घेऊन जात असतील तर घाट व्हर्सेस कोकण असा कोकणातील माणूस बोलायला लागला तर ते चुकीचे होईल काय ? पर्यटनाचा पैसाही कोकण सोडून तिकडेच जाणार असेल तर ते चालणार नाही. कोकणामध्ये सहकार प्रथमच आलेले आहे असे असतांना सुध्दा कोकणातील फळ प्रक्रिया करणारे सहकाराचे प्रकल्प दबावामुळे घाटात जात असतील तर ते योग्य होणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, कोकणावर बोलण्यासाठी अनेक विषय आहेत. पण वेळे अभावी बोलता येत नाही. वैधानिक विकास महामंडळाचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये कोकण वैधानिक विकास मंडळावर चर्चा झाली आहे. विदर्भ, मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आहे. पण कोकणाला मात्र आपण उर्वरित वैधानिक मंडळामध्ये समाविष्ट केले आहे. त्यात कोकणाचा किती विचार होतो याचा देखील विचार झाला पाहिजे. सन 2005 मध्ये नागपूरच्या अधिवेशनात वैधानिक विकास मंडळाचा ठराव मंजूर झाला. परंतु, केंद्र शासनाकडे यासंबंधी पाठपुरावा होताना दुर्दैवाने दिसत नाही. परवाच सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सभागृहात जांभळा पासून वाईन करण्यासंबंधीचा विषय काढला होता. कुडाळ MIDC मध्ये श्री.धुरी यांनी जांभळा पासून वाईन निर्मिती करण्याचा प्रकल्प काढला आहे. त्याला मान्यता देण्यात आली आहे. पण उत्पादन शुल्क खाते काय म्हणते ? आपल्याला परवानगी दिली असली तरी त्या वाईनची विक्री करता येणार नाही. एक्साईज विभागाने जांभळा पासून वाईन निर्मिती केली म्हणून एक्साईज डयुटी किती लावावी. 100 ते 200 टक्के त्यांनी एक्साईज डयुटी लावली. पण श्री.धुरी यांना त्या वाईनची विक्री करण्यास परवानगी नाही. तेव्हा आपण याचा विचार केला पाहिजे. कोकणाच्या विकासासाठी कोकणी माणूस कुठे तरी विचार करतो, पण असा विचार करणाऱ्या माणसाचा गळा घोटण्याचे काम प्रशासकीय व्यवस्था करीत आहे. तेव्हा कोकणाच्या विकासासाठी माननीय वित्त मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी आघाडी घ्यावी, पुढाकार घ्यावा. पर्यटन, फलोत्पादन, पाटबंधारे,यांच्या सारखे जे 5-10 प्रमुख विषय आहेत त्यासंबंधी आधुनिक मॅनेजमेंट पद्धतीने स्पॉट ॲनेलिसिस करावे. त्यांनी मध्ये कोकणामध्ये स्ट्रेन्थ किती आहे, विकनेस किती आहे, अपॉर्च्युनिटी किती आहे, थ्रेट किती आहे याचा विचार करावा. या विषयांवर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी व मला पाठपुरावा करायला सांगावे. यामध्ये जर श्री.तटकरे साहेबांनी समन्वय साधला तर आपण सर्वजण मिळून अडीच वर्षामध्ये कोकणाला न्याय देऊ शकतो. यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या दालनात बैठक बोलवावी. त्यांनी सांगावे विनोद तू पर्यटनाचा पाठपुरावा कर, श्री.रामदास कदम आपण पाटबंधारे प्रकल्पांचा पाठपुरावा करावा, श्री.राजन तेली आपण मत्स्यव्यवसायाचा पाठपुरावा करावा, ॲड.गुरूनाथ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कुलकर्णी आपण फलोत्पादनाचा पाठपुरावा करावा. असे जर केले तरच आपण कोकणाला न्याय देऊ शकू. नाही तर मघाशी मी म्हटल्याप्रमाणे आम्ही शिमगा करू आणि माननीय मंत्री पालखी नाचवतील असे होईल आणि पुढे पुन्हा कधी तरी कोकणाच्या संदर्भातील प्रस्ताव ॲड.गुरूनाथ कुलकर्णी यांच्या ऐवजी श्री.अनिल तटकरे घरात बोलायला मिळत नसल्यामुळे येथे मांडतील. या प्रस्तावाद्वारे केवळ पेपरच्या मथळ्यासाठी घोषणा न देता श्री.सुनील तटकरे यांनी आगामी काळात ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. श्री.तटकरे हे सी.डी.देशमुख यांच्या जन्मभूमीतून आले आहेत. त्यामुळे त्यांनी किमान दहा टक्के तरी न्याय कोकणासाठी द्यावा अशी विनंती या निमित्ताने करतो आणि भाषण थांबवितो.

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (स्थानिक संस्थेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणाच्या विकासासाठी सन्माननीय सदस्य ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी यांनी जो प्रस्ताव आणला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

मला भाषणाच्या सुरूवातीला सांगितले पाहिजे की, ज्या दिवशी श्री.सुनील तटकरे यांच्याकडे वित्त खात्याचा पदभार दिला असे समजले त्या दिवशी मला आनंद झाला. गुहागर विधानसभेच्या निवडणुकीत मी पडलो. पण त्याचे मला फारसे काही वाटले नाही. पण श्री.सुनील तटकरे यांच्याकडे वित्त विभाग दिल्यामुळे त्याचा आनंद वाटण्याचे कारण एवढेच आहे की, आता पर्यंतचा मागचा अनुभव पाहिला तर असे दिसून येईल की, वित्त खाते हे सातारा, सांगली यामध्ये गेल्याचे पहायला मिळते.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

"जिसकी लाठी उसी की भैंस" याचा अनुभव आपल्याला आलेला आहे. "ज्याच्या हाती ससा तो पारधी" याचा अनुभव आपल्याला आलेला आहे. फावड्याने आपल्याकडे माती ओढण्याचा अनुभव आलेला आहे. ज्याच्याकडे वित्त व नियोजन खाते गेले त्यांनी आपल्या विभागासाठी जास्तीत जास्त निधी घेऊन आपल्या विभागातील विकास केलेला आहे. माननीय श्री.सुनील तटकरे यांच्याकडे वित्त व नियोजन खाते देण्यात आले तेव्हा माननीय मंत्रिमहोदय कोकणासाठी फावड्याने पैसा ओढतील अशी आम्ही अपेक्षा बाळगली तर ते चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदय, सन 1990 मध्ये माननीय श्री.शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी कोकणासाठी एक चतु:सूत्री कार्यक्रम आखला होता. पर्यटन, मत्स्य, शेती आणि फळबाग असा तो कार्यक्रम होता. या चतु:सूत्री कार्यक्रमाचे पुढे काय झाले याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी घ्यावी.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी देशातील आणि राज्यातील सिंचनाची आकडेवारी सांगितली. देशात सिंचनाची सरासरी 52 टक्के आहे. राज्यात ती 18 टक्के आहे. मला येथे दुर्दैवाने, खेदाने आणि कळकळीने सांगावेसे वाटते की, कोकणातील सिंचन क्षमता फक्त 2.8 टक्के आहे. ही कोकणाची शोकांतिका आहे. राज्याच्या तुलनेत कोकणात 40 टक्के पाऊस पडतो. परंतु हे सर्व पाणी शेवटी समुद्राला जाऊन मिळते. गेल्या आठ दिवसांपासून पावसाने कोकणाला झोडपून काढले आहे. कोकणातील नद्या, नाले तुडुंबपणे वाहत आहेत. कोकणातील बाजारपेठा, रस्ते, गावे पाण्याखाली गेली आहेत. इतका मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असताना कोकणाला उन्हाळ्यात पाणी पाणी करावे लागते. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे राज्यातील सिंचन क्षमता 18टक्के आहे तर कोकणात फक्त 2.8 टक्के सिंचन क्षमता आहे. कोकण महाराष्ट्रात नाही काय ? कोकणात सर्वात जास्त पाऊस पडत असताना सर्वांत कमी पाणी कोकणात अडविले जाते. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आपणच सांगावे की, हा कोकणावर अन्याय नाही काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

सभापती महोदय, वीज निर्मितीसाठी वापरण्यात आलेले पाणी शेवटी समुद्राला मिळते. जवळपास 35 टी.एम.सी.पाणी वाया जाते. हे पाणी सांगली,सातारा, सोलापूर येथे असते तर ते वाया गेले असते का ? आपण या पाण्याचा उपयोग केला जवळपास 70 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते. उन्हाळ्यामध्ये या पाण्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. या संदर्भात पाटबंधारे मंत्री माननीय श्री.अजितदादा पवार यांच्याबरोबर सहा बैठका झाल्या. त्यांनी मला सांगितले की, सुरुवातीला पाच तालुक्यांना पाणी देण्याचा प्रयत्न करु. परशुराम घाटातून पाणी उचलून सुरुवातीला पाच तालुक्यांना देऊ आणि नंतर पुढे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करु. त्यानंतर माझ्या अधिकाऱ्यांसोबत बैठका झाल्या. चिपळूण येथे देखील बैठका झाल्या. या कामाचे सर्वेक्षण करण्याकरिता दोन कोटी रुपये दिले. परंतु नंतर पुढे काय झाले माहीत नाही ? खालच्या सभागृहात 16 हजार कोटी रुपयांच्या मागण्या मंजुरीसाठी आल्या होत्या त्यावेळी मी सांगितले होते की, कोकणासाठी कोयनचे पाणी उचलण्यासाठी एक हजार कोटी रुपये देणार असाल तर आम्ही त्यास मान्यता देतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

माननीय मंत्री महोदयांनी त्यास मान्यता देखील दिली होती परंतु प्रत्यक्षात मात्र पैसे दिले नाहीत त्यामुळे आमच्या तोंडाला फक्त पानेच पुसण्यात आली होती. हे प्रकार आणखी किती दिवस चालणार आहेत ? शासन कोकणावर जो अन्याय करीत आहे तो अन्याय आम्ही किती दिवस सहन करावयाचा?

सभापती महोदय, कोकणातील पाणी जर योग्य प्रकारे अडविण्यात आले तर कोकणमध्ये सगळया प्रकारची बागायती होऊ शकेल कोकणामध्ये पाणी अडविण्यात आले आणि बागायती झाली तर कोकणातील एकही व्यक्ती पुणे,मुंबई, ठाणे इत्यादी ठिकाणी नोक-या मागण्यासाठी येणार नाही.असे मला सांगावयाचे आहे. परंतु कोकणासाठी पाणी दिले जात नाही. त्यामुळे आमच्या नशिबात पाणी नाही असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते. निवडणुका समोर आल्या की कोकणासाठी विशेष पॅकेज जाहीर करावयाचे, मृगजळ निर्माण करावयाचे आणि त्याच्या जोरावर सामान्य माणसांची मते घ्यावयाची हा एकमेव कार्यक्रम कोकणामध्ये सुरु आहे.सभापती महोदय, तीन वर्षासाठी हे पॅकेज जाहीर करण्यात आले होते त्यानुसार 2009 सालासाठी पर्यटनाकरिता 100 कोटी 25 लाख रुपये, पर्यावरणासाठी 3 कोटी 60 लाख रुपये,बंदरांसाठी 62 कोटी रुपये, पदुमसाठी 24 कोटी 50 लाख रुपये,सार्वजनिक बांधकामासाठी 296 कोटी 72 लाख रुपये, ग्रामविकासासाठी 35 कोटी रुपये, जलसंपदासाठी 764 कोटी 49 लाख रुपये ,जलसंधारणासाठी 30 कोटी रुपये, पणनसाठी 37 कोटी 43 लाख रुपये ,उद्योगासाठी 20 कोटी रुपये, कृषीसाठी 3 कोटी 20 लाख रुपये, सामान्य प्रशासन विभागासाठी 4 कोटी 75 लाख रुपये, पाणीपुरवठयासाठी 201 कोटी 66 लाख रुपये, नगरविकासासाठी 59 कोटी 90 लाख रुपये, सांस्कृतिक कार्यासाठी 2 कोटी 50 लाख रुपये, उच्च शिक्षणासाठी 49 कोटी 79 लाख रुपये, क्रीडासाठी 19 कोटी 88 लाख रुपये, शिक्षणासाठी 9 कोटी 16 लाख रुपये, आरोग्यासाठी 31 कोटी रुपये ,नगरविकासासाठी 1317 कोटी रुपये अशा प्रकारे एकूण 2908 कोटी 26 लाख रुपये मिळावयास पाहिजे होते एकूण तीन वर्षामध्ये 5311 कोटी 7 लाख रुपये द्यावयाचे असून त्यातील पहिल्या वर्षी 2908 कोटी 26 लाख रुपये मिळावयास पाहिजे होते परंतु प्रत्यक्षात हा निधी देण्यात आलेला नाही .

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ...

सभापती महोदय, कोकणामध्ये कॅबिनेटची बैठक घेऊन विविध कामासाठी निधी देण्यात येईल अशा प्रकारची आश्वासने देण्यात आली आहेत परंतु प्रत्यक्षात पैसे मात्र दिले नाहीत या बैठकीच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदय कोकणामध्ये आले होते त्यावेळी त्यांनी लॉबस्टर मासे खाल्ले , निधी देण्यात येईल अशा घोषणा केल्या परंतु कोकणाच्या  पदरात मात्र काहीही निधी पडलेला नाही असे मला दुर्देवाने सांगावयाचे आहे. आता श्री.सुनील तटकरे वित्त मंत्री आहेत परंतु त्यावेळी या विभागाचे मंत्रीपद त्यांच्याकडे नव्हते म्हणून मी त्यांना दोष देत नाही. मला या चर्चेच्या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, कोकणासाठी कोटयावधी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात पैसे दिलेले नाहीत .

सभापती महोदय, सध्या सुमारे 1 लक्ष 98 हजार एकर  आंबा लागवड उत्पादन देणारे आहे त्याचबरोबर गेल्या वीस वर्षात फलोत्पादन योजनेतून एक लाख एकर क्षेत्रात आंब्याची लागवड करण्यात आली आहे अशा प्रकारे कोकणामध्ये सुमारे 3 लाख हेक्टर क्षेत्रात आंब्याची लागवड करण्यात आली आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर आंब्याचे उत्पादन होत असते. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन्ही जिल्हे पर्यटन जिल्हे म्हणून जाहीर करण्यात आले आहेत  त्या जिल्हयामध्ये आंब्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रोसेसिंग युनिटस्  जाहीर केले परंतु प्रत्यक्षात सुरु करण्यात आले नाहीत. डीआरडीएच्या माध्यमातून काजूच्या बोंडावर प्रक्रिया करणारे दहा प्रकल्प सादर केले होते परंतु हे प्रकल्प फक्त कागदोपत्री दाखविण्यात आले त्याबाबतीत आश्वासने देण्यात आली, घोषणा करण्यात आल्या पंरतु त्या सर्व घोषणा फसव्या आहेत  प्रत्यक्षात मात्र कोकणासाठी काहीही निधी देण्यात येत नाही. एका बाजूला पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात येते ,दुस-या बाजूला औष्णिक वीज निर्मिती करण्यासाठी  कोकणात प्रकल्प सुरु करण्यात येतात पण संपूर्ण राज्यासाठी वीज निर्मिती करण्याचा ठेका फक्त कोकणानेच घेतला आहे काय ..?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, कोकणामध्ये 10 हजार मेगावॅट वीज निर्मिती करणारे कारखाने निर्माण करण्याचा निर्णय घेतला. वेळ कमी असल्यामुळे माझ्याकडील नावे मी याठिकाणी वाचून दाखवीत नाही. साधारणपणे एका जिल्हयामध्ये 1 हजार मेगावॅटचा कारखाना सुरु होऊ शकतो. तुम्ही सर्व जिल्हयांमध्ये हे कारखाने सुरु करा, प्रत्येक जिल्हयामध्ये सुरु करा. परंतु एका जिल्हयामध्ये 10 हजार मेगावॅटचा कारखाना घेऊन तुम्ही पर्यटनाचा विकास करीत असतांना रासायनिक प्रदूषण आणीत आहात. हे कशासाठी करीत आहात? कोकणाला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे, ते कुणाच्याही बापाने दिलेले नाही. हे नैसर्गिक सौंदर्य उद्ध्वस्त करण्याचे पाप तुम्हाला करण्याचा अधिकार काय आहे? हे प्रथम आपण थांबवा.

सभापती महोदय, आम्ही कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची मागणी सातत्याने करीत आलो आहोत. विधानसभेमध्ये आम्ही दोन वेळा हा ठराव एकमताने संमत केला. तो ठराव घेऊन आपण दिल्लीला गेला, त्याठिक्णी आपल्या ठरावाला वाटाण्याच्या अक्षता लावण्याशिवाय काहीही झाले नाही, तो ठराव फेटाळून लावला. कोकण वैधानिक विकास मंडळासाठी आपण नेहमी भांडतो, आपण संपूर्ण राज्याला न्याय देत असतांना कोकणाला न्याय दिला नाही. आम्ही दोन वेळा हा प्रस्ताव मांडला होता. आमचे युतीचे सरकार असतांना एकदा हा प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर मी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता असतांना एक वेळ हा प्रस्ताव मांडला होता. परंतु त्याला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. दिल्लीमध्ये आपण माननीय श्रीमती सोनिया गांधी यांची भेट घेऊन कोकणासाठी वेगळा निधी दिला पाहिजे अशी मागणी करावी. कोकणासाठी मिळालेला निधी घाटमाथ्याकडे जात आहे, आणि आमच्यावर अन्याय होत आहे. सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करण्याचा निर्णय फक्त कागदावर घेण्यात आला आहे त्याची अंमलबजावणी तात्काळ झाली पाहिजे. कोकणाच्या पर्यटन विकासाठी जमीन घेऊनही दहा ते पंधरा वर्ष होऊन सुध्दा त्याठिक्णी काहीही विकास झालेला नाही. त्यामुळे आज कोकणातील शेतकऱ्याला "जमीन आमच्या मालकीची नाही कुणाच्या बापाची" अशी घोषणा द्यावी लागत आहे. शेतकऱ्यांकडून घेण्यात आलेल्या जमिनी त्यांच्या त्यांना परत दिल्या पाहिजेत अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, प्रस्तावित मुंबई-गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणासंबंधी माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे साहेबांकडून मला उत्तर मिळाले पाहिजे. नाशिक ते मुंबई हा महामार्ग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सहा पदरी होऊ शकतो. मुंबई-गोवा हा महामार्ग डोंगरी भागामधून जात असल्यामुळे त्याठिकाणी नेहमी अपघात होत असतात. म्हणून महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात यावे याकरिता अनेक वर्षापासून आम्ही मागणी करीत आहोत. परंतु या महामार्गाच्या चौपदरीकरणास केंद्र सरकारकडून निधी मिळालेला नाही, तो प्रस्ताव केंद्र सरकारने फेटाळला आहे अशी माझी माहिती आहे. त्या अनुषंगाने आपणाकडून मला उत्तर मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे. त्या दृष्टीने बंदर विकासाच्या माध्यमातून कोकणचा पर्यटन विकास करण्यासाठी आपण कोणत्या योजना घेतल्या आहेत? आज आपण सी वर्ल्डच्या माध्यमातून नवीन 80 हजार नोकऱ्या देणार आहात. त्या अनुषंगाने आपण ठोस योजना तयार केली आहे काय? या अथांग समुद्र किनाऱ्याचा फायदा घेऊन पर्यटन विकासासाठी आपण नवीन योजना आणणार आहात काय? त्यासाठी निधी देणार आहात काय? याबाबत सुध्दा आपणाकडून माहिती अपेक्षित आहे. सभापती महोदय, रासायनिक कारखान्याच्या बाबतीत माझी मागणी आहे की, कोकणातील स्थानिक बेरोजगार तरुणांना इंजिनिअरींगचे प्रशिण देऊन त्यांना नोकऱ्यांची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. मी ज्या माझ्या खेड मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतो त्या ठिकाणी 170 कंपन्या निघाल्या आहेत. त्या कंपन्यांमधील दूषित पाणी आज नदीमध्ये सोडले जात आहे. त्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होऊन त्यामधील मासे मरत आहेत. माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांनी सांगितले होते की, कंपन्यामधून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे नदीचे दूषित होणारे पाणी थांबले नाही तर त्याच नदीमध्ये मेलेले मासे अधिकाऱ्यांना खायला घालीन. याबाबत मी 50 वेळा हा विषय उपस्थित केला आहे. अशाप्रकारे कोकण उद्ध्वस्त करण्याचे पाप शासन करीत आहे. त्या अनुषंगाने कोकणामध्ये यापुढे रासायनिक कारखाने सुरु करण्यात येणार नाहीत अशी घोषणा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कोकणच्या किनारपट्टीवर मोठया प्रमाणात गाळ साचलेला आहे. त्याठिकाणी युती सरकारच्या काळात मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून एक पंचवार्षिक कार्यक्रम हाती घेतला होता.त्याप्रमाणे ठोस कार्यक्रम हाती घेऊन व त्यासाठी निधी देऊन हा गाळ काढला तर बंदर विकासाच्या माध्यमातून कोकणाला न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे यांच्यामुळे पहिल्यांदाच कोकणामध्ये आशादायक चित्र निर्माण झाल्याचे पहावयास मिळत आहे. आज सिंचनाच्या बाबतीत विशेषत: कोयनचे पाणी उचलण्यासाठी सुध्दा निधी मिळाला पाहिजे अशी आग्रहाची मागणी करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : दुपारी 12.45 वाजता प्रस्तावावरील चर्चा संपवावयाची असल्यामुळे व बोलणाऱ्या माननीय सदस्यांची यादी मोठी असल्यामुळे दोन-दोन मिनिटांमध्ये माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, आम्ही आमचे म्हणणे दोन-दोन मिनिटांमध्ये कसे मांडणार?त्यापेक्षा ही चर्चा रद्द करुन टाका. आमच्या कोकणाला न्याय मिळाला असता तर सभागृहामध्ये ही चर्चा घेण्याची वेळच आली नसती. गेल्या तीन चार वर्षामध्ये चार वेळा ही चर्चा करण्यात आली आहे व त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

तरी देखील काही होत नाही. सभापती महोदय, सर्व सन्मानीय सदस्यांचा भावनेचा आदर तरी करावा. या विषयावर दोन मिनिटे बोलण्यापेक्षा ही चर्चाच रद्द करण्यात यावी.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोनी ) : मी सन्माननीय सदस्य श्री. तेली यांनी सांगू इच्छितो की, चर्चेपेक्षा शासनाकडून काही आश्वासन मिळणे महत्वाचे आहे.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे जेष्ठ सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये या ठिकाणी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर मी माझे संक्षिप्त विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, सिंधुनगरी मध्ये दिनांक 24 जून,2009 मध्ये म्हणजे आज बरोबर एक वर्षे दोन दिवस झालले आहेत. त्या दिवशी या राज्याचे मुख्यमंत्री माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कोकण विकास पॅकेज जाहीर झाले. त्याचप्रमाणे 1988 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. शंकरराव चव्हाण यांनी कोकणासाठी एक फलोद्यान योजना जाहीर केली होती. कोकणात आंबा, फणस,नारळ, रतांबे, काजू, करवंदे जांभळे अशी फळे होतात. माजी कृषिमंत्री डॉ. बाळासाहेब सांवत यांनी दापोली कृषि विद्यापीठाचा 2020 पर्यंतचा कोकणातील फलोत्पादनाचा आराखडा तयार केला होता. त्याप्रमाणे कोकणात जवळ जवळ 6 लाख हेक्टर क्षेत्रातून 2539 लाख फळे उत्पन्न होतील. 10 हजार कोटीची उलाढाल होईल आणि 10 लाख लोकांना रोजगार मिळेल तसेच राज्यात डॉलर्स आणण्याची क्षमता कोकणात आहे. असे म्हटले होते हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर संपूर्ण कोकणात दिवाळी-दसरा साजरा करण्यात आला. सर्व पक्षातील लोकांनी आनंद साजरा केला. विधानसभा निवडणुकीमुळे आचारसंहिता सुरु झाली त्यामुळे ते पॅकेज रखडले. निधीची तरतूद व वितरण याला उशीर झाला. त्यामुळे या पॅकेजच्या अंमलबजावणीची प्रक्रिया बरीचशी थांबली त्यामुळे अद्यापपर्यंत कोकण पर्यटण महामंडळाची स्थापना झाली नाही. कोकण पर्यटन महामंडळावर मी दोन शब्द बोलणार आहे.

सभापती महोदय, कोकणातील एकमेव सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर झालेला आहे. हा सिंधुदुर्ग जिल्हा किती सुंदर आहे याचे वर्णन आमचे प्रदेश निवडणूक अधिकारी श्री. शरद हे जम्मू काश्मिरचे पर्यटन मंत्री निवडणुकीच्या निमित्ताने कोकणात आले होते त्यावेळी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

केलेले आहे. ते माझ्याबरोबर धामापूर, तारकर्ली, आंबोली या ठिकाणी दोन-तीन दिवस फिरले. त्या ठिकाणी काही बैठका झाल्या. त्यावेळी त्यांनी मुझे दोन दिन से ऐसा लग रहा है कि जैसे मैं जम्मू-काश्मीर में ही हूँ. असे उद्‌गार काढले आहेत. याचा अर्थ असा की, कोकण अतिशय सुंदर आहे. योगायोगाने आणि परमेश्वराच्या कृपेने का होईना पण आपणाला प्रथमच कोकणचे वित्त मंत्री मिळालेले आहेत. त्यांनी कोकणासाठी भरभरुन दिलेले आहे. जसे कोकणाच्या बाजूला गोवा आहे आणि जसा गोवा पर्यटनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न देतो त्याप्रमाणे कोकणही उत्पन्न देऊ शकेल यासाठी कोकणासाठी स्वतंत्र अभ्यासगटाची स्थापना करण्याची आवश्यकता आहे.सभापती महोदय, मी याठिकाणी काही सूचना करणार आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी यासाठी तज्ञांची समिती नियुक्त करावी. डेव्हलपमेन्ट प्लॅन तयार करावा व कालबध्द कार्यक्रम आखावा. टप्प्याटप्प्याने निधी द्यावा. केवळ कोकण पॅकेजसाठी पाच ते दहा हजार कोटी रुपये देऊन चालणार नाही तर त्यासाठी तज्ञांचा स्वतंत्र अभ्यास गट नेमण्यात यावा.आणि जसा आराखडा तयार करण्यात येईल त्यापध्दतीने निधी देण्यात यावा.

सभापती महोदय, या राज्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, कोरडवाहू जमीन ओलिताखाली आणण्यासाठी 1962 साली बर्वे आयोगाची स्थापना झाली. पाणी अडविण्यासाठी कृष्णा-गोदावरी लवाद बसविण्यात आला. अनुशेष दूर करण्यासाठी दांडेकर समिती अस्तित्वात आली. भूगर्भाचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र समिती अस्तित्वात आली. अवर्षण -प्रवर्षणाचा अभ्यास करण्यासाठी 1983 ला सुब्रम्हण्यम समिती नेमण्यात आली. त्यानंतर कोकणासाठी एक स्वतंत्र पाठबंधारे विकास महामंडळ तयार करण्यात आले.

...यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

या समित्या आल्यानंतर आपण कोकणासाठी एक स्वतंत्र पाटबंधारे विकास महामंडळ निर्माण केले. श्री. साईनाथ चव्हाण यांना आपण कोकण पाटबंधारे महामंडळाचे अध्यक्ष केले. त्यांना फक्त साडेचार महिने मिळाले त्यामुळे ते काही करु शकले नाहीत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आज आपण या चर्चेसाठी जो वेळ ठरविलेला आहे त्या वेळेत उत्तर होणे अवघड दिसते. त्यामुळे उद्या जर या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर द्यावयाचे असेल तर त्याची वेळ ठरवावी. सन्माननीय सदस्यांना जे विचार मांडावयाचे असतील त्याबाबतीत निश्चित वेळ ठरवावी लागेल. कारण आज या चर्चेसाठी ठरविलेली वेळ संपत आलेली आहे. आपण वेळेच्या बाबतीत ठरवावे.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : आज सभागृहापुढे खूप कामकाज आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या चर्चेचे उत्तर उद्या ठेवले तरी चालेल.

**तालिका सभापती** : आज या प्रस्तावावरील चर्चा 12.45 वाजता थांबवावी लागेल.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा दोन-तीन दिवसांपूर्वीच घेण्यात येणार होती परंतु शासकीय स्तरावर काही अडचणी आल्यामुळे ही चर्चा दोन-तीन दिवस पुढे ढकलली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांना सहभागी व्हावयाचे असेल तर त्याला आपण बंधन घालू नका. सर्व सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलू द्यावे. उद्या सकाळी 11.30 वाजता चर्चा घ्यावी. बाकीचे विषय घेऊ नका. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या ठिकाणी कोकणासंबंधीची चर्चा होत असताना उद्या 10 लक्षवेधी सूचना लावणार असतील तर दहा लक्षवेधी सूचना कशाला ठेवता ?

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या प्रस्तावावर उद्या 1 तास चर्चा ठेवावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, 1990 मध्ये स्वतंत्र पाटबंधारे किंवा जलसंपदा विभाग निर्माण झाला. त्यासाठी मंत्री, राज्यमंत्री झाले पण एवढे करुनही आतापर्यंत कोकणातील एक हेक्टर सुध्दा भूभाग ओलिताखाली आलेला नाही. त्या ठिकाण्‍ी कालवे झालेले नाहीत. धामापूर

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

श्री. सुभाष चव्हाण ....

तलावात भरपूर पाणी आहे. संपूर्ण जिल्ह्याला पुरेस एवढे पाणी आहे पण त्यासाठी जी यंत्रणा राबवावयास पाहिजे ती राबविली जात नाही. धामापूरला शिवकालीन कालवे आहेत. त्यासाठी निधी दिला त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे आभार मानतो. यावेळी पुरवणी मागण्यांमध्ये त्या गावाचे नाव आलेले आहे.

सभापती महोदय, कोकणातील सिंचन राज्याच्या इतर विभागाच्या तुलनेत मागे पडलेले आहे. त्यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करावी. त्यासाठी आराखडे आणि नियोजनबध्द कार्यक्रम तयार करावा. सिंचनाच्या बाबतीत कालबध्द कार्यक्रम तयार करावा. या बाबतीत तीन महिन्यात अहवाल मागवावा. विधिमंडळामध्ये त्यावर चर्चा करावी. कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून कोकणात सिंचन क्षमता निर्माण व्हावी यासाठी वेगळे पॅकेज द्यावे. या ठिकाणी कोकण भागातील 29 ते 30 आमदार आहेत. कोकण हा महाराष्ट्राचा आर्थिक कणा म्हणून उभा राहू शकतो. एवढी क्षमता या कोकणच्या मातीत आहे. सर्व आमदारांनी एकजुटीने काम केले तर निश्चितपणे आपल्याला न्याय मिळेल.

सभापती महोदय, मी माननीय वित्त मंत्र्यांना कळकळीची विनंती करतो. आपण पॅकेजमध्ये काही पैसे दिलेले आहेत. आपण श्रीक्षेत्र हरिहरेश्वरसाठी पुरवणी मागण्यांमध्ये 10 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे् रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र परशुरामसाठी 10 कोटी रुपये दिलेले आहेत. परशुराम हा रामाचा सहावा अवतार आहे. परशुरामाने कोकणाला एक शाप दिला होता की, कोकणातील लोक अर्धपोटी राहतील. परंतु कोकणातील अर्थमंत्री झाल्यावर आपण आम्हाला 10 कोटी रुपये देऊन ही भूमी शापमुक्त केलेली आहे. आपण श्रीक्षेत्र हरिहरेश्वरला 10 लाख रुपये दिले तसेच आपण 5 कोटी रुपये देऊन परशुरामाचा आशीर्वाद घ्यावा. धामापूर येथे आपण वेगवेगळ्या भागातून पैसे मिळविलेले आहेत. फ्लोटींग पध्दतीच्या 16 बोटी आलेल्या आहेत. देशातील पहिली प्रदूषण विरहित बोट आणून त्या ठिकाणी इकोटुरिझमचा पहिला प्रयोग सुरु झालेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

त्यामुळे तेथे 500 पर्यटक येत होते आता 5,000 पर्यटक येऊ लागले आहेत. तेथे प्रदूषणमुक्त बोटी सुरु झाल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री.विक्रमकुमार हे वास्तुविशारद आहेत. ते मला या कामासाठी भरपूर सहाय्य करीत आहेत. त्यामुळे मी त्यांचे कौतुक करतो. वित्त विभागाचे प्रधान सचिव श्री.सुनील सोनी हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे जिल्हाधिकारी होते. त्यांना सुध्दा या कामाची कल्पना आहे. त्यांनी या कामासाठी निधी दिला तर श्री.सुनील सोनी यांचे देखील हिवाळी अधिवेशनात कौतुक व गौरव करण्यात येईल. वित्त विभागाने धामापूर येथील जंगल सफारीसाठी 14 कोटी रुपये मंजूर केले आहेत ते तातडीने रिलीज केले जावेत.

सभापती महोदय, केरळमध्ये पेरीयार आहेत. त्याप्रमाणे कोकणामध्ये बॅक वॉटरच्या ठिकाणी बोटींची व्यवस्था करावी. सिंधुदुर्ग जिल्हाधिका-यांनी 38 हजार हेक्टर जमीन वन संज्ञे खाली असल्याची नोंद केलेली आहे. राज्यातील संपूर्ण जिल्हयांमधील वन संज्ञेखाली जमीन 20 हजार हेक्टर आहे. परंतु आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयात 38 हजार हेक्टर जमीन वन संज्ञेखालील असल्याची नोंद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील क्षेत्रफळापैकी 49.5 टक्के जमीन ग्रीन कव्हर म्हणून नोंदली आहे. 10.80 टक्के म्हणजे 55,538 हेक्टर इतकी जमीन वन विभागाच्या मालकीची आहे. 8 टक्के क्षेत्र 42,242 हेक्टर वन संज्ञेखाली दर्शविली आहे. त्यामुळे विकासासाठी केवळ 19 टक्के जमीन शिल्लक राहिली आहे. त्यावेळच्या जिल्हाधिका-यांनी हया नोंदी केलेल्या आहेत. हया नोंदी चुकीने झालेल्या आहेत त्या तातडीने रद्द करण्यात याव्यात अशी मी मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि येथेच थांबतो.

-----

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

2......

NTK/ SBT/ MMP/

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 260 अन्वये कोकणाच्या संदर्भातील प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. परंतु मी केवळ टूरिझम व इन्फ्रास्ट्रक्चर या विषयापुरते माझे भाषण मर्यादित ठेवणार आहे. कोकणाला 720 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे असे म्हणतात. परंतु गोव्याला केवळ 101 किलोमीटर इतकाच समुद्र किनारा आहे. त्याची तुलना केली तर सिंधुदुर्ग जिल्हयाला 121 किलोमीटर इतका समुद्र किनारा आहे, रत्नागिरी जिल्हयाला 257 किलोमीटर समुद्र किनारा आहे आणि रायगड जिल्हयात 172 किलोमीटर समुद्र किनारा आहे. आज कोकणामध्ये किती विदेशी पर्यटक येतात त्याची मला कल्पना नाही. परंतु सन 2007-08 सालामध्ये गोव्यात 21,58,466 पर्यटक आले होते. 4 लाख स्थानिक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात अशी माझी माहिती आहे. कोकणातील हॉटेलची संख्या आणि गोव्यातील हॉटेलची संख्या पाहिली तर कोकणातील हॉटेलची संख्या नगण्य आहे. मालदीव, मॉरिशस, सिंगापूर, श्रीलंका या देशांना समुद्र किना-याने वेढलेले आहे. या देशांची अर्थव्यवस्था आणि गोव्याची अर्थव्यवस्था पर्यटनावर उभी राहिलेली आहे. केरळ या राज्याची अर्थव्यवस्था देखील पर्यटनावर अवलंबून आहे. तेथे अनेक बॅक वाटर्स आहेत. कोकणातील समुद्र किना-यावर देखील बॅक वाटर्स आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:40

(श्री. प्रकाश बिनसाळे...

मॉरिशसमध्ये समुद्र किना-याचा वापर टुरिझमसाठी करीत असताना इकॉलॉजी बॅलन्सही मेण्टेन केला जातो. तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करुन त्या ठिकाणी विविध सुविधा निर्माण करण्याचे काम त्या त्या सरकारांनी केलेले आहे.

सभापती महोदय, कोकणाच्या विकासाच्या संदर्भात बोलत असताना आपण एक दशक मागे वळून पाहिले तर असे दिसून येईल की, कोकणाच्या विकासासाठी श्री. शरद पवार साहेबांनी चारसूत्री विकास कार्यक्रम दिला. त्यातील एका सूत्राची अंमलबजावणी कोकणामध्ये चांगल्या प्रकारे झालेली आहे आणि ते सूत्र म्हणजे फलोत्पादन. आपण कोकणामध्ये रत्नागिरी जिल्हयातून प्रवेश करुन फेरफटका मारला तर आंबा आणि काजूच्या बागा फार मोठ्या प्रमाणावर पहायला मिळतात. आता आपण पर्यटनाच्या माध्यमातून कोकणाचा विकास करण्याची भाषा बोलत आहोत. पर्यटनाच्या माध्यमातून आपण फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करु शकतो. या सभागृहामध्ये युवा धोरणाच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी युवकांना रोजगार मिळत नाही, लाखोंनी तरुण बेरोजगार आहेत, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत अशा प्रकारचे मुद्दे मांडले गेले. शासनाने कोकण हे पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केले. पण केवळ घोषणा करुन विकास होत नाही. पर्यटनाचा चांगल्या प्रकारे विकास करण्यासाठी चांगले इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करावयास पाहिजे. सभापती महोदय, गोव्याची स्थिती काय होती ? दोन गाड्या एकत्रितपणे जाऊ शकत नाही अशी गोव्याची परिस्थिती आहे. तरी तेथील पर्यटन विकसित झाले. त्यांना माहीत होते की, गोव्याचा विकास करण्यासाठी प्रथम पर्यटनाच्या संदर्भातील आर्थिक व्यवस्था बळकट करावी लागेल. फलोत्पादन कार्यक्रम राबविल्यामुळे कोकणातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढले. परंतु एवढ्यावरच थांबता कामा नये. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या तीन जिल्ह्यामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने इन्फ्रास्ट्रक्चर विकसित झाले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, पंचतारांकित हॉटेलांसाठी कोकणामध्ये जमिनी घेऊन ठेवलेल्या आहेत. परंतु पाणी आणि चांगल्या रस्त्यांची सोय नसल्यामुळे पंचतारांकित हॉटेलासाठी घेऊन ठेवलेल्या जमिनी कोणीही विकसित करीत नाहीत. सभापती महोदय, या विषयावर खूप बोलता येण्यासारखे आहे.

सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी आंग्रे बेटाचा उल्लेख केला. या बेटावर चांगल्या प्रकारचे मरीन लाईफ आहे. अशा ठिकाणी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.प्रकाश बिनसाळे....

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. मग स्कुबा डायव्हिंग असेल, मरीन लाईफ एक्प्लोअर करण्याची बाब असेल, अशा गोष्टींसाठी राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला विचारु इच्छितो की, कोकणाच्या विकासासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात येणार आहे की नाही ? कोकणातील पर्यटनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल, आर्थिक व्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. परंतु केवळ एकाच बाजूचा विकास करीत असताना दुस-या भागाच्या विकासाबाबत कोंडी केली जात आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही....

श्री. दिवाकर रावते : एकाच बाजूचा विकास म्हणजे कोणत्या बाजूचा विकास ?

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील माणसाला वाटते की विदर्भाचा विकास होतो आणि विदर्भातील माणसाला वाटते की, कोकणाचा विकास होतो.

...नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भाचे लोक म्हणतात कोकणाचा विकास होतो. कोकणातील लोक म्हणतात पश्चिम महाराष्ट्राचा विकास होतो. सन्माननीय सदस्यांनी विदर्भाबाबत आवाहनकारक बोलू नये.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी कोणाचा अवमान करु इच्छित नाही. असमतोल विकासामुळे लोकांच्या मनामध्ये जी भावना निर्माण झालेली आहे त्याचे उदाहरण सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. कोणत्याही भागातील लोकांचा अवमान करण्यासाठी मी हे बोलत नाही एवढेच नमूद करु इच्छितो.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : ही चर्चा याठिकाणी थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे हे ऑन लेग राहतील. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी एक विनंती करु इच्छितो. सन्माननीय सदस्यांच्या विनंतीप्रमाणे हा प्रस्ताव उद्या सकाळी 10.00 वाजता चर्चेला घेण्यात यावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला येणार आहे. त्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण राहिल्यास ती उद्या सकाळी घेण्यात यावी अशी आमची विनंती राहणार आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी केलेली विनंती आम्हाला मान्य नाही.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.45 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर डब्ल्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**कामकाज पत्रिकेवरील दिवसाच्या कामकाजासंबंधी**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर जवळपास 16.5 तासाचे कामकाज दाखविण्यात आलेले आहे. एवढे कामकाज एकाच दिवशी घेणे शक्य नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या अधिवेशनात एकही दिवस सभागृहाची बैठक स्थगित झालेली नाही. गेले दहा दिवस सभागृहाचे काम सुरु आहे, त्यातील एकही तास वाया गेलेला नाही. तसेच दररोज सकाळी सभागृहाची विशेष बैठक घेऊन तसेच संध्याकाळी देखील 9 ते 9.30 पर्यंत बसून कामकाज उरकण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेवरील अजेंडा पाहिला असता ते कामकाज 16 तासाचे असेल एवढे आहे. एवढे कामकाज एकाच दिवशी घेणे अशक्य आहे. म्हणून सुरुवातीलाच आमची मागणी होती की सभागृहाच्या कामकाजाचा कालावधी एक आठवड्याने वाढवावा. माननीय सदस्य स्व. मधुकरराव सरपोतदार हे नेहमीच मुद्दा उपस्थित करीत होते की, एवढा वेळ कामकाज करण्यासाठी बसायला आम्ही वेठबिगार आहोत काय ? म्हणून अशा प्रकारे एकाच दिवशी एवढे कामकाज करणे योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, कामकाजाच्या अनुषंगाने माझा नेहमीच वाद होत असतो. परवा देखील कामकाज सल्लागार समितीमध्ये कामकाजाला अनुसरुन अशीच टिंगल-टवाळी झाली आणि आपल्याला एक शब्दही बोलण्याची संधी मिळाली नाही. कारण चौथ्या मिनिटाला कामकाज सल्लागार समितीची बैठक संपली असा प्रकार झाला. या अधिवेशनात विधान परिषदेमध्ये आमच्या कडून जी विधेयके पास करावयाची होती ती आम्ही मान्य करुन दिलेली आहेत. परंतु आज आणखी किती तरी विधेयके दाखविण्यात आली आणि एवढी विधेयके पास करावयाची म्हणजे ती विधेयके चर्चेविना पास करावी अशी अपेक्षा असते. हे योग्य नाही म्हणून आम्ही अधिवेशनाचा कालावधी एक आठवडा वाढवावा अशी मागणी केली होती. कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही सुध्दा उपस्थित असतो. सत्ताधारी पक्षाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कामकाज मंत्री आणि महसूल मंत्री हे उपस्थित असतात. माननीय महसूल मंत्री तर म्हणाले काही गरज नाही, आटोपून घ्यावे, तेव्हा आपल्याला एक शब्दही बोलू दिला नाही, ही

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

पध्दत योग्य नाही, असे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. चहा वगैरे येण्यापूर्वीच बैठक आटोपली आणि सर्व निघून गेले. विधानसभेची कामकाज सल्लागार समिती मात्र एक तास चालली आणि आपली तीन मिनिटात संपली. आमच्याकडून काही चूक झालेली आहे काय, सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले असेही घडले नाही. तरी सुध्दा आजच्या कामकाज पत्रिकेवर जेवढे कामकाज दाखविलेले आहे ते बघितले तर ते एका दिवसात होणे शक्य दिसत नाही, याबाबत निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, गेले तीन दिवस तर ज्यांना आपण सभागृहाच्या कामकाजाचा अनिवार्य घटक समजतो ते तारांकित प्रश्न सुध्दा कामकाजातून वगळण्यात आलेले आहेत, याची सुध्दा नोंद घेणे आवश्यक आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, गेल्या आठवड्यापासून या सभागृहात मी विनंती करीत आहे की, नियम 93 ची निवेदने सुध्दा चर्चेला घ्यावीत. आजच्या कामकाजामध्ये फक्त एकच निवेदन आलेले आहे. गेल्या दोन तीन अधिवेशनांपासून अशी परिस्थिती निर्माण होत आहे की, शेवटच्या दिवशीच एकत्रितपणे निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात त्यामुळे त्या निवेदनांवर चर्चाही करता येत नाही. या गोष्टींवरही बंधन आणले पाहिजे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, श्री. जयंत प्र.पाटील यांनी कामकाजाच्या अनुषंगाने काही सूचना केल्या आहेत. तसेच कामकाज सल्लागार समितीमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. दिवाकर रावते तसेच सत्तारुढ पक्षाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्री व अन्य सदस्य असतील यांची चर्चा झाली, त्या बैठकीचे इतिवृत्त देखील आपण सभागृहात मंजूर केले. त्यात आपण अधिवेशनाचा कालावधी वाढविण्याचा आग्रह धरला होता त्या अनुषंगाने अधिवेशनाचा कालावधी दोन दिवसांनी वाढविण्यासंबंधीचा निर्णय झाला होता.......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

त्यानुसार अधिवेधनात आज आणि उद्या सभागृहाचे कामकाज होणार आहे. नियम समितीच्या माध्यमातून आपल्याला चांगल्या प्रकारचे निर्णय घेता आलेले आहेत. यामध्ये नियम 260 च्या प्रस्तावाला अडीच तासाचा अवधी दिला जात असतो. परंतु नियम असा सांगतो की, या प्रस्तावावर मंत्र्याचे उत्तर सोडून बाकीची जी वेळ असते ती दोन्ही बाजूंना निम्मी निम्मी या प्रमाणात विभागून दिली जात असते. या अधिवेशनात 2-4 प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. या प्रस्तावांवर एकूण किती वेळ चर्चा झाली याची माहिती आता माझ्याकडे नाही परंतु या चर्चा फार चांगल्या पध्दतीने झालेल्या आहेत. यापुढे वेळेत राहून चर्चा संपवावयाची का ? सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात माझे धोरण लवचिक असते. एखादी चर्चा चांगल्या प्रकारे होत असेल, मूलभूत पध्दतीने होत असेल तर त्याकरिता ती चर्चा अडीच तास, तीन तास, चार तास होईल परंतु शेवटच्या दोन दिवसात देखील आपण असेच करावयाचे म्हटले तर त्याला माझा नाईलाज राहील. कार्यक्रम आखतांना माझ्या लक्षात आले होते की आजचा कार्यक्रम जास्त आहे. आज सकाळी कोकणाच्या संदर्भात चर्चा होती परंतु ही चर्चा देखील अपूर्ण राहिलेली आहे. उद्या सभागृहाच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. मराठी भाषेच्या संदर्भातील प्रस्तावावर तीन-चार दिवस चर्चा झालेली आहे. या चर्चेला आज उत्तर दिले जाणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आज आपल्यासमोर काम जास्त आणि वेळ कमी, अशी स्थिती आहे. आज एकूण 9 लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आहेत. लक्षवेधी सूचना 45 मिनिटात पूर्ण कराव्यात अशी मर्यादा आपण घालून घेतलेली आहे. दरम्यानच्या काळात ज्या काही लक्षवेधी सूचना झाल्या त्या 45 मिनिटात कधीच पूर्ण झालेल्या नाहीत. आज आपल्याला जेवढे काम करणे शक्य आहे तेवढे काम आज आपण करु. कोकणाच्या चर्चेच्या संदर्भात मी कोकणातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे प्रश्न अत्यंत आवश्यक आहेत, जे प्रश्न कोणी मांडले नाहीत तेवढेच प्रश्न मांडले आणि अशा पध्दतीने जर चर्चा केली तर या चर्चेला उत्तर मिळू शकेल व हा विषय पूर्ण होऊ शकेल, असे मला वाटते. पुढील काळात अशा प्रकारचा कार्यक्रम आखण्याचा प्रसंग येईल त्यावेळी त्यासंदर्भात या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुडकर साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/ 13:05

**सभापती** .....

यांनी जे विचार या चर्चेच्या अनुषंगाने मांडले त्याबाबतीत माझाही तसाच निर्णय राहील. मी जेव्हा आमदार होतो त्यावेळी लक्षवेधी सूचना काही कारणामुळे पुढे गेल्या तर त्या लक्षवेधी सूचना परत चर्चेसाठी उपस्थित होत नव्हत्या. दोन दोन दिवस वाट बघून सुध्दा काही कारणामुळे पुढे गेलेल्या लक्षवेधी सूचना चर्चेसाठी येत नसायच्या आणि नंतर सांगितले जायचे की, आता या लक्षवेधी सूचना सभागृहापुढे चर्चेसाठी येणार नाहीत. त्यामुळे आता अशा प्रकारे पुढे गेलेल्या लक्षवेधी सूचना परत येणे कठीण आहे व याबाबतीत मी निर्णय घेतलेला आहे. कामकाज सल्लागार समितीत म्हणण्यापेक्षा नियम समितीत या विषयाच्या बाबतीत मी सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करेन की, एक वेळा लक्षवेधी सूचना लॅप्स झाली की, ती बाजूला काढून ठेवायची. परंतु आजच आपण त्याबाबत नकारार्थी विचार करण्याचे काय कारण आहे ? आजच्या व उद्याच्या कामकाजाच्या दृष्टीने सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य करावे. चर्चा 7 तास चालणार नाही याची काळजी घेण्यात येईल. अडीच तासाची चर्चा तीन तास होईल, साडेतीन तास होईल यासाठी जरुर प्रयत्न करण्यात येतील.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात देखील विरोधी पक्षाचा अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेसाठी आला नव्हता. तेव्हा अंतिम आठवडा प्रस्तावाचे काय होणार आहे ? परवाची नियम 97 ची चर्चा आणि अंतिम आठवडा प्रस्ताव आपण आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविलेला आहे. या शिवाय तिसरी एक चर्चा आहे. त्याचे उत्तर आज होणार आहे. तेव्हा आजच्या दिवसाच्या कामकाजाचे नियोजन कसे करणार आहात या बाबत सभागृहाला अवगत करावे.

**सभापती** : आजच्या कामकाजासंबंधीची वस्तुस्थिती कामकाज पत्रिकेमध्ये आलेली आहे. आजची कामकाज पत्रिका पाहिल्यानंतर ते काम दोन दिवसात संपणारे नाही, असे दिसून येते. आज अंतिम आठवडा प्रस्तावरील आणि नियम 97 वरील चर्चा संपल्यानंतर पुढचे कामकाज कसे काय घ्यायचे हे आपण सभागृहाच्या अनुमतीने ठरवू या. आता मी पुढच्या कामकाजाकडे वळतो.

.............

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**:तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील दुष्काळी तालुक्यासाठी दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याबाबत" या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.विनोद तावडे, श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर, वि.प.स. व श्री.प्रकाश शेंडगे, श्री.मधुकर चव्हाण, माजी वि.प.स.यांच्या दिनांक 25 मार्च 2008 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 39721 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय व गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे सन 2006-2007 चे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा व लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचे सन 1998-99, 1999-2000 व 2000-2001 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, एका गोष्टीकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. आता सन 2010 सुरू आहे आणि सभागृहासमोर सन 1998-99, 1999-2000 व 2000-2001 चे वार्षिक अहवाल ठेवण्यात आले आहेत. इतक्या विलंबाने हे अहवाल येत असतील तर चुकीचे आहे. आम्ही विचारलेल्या प्रश्नासंबंधीचा अहवाल आठ-दहा वर्षाने आला तर तो पर्यंत आमची मुदत संपलेली असेल. तेव्हा शासनाने इतक्या विलंबाने अहवाल सभागृहासमोर ठेवू नये यासंबंधी आपण शासनाला सूचना करावी अशी मी विनंती करीत आहे.

**सभापती** : याची शासनाने नोंद घेणे जरुरीचे आहे. विविध महामंडळांचे अहवाल हे सभागृहाच्या पटलावर वेळेत आले पाहिजेत. काही अन्य कारणांमुळे एक-दोन वर्ष विलंबाने आले तर ते समजू शकतो. तेव्हा मंत्रिमहोदयांनी याबाबत संसदीय कार्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून सर्व विभागांना सूचना देण्याच्या दृष्टीने मी शासनाला सक्त ताकीद देतो की, सदर अहवाल वेळेत सदनाला सादर करावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपल्या सूचने प्रमाणे निश्चित कार्यवाही केली जाईल. अहवाल सादर करण्यास विलंब का लागतो याला देखील काही वेगळी कारणे आहेत. त्याच्या तपशीलात न जाता आपल्या सूचनेप्रमाणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आमच्या विभागातर्फे केला जाईल.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचासन 1999-2000 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅफको लिमिटेडचा सन 2005*2006 व 2006-2007 चा अनुक्रमे 35 वा व 36 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

......................

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.रमेश शेंडगे(समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

राज्यातील आदिवासींसाठी लादण्यात आलेले आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्राबाहेरील आदिवासींना सद्या असलेले क्षेत्रीय बंधन उठवून राज्यातील सर्व आदिवासींना समान न्याय मिळण्यासाठी मूलभूत सुविधा व वैयक्तिक लाभाच्या योजनेवर खर्च करण्यात यावा.

दुसरी महत्वाची बाब अशी की, आदिवासी लोकांना जातीचे प्रमाणपत्र पडताळणीमध्ये अतिशय त्रास होत आहे. महाराष्ट्र अधिनियम, 2001 च्या कलम 7(2) अन्वये जात पडताळणी समितीच्या निर्णयास फक्त माननीय उच्च न्यायालयातच आव्हान देता येते. हे कलम आदिवासी जनतेला न्याय देण्याऐवजी त्या जनतेवर अन्याय करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मोकळीक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. म्हणून महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-23 -2001 मधील कलम 7(2) व कलम 9 सदर कलम वगळण्याबाबत विभागाने त्वरित कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे जात पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयाला प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे आव्हान करण्याबाबतची तरतूद करण्यात यावी अशी समितीने शिफारस केलेली आहे.

**सभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज सादर करणे

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "डॉ.आण्णासाहेब चौगुले अर्बन को.ऑपरेटीव्ह बँक, पेठवडगाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर या बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीमध्ये शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतो.

**सभापती** :विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची एक प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील आर्थररोड कारागृहात कैद्यांना पंचतारांकित सुविधा मिळत असल्याबाबत**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण 93 अन्वये वरील सूचना वाचण्यापूर्वी मी एक बाब आपल्या अनुमतीने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आजच्या वर्तमानपत्रात बातमी आली आहे की, "राज्याचे गृह राज्यमंत्री मुंबईतील आर्थर रोड कारागृहास भेट देण्यासाठी गेले असताना तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना भेट न देण्याचा सल्ला देताना सांगितले की, त्याठिकाणी डेंजर कैदी आहेत." पुढे अशीही बातमी छापलेली आहे की, "या कारागृहातील कैद्यांना पंचतारांकित हॉटेलप्रमाणे सुविधा मिळतात." राज्यातील गृह राज्यमंत्री सुरक्षित नाहीत असे पोलीस अधिकाऱ्यांना वाटते काय ? शिवाय तेथील कैद्यांना पंचतारांकित हॉटेलप्रमाणे सुविधा मिळत असतील तर येथे बसण्यापेक्षा त्याठिकाणी गेलेले बरे. कैद्यांना पंचातारांकित हॉटेलप्रमाणे सुविधा मिळतात म्हणजे नक्की कोणत्या सुविधा मिळतात याची माहिती सभागृहाला अवगत होणे आवश्यक आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे हा विषय मांडण्याची परवानगी मागितलेली आहे तर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. याठिकाणी सन्माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील उपस्थित आहेत. त्यांनी माननीय गृहमंत्र्यांना या संदर्भात निवेदन करण्यास सांगावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, होय.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी "चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, पोभूर्णा तालुक्यात धान पऱ्ह्यावर मोठ्या प्रमाणात लष्कर अळींचा प्रादूर्भाव होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी" नवी मुंबईतील व्ही शॉपिंग मॉल, टायना मिक्स, रघुलीला मॉल इत्यादी 20 मॉल्सनी मुद्रांक शुल्काबाबतचे दस्तऐवज तसेच रक्कम न भरणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.गायकवाड.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे,वि.प.स. यांनी " मुंबई सेन्ट्रल बस डेपोजवळ असणारी हाजी जकेरिया हाजी अहमद पटेल यांनी वक्फ बोर्डाला अनाथ मुलांच्या कल्याणासाठी दिलेली साडेचार एकर जमीन कोटयावधी रुपयांना परस्पर विक्री केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर,वि.प.स.. यांनी "रत्नागिरी शहरालगतच्या मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्यासाठी सिंधुराज ड्रेजरव्दारे 5 ते 6 कोटी रुपये खर्च करुनही गाळ काढण्याचे काम पूर्ण न झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील,वि.प.स..यांनी " उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पदांच्या आढाव्यानुसार व्यवसाय शिक्षण राबविणा-या सर्व अशासकीय अनुदानित संस्थांमधील अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांचे समायोजन करण्याचे शासनाने निदेश देणे, समायोजनाअंतर्गत उच्च पदावर व वेतन श्रेणीत काम करणा-या कर्मचा-यांवर निम्न पदावर व निम्न वेतन श्रेणीवर समायोजन करण्याचे आदेश देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर वि.प.स.यांनी " दिनांक 15 व 16 जुलै 2010 रोजी अनुक्रमे आमगाव तालुक्यातील (जि.गोदिंया) ग्राम म्हाली येथील ताराचंद्र लक्ष्मण शेंडे, नरेंद्र सोमा शेडे व जितेंद्र बाळकृष्ण शेंडे तसेच गोरेगाव तालुक्यातील ग्राम तुमसर येथील रेवलाल अनंतराव कुंभारे, ग्यानीराम साधू खंडाळकर व राजेश ग्यानीराम खंडाळकर यांचा विहिरीतील पाण्याच्या मोटार पंप दुरुस्ती करता विहिरीत उतरले असता विहिरीतील विषारी वायूमुळे मृत्यू झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र पाटील,वि.प.स. यांनी "पेण येथील उप जिल्हा रुग्णालयात अपु-या सोयी सुविधा, औषधांचा अपुरा साठा, वैद्यकीय अधिका-यांच्या रिकाम्या जागा असल्याने तेथे उपचारासाठी येणा-या रुग्णांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पाशा पटेल, संजय केळकर, रामनाथ मोते.,वि.प.स.यांनी " मुंबईतील मध्यवर्ती कारागृहामध्ये अबू सालेम गुंडास अन्य कैद्यांनी दोन दिवसांपूर्वी तुरुंगात मारहाण केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,रामनाथ मोते संजय केळकर चंद्रकांत पाटील,वि.प.स.यांनी " मालाड पूर्व येथील राणी सती मार्गावरील खोत डोंगरी को ऑप हौसिंग सोसायटीमध्ये तसेच जयअंबे सोसायटी, वराडपाडा सोसायटी, नवजीवन सोसायटी,सहयाद्री सोसायटी, नवदुर्गा सोसायटीमध्ये एसआरए प्रकल्पांतर्गत योग्य पुरावे नसतांनाही काही झोपडपट्टी धारकांचा अनधिकृतपणे समावेश केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.धनंजय मुंडे, संजय केळकर वि.प.स. यांनी " दिनांक 24 जुलै 2010 रोजी बीड नगर राज्य महामार्गावर केज तालुक्यातील 15 व्यापा-यांना दरोडेखोरांनी मारहाण करुन 41 लाखांची रक्कम लुटल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

--------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने सभागृहात लवकर करण्यासंबंधी</u>**

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनासंबंधी सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी मधाशी सूचना केल्याप्रमाणें मला सांगावयाचे आहे की, ज्यावेळी नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या अनुषंगाने सभापती शासनाला निवेदन करण्यास सांगतात त्यावेळी ती निवेदने तातडीने सभागृहात करण्यात आली पाहिजेत या दृष्टीने नियम समितीने एक निश्चित नियम केलेला आहे. त्या नियमाप्रमाणे सहा दिवसामध्ये सभागृहात निवेदन केले गेले पाहिजे. परंतु आतापर्यत फक्त 35 निवेदने वितरित करण्यात आलेली आहेत. अजूनही किमान 15 ते 20 निवेदने वितरित व्हावयाची आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्यापेक्षासुध्दा जास्त निवेदने अजून व्हावयाची आहेत.

**सभापती** :ठीक आहे. माननीय मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मी सांगतो की, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे तेव्हा उद्या सगळी निवेदने करण्यात यावीत या संबंधी तुमच्या पी.ए.च्या मार्फत सर्व विभागांना कळविण्यास सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या निवेदने करण्याच्या बाबतीत आपण जे निदेश दिले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु या निमित्ताने मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सहा दिवसात करण्यात आली पाहिजेत. परंतु तेवढया कालावधीमध्ये निवेदन करण्यात येत नसेल तर वेळेवर निवेदन न करणा-या खात्यातील संबंधित व्यक्तीवर शासनाने कारवाई करावी अशा प्रकारे नियम समितीमध्ये आपल्याला आणखी नियम करावा लागेल . अन्यथा वेळेवर निवेदन होत नसल्यामुळे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे असे म्हणाल्या होत्या की नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर जर वेळेवर निवेदने होत नसतील तर 93 अन्वयेची सूचना कशासाठी द्यावयाची.?.

**सभापती** : यानंतर नियम 93 ची निवेदने चर्चेला धेण्यात येतील

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मेहकर, जिल्हा बुलढाण येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव

**मु. शी.** : मेहकर, जिल्हा बुलढाण येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, व्ही. यू. डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

. श्री. राधाकृष्ण विखे पाटील (विधी व न्यायमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र. पाटील, व्ही.यू. डायगव्हाणे यांनी "मेहकर, जिल्हा बुलढाण येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याचा प्रलंबित असलेला प्रस्ताव" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मेहकर, जिल्हा बुलढाणा येथे नवीन न्यायालय इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला असे कबूल केले आहे. परंतु त्या प्रस्तावाला गती मिळाली पाहिजे ती दिली जात नाही. बार असोसिएशनने न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. तेव्हा या बार असोसिएशनला विश्वासात घेऊन तातडीने न्यायालय मान्य करण्याचा विचार करणार काय? आणि वकिलांमधील असंतोष दूर करण्याचा प्रयत्न करणार काय?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, नामदार हायकोर्टाच्या मान्यतेच्या बाबतीत हा विषय प्रलंबित होता. आणि त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात तूर्तास भाडे तत्वावर जिल्हा न्यायालय व सत्र न्यायालय स्थापन केले होते. आता शासन स्तरावर त्याबाबत पाठपुरावा केल्यानंतर कालच हायकोर्टाने या प्रस्तावाला मान्यता दिली आहे, व तशाप्रकारची सूचना बार असोसिएशनला पाठविल्यानंतर त्यांनी देखील आपले आंदोलन स्थगित केले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विदर्भातील राईस मील धारकांनी धानाची भरडाई बंद केल्यामुळे धान उत्पादकांचे होत असलेले नुकसान

**मु. शी.** : विदर्भातील राईस मील धारकांनी धानाची भरडाई बंद केल्यामुळे धान उत्पादकांचे होत असलेले नुकसान याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख (अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर यांनी "विदर्भातील राईसमील धारकांनी धानाची भरडाई बंद केल्यामुळे धान उत्पादकांचे होत असलेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. दरवर्षी पावसाळयामध्ये धानाचे भाव उत्कर्षाला पोहोचलेले असतात, त्याचा शेतकऱ्यांना लाभ होतो. यावर्षी शेतकऱ्याचे दुर्दैव असे की, हमी भावापेक्षा कमी भावाने धान विकावे लागत आहे. त्यामुळे भंडारा व गोंदिया येथील राईस इंडस्ट्री धोक्यात आली आहे. मागील आठवडयामध्ये मी या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधले होते. भारतीय अन्न महामंडळ हे केंद्र सरकारची नोडल एजन्सी म्हणून काम करते, म्हणून तेथील शेतकऱ्यांना वाऱ्यावर ढकलणे योग्य होणार नाही. माझी महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की, हा जटिल प्रश्न आपण सोडविला पाहिजे. याबाबतीत राज्य सरकार दरवर्षी हस्तक्षेप करुन भावामध्ये वाढ करुन हा प्रश्न सोडविते. त्याप्रमाणे यावर्षी देखील हा प्रश्न सोडविणार काय? दुसरा प्रश्न असा की, 35 टक्क्यापर्यंत तूट आणली आहे, तिचे मी स्वागत करतो. त्याबाबत आपण त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जर आपण तसे केले नाही तर शेतकऱ्यांना नुकसान होते. यामध्ये मिल इंडस्ट्रीचे कोणतेही नुकसान होत नाही. म्हणून हे नुकसान थांबविण्यासाठी व केंद्र सरकारच्या सूचना अंमलात आणण्यासाठी आपण किती कालावधीत कारवाई करणार आहात?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, विदर्भामध्ये मधल्या काळात कमी पाऊस झाल्यामुळे धान परिपक्व झाले नाही. त्यामुळे कच्च्या धानाची भरडाई करतांना त्याचा मोठया प्रमाणावर तुकडा पडत होता. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या नियमाप्रमाणे 35 टक्क्यापर्यंत तुकडयाचे प्रमाण मान्य केले जात होते परंतु आता हे प्रमाण 40 टक्क्यापर्यंत एफसीआयच्या माध्यमातून मान्य करीत आहोत. त्याचप्रमाणे बॉईल राईसचा प्रश्न आहे, वहातुकीचा प्रश्न आहे, मिल चार्जेसचा प्रश्न आहे. या चारही प्रश्नाच्या बाबतीत एफसीआयकडून लवकरात लवकर निर्णय मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे लवकरात लवकर त्याबाबत निर्णय लागेल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये झालेला घोटाळा.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये झालेला घोटाळा याबाबत सर्वश्री किसनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील (परिवहन मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किसनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये झालेला घोटाळा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय. वाहक पदाच्या भरतीसाठी अर्ज स्वीकारण्याची तारीख 12 डिसेंबर ठेवण्यात आली होती. मी स्वत: याबाबतीत एस.टी. च्या अधिकाऱ्यांना भेटलो. त्याठिकाणी एका उमेदवाराने 8 तारखेला अर्ज दिला असतांना त्याच्या अर्जावर 14 तारीख टाकण्यात आली. तसेच, उमेदवारांकडून देण्यात आलेल्या अर्जाला पोहोच देण्याची पध्दत नसल्यामुळे त्यांचे अर्ज गहाळ होण्याची शक्यता आहे.एमसीव्हीसी च्या परिक्षेकरिता अर्जासोबत डीडी घेण्यात आला, परंतु परिक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना हॉल तिकीट नाकारण्यात आले. त्यामुळे अर्ज स्वीकारुन देखील हॉल तिकीट नाकारणाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी या वर्षी पहिल्यांदाच एका तारखेला सर्व जिल्हयात परीक्षा घेण्यात आली. पूर्वी वेगवेगळया तारखांना मुलाखती व्हावयाच्या. त्यामुळे दुसऱ्या जिल्हयातील मुले आपल्या जिल्हयात यायची आणि आपल्या जिल्हयातून दुसऱ्या जिल्हयात जात होती. त्यामुळे स्थानिक उमेदवांरावर अन्याय होत होता. आणि म्हणून पहिल्यांदाच यावर्षी चालक व वाहक पदाकरिता एकाच दिवशी परीक्षा घेण्यात आली. अर्ज घेण्याच्या पूर्वीच्या पध्दतीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी पहिल्या परीक्षेचे निकाल लागल्यानंतर व मुलाखती झाल्यानंतर देखील ज्यांनी अर्ज केले होते, त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याची संधी नाकारली गेली आहे त्यांना दुसऱ्या भरती प्रक्रियेमध्ये संधी द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

(यानंतर श्रीमती. थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

सभापती महोदय, दुसऱ्या टप्प्यामध्ये होणाऱ्या परीक्षेच्या वेळी त्यांना सुध्दा संधी देण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. एमसीव्हीसी ची पोस्ट देण्याबद्दलची जी सूचना आहे त्यासंदर्भात जरुर सूचना देण्यात येतील. एमसीव्हीसीच्या अभ्यासक्रमा बाबत आयटीआयच्या धर्तीवर डायरेक्टर ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग यांच्याबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्याबद्दलच्या सूचना एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

-----

**छायाचित्रकाराने सभागृहात फोटो काढल्याबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहात फोटो कशासाठी काढले जात आहेत?

**सभापती** : सीपीएचा शतकोत्तर कार्यक्रम साजरा होणार आहे. त्यासंदर्भात संसद तसेच विधीमंडळ यांचे फोटो काढावयाचे आहेत. म्हणून मी त्यांना स्पेशल परवानगी दिलेली आहे.

.....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे.

**सभापती** : आज माझ्याकडे दोन-तीन औचित्याचे मुद्दे आलेले आहेत. खरे म्हणजे औचित्याचे मुद्दे शुक्रवारी घेण्यात येतात.परंतु उद्या अधिवेशन संपणार आहे या दृष्टिकोनातून आज ज्या सन्माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दो मांडण्यास परवानगी मागितलेली आहे त्यांना मी परवानगी देणार आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवागनगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा पुढील प्रमाणे आहे. मुंबईमध्ये ऑर्थर रोड कारागृहामध्ये अबू सालेमवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. हा हल्ला कुठल्याही शस्त्राने न करता तो चमच्याने करण्यात आलेला आहे. चमचा हा राजकारणात नेहमी वापरण्यात येणारा शब्द आहे. परंतु त्या चमच्याला धार होती आणि त्या चमच्याचा शस्त्र म्हणून ऑर्थर रोड जेलमध्ये उपयोग करण्यात आलेला आहे. माननीय गृह राज्यमंत्री श्री. रमेश बागवे यांनी या ऑर्थर रोड जेलला अचानकपणे भेट दिली तेव्हा तेथील अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, येथे खतरनाक आरोपी आहेत त्यामुळे आपण तिकडे जाऊ नये. पण माननीय मंत्री महोदयांनी या ऑर्थर रोड जेलला भेट दिल्यानंतर असे निदर्शनास आले की, आबू सालेमच्या खोलीतील स्वच्छतागृह पंचतारांकित हॉटेलला लाजवेल अशा प्रकारचे आहे. तेथे अर्धनग्न अवस्थेतील मॉडेल्सचे पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर आरोपी डोसाच्या खोलीमध्ये पंधरा दिवस पुरेल एवढे जेवण सापडले त्यामध्ये फळेही होते आणि ते कुठल्याही प्रकारची तपासणी न करताच आतमध्ये पोहचलेले होते. सभापती महोदय, ज्या जेलमध्ये कसाब आहे तेथे चौकटीमध्ये जी जाळी आहे त्यातून तो हात पूर्णपणे बाहेर काढू शकतो, असे माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आले. सभापती महोदय, उद्या अधिवेशन संपत आहे. ऑर्थर रोड जेलमध्ये जे आरोपी आहेत त्यांच्यामुळे समाजामध्ये अनागोंदी कारभार होत आहे. कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडत आहे. असे लोक कायदा हातात घेत असतील आणि त्यात जेलमधील लोक सामील असतील आणि असे स्वत: गृहराज्य मंत्री म्हणत असतील तर सभापती महोदय, उद्या अधिवेशन संपण्याच्या आत किंवा आजच गृह विभागाने निवेदन करावे याकडे मी माननीय गृह राज्य मंत्र्यांचे लक्ष वेधीत आहे.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी या मुद्याच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांना काय बोलावे आणि किती गुप्तता ठेवायची याबाबतीत गुप्ततेची शपथ दिली जाते. सभापती महोदय, या संदर्भात मी या सभागृहात दुसऱ्यांदा मुद्दा मांडीत आहे. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना समज द्यावी लागेल. काही शासकीय कामाच्या बाबतीत काही पथ्य पाळली पाहिजेत यासाठी ही गुप्ततेची शपथ देण्यात येते. सभापती महोदय, गुप्ततेची शपथ कशासाठी दिली जाते आणि गुप्ततेच्या शपथेचा अर्थ काय? हे या सभागृहाला कळले पाहिजे. नाही तर आम्ही माननीय मंत्रिमहोदय, टी.व्ही.वर शपथ घेताना बघतो. तेव्हा केवळ टी.व्ही.वर दाखविण्यासाठी ही शपथ नको तर त्याबाबतीत बंधने आणि नियम आहेत. ते नियम या सभागृहाला कळण्याची आवश्यकता आहे, अशी मी डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या औचित्याच्या माध्यमातून अपेक्षा व्यक्त करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. सभागृहात सन्माननीय मंत्रिमहोदय, श्री. पाचपुते उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण याकडे शासनाचे लक्ष वेधावे आणि या अनुषंगाने काळजी घेण्यात यावी.

सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवागनगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्मारकाच्या संदर्भात या सभागृहात शुक्रवारी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने आज सोमवारी शासन निवेदन करेल असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु आतापर्यंत शासनाचे निवेदन आलेले नाही आणि उद्या अधिवेशन संपणार आहे. या दृष्टिकोनातून शासनाने आजच निवेदन करावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, आश्वासन दिल्याप्रमाणे निवेदन केले जाईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ग्यानचंद पुरस्कार विजेते हिंद केसरी श्री. मारुती माने हे एका दूर्धर आजारामुळे गेले महिनाभर मिरज येथे सिध्दिविनायक हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागामध्ये उपचार घेत आहेत. त्यासाठी त्यांचा रोज 40 ते 50 हजार रुपये खर्च होत आहे. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शाहू महाराजांनी मातीतील कुस्तीला राजाश्रय दिलेला होता. या महाराष्ट्रामध्ये बोटावर मोजण्याइतके फक्त पाच सहा हिंद केसरी आहेत. असे असताना यापूर्वी एक हिंद केसरी आजारामुळे पुना हॉस्पिटलमध्ये असताना त्यांची हालअपेष्टा झाली. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा हिंद केसरीच्या बाबतीत शासनाने लक्ष घालून त्यांच्यावर योग्य ते उपचार होतील आणि त्यांचा आजार लवकरात लवकर कसा बरा होईल यासाठी प्रयत्न करावेत.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत आपण स्वत: लक्ष घालावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, त्या जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री स्वत: लक्ष घालत आहेत. या मुद्याची आम्ही नोंद घेत आहोत.

---

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकण रेल्वे सुरु झाल्यानंतर गेली पाच वर्षे निवसर स्टेशनवर माती खचण्याचा प्रकार घडत आहे. गेली चार वर्षे आठ-आठ इंच माती दबत होती तसेच रुळ दबत होते. परंतु गेल्या वर्षी दबलेली माती काढून त्या ठिकाणी नवीन माती टाकली आणि त्यामुळे या वर्षी त्या ठिकाणी 10 फूट रेल्वे खाली गेली. त्या ठिकाणी रुळ पूर्णपणे वाहून जाण्याचा प्रकार घडलेला आहे. त्या ठिकाणी रेल्वे रुळावर ज्या गाडीची वाहतूक केली तसेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. परशुराम उपरकर .....

एक हजार प्रवाशांचा जीव धोक्यात घातला ते अधिकारी कोण याची चौकशी करण्याची गरज आहे. हा अपघाताचा प्रकार समजून याची चौकशी कमिशनर ऑफ रेल्वे (सेफ्टी) यांच्या माध्यमातून व्हावी आणि रुळ वाहून जाणे, माती वाहून जाणे या प्रकाराची चौकशी होऊन कोकण रेल्वे लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कार्यवाही व्हावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, कोकण विभागातील जे रेल्वे रुळ खचलेले आहेत किंवा वाहतूक बंद आहे त्या दृष्टीने तातडीने संपूर्ण दुरुस्ती झाली पाहिजे या अनुषंगाने केंद्र शासनाच्या रेल्वे विभागाला तातडीने कळवावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात राष्ट्रीय फळबाग योजने अंतर्गत आवळा लागवड केलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाच्या रकमेचा पहिला हप्ता न मिळणे

**मु. शी.** : अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात राष्ट्रीय फळबाग योजने अंतर्गत आवळा लागवड केलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाच्या रकमेचा पहिला हप्ता न मिळणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, सय्यद पाशा पटेल, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्याच्या 27 गावातील 656 शेतकऱ्यांनी शासनाच्या राष्ट्रीय फळबाग योजनेंतर्गत आवळा लागवड करणे, लागवडीसाठी प्रत्येक शेतकऱ्यांने साधारणत: एकरी 7 ते 8 हजार रुपये खर्च करणे, आवळा लागवड केल्यानंतर शेतकऱ्यांनी सदर लागवड कृषी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणूनही अनुदानाच्या रक्कमेचा पहिला हप्ता शेतकऱ्यांना न मिळणे, अनुदान देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शेतकऱ्यांनी केलेली मागणी, तसेच संबंधित कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे ( फलोत्पादन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील 26 गावांमध्ये 656 शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या फलोत्पादन अभियानाच्या अंतर्गत 656 एकरवर आवळ्याची लागवड केली. साधारणत: 2009-2010 सालातील ही लागवड आहे. ही लागवड करीत असताना सरकारने प्रमाणित केलेल्या सोलापूर येथील नागनाथ नर्सरी आणि केशर नर्सरी येथून रोपे आणली. शेतकऱ्यांनी खड्डे खणून त्या रोपांची लागवड केली. माझ्याकडे त्या विभागाचा जो अहवाल आहे त्या अहवालावर या शेतकऱ्यांनी लागवड केल्याबद्दल मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या सह्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

हे सर्व झालेले असताना त्यावेळी अनुदानाचा पहिला हप्ता जानेवारी महिन्यात मिळाला पाहिजे होता. परंतु जानेवारीत पहिला हप्ता दिला गेला नाही. म्हणून त्या शेतक-यांनी जिल्हा कृषी अधिका-यांकडे अनुदानाची मागणी सुरु केली. हा विषय एवढयापुरता मर्यादित राहिला आहे. त्या विभागातील सर्व पत्रकारांकडे तक्रार केल्यानंतर ते पत्रकार पाहणीसाठी गेले. माझ्याकडे अनेक वर्तमानपत्रे आहेत. 'पुण्यनगरी' या वर्तमानपत्रातील हेडिंगमध्ये "आवळा उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित", 'सकाळ' या वर्तमानपत्रामध्ये "तेल्हारा तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित, राष्ट्रीय फळबाग योजना, आंदोलनाचा इशारा", 'मातृभूमी' नावाचा पेपर आहे, त्यातील हेडिंग असे आहे की, "तेल्हारा तालुक्यात फळबाग योजनेचा बट्याबोळ, आवळा लागवडीसाठी एकही शेतकरी पात्र नाही."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांना निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ? या निवेदनातील शेवटचे वाक्य गंभीर आहे. "वरीलपैकी एकाही शेतक-याकडे आवळा फळपिकाची लागवड झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे कोणत्याही शेतक-यास अनुदान अदा करणे शक्य झाले नाही."

श्री.पांडुरंग फुंडकर: सभापती महोदय, माझ्याकडे तालुका कृषी अधिका-यांच्या सहयांचा अहवाल आहे. त्या परिसरातील सर्व वर्तमानपत्रामध्ये याबाबतच्या बातम्या येऊन गेल्या आहेत. शेकडो शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत. जिल्हा कृषी अधिका-यांचे असे म्हणणे आहे की, हे सर्व बोगस आहे. ही केंद्र सरकारची योजना आहे. 650 शेतक-यांचा हा प्रश्न आहे. 47 लाख रुपयांचे अनुदान कोठे गेले ? तालुका कृषी अधिका-यांनी स्वतःच्या सहयांचा अहवाल पाठविलेला आहे. तेथील शेतक-यांना एकही पैसा मिळालेला नाही. ही राष्ट्रीय फळबाग आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे शेतक-यांनी त्या नर्सरीतून रोपे आणली आहेत. माझ्याकडे त्याच्या पावत्या आहेत. कोणत्या शेतक-यांनी कोणती व किती रोपे नेली ते नमूद केलेले आहे. नागनाथ व केसर या सोलापूर येथील शासनमान्य नर्सरीज आहेत. या नर्सरीमधून शेतक-यांनी रोपे नेल्यावर खड्डे खणले आणि ती रोपे लावली होती. आता जिल्हा कृषी अधिकारी असे सांगतात की, शेतक-यांनी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

रोपे लावलीच नाहीत, रोपे जळाली आहेत. खड्डा खणून झाल्यावर त्यात रोप लावून खड्डा भरला होता. त्या शेतक-यांना अनुदानाचा दुसरा हप्ता न मिळाल्यामुळे त्याची मशागत करु शकला नाही. त्या शेतक-यांचे स्वत:चे प्रत्येकी 7-8 हजार रुपये खर्च झाले आहेत. अशा परिस्थितीत जिल्हा कृषी अधिकारी यांचे असे उत्तर आहे की, शेतक-यांनी रोपेच लावली नाहीत. मग हा पैसा कोठे गेला ? हे प्रकरण गंभीर असल्यामुळे मी ही सर्व कागदपत्रे आपल्याकडे सादर करण्यास तयार आहे. माझ्याकडे तालुका कृषी अधिका-यांचा रिपोर्ट आहे. तेल्हारा तालुक्यातील 27 गावातील 650 गावांचा प्रश्न आहे. प्रत्येक शेतक-यांनी 7-7, 8-8 हजार रुपये स्वत:चे खर्च केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्यांना अनुदान मिळाले नाही, एक वर्षाचे पीक हातातून गेले असताना हे जिल्हा कृषी अधिकारी कोण लागून गेले ? म्हणून या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिका-यांमार्फत चौकशी करावी आणि शेतक-यांना ताबडतोब पहिला हप्ता देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी माझी मागणी आहे. खड्डे खोदणे व रोपे लावणे याचा जो पहिला हप्ता दिला पाहिजे तो देण्यासंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, फलोत्पादनाचा कार्यक्रम रोजगार हमी योजना व राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रमांर्गत राबविला जातो. त्याची एक प्रक्रिया आहे. प्रत्येक जिल्हयातील लागवडीच्या अगोदर लक्ष्य ठरविले जाते. प्रत्येक जिल्हयामध्ये किती व कोणत्या फळांच्या झाडांची लागवड केली जाते ते निश्चित केले जाते. शेतक-यांकडून मे व जून या महिन्यात मागणी आल्यानंतर व मान्यता दिल्यानंतर शेतक-यांच्या शेतामध्ये खड्डे खणण्यास सांगितले जाते. त्याची तपासणी झाल्यानंतर परवानगी दिली जाते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रणजित कांबळे...

आवळा हे कोरडवाहू पीक आहे. जूनपर्यन्त जिल्ह्याची मागणी आली होती. जिल्ह्याचे उद्दिष्ट 700 हेक्टरचे होते. त्यामध्ये तालुक्यासाठी 100 हेक्टरचे उद्दिष्ट दिले होते...

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधीमध्ये असे नमूद केलेले आहे की, तेल्हारा तालुक्यासह 252.30 हेक्टर लागवडीस अंतिम मंजुरी देण्यात आलेली आहे.

श्री. रणजित कांबळे : त्यामध्ये "तेल्हारा तालुक्यासह" असे म्हटलेले आहे. संपूर्ण जिल्ह्याचे उद्दिष्ट आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रणजित कांबळे : माझे पूर्ण उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. मी फक्त आवळ्याच्या संदर्भात उत्तर दिले. सर्व पिकासाठी मिळून जिल्ह्याला जे उद्दिष्ट दिलेले होते त्याचा उल्लेख मी केला.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे सांगितले त्याबाबत काय परिस्थिती आहे ?

श्री. रणजित कांबळे : आवळा हे कोरडवाहू पीक आहे. जून पासून सप्टेंबरपर्यन्त यासंदर्भात अर्ज मागविले जातात. जून पर्यन्त कोणत्याही प्रकारची मागणी नव्हती, कोणताही अर्ज प्राप्त झालेला नव्हता. डिसेंबरमध्ये तालुका कृषी अधिका-यांनी परमिट इश्यू केले असे जिल्हा कृषी अधिका-यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संपूर्ण दप्तर जप्त केले आणि चौकशी सुरु केली. जवळपास 650 शेतक-यांचे शेत तपासले. त्यावेळी फक्त एका शेतक-याच्या दीड एकरामध्ये लागवड झालेली असल्याचे दिसून आले.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाला दिशाभूल करणारी माहिती दिली जात आहे. तालुका कृषी अधिका-यांनी लागवडीची शिफारस केलेली आहे.

श्री. रणजित कांबळे : शेतक-यांनी आपले अर्ज तालुका कृषी अधिका-यांकडे सादर केले. जेव्हा कोणत्याही कास्तकाराला परमिट दिले जाते त्यावेळी त्याला स्वत:च्या सहीने विशिष्ट फॉर्म भरावा लागतो. परंतु असे सही न झालेले अर्ज आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 13:50

लक्षवेधी सूचना क्रमांक-१......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तालुका कृषि अधिकाऱ्यांनी काय प्रमाणित केले ते मी वाचून दाखवितो. "प्रमाणित करण्यात येते की, वरील अनुक्रमांक १ ते १२ वरील शेतकऱ्यांनी २००९-२०१० मध्ये राष्ट्रीय फळबाग योजनेंतर्गत रोहयो फळबाग लागवड शासन मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली आहे. सदर लागवडीची भौतिक तपासणी केली असून मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेतल्या आहेत. सदर प्रकरणाची गणिती, ताळेबंद, देय अनुदान तपासले असून संबंधित शेतकऱ्यांच्या समोरील स्तंभ क्रमांक १६ व १७ मध्ये दर्शविलेली रक्कम अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे."

श्री.रणजित कांबळे : त्यावर तारीख नमूद केली असल्यास ती सांगण्यात येईल काय?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी तारीख शोधण्याचा प्रयत्न करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हसत आहेत. हा कामगारांचा विषय नाही. शेतकऱ्यांचा विषय आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा होत असताना हसत असतील तर सन्माननीय सदस्यांना शरम वाटली पाहिजे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तोंड आवरुन बोलावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : तुम्हाला हसण्याची गरज काय होती? शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तुम्ही हसत आहात. हे सहन केले जाणार नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.भाई जगताप : काय एवढे आकाश फाटले ते सांगा? तुम्हाला कोणी अडविले आहे? तुम्ही नेते आहात. नेत्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य करणे योग्य नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : कशी शेतकऱ्यांची थट्टा करीत आहात?

श्री.भाई जगताप : तुम्ही लोकांनी शेतकऱ्यांची थट्टा केली. आमच्या सरकारने ७३ हजार कोटी रुपयांची मदत केली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आपापसात बोलू नये.

श्री.दिवाकर रावते : ७३ हजार कोटी रुपये हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांना दिले, महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना दिले नाहीत हे सन्माननीय सदस्यांना माहिती नाही, तरी बोलत आहेत.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो अनुचित शब्द उच्चारला आहे तो कामकाजातून वगळण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सत्ताधारी पक्षाकडील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने प्रवक्ते म्हणून नेमण्यात आले आहे का?

**सभापती** : सन्माननीय सदस्य लोकप्रतिनिधी आहेत, आमदार आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे प्रश्न विचारतात त्यावेळी आम्ही त्यामध्ये कधीही हस्तक्षेप केलेला नाही. असे असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ते का कॉमेंट्स करीत आहेत?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांकडे तारीख उपलब्ध नव्हती. ती तारीख द्या असे त्यांनी म्हटले. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना तारीख पहा एवढेच म्हटले होते.

श्री.पांडुरंग फुंडकर : अशा पध्दतीने कोणी दम देणार असेल तर आम्ही खपवून घेणार नाही.

**सभापती** : शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर याठिकाणी आपण चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्य ज्यावेळी प्रश्न विचारतात त्यावेळी माननीय मंत्री किंवा राज्यमंत्री यांची बाजू सुध्दा सन्माननीय सदस्यांनी शांतपणे ऐकून घेतली पाहिजे आणि त्यानंतर काही शंका असल्यास उपप्रश्नाचा आग्रह धरला पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या तोंडून एक अनुचित शब्द उच्चारला गेला आहे तो मी कामकाजातून वगळला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्या तोंडून चुकीचा शब्द उच्चारला गेला असेल तर तो कामकाजातून वगळण्यात यावा. मी तो शब्द मागे घेत आहे.

(नंतर २एच.१....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मंत्री महोदयांनी सुरुवातीला सांगितले की, जिल्ह्याचे टार्गेट संपल्यामुळे नवीन प्रस्ताव घेतले नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, संपूर्ण राज्याचे एकूण टार्गेट किती होते ? कोणकोणत्या जिल्ह्यात ते पूर्ण झाले, एखाद्या जिल्ह्यात असे टार्गेट पूर्ण झाले असेल तर दुसऱ्या जिल्ह्यात हे टार्गेट देण्याची शासनाची पध्दत आहे. त्याचा अभ्यास शासनाने केला होता काय, या लक्षवेधीमध्ये एकाच शेतकऱ्याने अनुदानाची मागणी केली नाही तर जवळपास 600 शेतकऱ्यांनी आपले अर्ज अनुदानासाठी पाठविले आहेत. या शेतकऱ्यांच्या शेतात विस्तार अधिकारी (कृषी), तालुका कृषी अधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी किती वेळा भेटी दिल्या आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर : मघाशी माननीय कृषी राज्यमंत्री तारीख विचारत होते, ती तारीख दि. 18 जानेवारी 2010 अशी असून या तारखेला हे अर्ज जिल्ह्याकडे पाठविलेले आहेत.

श्री. रणजित कांबळे : महोदय, संपूर्ण राज्याचे आवळा लागवडीचे टार्गेट 75 हजार हेक्टर एवढे होते. हे खरे आहे की, कुठल्याही जिल्ह्याचे टार्गेट पूर्ण झाल्यानंतर इतर ठिकाणी सुध्दा ते टार्गेट दिले पाहिजे. परंतु अगोदर तालुक्यापर्यंत आपण हा विचार करतो. एखाद्या तालुक्यात टार्गेट जास्त झाले आणि त्यात स्कोप व ॲव्हेलेबिलिटी असेल आणि टार्गेट शिल्लक असेल तर त्याचे रिॲप्रोप्रिएशन त्या स्तरावर करण्यात येते. समजा अगोदरच मागणी आली असेल तर त्याचे रिॲप्रोप्रिएशन सुध्दा अगोदरच करण्यात येते. तसेच टार्गेट आपण सुपरवायझरसाठी 100 टक्के, तालुका कृषी अधिकाऱ्याचे टार्गेट 10 टक्के, एस.ए.ओ. चे टार्गेट 15 टक्के असे ठरविलेले आहे. तसेच त्यांनी किती व्हिजीट दिल्या असेही सन्माननीय सदस्यांनी विचारले, ती माहिती सध्या माझ याकडे उपलब्ध नसल्याने मी ती माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले, जी माहिती दिली ती माहिती सन 2010 जानेवारी मधील आहे. परंतु जी माहिती मी दिली ती लावगड 2009 मध्येच झालेली आहे. या निमित्ताने मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, ही योजना 100 टक्के अनुदानावर चालणारी असून त्यात केंद्रशासन आणि राज्यशासन असे दोन्हीकडून अनुदान मिळते. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा फायदा घेतला पाहिजे व त्यासाठी जे मार्गदर्शन अथवा मदत लागेल ती शासनाच्या वतीने प्रामाणिकपणाने देण्यात येते. जेणेकरुन कुठलाही कास्तकार या योजनेपासून वंचित राहू नये असाच शासनाचा उद्देश आहे. संपूर्ण जिल्ह्याचा विचार केला तर .......

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

सन 2009-10 मध्ये इतर सर्व पिके धरुन तसेच प्लांटेशन धरुन आणि टोटल प्लांटेशनचा हिशेब पाहता 43 लाख रुपये द्यावयाचे होते. त्यातला पहिला टप्पा 24.03 लाख एवढे पेमेंट कास्तकारांना दिलेले आहे. आपण तालुक्याचा उल्लेख करुन राहिला असला तरी मुद्दाम यांचे पैसे दिले नाही अशातला भाग नाही. कोरडवाहू पिकासाठी ठराविक वेळ असतो आणि अशा कोरडवाहू पिकाच्या अनुषंगाने अर्ज केल्याशिवाय अनुदान शक्य नाही. तरी सुध्दा त्यांनी लागवड केली असली तरी त्यांनाही शासन अनुदान देण्यास तयार आहे. पण मी सांगू इच्छितो की, या 650 शेतकऱ्यांप्रमाणेच जवळपास 664.09 हेक्टरसाठी अनुदानाची मागणी शासनाकडे आली. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दोन नर्सरीजमधून त्यांनी रोपाची मागणी केली....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ...

पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला यांची सुध्दा रोपवाटिका आहे. तसेच त्या जिल्हयामध्ये अजून सुध्दा काही रोपवाटिका आहेत. त्या ठिकाणांवरून आवळयाची रोपे घेण्यात आलेली आहेत. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जॉईंट डायरेक्टर ॲग्रीकल्चर यांच्या मार्फत चौकशी करण्यात येईल असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ही चौकशी सविस्तरपणे केली जाईल. ज्या कास्तकारांनी आवळयाची लागवड केलेली आहे त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही. ज्या कास्तकारांनी आवळयांची लागवड केलेली आहे ते सिध्द झाल्यावर त्यांना सर्व अनुदान दिले जाईल याची मी आपणास ग्वाही देतो. 650 कास्तकांरानी 745.9 हेंक्टरवर आवळयाची लागवड केलेली आहे. यामध्ये फक्त एका कास्तकाराने 1.5 हेक्टरवर आवळयाची लागवड केलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात उच्चस्तरीय चौकशी केली जाईल व यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही हे मी याप्रसंगी सांगू इच्छितो. फॉर्मवर कास्तकारांच्या सहया असणे आवश्यक असते परंतु यामध्ये काही कास्तकारांच्या सहया नाहीत त्यामुळे यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल व जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. कोणत्याही कास्तकाराला वंचित ठेवले जाणार नाही. सर्व कास्तकारांना लाभ दिला जाईल. आवळा लागवडीसाठी 100 टक्के अनुदान दिले जाते त्यामुळे कोणत्याही कास्तकारावर अन्याय होणार नाही हे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 18 जानेवारी, 2010 रोजी अनुदानासाठी शेतक-यांनी अर्ज केलेले होते. यासंदर्भातील अहवाल कृषी अधिका-यांनी जिल्हा कृषी अधिका-यांकडे पाठविलेला आहे. या अहवालात 650 शेतक-यांनी आवळयाची लागवड केल्याची माहिती आहे. या अहवालानुसार 650 शेतकरी खोटे आहेत की, तालुका कृषी अधिकारी खोटा आहे ? जून ते सप्टेंबर या महिन्यात आवळयाची लागवड करण्याची मुदत आहे. परंतु विदर्भात सप्टेंबर ते ऑक्टोबर या महिन्यात लागवड केली जात असते. सन 2009 च्या लागवडीचा अहवाल तालुका कृषी अधिका-यांनी जानेवारी,2010 मध्ये जिल्हा कृषी अधिका-यांकडे पाठविला आहे. अनुदान मिळाले नाही तर शेतकरी आपली शेती कधीही खाली ठेवू शकत नाही. आवळयाचे अनुदान न

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मिळाल्यामुळे शेतक-यांनी त्या शेतीत दुस-या पिकाची पेरणी केली. आवळयाच्या अनुदानामध्ये शेतक-यांची फसवणूक झालेली आहे. विदर्भावर अन्यायच होतो आहे आणि आता पुन्हा आवळयाच्या अनुदानामध्ये विदर्भातील शेतक-यांवर अन्याय झालेला आहे त्यामुळे विदर्भात अजून आत्महत्या वाढण्याची शक्यता आहे.केद्रसरकारचे व राज्य सरकारचे विदर्भातील शेतक-यांचे पॅकेज मिळाले असले तरी सुध्दा या ठिकाणी शेतक-यांच्या आत्महत्या होतच आहेत. आवळयासाठी 100 टक्के अनुदान दिले जात असतांना विदर्भातील शेतक-यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. जिल्हा कृषी अधिका-यांनी आवळा लागवड केलेल्या 650 कास्तकारांवर अन्याय केलेला आहे. या प्रकरणाच्या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी केली जाणार आहे म्हणजे नक्की कोणती चौकशी केली जाणार आहे ? जे शेतकरी अनुदानापासून वंचित राहिलेले आहेत त्यांना आपण अनुदान कधी देणार आहात ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रकरणी जॉईंट डायरेक्टर ॲग्रीकल्चर यांच्या माध्यमातून चौकशी केली जाणार आहे. सन्माननीय सदस्यांना डायरेक्टर ऑफ हॉर्टीकल्चर यांच्या माध्यमातून चौकशी पाहिजे असेल तर तशा प्रकारची सुध्दा चौकशी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सदर चौकशी सचिवांमार्फत करण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, डायरेक्टर ऑफ हॉर्टीकल्चर हे या विभागांचे अंतिम अधिकारी आहेत. नर्सरीच्या संगनमताने या ठिकाणी गैरप्रकार झालेला दिसतो. त्यामुळे यासंदर्भातील सविस्तर चौकशी करुन यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या चौकशीमध्ये ज्या शेतक-यांनी आवळयाची लागवड केल्याचे सिध्द होईल अशा सर्व शेतक-यांना अनुदान दिले जाईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/ जुन्नरे... 14:05

**पृ. शी.** : राज्यात मराठा समाजाला आरक्षण लागू करण्याची होत असलेली मागणी

**मु. शी.** : राज्यात मराठा समाजाला आरक्षण लागू करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी श्री.विनायक मेटे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत होत असलेली मागणी, त्यासाठी वेळोवेळी फार मोठी आंदोलने होणे व सध्याही आंदोलने सुरु असणे, राज्यात गरीब मराठा समाज मोठया प्रमाणात असणे, त्यात शिक्षित व उच्च शिक्षित तरुणांची वाढत असलेली संख्या, परंतु त्यांना आरक्षण मिळत नसल्यामुळे त्यांना शैक्षणिक पात्रता असून सुध्दा नोकऱ्यामध्ये संधी न मिळणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेली नैराश्याची भावना, राज्यामध्ये ज्या समाजाला आरक्षणाचा लाभ मिळतो त्या समाजाला मिळणाऱ्या आरक्षणाला धक्का न लावता गरीब मराठा समाजाला आरक्षण देण्याची नितांत आवश्कयता, सध्या राज्यात एकूण 52 टक्के आरक्षण देण्यात येणे, सध्याच्या आरक्षणाच्या एकूण टक्केवारीत वाढ करुन मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय होण्याची आवश्यकता कर्नाटक शासनाने 73 टक्के, तामिळनाडू शासनाने 69 टक्के तर राजस्थान शासनाने 75 टक्के व इतर राज्यानी सुध्दा 50 टक्केपेक्षा जास्त आरक्षण देणे, त्यासंबंधी नुकतीच मा.सर्वोच्च न्यायालयाने सहानुभूतीची घेतलेली भूमिका, त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या सहानुभूतीपूर्वक निर्णयानुसार शासन आरक्षण वाढवून देवू शकते अशी मराठा समाजात निर्माण झालेली आशा, गरीब व जास्त प्रमाणात लोकसंख्या असलेल्या मराठा समाजाला 25 टक्के आरक्षण मिळण्याबाबत त्या समाजातील लोकांची व लोकप्रतिनिधींची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मराठा समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि जिव्हाळ्याची आहे. सदर लक्षवेधी सूचना शनिवारच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आली होती. जेव्हा ही लक्षेवेधी सूचना सदनासमोर आली त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, या लक्षेवधी सूचनेवर माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. पण आजही माननीय मुख्यमंत्री नाहीत. त्यावेळी ते उपस्थित नव्हते. त्यामुळे ती पुढे ढकलण्यात आली होती. आता देखील सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित नाही. या लक्षवेधी सूचनेवर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणे आवश्यक आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदया उत्तर देण्यास सक्षम आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, शनिवारी स्पष्टपणे सांगितले होते की, माननीय मुख्यमंत्री नाहीत म्हणून लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. आज देखील माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. मराठा समाजाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. लाखो-करोडो मराठा समाजातील लोक या लक्षवेधी सूचनेसंबंधी शासन कोणता निर्णय घेत आहे याकडे डोळे लावून बसले आहेत. मराठा समाजाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. तेव्हा आपण माननीय मुख्यमंत्र्यांना या लक्षवेधीवर उत्तर देण्यासाठी पाचारण करावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना महत्त्वाची असल्यामुळे यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तर ते विश्वासार्ह राहील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणे आवश्यक आहे. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री जो पर्यंत येत नाही तो पर्यंत ही लक्षवेधी सूचना अनुत्तरित ठेवावी अशी मी मागणी करीत आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी उत्तर देण्यास तयार आहे. माननीय मुख्यमंत्री उपस्थित नसल्यामुळे लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी अशा प्रकारचे पत्र मी आपल्याला दिलेले नाही. शासनाच्या वतीने मी या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देण्यास तयार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदया निश्चितपणे उत्तर देण्यास सक्षम आहेत. शनिवारी या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर वितरित करण्यात आले होते. त्यावेळी अजून काही माहिती मिळायची आहे, त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना परवा घ्यावी अशी विनंती करण्यात आली होती. परवाचे आणि आजचे या लक्षवेधी सूचनेवरील शासनाचे उत्तर पाहिले तर एक नवीन शब्द सुद्धा आजच्या निवेदनामध्ये समाविष्ट केलेला नाही. मग त्या दिवशी लक्षवेधी सूचना का घेतली नाही ? ती पुढे का ढकलण्यात आली होती ? हा एकट्या विनायक मेटेचा प्रश्न नाही. लाखो-करोडो मराठा समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे उपस्थित राहून या लक्षवेधी सूचना उत्तर देणे अपेक्षित आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्रीमती फौजिया खान ह्या उत्तर देण्यास सक्षम आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंबंधी आपण निर्णय द्यावा.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्यासंबंधी माझे रूलिंग असे आहे की, सन्माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान ह्या शासनाच्या प्रतिनिधी म्हणून या लक्षवेधी सूचनेला उत्तरे देतील.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, राज्यात मराठा समाज साधारणत: 35 ते 40 टक्के आहे. आज मराठा समाजातील तरुण मुले-मुली अत्यंत वाईट अवस्थेत आहेत. या मराठा समाजाला शिक्षण मिळत नाही, शिक्षण नाही म्हणून नोकरी मिळत नाही. त्यास उद्योगधंदा नाही. आज मराठा समाजातील जवळपास 80 टक्के वर्ग अत्यंत गरिबीमध्ये जीवन कंठीत आहे. तेव्हा मराठा समाजाला आरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सन 1952 पासून आरक्षणास सुरुवात झाली. सुरुवातीस एस.सी.आणि एस.टी.वर्गाला आरक्षण मिळाले. सन 1993 मध्ये मंडल आयोगाने ओ.बी.सीं.साठी आरक्षण सुरु केले. मंडल आयोगाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी बाबींचा विचार करुन ओ.बी.सीं.ना आरक्षण दिले. गेल्या पाच वर्षापासून मराठा समाजास आरक्षण मिळावे म्हणून त्या वर्गातील लोक सतत आंदोलन, मार्चे काढत आहेत. तेव्हा मराठा समाजास 25 टक्के आरक्षण देण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी मराठा समाजास आरक्षण मिळण्याबाबत अतिशय पोटतिडकीने विषय मांडलेला आहे. सर्वच समाजातील घटकाला न्याय देण्याची शासनाची भूमिका राहिलेली आहे. मराठा समाजाकडून आरक्षणाबाबत मागणी झाल्यानंतर त्यावर अभ्यास करण्यासाठी बापट आयोगाची स्थापना करण्यात आली. या संदर्भात एकूण 22 अहवाल प्राप्त झाले असून त्याची छाननी करण्यात आली आहे. यामध्ये अजूनही काही बाबी राहिलेल्या आहेत म्हणून न्यायमूर्ती श्रॉफ आयोगाकडे हे प्रकरण सोपविलेले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणास कोणत्याही प्रकारची बाधा न येता मराठा समाजास शैक्षणिक आणि आर्थिकदृष्टया आरक्षण देता येईल काय याबाबत त्यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या संदर्भात शासनाची सकारात्मक आणि स्वच्छ भूमिका आहे. वेगवेगळ्या समाजाकडून आरक्षण मिळण्याबाबतची एकूण 66 प्रकरणे आयोगाकडे प्रलंबित आहेत. त्याबाबत सर्वसमावेशक आढावा घेणे आवश्यक आहे. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात देखील विविध राज्यातील अशाप्रकारची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याबाबत न्यायालयाकडून कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय झालेला नाही. मराठा समाजास न्याय देताना अन्य समाजावर अन्याय होणार नाही याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. तेव्हा या संदर्भातील सखोल अभ्यास झाल्यानंतर शासन योग्य तो निर्णय घेईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री .कपिल पाटील : सभापती महोदय, बापट आयोगासह एकूण 9 आयोगाने मराठा समाजाची आरक्षणाची मागणी फेटाळलेली हे खरे काय ? तसेच सर्वोच्च न्यायालयात दोन प्रकरणे फेटाळली हे खरे आहे काय ? असे असताना पुन्हा एकदा श्रॉफ आयोगाकडे कोणत्या निषकावर हे प्रकरण पाठविण्यात आले आहे ? आरक्षण कोणास द्यावयाचे याबाबत संविधानामध्ये स्पष्ट निर्देश आहेत. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या वर्गाला आरक्षण देता येते, आर्थिक निकषावर आरक्षण देता येत नाही असे असताना आपण ओ.बी.सी.आयोगाकडे हे प्रकरण कोणत्या कारणासाठी पाठविले ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 14.15

श्री.कपिल पाटील ....

सभापती महोदय, यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की,या राज्यातील बहुसंख्य आर्थिक आणि शैक्षणिक संस्था मराठा सामाजाच्या ताब्यात आहेत या संस्थांनी अफेर्मेटीव्ह ॲक्शन घेण्याची आवश्यकता आहे ती अफेर्मेटीव्ह ॲक्शन घेण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, बापट आयोगाचा अहवाल आल्यानंतर त्यातील काही बाबीची तपासणी करणे गरजेचे असल्यामुळे त्यासाठी श्रॉफ कमिटीकडे ही बाब रेफर करण्यात आली होती.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने हा अहवाल फेटाळला होता किंवा नाही ?

प्रा.फोजिया खान : हा अहवाल फेटाळण्याचा प्रश्न नाही. या संदर्भात त्यांनी आपल्या अहवालामध्ये शिफारशी केल्या होत्या .सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सुप्रीम कोर्टाच्या बाबतीत देखील विचारले आहे. मी त्यांना सागू इच्छितो की,सुप्रीम कोर्टाने एम. नागराज यांच्या प्रकरणात निर्णय दिला होता त्यावेळी 77 व 85 वी घटना दुरुस्ती लक्षात घेऊन त्यांनी फक्त एस.सी. आणि एस.टी.ना प्रमोशनच्या बाबतीत आरक्षण देण्यात यावे असे म्हटलेले आहे परंतु ओ.बी.सी..ना त्यामध्ये धरावयाचे नाही अशा प्रकारचा निर्णय देण्यात आला होता. सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे या बाबतीत अनेक निर्णय आणि अनेक प्रकरणे आहेत व सुप्रीम कोर्टाने आरक्षणाच्या संदर्भात ठोस भूमिका घेतलेली नाही. ओबीसींना प्रमोशनच्या संदर्भात आरक्षण देण्याचे प्रकरण अजूनही प्रलंबित आहे त्याबाबतीत अंतिम निर्णय झाल्यानंतरच आपल्याला त्यावर विचार करता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाच्या गांभीर्याकडे थोडेसे दुर्लक्ष होत आहे एवढेच मला या निमित्ताने निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. आपले आरक्षण कमी करुन मराठा समाजाला आरक्षण देण्यात येत आहे अशा प्रकारचा गैर समज काही सन्माननीय सदस्यांचा तसेच सभागृहा बाहेरील काही लोकांचा वा काही समाजाचा होण्याची शक्यता आहे. याबाबतीत मला नक्की माहीत नाही परंतु ज्या घटनेतील कलमाचा या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केलेला आहे त्या बाबतीत मी असे सांगू इच्छितो की, देशातील राज्य घटना सर्व राज्यांवर बंधनकारक आहे त्याला अनुसरुन या राज्याबरोबर काही राज्यामध्ये 73 टक्के, काही राज्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ....

69 टक्के, तर काही राज्यामध्ये 56 टक्के आरक्षण आहे या प्रकरणातील काही गोष्टी जरी कोर्टात प्रलंबित असल्या तरी त्या त्या राज्यांमध्ये अशा प्रकारची आरक्षणे ठेवण्यात आली आहेत हे आपल्याला नाकारता येणार नाही.माझा प्रश्न असा आहे की, आरक्षणाच्या बाबतीत इतर राज्यांनी जी भूमिका घेतलेली आहे तशी भूमिका महाराष्ट्र शासन घ्णोर आहे काय ? सुप्रीम कोर्टाची जी भूमिका असेल वा त्यावेळी ते जो काही निर्णय देतील तो निर्णय संपूर्ण देशपातळीवर बंधनकारक राहील. सर्व राज्यावर तो बंधनकारक राहील. परंतु आता इतर राज्यांनी आरक्षणाच्या बाबतीत जी भूमिका घेतली आहे तीच भूमिका महाराष्ट्र सरकार घेणार आहे काय ? कोणत्याही समाजाला वंचित न ठेवता, त्यांचे असलेले आरक्षण कोणत्याही प्रकारे बंद न करता इतर राज्याप्रमाणे आरक्षण ठेवण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, याबाबतीत कोणावरही अन्याय होता कामा नये तसेच दुसऱ्या राज्यामध्ये ज्या प्रमाणे आरक्षण ठेवलेले आहे त्या प्रमाणे आपल्याला आरक्षण ठेवता येईल काय याबाबतीत आतच निर्णय घेता येणार नाही कारण या संदर्भात सुप्रीम कोर्टाने अंतरिम निर्णय दिला आहे. त्याचबरोबर 50 टक्क्यापेक्षा आपल्याला जास्त आरक्षण देता येणार नाही त्याबाबतीत मी सागितले होते की, अजूनही सुप्रीम कोर्टाचा निर्णय प्रलंबित आहे. या संदर्भात निर्णय घेत असतांना सर्व बॅकवर्डनेस आणि यासंबंधीचे जे 23 पॅरामिटर्स आहेत त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे आणि तो अभ्यास करण्यासाठी आयोगाकडे हे प्रकरण पाठविण्यात आलेले आहे

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,बापट कमिशनच्या अहवालासबंधी तसेच सुप्रीम कोर्टाच्या निर्णयासबंधी माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला होता. आर्थिक दृष्टया मागासलेल्या व्यक्तींना आरक्षण देण्याचे सरकारच्या विचाराधीन असल्याचे देखील निवेदनात म्हटलेले आहे. या हा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबित आहे तेव्हा ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किती दिवस लागतील यासंबंधी माननीय राज्यमंत्री ठोस उत्तर देऊ शकतील काय ? अन्यथा माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे येऊन उत्तर द्यावे अशी मागणी आम्ही मघाशी केली होती. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यास किती दिवस लागतील ?

( नतर श्री.सरफरे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, श्रॉफ आयोगाला त्यांचा अहवाल लवकरात लवकर सादर करावा यासाठी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे.त्याचप्रमाणे शासनाकडून त्याबाबत वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. तो अहवाल शासनाकडे सादर झाल्यानंतर त्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन नंतर निर्णय घेण्यात येईल.

(गोंधळ)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांकडून माझ्या प्रश्नाला उत्तर आले नाही..

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आयोगाचा काहीही संबंध नाही, मंत्रिमहोदया चुकीचे उत्तर देत आहेत.

(गोंधळ)

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, आरक्षणाच्या संदर्भात शासनाला जेव्हा निर्णय घ्यावयाचा असेल तेव्हा घेण्यात यावा. तूर्तास महाराष्ट्रामध्ये लाखो मराठा समाजाचे विद्यार्थी शैक्षणिक सवलतीपासून वंचित आहेत. या विद्यार्थ्यांना आपण शैक्षणिक सवलती जाहीर करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब तपासून पहाण्यात येईल...

श्री. भाई जगताप : यामध्ये काय तपासावयाचे आहे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब तपासून पाहिल्याशिवाय निर्णय घेता येणार नाही...

(गोंधळ)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न आपण राखून ठेवावा. हे सरकार उत्तर देण्यास सक्षम नाही...

(सभागृहामध्ये अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी हा विषय उपस्थित केला. या संदर्भात महाराष्ट्रामध्ये अनुकूल आणि प्रतिकूल अशाप्रकारचा असंतोष आहे. मराठा समाज हा सत्तेवर असलेला समाज आहे. त्यांच्याकडे कारखाने आहेत ही वस्तुस्थिती आहे. तरीसुध्दा या समाजामध्ये दरिद्री आणि गरीब लोकांची संख्या देखील मोठया प्रमाणात आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. हुसेन दलवाई....

ही वस्तुस्थिती आहे. दुर्दैवाने एका बाजूला शिक्षणासंबंधी बोलले जाते आणि दुसऱ्या बाजूला फीमध्ये वाढ करुन फी न भरल्यास त्या मुलांना शाळेतून बाहेर काढण्याचे प्रकार सुरु आहेत. आज शिक्षणाचे खाजगीकरण झाले आहे.त्यामुळे गरीब मराठा समाजातील मुले शिक्षणापासून वंचित रहात आहेत हेही तितकेच खरे आहे. त्यामुळे ही बाब तपासून पहाण्याची गरज नाही. मुळामध्ये शिक्षण व सरस्वतीच्या मंदिराच्या बाहेर जी मराठा समाजाची मुले आहेत त्यांना सवलत मिळेल काय? त्याचप्रमाणे हा असंतोष मुस्लिम समाजामध्ये देखील खदखदतो आहे. सच्चरचा अहवाल आल्यानंतर काही लोकांनी त्याला विरोध केला. म्हणून माझा तिसरा प्रश्न असा आहे की, त्या त्या समाजाची संख्या शासनामध्ये, मंडळामध्ये व शिक्षणसंस्थेमध्ये किती आहे याची एकदा तपासणी करण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या म्हणण्याप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी आज आपण शैक्षणिक सवलत देत आहोत.....

(गोंधळ)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्रिमहोदया चुकीचे उत्तर देत आहेत...

प्रा.फौजिया खान : आज इकॉनॉमिकली बॅकवर्ड क्लास....

(गोंधळ)

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे :सभापती महोदय, आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना फक्त ईबीसीची सवलत देण्यात येते बाकीची कोणतीही शैक्षणिक सवलत देण्यात येत नाही. त्यामुळे या ठिकाणी चुकीचे उत्तर देण्यात येत आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना सवलत देण्यात येते. त्या शिवाय आरटीई मध्ये मोफत शिक्षण देण्याची सवलत शासनाने दिलेली आहे.

( काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, ईबीसीच्या विद्यार्थ्यांना पहिल्यांदा फी भरा असे सांगण्यात येते.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एखाद्या समाजाला काही आर्बिटरिली सवलती तपासणी न करता देता येतील काय ? असे मला सभागृहालाच विचारावयाचे आहे. यासंदर्भात कायदेशीर तपासणी करणे गरजेचे आहे. ते तपासण्यात येऊ नये असे म्हटले तर कसे चालेल.

श्री. विनायक मेटे : तपासण्यात येऊ नये असे आमचे म्हणणे नाही. तसेच आयोगाविषयी देखील आम्ही बोलत नाही.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या संदर्भात तपासणी आणि अभ्यास करणे गरजेचे आहे. आर्बिटरिली एका समाजाला काही सवलती देणे, आरक्षण देणे हे योग्य आहे काय? सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी सांगितले की, अशा प्रकारची मागणी मुस्लिम समाजाची सुध्दा आहे. 67 समाजाच्या वेगवेगळया मागण्या आहेत. त्यामुळे तुलनात्मकदृष्टया सर्वांचा कॉम्प्रीहेन्सिव्ह व्हयू घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत हा सगळा अभ्यास होत नाही तोपर्यंत शासनाला अधिकार असला तरी या बाबतचा निर्णय घेणे योग्य होणार नाही.कारण या बाबतीत इतर राज्यात बरीच प्रकरणे कोर्टात गेलेली आहेत. त्याप्रमाणे आपल्याला करायचे नाही. या बाबतीत राज्य शासनाला स्पष्टपणे निर्णय घ्यावयाचा आहे. घाईगर्दीत निर्णय न घेता तो निर्णय कोर्टातसुध्दा टिकला पाहिजे या दृष्टीने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदया थोडयावेळा पासून उत्तर देत आहेत आणि आयोगाच्या रिपोर्ट बाबत सांगत आहेत. परंतु आम्ही त्या विषयी बोलतच नाही. एखाद्या समाजाने मागणी केली आणि तो मागासलेला असेल तर त्याला पूर्णपणे आरक्षण देण्याचा

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

अधिकार शासनाला आहे. 50 टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण देऊ नये अशा सुप्रिम कोर्टाच्या गाईडलाईन्स आहेत. पण ही गाईडलाईन राज्य शासनाने ओलांडलेली आहे. 52 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. त्यामुळे आणखी 25 टक्के आरक्षण मराठा समाजासाठी देण्यात यावे अशी आमची मागणी आहे. इतर कोणत्याही समाजाला आरक्षण द्यावयाचे असेल तर त्याला आमची ना नाही. त्याला आमचा विरोधही नाही. तसेच कोणाचे आरक्षण कमी करण्यात यावे असेही आमचे म्हणणे नाही. सभापती महोदय, तामिळनाडूमध्ये 69 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. कर्नाटकमध्ये 73 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. केरळमध्ये 62 टक्के, आंध्र प्रदेशमध्ये 66 टक्के, आणि राजस्थानमध्ये 78 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे. या संदर्भात सुप्रिम कोर्टाने 13 जुलै रोजी एक निकाल दिलेला आहे. त्या निकालाची प्रत मी माननीय मंत्रिमहोदयांना देऊ इच्छितो. त्या निकालामध्ये या आरक्षणाला स्पष्टपणे मंजुरी देण्यात आलेली आहे. या समाजाला न्याय देण्याकरिता शासन किती दिवसात आरक्षण लागू करणार आहे?

प्रा. फौजिया खान: सभापती महोदय, आयोग वगैरे बद्दल मी सांगत नाही. मला या ठिकाणी फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, शासनाला सर्व वंचित समाजाला न्याय द्यावयाचा आहे. तशी शासनाची भूमिका आहे. पण हा न्याय देण्यासाठी तज्ज्ञ लोकांकडून अभिप्राय मागविणे गरजेचे आहे.

**सभापती** : आता लक्षवेधी क्रमांक 3 चर्चेला घेण्यात येईल.

( काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या एकाही प्रश्नाला उत्तर आलेले नाही.

**सभापती** : मी पुढची लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, आमच्या एकाही प्रश्नाचे उत्तर आले नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, एकाही प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. त्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले उत्तर दिले आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझ्या एकाही प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. मी सभात्याग करतो.

( सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे सभात्याग करतात )

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

**पृ. शी.** : राज्यातील अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवडून आलेल्या उमेदवाराचे जात प्रमाणपत्र पडताळणीमध्ये रद्द ठरविल्यामुळे होत असलेला अन्याय

**मु. शी.** : राज्यातील अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवडून आलेल्या उमेदवाराचे जात प्रमाणपत्र पडताळणीमध्ये रद्द ठरविल्यामुळे होत असलेला अन्याय यासंबंधी सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील अनुसूचित जमातीच्या नागरिकांना संबंधित तहसीलदार व विभागीय अधिकारी यांचेकडून आवश्यक कागदपत्राची शहानिशा करुन वितरीत करण्यात आलेल्या जातीच्या दाखल्याच्या आधारे संबंधित नागरिकांनी आरक्षित जागेवर निवडणूक लढविणे, संबंधितांचे दाखले पडताळणीसाठी जात पडताळणी समितीकडे सादर झाल्यावर त्यापैकी काही दाखले पडताळणीमध्ये रद्द करण्याचा समितीचा निर्णय होणे, यामुळे निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची निवडणूक अवैध ठरणे, निवडणुकीत जागा आरक्षित करतांना त्याठिकाणी असलेल्या त्या जातीतील लोकसंख्या विचारात घेऊन आरक्षण ठरविले जाणे, मात्र याच मतदारांपैकी निवडणुकीत निवडून आलेल्या उमेदवाराचे जात प्रमाणपत्र पडताळतीमध्ये रद्द ठरविण्यामुळे संबंधितांवर घोर अन्याय होणे, त्यामुळे या समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, अशा प्रकारे निवडणूक अवैध ठरल्याने फेर निवडणुका घ्याव्या लागणे, फेर निवडणुकांवर शासनाचा झालेला व होणारा खर्च याचा आढावा घेण्याची आवश्यकता तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. पद्माकर वळवी ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्यांना प्रमाणपत्रे मिळाली त्या पंचायतीच्या सदस्यांनी आणि जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी पाच पाच वर्षे आपले पद उपभोगले. त्यांचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीपुढे गेल्यानंतर त्यांचे सर्टिफिकेट रद्द करुन त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. ते आम्ही समजू शकतो परंतु ते सर्टिफिकेट रद्द झाल्यानंतर ज्यांनी ते सर्टिफिकेट घेतले त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय शासनाच्या ग्रामविकास विभागाने घेतलेला आहे, ही गोष्ट खरी आहे काय ? शासन एवढ्यावरच थांबले नाही तर त्या लोकांनी त्या काळात जे भत्ते घेतलेले आहेत, ज्या आर्थिक सवलती घेतलेल्या आहेत त्या सगळ्या रद्द करुन त्यांच्याकडून वसूल करण्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला आहे, ही गंभीर बाब आहे. कारण ज्यांनी सर्टिफिकेट दिले त्या तहसीलदार किंवा प्रांत अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई करीत नाही. विशेषत: कोकण भागामध्ये किनाऱ्यावरचे जे कोळी आहेत त्या कोळीवाड्यांमध्ये आरक्षण ठेवले जाते पण तेथील जातीची प्रमाणपत्रे रद्द केली जातात. ते आरक्षण रद्द करण्याचा निर्णय शासन घेईल काय तसेच गुन्हे दाखल करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे तो रद्द करणार काय ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे......

श्री. राम पंडागळे : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर संपल्यानंतर मी आपल्याला परवानगी देतो.

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या नामसदृश्यतेचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर बिगर आदिवासी लोकांनी जातीची प्रमाणपत्रे घेतलेली आहेत. यासंदर्भात आपल्या राज्य शासनाच्या नगरविकास, जिल्हा परिषद, पंचायत समित्या अशा वेगवेगळ्या विभागांनी तसेच निवडणूक आयोगाने सुध्दा स्पष्टपणे निर्देश आणि अधिनियम निश्चित केले आहेत. त्यामुळे ज्या लोकांनी खोटी प्रमाणपत्रे घेतलेली आहेत, ज्यांचे प्रमाणपत्र जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अवैध ठरविते त्या व्यक्तीने जो लाभ घेतला असेल, मग नोकरीतील लाभ असेल किंवा निवडणुकीमध्ये निवडून आला असेल ते लाभ काढून घेण्याचे अधिकार कायद्याव्दारे देण्यात आलेले आहेत. त्यामुळे अशा पध्दतीने त्यांनी जे लाभ घेतलेले आहेत, ज्यांनी भत्ते घेतले असतील, त्यांनी

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्‌माकर वळवी ....

निवडणुकीच्या अनुषंगाने अधिकारात जे काम केले असेल त्यासंदर्भात तो लाभ काढून घेण्याचे म्हणजे तो नगरसेवक झाला तर त्याचे नगरसेवकपद काढून घेणे, सरपंच झाला तर सरपंच पद काढून घेण्याबाबत, जातीचा दाखला देणे आणि पडताळणी करणे याबाबतचा 23/2001 चा जो कायदा आहे त्या कायद्याच्या अंतर्गत लाभ काढून घेण्याची तरतूद आहे. अशा पध्दतीने लाभ काढून घेण्याची तरतूद असल्यामुळे अशा पध्दतीने लाभ काढून घेण्याची प्रक्रिया त्या त्या विभागाकडून केली जाते. हा जो कायदा आहे तो या विधिमंडळाने सर्वानुमते मंजूर केलेला आहे. त्यामुळे कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्या पदतीने अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मी सगळ्यात आधी हात वर केलेला होता. माझ्या नंतर हात वर केलेल्या सन्माननीय सदस्यांना आपण दोन दोन वेळा प्रश्न विचारण्याची संधी दिली. मी मागणी करुन सुध्दा माझ्याकडे दुर्लक्ष केले जाते. मी दलित समाजाचा आहे, मागासवर्गीय समाजाचा आहे म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष केले जाते अशा तऱ्हेचा माझा समज होत चाललेला आहे. माझ्याकडे आपण मुद्दाम दुर्लक्ष करता म्हणून मी सभात्याग करतो.

( सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे सभात्याग करतात )

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, आम्हालाही बोलावयाचे होते. आम्ही पण ओबीसी समाजाचे आहोत. एकाही महिलेला बोलू दिले नाही. अशी कोठे पध्दत आहे काय ?

**सभापती** : सभागृहामध्ये किमान 50 सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केले होते ही परिस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/ प्रथम श्री.बरवड 14:35

**सभापती**.....

त्यापैकी जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना संधी देणे हे सभापतींचे काम आहे. या प्रश्नासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांना मला संधीही देता आली नाही. अशा परिस्थितीत एखाद्या सन्माननीय सदस्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य करणे म्हणजे सभागृहाच्या परंपरा व प्रथा आहेत, त्याच्याशी विसंगत आहे, अनुचित आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी आता जे वक्तव्य केले आहे ते मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, संबंधितांचे पद रद्द करावे लागेल, हे मला मान्य आहे. परंतु त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जाणे हे योग्य नाही. 25-30 वर्षापूर्वी ही जात पडताळणी समिती अस्तित्वातच नव्हती. परंतु त्यांनी जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूक लढवून पद मिळविले असेल, भत्ते घेतले असतील ते पैसेही परत करण्यासाठी काहींच्या जवळ पैसे नाहीत. त्यादृष्टीने पद रद्द करणे मान्य आहे, परंतु गुन्हा दाखल करण्याची जी तरतूद केली आहे त्याबाबतचा निर्णय शासन मागे घेईल का ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्यावेळी जात पडताळणी समिती अस्तित्वात नव्हती किंवा अशी तरतूद नव्हती. परंतु तसे नाही. जातीचा दाखल घेणे व देणे याबाबतचा 23/2001 हा कायदा विधिमंडळाने मंजूर केला असला तरी यापूर्वी सुध्दा एखाद्याने खोटे प्रमाणपत्र तयार केले असेल तर आयपीसी अंतर्गत हा गुन्हा मानला जात होता. खास करुन जातीच्या दाखल्याबाबत सुप्रीम कोर्ट व हायकोर्टाचे निवाडे झालेले आहेत. विशेषत: माधुरी पाटील विरुध्द राज्य सरकार या प्रकरणी सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता की, राज्य सरकारने कायदा करावा. त्याप्रमाणे विधिमंडळाने कायदा केलेला आहे. त्यामुळे जी व्यक्ती निवडून आली असेल तिचे पद काढून घेणे, त्याचा लाभ काढून घेणे आणि त्या व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करणे ही सुध्दा कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे ही कारवाई तरतुदींना अधीन राहून करण्यात येत आहे.

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, निवडून आल्यानंतर 4 महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे निदेश आहेत. अनेक केसेसमध्ये उमेदवार निवडून आल्यानंतर तुमचे जात वैधता प्रमाणपत्र वैध नाही असे सांगितले जाते. या दृष्टीकोनातून एक कालमर्यादा घालून दिली पाहिजे. ॲथोरिटीकडे अर्ज आल्यानंतर 15-20 दिवसाच्या आत तो दाखला दिला पाहिजे. या कार्यालयात सबंध भ्रष्टाचाराचे प्रकार चालू आहेत त्यामध्ये प्रामाणिकपणा व पारदर्शकता आणली पाहिजे म्हणून याबाबत वेळेची मुदत घालून देण्याची कार्यवाही केली जाईल काय आणि निवडणुकीपूर्वीच ते प्रमाणपत्र देण्यास शासनास काय अडचण आहे याचा खुलासा केला जाईल काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, याबाबत संबंधित व्यक्ती, संघटना, लोकप्रतिनिधी या सगळयांकडून निवेदने आली होती. जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र वेळीच प्राप्त करणे शक्य होत नाही, म्हणून दि.17.11.2009 रोजी आदिवासी विकास विभागाने जी.आर.काढला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, निवडणुकीपूर्वी सहा महिने अगोदर जातीच्या दाखल्याची पडताळणी करुन घ्यावी. त्याबाबत जिल्हाधिका-यांना अधिकार दिलेले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित उमेदवाराकडून सहा महिन्यापूर्वी आलेला अर्ज दाखल करुन घेणे. सहा महिन्याच्या आत वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तशा पध्दतीची कार्यवाही झालेली नाही. नुकतीच ग्रामपंचायतीची निवडणूक झालेली आहे. त्या निवडणुकीतील ब-याच उमेदवारांकडेही वैधता प्रमाणपत्रे नव्हते. म्हणून ग्रामपंचायत अधिनियमात दुरुस्ती करुन निवडणुकीनंतर सहा महिन्यांऐवजी चार महिन्यात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य केले आहे. 4 महिन्यात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर ज्या पदावर उमेदवार निवडून आला असेल ते रद्द होईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, राजकीय आरक्षण लोकसंख्येचा विचार करुन ठरविले जाते. रोहा किंवा रायगड तालुक्यामध्ये कोळी समाजाबाबत शासनाकडून अद्याप निर्णय घेतलेला नाही. पूर्वी त्यांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये होता. रोहा तालुक्यात जिल्हा परिषदेचा भातसई हा मतदार संघ आहे, तेथील कोळी समाजातील लोकसंख्या विचारात घेऊन तो मतदार संघ अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवला गेला. परंतु ज्यावेळी आम्ही कोळी समाजाचे उमेदवार निश्चित करीत होतो त्यावेळी तुम्ही अनुसूचित जमातीमध्ये नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे या कोळी समाजाची अवस्था आई जेवू घालीना व बाप भीक मागू देईना अशी झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. अनिल तटकरे : ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्या शिवाय जात पडताळणी अधिकारी पडताळणीसंबंधीचे अर्ज घेत नाहीत. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर हे अर्ज घेतले जातात आणि तो पर्यन्त वेळ निघून जाते. तेव्हा याबाबतीत शासन आपली भूमिका जाहीर करील काय ?

श्री. पद्माकर वळवी : सन्माननीय सदस्यांनी जनगणनेचा मुद्दा उपस्थित केला. कोकणातील काही जिल्ह्यामध्ये आदिवासी लोकसंख्या असल्याची नोंद जनगणनेमध्ये झालेली आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचाय, पंचायत समित्या, नगरपालिका यांच्या निवडणुकांमध्ये आरक्षण दिले जाते. जनगणनेचा कायदा हा केन्द्रीय कायदा आहे. जनगणनेची नोंद करताना कुटुंब प्रमुखाकडून कुटुंबाची तोंडीच माहिती दिली जाते. जातीची नोंद करताना जातीच्या प्रमाणपत्राची किंवा जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी केली जात नाही. त्यामुळे काही कोळी लोकांनी महादेव कोळी अशी नोंद केलेली आहे. जनगणनेच्या वेळी बिगर आदिवासी लोक आदिवासी म्हणून नोंद करतात. याचा अर्थ जनगणनेमध्ये नावाचा आणि जातीचा उल्लेख झाला म्हणजे त्या व्यक्तीला आरक्षित जागेवर उभे राहाणाचा अधिकार आहे असे नाही. सन्माननीय सदस्यांना या गोष्टी माहीत नाही असे नाही. जो उमेदवार निवडणुकीसाठी उभा राहाणार आहे त्याला या सर्व गोष्टींची माहिती असते. म्हणून निवडणुकीसाठी उभे राहाणा-या उमेदवाराने वेळीच वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले पाहिजे.

श्री. रमेश शेंडगे : जात पडताळणी करण्यासाठी 2001मध्ये करण्यात आलेल्या कायद्याच्या कलम 7(2) प्रमाणे समिती गठीत करण्यात आली. मागील अधिवेशनामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांना जात वैधता प्रमाणपत्र देताना त्यांच्यावर अन्याय केला जातो. म्हणून त्या समितीचे अध्यक्ष श्री. कर्वे यांना कार्यमुक्त करावे अशी मागणी माननीय विरोधी पक्षनेते आणि दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी केलेली होती. त्यावेळी सभापतीस्थानी माननीय उपसभापती होते. त्यानी देखील त्यांना कार्यमुक्त करावे असे निदेश दिले होते. परंतु या सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यन्त झालेली नाही. दुसरे असे की, विधिमंडळाच्या अनुसूचित जमातीच्या दौ-याचे वेळी श्री. कर्वे हे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोलावल्यानंतर देखील समितीसमोर साक्षीसाठी हजर राहात नाहीत. समितीला अपमानास्पद उत्तरे पाठवून देतात. तेव्हा या सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री. कर्वे यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तरे दिलेली आहेत. समितीचे सदस्य श्री कर्वे यांच्या संबंधी या सभागृहात चर्चा झाली आणि खालच्या सभागृहामध्येही हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.त्यांच्यावर त्या पध्दतीने कारवाई केली जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, निवडणुकीच्या वेळी एखाद्याला 24 तासामध्ये सर्टिफिकेट मिळते तर एखाद्याला चार-चार महिने लटकवले जाते. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे या कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. त्याला आळा घालण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? तसेच समाजाचे खोटे सर्टिफिकेट दाखल करुन निवडून आल्यानंतर प्रकरण उच्च न्यायालामध्ये जाते आणि निवडून आलेली व्यक्ती पुढच्या निवडणुकीपर्यन्त नगरसेवक म्हणून असते. याबाबतीत शासन नेमकी कोणती उपाययोजना करणार आहे ?

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3......

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या खूप शंका आहेत, खूप चर्चाही झालेली आहे. या आठही समित्यांचे स्ट्रेंग्थनिंग करण्यासाठी संगणकाचा वापर करावा असा प्रयत्न सुरु आहे. अर्ज आल्यानंतर किती दिवसात निकाली काढला पाहिजे या संदर्भात नियमावली तयार करीत आहोत. 31 हजारापेक्षा जास्त अर्ज प्रलंबित आहेत. अर्ज प्रलंबित राहणे, वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र न देणे याला काही कारणे आहेत. ती शोधून काढून त्यावर उपाययोजना केली जाईल. ही पध्दत सुटसुटीत असली पाहिजे, आलेल्या अर्जावर ताबडतोब निकाल दिला पाहिजे अशा प्रकारचा निर्णय थोड्याच दिवसात घेत आहोत.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मी दिलगिरी व्यक्त करतो. आपण माझ्याकडे लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील तमाम बौध्द, नवबौध्द समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश झालेला नाही. या समाजाला मायनॉरिटीमध्ये समाविष्ट केले आहे. माननीय मंत्रीमहोदय, महाराष्ट्रातील बौध्द, नवबौध्द समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करणार आहेत का?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. या लक्षवेधी सूचनेशी संबंधित असा हा प्रश्न नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहात माननीय अध्यक्षांनी सु-मोटो विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करुन घेतला आहे. विशेष हक्कभंग समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. जात पडताळणी प्रमाणपत्र देताना वेगवेगळया गरीब घटकांना खूप मोठ्या प्रमाणात त्रास होतो ही वस्तुस्थिती आहे. माझ्या निदर्शनास आलेली एक बाब मी याठिकाणी सांगू इच्छितो. जात प्रमाणपत्र पडताळणी पथकामध्ये डीवायएसपी दर्जाच्या एका अधिकाऱ्याचा समावेश आहे. मी अनेक वर्षे या राज्याचा गृहमंत्री म्हणून काम करीत आहे. अलिकडच्या दोन वर्षामध्ये या पथकामध्ये जाण्यासाठी वशिलेबाजी आणि मागणी वाढली आहे, यावरुन तेथे काय चालले आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. काही गोष्टी आहेत त्या मान्य केल्या पाहिजेत. मला एक गोष्ट माहित आहे तो म्हणजे जात पडताळणी पथकातील एक सदस्य मुंबईमध्ये होते, त्याचवेळी

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 14:45

श्री.आर.आर.पाटील........

त्यांची नाशिकमधील प्रोसिडिंगवर सही झाल्याचे मोबाईल लोकेशनवरुन पोलीस तपासात आढळून आले. जात पडताळणी पथकाकडून जात पडताळणी प्रमाणपत्र देताना लाखो रुपयाचे दर ठरले आहेत. गरीब माणूस मंत्र्यांना भेटायला आला म्हणून मंत्र्यांनी फोन केला तर त्याची नोंद ठेवली जाते. आमचे काम अर्धन्यायिक स्वरुपाचे आहे, त्यामध्ये हस्तक्षेप करतात म्हणून वेगळ्या कार्यवाहीची भूमिका या जात पडताळणी पथकाकडून घेतली जाते. भिल्ल समाजाच्या लोकांना जात पडताळणी प्रमाणपत्र त्वरेने मिळत नाही म्हणून सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी मला एक पत्र दिले होते. ही प्रकरणे प्रलंबित राहता कामा नयेत, असलेल्या व्हॅकेन्सी तातडीने भराव्यात म्हणून माझ्या दालनात एक बैठक आयोजित केली होती. ताबडतोब त्यांनी रीट दाखल केले आणि अशा पध्दतीने आमच्या कामकाजात गृहमंत्री हस्तक्षेप करु शकत नाहीत म्हणून कोर्टाकडून मला आणि सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांना नोटीस पाठविण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनाही नोटीस आली होती. या पथकाकडे अर्ज करणारी सर्व सामाजिकदृष्टया मागासलेली गरीब माणसे आहेत. राज्यामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी पथके काय करीत आहेत ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळामध्ये निश्चितपणे काही ठोस भूमिका घेऊ. आम्ही सरकारपेक्षाही मोठे आहोत असा त्यांनी गैरसमज करुन घेतला आहे. दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीपुढेही यायचे ते नाकारीत आहेत. आम्ही लोकशाहीमध्ये राष्ट्रपतींपेक्षा मोठे आहोत हा जो त्यांचा समज झाला आहे त्यांना लोकशाही पध्दतीने तडा देण्याचे काम केले जाईल. गरीब माणसांची पिळवणूक होणार नाही आणि अर्ज प्रलंबित राहणार नाहीत अशाप्रकारे मंत्रिमंडळामध्ये विचार करुन निश्चितपणे या यंत्रणेसाठी ज्या दुरुस्त्या कराव्या लागतील त्या आम्ही करु.

नंतर 2एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, एखाद्या जातीला अथवा समाजाचा समावेश करण्याबाबत शासनाने एक महिना, दोन महिना अथवा वर्षापूर्वी जी.आर. काढून निर्णय घेतला असेल तर त्या जातीच्या पडताळणीसाठी 50-60 वर्षापूर्वीच्या पुराव्यांची मागणी केली जाते. वास्तविक त्यांच्या नातेवाईकांचे दाखले ग्राह्य धरुन ते स्वीकारले पाहिजेत. माननीय गृह मंत्र्यांनी सांगितल्यानुसार माझी अशी विनंती आहे की, या समितीमध्ये कशा प्रकारच्या गोष्टी चालतात. म्हणून माझी सूचना अशी आहे की, शासनाने ज्या दिवसापासून जी.आर. काढला असेल तेव्हापासूनचे पुरावे उपलब्ध करण्याबाबत सांगायला हवे. 50 वर्षापूर्वीचे दाखले नसतात म्हणूनच ते देऊ शकत नाहीत. जन्मतारखेच्या संदर्भात शासनाची भूमिका काय राहणार आहे ?

श्री. पद्माकर वळवी : महोदय, अनुसूचित जमातीची पहिली यादी सन 1952 मध्ये तयार झ ाली होती. त्यानंतर वेळोवेळी त्यात सुधारणा करण्यात आल्या. म्हणून ही 50 वर्षांची अट टाकलेली आहे. तसेच ज्या एस.सी. आणि ओ.बी.सी. मधील जाती आहेत त्यांच्या बाबतीत दोन वर्षातील असल्या तरी ज्या कॅटेगरीजमध्ये दाखविल्या त्यांचा ठराविक क्रायटेरिया निश्चित केला आहे, वेगळ्या प्रकारची वैशिष्ट्ये आहेत ती फुलफिल करावी लागतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आताच निदर्शनास आले आहे की, वेगवेगळ्या ठिकाणी जात पडताळणी समितीकडून वेगवेगळे निकष लावण्यात येतात. काही ठिकाणी कोतवाल बुकाची नक्कल मागविली जाते तर काही ठिकाणी वंशावळ सादर करण्याची मागणी होते. अशा प्रकारे वंशावळ सादर करीत असताना चुलत भावाचा दाखला सादर केला तरी तो ग्राह्य धरला जात नाही. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सर्व राज्यासाठी एकच पध्दत लागू करावी. समजा कोतवाल बुकाची नक्कल पाहिजे असेल आणि ती पुरावा ग्राह्य धरण्यात येत असेल तर संपूर्ण राज्यभर तेच मान्य केले पाहिजे. तसेच 50-50 वर्षाचे पुरावे जे मागण्यात येतात त्यात कोतवाल बुकाची नोंद असतेच असे नाही, कारण ते शिल्लक नसते. म्हणून माझ्या भावाचा दाखला असेल आणि तो दिला तरी हे अधिकारी मान्यता देत नाहीत म्हणून त्यात गैरव्यवहार होतात. म्हणून अशी नवीन नियमावली संपूर्ण राज्यभर लागू करुन त्याच्या आधारे जात पडताळणी केली जाईल अशा प्रकारचे आदेश शासन देणार काय ? त्याचबरोबर आज राज्यात हजारो केसेस प्रलंबित आहेत त्या ताबडतोबीने निकालात काढण्यासंबंधी शासनाचे काय धोरण आहे ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर अशा प्रकरणांच्या बाबतीत जानेवारी, 19 ते 21 असे तीन दिवस कार्यशाळा घेतली होती. त्यात अशी प्रमाणपत्रे देण्यात ज्या अडचणी येतात त्यावरही चर्चा केली. आता या अडचणी सोडविल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण राज्यासाठी एकच नियमावली तयार करुन ती राज्यात लागू करण्यात येईल.

-------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. भोगले..... 14:50

**पृ. शी.** : वक्फ बोर्डाच्या मालकी हक्काच्या जागेची होत असलेली बेकायदेशीर विक्री

**मु. शी.** : वक्फ बोर्डाच्या मालकी हक्काच्या जागेची होत असलेली बेकायदेशीर विक्री यासंबंधी श्री धनंजय मुंडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकी हक्काच्या जागेची करण्यात येत असलेली बेकायदेशीर विक्री, मुंबईतील ग.द. आंबेकर मार्ग, शिवडी येथील सीटी सर्व्हे क्र. 662 महादेवाची वाडी येथील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या चाळ क्र. 5 ग,ड, मधील गेली अनेक वर्षे राहणाऱ्या रहिवाशांना व भाडेकरुंना म्हाडा अधिनियम, 1976 चे कलम 95 अन्वये नोटीस काढून बेकायदेशीरपणे स्थानिक रहिवाशांची तोडण्यात आलेली घरे, त्यानंतर सुमारे एक महिन्यानी वक्फ बोर्डाचे कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री.कादरी यांनी विकासकाला त्या भुखंडावर विकासाकरिता ना-हरकत प्रमाणपत्र देणे, घरे तोडल्यानंतर 1 महिन्यांनी वक्फ बोर्डाच्या कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या श्री.कादरी यांनी विकासकाला त्या भूखंडावर विकासाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देणे, सदर भुखंडावर बोर्डाच्या नियमाप्रमाणे अनाथालय बांधण्याची अट विकासकाला घालण्यात न येणे, 14 सदस्यांपैकी फक्त 4 सदस्य अस्तित्वात असलेल्या बोर्डाच्या 4 सदस्यांनी हा निर्णय घेतल्याने हा निर्णय बेकायदेशीर असणे, केवळ विकासकाला फायदा व्हावा म्हणून म्हाडाने उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करुन रहिवाशांचे विरोधात केलेली नियमबाह्य कारवाई, बोर्ड व म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी संगनमताने कोटयावधी रुपयांच्या भुखंडाची विक्री नाममात्र किंमतीमध्ये करुन विकासकाला करुन देण्यात आलेला कोट्यावधी रुपयांचा फायदा, म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी केलेले नियमबाह्य वर्तन, बेघर करण्यात आलेल्या शेकडो रहिवाशांनी म्हाडाचे अधिकारी, वक्फ बोर्ड तसेच विकासकाविरोधात शासनाकडे तक्रारी करुनही त्याकडे हेतुत: करण्यात येत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

26-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS-4

श्री. धनंजय मुंडे : महोदय, वास्तविक या लक्षवेधी सूचनेचे उत्तर कोण देणार हे अगोदर समजले पाहिजे. कारण या लक्षवेधी सूचनेमध्ये वक्फ जमिनीशी संबंधित विषय आहे, उत्तर मात्र गृहनिर्माण विभागाकडून आलेले आहे. माझी विनंती आहे की, औकाफ मंत्र्यांकडूनच या लक्षवेधी सूचनेला उत्तर मिळणे अपेक्षित आहे.

श्री. सचिन अहिर : महोदय, जमिनीची मालमत्ता कोणाची आहे आणि कसे या सर्व गोष्टींची पुर्तता करण्याचे काम गृहनिर्माणाची पुनर्बांधणी विभाग करतो म्हणून हा विषय गृहनिर्माण विभागाशी संबंधित असल्यामुळे मी उत्तर देण्यास सक्षम आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया प्रश्न विचारावेत आणि त्यांचे समाधान करण्याचा मी प्रयत्न करीन.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, वक्फ् बोर्डाच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. त्यामुळे संबंधित खात्याकडून उत्तर येणे अपेक्षित आहे. नगर विकास आणि म्हाडाचा काही संबंध नाही. ही जी जमिनी आहे ती वक्फ् बोर्डाची आहे. वक्फ् बोर्डाच्या जमिनीमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेस सन्माननीय औकाफ मंत्र्यांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, प्रश्न कोणत्याही विभागाचा असला तरी सामूहिक जबाबदारी म्हणून कोणाताही मंत्री उत्तर देऊ शकतो. या प्रश्नाच्या संदर्भात गृहनिर्माण राज्यमंत्री उत्तर देण्यास सक्षम आहेत.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, कोणत्याही प्रश्नास कोणत्याही विभागाचा मंत्री उत्तर देऊ शकतो तर निरनिराळया खात्यास मंत्री पद कशासाठी देण्यात आलेले आहे ? संबंधीत लक्षवेधी सूचनेचा विषय औकाफ मंत्र्यांचा असल्यामुळे माननीय औकाफ मंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेस उत्तर देणे अपेक्षित आहे. मा. औकाफ मंत्री उत्तर देऊ शकत नसतील तर हा प्रश्न उद्यापर्यंत राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या मुळात जाणे आवश्यक आहे. ही लक्षवेधी सूचना भाडेकरुंच्या वतीने आलेली आहे. ही मालमत्ता वक्फ् बोर्डाची आहे. या विषयायमध्ये डेव्हलपर्स आणि 70 टक्क्यापेक्षा जास्त भाडेकरुंचा हा प्रश्न आहे. यामध्ये गृहनिर्माण विभागाचा संबंध येत असल्यामुळे मी या लक्षवेधी सूचनेस उत्तर देणार असून सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे पूर्ण समाधान मी करणार आहे.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, राज्य मंत्री महोदय ने कहा कि यह गृह निर्माण विभाग से जुड़ा मामला है. मंत्री महोंदय ने अपने लिखित निवेदन में बहुत विस्तृत रुप से उत्तर दिया है. निवेदन पढ़ने के बाद ऐसा लगता है कि वक्फ बोर्ड की जमीन के बारे में इसमें कोई जानकारी नहीं है. अगर यह वक्फ बोर्ड की जमीन है तो वह वक्फ बोर्ड में रजिस्टर्ड हुई थी या नहीं, चैरिटी कमिश्नर के कार्यालय में रजिस्टर्ड हुई थी या नहीं, इस संबंध में जब तक हमें इस जमीन का स्टेटस मालूम नहीं होगा तब तक आगे सवाल पूछने का कोई अर्थ नहीं है. इसलिए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ...

पहले इस जमीन का स्टेटस हमें पता चलना चाहिए, जो लिखित उत्तर में स्पष्ट नहीं है. अत: मंत्री जी इस जमीन के स्टेटस की जानकारी दें ताकि इस की सत्यता ज्ञात हो सके और हम यह समझ सके की जमीन किसकी है. इसके बाद ही हम सवाल पूछ सकेंगे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर निवेदनामध्ये आहे. पान तीन वर म्हटले आहे की "सदर वक्फ मिळकतीची नोंदणी कोठेही धर्मदाय आयुक्त किंवा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे करण्यात आलेली नाही. "

श्री. जैनुद्दीन जव्हेरी :सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना ही वक्फ् बोर्डाच्या संदर्भात आहे. वक्फ् बोर्डाचे कार्यकारी अधिकारी श्री. कादरी यांच्या विरोधात ही लक्षवेधी सूचना आहे. वक्फ् बोर्डाचे अध्यक्षपद गेल्या दोन वर्षापासून रिक्त आहे. श्री एम.ए.अजिझ हे वक्फ् बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्याकडून हे पदे गेल्यापासून म्हणजे दोन वर्षापासून हे पद रिक्त आहे. नियमाप्रमाणे निवडणूक घेऊन हे पद भरणे आवश्यक आहे परंतु गेल्या दोन वर्षापासून वक्फ् बोर्डाचे अध्यक्षपद रिक्त आहे. त्यामुळे वक्फ् बोर्डाच्या अध्यक्षाचे पद शासन कधी भरणार आहे ? वक्फ् बोर्डाचे कार्यकारी अधिकारी श्री. कादरी यांच्या विरोधात ब-याच तक्रारी आलेल्या आहेत. पनवेल येथील मशिदीच्या जमिनीत त्यांनी डोनेशन घेतले होते यासंदर्भात मी स्वत: तक्रार केली होती. श्री. कादरीच्या संदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्यामुळे शासन वक्फ् बोर्डाचे कार्यकारी अधिकारी श्री. कादरी यांच्यावर कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख : वक्फ बोर्डाची जमीन कोणालाही विकता येत नाही. तसेच कोणालाही नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही. शिवडी येथील जमीन चॅरिटी कमिशनरच्या अंडर नाही. तसेच वक्फ बोर्डाच्या अंडर देखील नाही. वक्फ बोर्डाचे चार सदस्य आणि सीइओ आणि म्हाडाचे अधिकारी यांनी संगनमताने हा भूखंड विकलेला आहे. वक्फ बोर्डाची जमीन ज्या हेतूने दिली होती तो हेतू पूर्ण होत नसेल तर इतर बांधकामासाठी ती जमीन देता येते काय ? वक्फसाठी जमीन दिली होती. पण तेथे असलेल्या लोकांना बेघर करण्यात आले आहे. यासाठी त्यांना पर्यायी जागा वक्फ बोर्ड देणार आहे काय ? ज्या अधिकाऱ्यांनी संगमताने कारवाई केली आहे ती आपण रद्द करणार आहात काय ?

**सभापती** :वक्फ बोर्डाचे आणि गृहनिर्माण विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. लेखी उत्तरामध्ये असे आहे की, सध्या तेथे म्हाडाचे भाडेकरू आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, औकाफच्या जमिनीवर म्हाडाने हस्तक्षेप केला आहे. यात म्हाडाचा हस्तक्षेप करणे योग्य आहे काय ? हे नेमके कोणाकडून कळेल तर औकाफ मंत्र्यांकडून. एकीकडे दावा केला जातो की, ही जमीन वक्फ बोर्डाची आहे. ही जमीन वक्फ बोर्डाची असेल तर त्यात म्हाडाला हस्तक्षेप करता येऊ शकतो काय ? हा मूळात प्रश्न आहे. त्यामुळे लेखी उत्तरामध्ये आम्हाला औकाफ मंत्र्यांकडून देखील माहिती अपेक्षित होती. ती आम्हाला मिळालेली नाही. त्यामुळे येथे माननीय औकाफ मंत्र्यांचे देखील लेखी उत्तर मिळणे आवश्यक आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, रिपेअर बोर्डा अंतर्गत आपण नियम 33(7) अंतर्गत पुनर्बांधणीसाठी परवानगी देतो त्यावेळी एक मालक असतो. मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन 70 टक्के भाडेकरू पुढे येत असतील तर त्याला ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे काम आपण म्हाडा अंतर्गत करतो. सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, ही जागा वक्फ बोर्डाची आहे काय ? सदर जागा ही एका ट्रस्टची होती. त्या ट्रस्टने 70 टक्के भाडेकरूनां एकत्रित करून खाजगी विकासकांबरोबर जॉईंट ॲग्रीमेंट करून, व्यवहार पूर्ण केल्यानंतर प्रस्ताव पुढे ठेवण्याचे काम केले आहे. त्यास म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. ही वक्फ बोर्डाची जमीन नाही असे खुद्द तिथल्या सीइओ यांनी सांगितले आहे. हे मॅटर सिटी सिव्हील कोर्टात गेले. सिटी सिव्हील कोर्टाने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर......

स्पष्टपणे आदेश दिला आहे की, सदर जागा ही वक्फ बोर्डाची नसल्यामुळे आम्ही हस्तक्षेप करू शकत नाही. वक्फ बोर्डामध्ये दोन प्रकारच्या मालमत्ता जातात. यासंबंधी त्या खात्याचे मंत्रिमहोदय माझ्यानंतर बोलतील. पब्लिक ट्रस्ट आहे आणि त्याला कोणीच वाली नाही तर ती जागा वक्फ बोर्डकडे जाते. वक्फ अलल अवलाद असा देखील ट्रस्ट असतो. यात त्यांच्या कुटुंबातील असणाऱ्या लोकांचा ट्रस्ट असतो. तो वक्फच्या बाहेर आहे असे 1951 च्या कलम 83 नुसार रेक्टिफाय केले आहे. 1988 चे पी.आर.कट म्हाडा समोर आले. त्यामध्ये ॲक्वायर्ड प्रॉपर्टी म्हणून नोंद आलेली आहे. प्रॉपर्टीची ती नोंद बघून, 70 टक्के पेक्षा भाडेकरूंनी सहमती दिल्यामुळे आपण त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे काम केले आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, या सर्व प्रकरणामध्ये फार मोठ्या गांभीर्याने पाहिले पाहिजे असे मला वाटते. यासंबंधी मुस्लिम समाजामध्ये सातत्याने अंसतोष आहे. महाराष्ट्रात वक्फ बोर्डाच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर असूनही त्या जमिनींचा मुस्लिम समाजाला काही फायदा मिळत नाही. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, सी.ई.ओ.नी ही जमीन वक्फ बोर्डाची नाही असे सांगितले." मी मंत्रिमहोदयांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की,"आज कोणालाही कोणत्याही प्रकारे वापरता येते." वक्फ बोर्डाची जमीन म्हणजे कोणीही यावे आणि ती ओरबाडून घेऊन जावी अशी परिस्थिती आहे. सरकारने वक्फ बोर्डाची जमीन घेतली,परंतु त्याचे पैसे दिले नाहीत. मी मंत्री असताना माझ्याकडे औफाफ विभाग होता. या वक्फ बोर्डामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 700-800 रुपये पगार मिळत होता,परंतु तो देखील कधी वेळेवर मिळत नव्हता. म्हणून मी हा विषय मंत्रिमंडळात उपस्थित करुन माननीय वित्त मंत्र्यांकडून 15 लाख रुपये मंजूर करुन घेतले होते. यासाठी मला खूप भांडावे लागले होते. जर आपण पैसे देणार नसाल तर मी मंत्रिमंडळाच्या बैठकीस उपस्थित राहणार नाही असे सांगितल्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी निधी मंजूर केला होता. सरकार वक्फ बोर्डाची जमीन घेते,परंतु पैसे देत नाही. अन्य लोक जमिनी घेतात परंतु तेही पैसे देत नाहीत. राज्यात वक्फ बोर्डाच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर असूनही त्या मुस्लिम समाजासाठी डेव्हलेपमेंट होत नाहीत. खरे म्हणजे या जमिनी मुस्लिम समाजाच्या विकासासाठी, विधवा महिला आणि यतीम लोकांसाठी आहेत. परंतु या जमिनी अन्य लोकांकडून लुबाडण्यात येत आहेत. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, गेल्या 20-25 वर्षात वक्फ बोर्डाच्या किती जमीन ओरबाडण्यात आल्या याची माहिती घेण्यासाठी एक समिती नियुक्त करुन त्याचा अहवाल सभागृहात ठेवण्यात येईल काय ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांनी याठिकाणी अतिशय विस्तृत उत्तरे दिली आहेत. त्याठिकाणी डेव्हलपमेंट सुरु झालेली आहे. विकासकाने डेव्हलपमेंट सुरु करण्यापूर्वी प्लानिंग ऑथॉरिटी म्हणून म्हाडाची परवानगी घेतलेली आहे. म्हाडाने नियम 33(7) अन्वये बांधकामास परवानगी दिलेली आहे. मूळ प्रश्न असा आहे की, ही जमीन वक्फ बोर्डाची आहे काय ? वक्फ बोर्डाच्या जमिनीवर बांधकाम सुरु आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान...

असे दोन-तीन प्रश्न आहेत. मी या संदर्भात ब्रिफींग घेतलेले आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी येथे सांगितले की, ही जागा आयसूबाई हाजी मुहम्मद सालेह हाजी जकेरिया पटेल वक्स अल्ल औलाद ट्रस्टची आहे. सन 1995 मध्ये वक्फ संदर्भात केंद्र सरकारचा कायदा आला आणि हा कायदा आपल्या राज्यात 2002 मध्ये लागू झाला. वक्फ ॲक्टप्रमाणे वक्फ अल्ल औलादची परिभाषा अशी आहे की, स्वत:ची जागा असेल किंवा त्यांचे वारस असतील तर ते वारसाला वक्फ करतात. जागा मालक जमिनीचा काही भाग अल्लासाठी देतात तर काही भाग मुला-मुलींच्या नावे करतात. तशाप्रकारचे डीड झाल्यानंतर ते कोर्टात रजिस्टर करुन घेतले पाहिजे. या प्रकरणी सदरहू ट्रस्टने त्यावेळच्या किंवा आजच्या वक्फ बोर्डामध्ये तशी नोंदणी केलेली नाही. गेल्या जानेवारी महिन्यात वक्फ सी.ई.ओ.कडे काही भाडेकरुंनी अशाप्रकारची तक्रार केली होती. त्यावर वक्फ अधिकाऱ्यांनी ताबडतोब स्थगिती दिली व त्याचे हिअरिंग घेतले. त्यावेळी त्यांच्या असे नजरेस आले की, महसूल विभागाच्या रेकॉर्डनुसार सदरहू मालमत्ता बिल्डर्सच्या नावे ट्रान्सफर झालेली आहे. वारसाने ती जागा विकली आहे असे अधिकाऱ्यांनी सांगितल्यानंतर तेथील भाडेकरुनी सी.ई.ओं.च्या आदेशा विरुध्द अपील केलेले आहे आणि सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसिम खान ........

या संदर्भात सीईओ यांनी दिलेल्या आदेशाला तेथील रहिवाशांनी वक्फच्या ट्रिब्युनल कोर्टात चॅलेंज केलेले आहे व त्या ठिकाणी अपील केले असून हे अपील ट्रिब्युनल कोर्टाच्या विचाराधीन आहे अशा प्रकारची परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री हुसेन दलवाई यांनी यासंबंधीचा मुद्दा मांडला आहे तो अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे .त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य सर्वश्री.एस.क्यु.जमा. जैनुद्दिन जव्हेरी आणि एम.एम.शेख या सर्व सन्माननीय सदस्यांनी मते मांडली आहे त्या मताशी मी देखील सहमत आहे.पुरवणी मागण्यांवर बोलत असतांना सन्माननीय सदस्य श्री पाशा पटेल यांनी देखील आपले विचार व्यक्त केले होते.वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या व्यवहार हा संशयास्पद आहे हे कबूल करण्यास माझी काहीही हरकत नाही.परंतु या बाबतीत शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट आहे की वक्फ बोर्डाची जमीन ज्यांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतली आहे त्यावर वक्फ बोर्डाच्या नियम 1 प्रमाणे कारवाई करुन ती सर्व जागा परत ताब्यात घेण्यात येईल आणि वक्फ बोर्डाकडे देण्यात येईल त्या जागेच्या माध्यमातून जे काही उत्पन्न मिळेल ते उत्पन्न अल्पसंख्याक समाजासाठी वापरण्यात येईल.... अडथळा ... सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या बाबतीत बोंलण्यास मला आणखी एक दोन मिनिटे वेळ दिला तर मी विस्तारपूर्वक माहिती देऊ शकेन त्यामुळे सदनामध्ये आणि सदनाच्या बाहेरच्या लोकांमध्ये जे काही गैरसमज निर्माण झालेले आहेत ते दूर होऊ शकतील.

सभापती महोदय, अशा प्रकारे कडक कारवाई करण्यास आता सुरुवात झ्ांलेली आहे गेल्या बारा महिन्यामध्ये कारवाई करुन कमीत कमी चारशे एकर जागा अनधिकृतपणे लोकांनी बळकावली होती त्याबाबतीत नियमाप्रमाणे कारवाई करुन ही सर्व जागा त्यांच्याकडून ताब्यात घेण्यात आलेली आहे. पुणे जिल्हयातील जुन्नर येथील 110 एकर जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते त्याबाबतीत देखील कारवाई करुन ही जागा त्याच्याकडून परत घेण्यात आली आहे त्याचबरोबर औरंगाबाद, नांदेड, वाशिम इत्यादी ठिकाणी अशा प्रकारची कारवाई करण्यास सुरुवात झालेली आहे. सीईओ यांच्याबद्दल अनेक लोकांनी तक्रारी केलेल्या आहेत म्हणून शासनाकडे जेवढया तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या सर्व तक्रारीची चौकशी करण्याचे निदेश संबधित जे प्रभारी सचिव आहेत त्यांना देण्यात येतील आणि सर्व प्रकरणाची चौकशी करुन त्यामध्ये जो कोणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दोषी असेल त्याच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल हे मी आपल्या माध्यमातून सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करु इच्छितो.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवर मला प्रश्न विचारावयाचा आहे.या लक्षवेधी सूचनेवर कोणी उत्तर द्यावयाचे आहे हे अजून ठरत नाही. वक्फ बोर्डाच्या जमिनी कोणालाही विकता येत नाहीत तसेच या जमिनी कोणालाही विकत घेता येत नाहीत अशी आमची माहिती होती.वक्फ बोर्डाच्या जमिनीशी संबंधित जर ही लक्षवेधी सूचना असेल तर औकाफ मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे अशी आमची अपेक्षा होती .... अडथळा.. सन्माननीय सदस्यांनी मला प्रश्न विचारु द्यावा.सन्माननीय मंत्री श्री सचिन अहिर यांनी उत्तर देतांना मघाशी असे सांगितले होते की, कादरीने ही जमीन आमची नाही असे म्हटले. मूळ विषय असा आहे की, हा कादरीच चोर आहे. या जमिनीच्या रेकॉर्डमध्ये वक्फ बोर्डाचे नाव आले आहे याचा अर्थ असा आहे की या जमिनी वक्फ बोर्डाच्याच आहेत परंतु इतर लोकांनी त्या बळकावलेल्या आहेत. या निमित्ताने मला शासनाला असे सांगावयाचे आहे की वक्फ बोर्डाच्या जमिनीचे सर्व रेकॉर्ड हैद्राबाद येथे आहे . बटाटयाचे शिक्के तयार करुन व बोगस शिक्के मारुन लोकांनी या जमिनी विकल्या आहेत.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

माझा मूळ प्रश्न असा आहे की, या सर्व जमिनींचे रेकॉर्ड हैद्राबादहून आपण याठिकाणी आणणार काय? शासनाने हे रेकॉर्ड आणल्यानंतरच वक्फ बोर्डाच्या किती ठिक्‍ाणी जमिनी आहेत हे जनतेला समजेल. आणि त्यामुळे दोन-तीन वर्षानंतर जमिनीमध्ये होणारे फेरफार थांबतील.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची शासनाने नोंद घ्यावी.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनी ज्यांनी ज्यांनी बळकावल्या आहेत व त्या जमिनींचा दुरुपयोग केला आहे, त्यांच्याकडून त्या जमिनी परत घेतल्या जातील असे मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले त्याबद्दल मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो.

(गोंधळ)

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, रिलायन्सला दिलेली जमीन सुध्दा हे सरकार परत घेणार काय?

(गोंधळ)

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न होता की, वक्फ बोर्डाच्या जमिनीचे संपूर्ण रेकॉर्ड हैद्राबादमध्ये आहे. ते रेकॉर्ड हैद्राबादमधून आपण किती दिवसात आणणार आहात? आणि ते रेकॉर्ड किती दिवसात प्रकाशित करणार आहात? आणि ज्यांनी ज्यांनी या जमिनी गिळल्या आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी उपस्थित केलेल्या मुद्याकडे....

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. राम पंडागळे मी आपणास ताकीद दिलेली आहे.एकदा मी आपणास सांगितल्यानंतर आपण खाली बसत नाही. अशाप्रकारे यापुढे आपण उभे राहिलात तर मला ते सहन होणार नाही.

श्री.नसीम खान :सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनीचे सर्व रेकॉर्ड शासनाकडे आहे. तरीसुध्दा या जमिनीचे जुने रेकॉर्ड देशामध्ये कुठेही असले तरी त्याची जेव्हा जेव्हा गरज लागेल तेव्हा ते आणण्याची कारवाई आपण करीत असतो. केंद्र सरकारने याबाबत कायदा केल्यानंतर राज्य सरकारने निर्णय घेतला की, राज्यामध्ये विविध ठिकाणी वक्फ बोर्डाच्या जमिनी आहेत त्यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. नसीम खान....

नोंदणी करुन व संगणकीकरण करुन ती संपूर्ण माहिती वेब साईटवर टाकण्यात येईल. जेणेकरुन राज्यातील कोणत्या जिल्हयामध्ये किती ठिकाणी जमीन आहे हे जनतेला समजू शकेल. व त्यामध्ये पारदर्शकता राहिली पाहिजे यासाठी काळजी घेण्यात येईल.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना हिंदुस्थानामध्ये कुठेही रेकॉर्ड असले तरी आम्ही ते आणू असे सांगितले आहे.आता ते रेकॉर्ड किती दिवसात आणणार हे विचारा. याठिकाणी आम्ही एखादा प्रश्न विचारल्यानंतर त्याची नोटिस द्या, किंवा तो प्रश्नाशी संबंधित नाही, किंवा वेगळा प्रश्न विचारा असे सांगितले जाते. याठिकाणी वक्फ बोर्डाच्या जमिनीचा विषय मांडण्याचा आपल्याला अधिकार आहे, तो आपण मांडा. तुमचे समाधान होईपर्यंत मांडा. परंतु याठिकाणी हा काद्री कोण आहे,तुम्ही तुमच्या जमिनी विकत आहात, तर मग या सभागृहाला कशासाठी छळता?

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी पाचवी लक्षवेधी सूचना मांडावी.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नबांधणीकरिता अतिरिक्त चटईक्षेत्र देण्याचे म्हाडाचे धोरण

**मु. शी.** : जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नबांधणीकरिता अतिरिक्त चटईक्षेत्र देण्याचे म्हाडाचे धोरण यासंबंधी श्री. कपिल पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई मधील म्हाडाच्या वसाहतींमधील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र देण्याचे म्हाडाने ठरवलेले धोरण, त्यानुसार टिळकनगर, डी.एन.नगर, पंतनगर, इत्यादी ठिकाणाच्या म्हाडाच्या एकूण 104 वसाहतींमधील हजारो इमारतींचे पुर्नविकासाचे काम सुरु होणे, टिळकनगर चेंबूर येथील म्हाडा वसाहतीतील इमारत क्रमांक 62 मधील अक्षय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या 90 टक्केपेक्षा जास्त सभासदांनी पुनर्बांधणीसाठी प्रस्ताव करणे, तथापि त्यांचे विरुध्द काही जणांनी सतत तक्रारी दाखल करणे, शासनाच्या विविध खात्यांमधून तक्रारदारांच्या तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे आढळणे, उच्च न्यायालयाने म्हाडा, महापालिका, एसआरए इत्यादीच्या पुर्नविकासासाठी स्थापन केलेल्या हाय पॉवर कमिटीकडे सविस्तर अभ्यासासाठी हे प्रकरण न पाठविण्यासाठी तक्रारदारांनी सतत प्रयत्न करणे, तसेच सामान्य प्रशासन विभागाचे सन 1972 चे आदेश स्थगित असल्याचे कारण दाखवून लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी होण्यासाठी प्रयत्न करणे, त्यामुळे या 104 वसाहतींमधील हजारो इमारतींचे पुर्नविकासाचे काम धोक्यात येणे, तपास अधिकाऱ्यांना नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, गृहविभाग, सहकार विभाग या खात्यांकडून प्राथमिक अहवाल मागविण्यास अडथळा करणे, अशा तक्रारी हाय पॉवर कमिटीकडे न जाता लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे जात असल्यामुळे म्हाडा, महानगरपालिका, सहकार विभाग, तसेच पोलिस अधिकाऱ्यांनी पुनर्विकासाच्या प्रक्रीयेत मदत न करणे, सर्व प्रकरणे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हायपॉवर कमिटीकडे पाठविणे आवश्यक असताना अशा तथ्यहीन तक्रारीमुळे गरीब कुटुंबियांची होरपळ व ससेहोलपट होणे, यामुळे तेथील सभासदांमध्ये पसरलेला असंतोष आणि संताप, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, म्हाडाच्या 104 वसाहतीमधील हजारो इमारतींचा व त्यामधील लाखो कुटुंबांचा हा प्रश्न आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 15:20

श्री. कपिल पाटील.....

सभापती महोदय, एका सोसायटीतील एका सभासदाच्या तक्रारीमुळे मुंबईतील 104 वसाहतींमधील हजारो कुटुंबांना ओलीस धरण्यात आलेले आहे. या निवेदनामध्ये मूळ प्रश्न असा विचारण्यात आला होता की, अशा तक्रारी ए.सी.पी.कडे न पाठविता त्या हायपॉवर समितीकडे का पाठविण्यात आल्या नाहीत? या प्रश्नाचे उत्तर न देता तीन-चार गोष्टी माननीय मंत्रिमहोदयांनी कबूल केलेल्या आहेत. 90 टक्क्यापेक्षा जास्त सभासदांची मान्यता होती. या सगळया इमारती धोकादायक आहेत. हायकोर्टाने कोणताही गुन्हा नोंदवण्याचा आदेश दिला नसताना गुन्हा नोंदवला गेला आहे आणि चुकीच्या पध्दतीने हे प्रकरण हाताळले जात आहे. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, हे सगळे प्रकरण हायपॉवर समितीकडे पाठविणार काय? आणि कोर्टाच्या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून 1972 च्या निर्णयाला स्थगिती मिळविलेली आहे ती स्थगिती उठविण्यात येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, या अगोदर देखील म्हाडाच्या अशा अनेक तक्रारी मग त्या एफएसआय बद्दल असतील किंवा इतर कामाच्या बाबतीत असतील त्या ज्या ज्या वेळी करण्यात आल्या त्या त्या वेळी ती सर्व प्रकरणे माननीय उच्च न्यायालयात नेण्याची मुभा सर्व रहिवाशांना आणि तक्रारदारांना दिलेली आहे. माननीय उच्च न्यायालयात अशा प्रकारच्या ज्या तक्रारी येतात त्यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाने सचिवांच्या स्तरावर एक हायपॉवर समिती नेमलेली आहे. या समितीला त्या सर्व तक्रारी बघता येतील काय? या संबंधित केसच्या संदर्भात हायकोर्टाने एक निर्णय दिलेला आहे. 1972 साली जीएडीचा एक निर्णय होता तसेच गृह विभागाचा एक निर्णय होता. संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करावयाची असेल तर त्याच्यावर सरसकट गुन्हा न नोंदवता त्यांची खात्यामार्फत चौकशी करुन त्यामध्ये दोषी आढळले तर त्याप्रमाणे त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्याचा किंवा कारवाई करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु कोर्टाच्या एका आदेशान्वये असे सांगितले होते की, हा 1972 चा जी.आर. वेगळा ठेवून कारवाई करण्यात यावी. एका प्रकरणामध्ये त्याचे सबस्टेन्शिएल एव्हिडन्स मिळाल्यामुळे ॲन्टीकरप्शन ब्युरोने त्याच्यावर एफआयआर नोंदविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात त्याचा उद्देश सरसकट नाही. पण आज एक सबस्टेन्शिएल एव्हिडन्स मिळाल्यामुळे सर्वांनाच असे वाटते की, काहीही तक्रार करायची असेल, मग ज्याला घर मिळाले ते देखील ॲन्टी करप्शनकडे जातात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा इतर कोणत्याही गोष्टीमध्ये त्यांचे समाधान झाले नाही तर ॲन्टीकरप्शनकडे जातात. म्हणून ही सर्व प्रकरणे हाय पॉवर समिती, जी हाय कोर्टाने नेमलेली आहे, या समितीकडे देता येण्याच्या दृष्टिकोनातून माननीय उच्च न्यायालयाचा अवमान न होता जर काही करता आले तर तशा प्रकारचा प्रयत्न त्या त्या विभागाशी चर्चा करुन करण्याचा प्रयत्न केला जाईल्.

श्री. विजय सावंत : सभापती महोदय, या सोसायटीमध्ये 37 सदस्य आहेत त्यापैकी 36 सदस्यांनी या रीडेव्हलपमेंटला मंजुरी दिलेली आहे. या सोसायटीच्या मॅनेजिंग समितीची अशी चूक झालेली आहे की, त्यांनी सेक्शन-20 खाली जो बॉण्ड भरुन द्यावयाचा असतो तो भरुन दिलेला नाही. या एका चुकीमुळे एसीबीने त्यांच्यावर केस दाखल केली. या बॉण्डचा अर्थ असा आहे की, मॅनेजिंग समिती कोणताही भ्रष्टाचार करणार नाही.सोसायटीचे नुकसान होईल अशी गोष्ट करणार नाही, कोणताही गैरव्यवहार करणार नाही. अशा तऱ्हेचा हा बॉन्ड असतो. मुंबईमध्ये हा बॉन्ड पेपर पुष्कळ सोसायटयांनी भरुन दिलेला नाही. पण या एकाच कारणासाठी या मॅनेजिंग कमिटीच्या विरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे. हा गुन्हा माझ्या म्हणण्याप्रमाणे चुकीचा आहे. जनरल बॉडीने या रीडेव्हलपमेंन्टला परवानगी दिलेली आहे. उद्या समजा कायद्याप्रमाणे ही मॅनेजिंग समिती रद्द झाली तर मॅनेजिंग समितीने परवानगी दिल्यामुळे ती डेव्हलपमेंट थांबविता येत नाही. या सोसायटीचे डेव्हलपमेंन्ट थांबविण्यात आलेले आहे तसेच मॅनेजिंग समितीच्या व्यतिरिक्त इतर 30 ते 35 लोकांवर केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत त्या चुकीच्या आहेत. सभापती महोदय, या स्पेसिफिक प्रकरणामध्ये ए.सी.बी.कडे जी केस दाखल करण्यात आलेली आहे ती हाय पॉवर समितीकडे पाठविण्यात येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की,कायदेशीर बाबी तपासून कोर्टाचा अवमान न होता ती केस हाय पॉवर समितीकडे पाठविण्यात येईल. या अनुषंगाने एका गोष्टीचा विचार करावा लागेल की, अशी प्रकरणे वाढत चाललेली आहेत. मोठया प्रमाणावर हेही मान्य करावे लागेल की, सर्वच अधिकारी चांगले काम करतात अशातला भाग नाही. काही उणिवा अधिकारीवर्गामध्ये देखील आहेत. काही वेळा एफएसआयचे घोटाळे,टी.डी.आर.चे घोटाळे मोठया प्रमाणात वाढताना दिसतात आणि त्यातून शासनाची प्रतिमा मलीन होते. म्हणून शासन स्तरावर मी स्वत: पुढाकार घेऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ......

आम्ही नियम प्राधिकरण आणण्याचे काम करीत आहोत. त्याला क्वासी ज्युडिशियल अधिकार देण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. जेणेकरुन अशी तक्रार आली किंबहुना कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार किंवा गैरव्यवहार करण्याची भूमिका असली तर त्यासाठी कोठे तरी दाद मागण्यासारखे एक प्राधिकरण असावे यादृष्टीकोनातून नियम प्राधिकरणाची स्थापना लवकरात लवकर करण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करील. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे ही सर्व प्रकरणे हायपावर कमिटीकडे देता येईल काय या दृष्टीकोनातून सुध्दा सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या कॉलनीमध्ये पुनर्विकासाच्या पुष्कळ केसेस चालू आहेत. सगळे नियम कागदावर राहिलेले आहेत. पुनर्विकासाकरिता आपण 33(5) हा नियम लावलेला आहे. पण बहुतांश सोसायट्यांमध्ये विकासकांकडून काही कमिटी सदस्यांना हाताशी धरुन, त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवून, सर्व नियम तोडून, आपण जास्त जागा देऊ असे सांगून लोकांना फसवले जाते. चार पाच वर्षे ट्रान्झीट कॅम्पमध्ये किंवा भाडेतत्वावर राहिल्यानंतर लोकांना कळते की, आपण विकासकाकडून फसवले गेलो आहोत. अशा ठिकाणी जनरल बॉडीची बैठक चालू असताना म्हाडाचे काही अधिकारी जातात. नियमांचे उल्लंघन होत असताना स्वत: त्या ठिकाणी उपस्थित असतात. त्यानंतरही त्यांना मंजुरी देत आहेत. आपला जो 33(5) नियम आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी शासन करणार काय ? अधिकारी 33(5) हा नियम तोडत आहेत. एक तर तो नियम रद्द करुन टाका आणि ज्यांना जसे द्यावयाचे आहे तसे देऊ द्या. जे नियम तोडत आहेत त्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, 33(5) अंतर्गत आता एक स्पर्धा निर्माण झालेली आहे. म्हाडामध्ये पुनर्बांधणी करण्याच्या संदर्भात आपण 416 चौरस फुटाची मर्यादा दिलेली आहे पण भाडेकरुंना जर विकासक जास्तीत जास्त फायदा देत असतील तर त्यांनी तो घ्यावयास पाहिजे म्हणून त्याला आपण कोठेही बंधन ठेवलेले नाही. पण आता असे दिसावयास लागले आहे की, कोणी 425 चौरस फूट जागा देतो तर कोणी 500 चौरस फूट जागा देतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. सचिन अहिर ....

उपनगरामध्ये 1400 चौरस फुटाचा फ्लॅट देण्यास तयार आहोत असे सांगतात. अशा वेळी दिशाहीन होण्याचे काम होते. केवळ ते दिशाहीन होत नाहीत तर संपूर्ण योजना दिशाहीन होते आणि म्हाडाला जे मिळणे अपेक्षित आहे ते मिळत नाही. मी परवाच म्हाडाच्या उपाध्यक्षांशी या विषयावर सखोल चर्चा केली. म्हणून शासन स्तरावर यासाठी कोठे तरी बंधन असले पाहिजे. जसे आपण एसआरएच्या संदर्भात बंधन घातलेले आहे तसे 33(5) च्या बाबतीत आपल्याला करता येईल काय, ते करीत असताना काही सर्टिफिकेशन असेल किंवा असलेल्या भाडेकरुंना शेवटपर्यंत घर मिळण्याच्या दृष्टीकोनातून देखील आपली जबाबदारी 33(5) मध्ये आहे, हा दृष्टीकोन ठेवून अशा पध्दतीने काही विचार करता येईल काय अशा सूचना संबंधित उपाध्यक्षांना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर शासन निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करील.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री वस्तुस्थिती कबूल करतात. पण हायपावर कमिटीकडे हे प्रकरण पाठविण्यासाठी पुन्हा प्रकरण तपासण्याची काय आवश्यकता आहे? कारण या एका प्रकरणामुळे 104 वसाहतींमधील पुनर्विकास थांबलेला आहे. हजारो कुटुंबे देशोधडीला लागण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे या सोसायटीच्या प्रकरणासह अशी पुनर्विकासाची जेवढी प्रकरणे आहेत ती हायपावर कमिटीकडे ताबडतोब पाठविणार काय ? कारण त्यासाठीच हायपावर कमिटी तयार केली आहे. कोर्टाने देखील त्याला कोणतेही बंधन घातलेले नाही. त्यामुळे हायपावर कमिटीकडे पाठविण्याबाबत स्पष्ट घोषणा करणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. आपली न पाठविण्याची नकारात्मक भूमिका नाही. हायपावर कमिटीचा जो स्कोप दिलेला आहे तो एसआरएसाठी आणि नियम 36(6) साठी दिलेला आहे. यामध्ये 33(5) संबंधी म्हाडाच्या कॉलनीचा नवीन विषय आलेला आहे. म्हणून विभागाच्या वतीने आमची देण्याची मानसिक तयारी आहे पण कोर्टाचा अवमान होता काम नये. कारण ते सर्क्युलर गृह विभागाचे होते. तसेच एक सर्क्युलर सामान्य प्रशासन विभागाने काढलेले अहे. आपण काही भूमिका घेत असताना त्या विभागाशी संबंधित असलेले विषय असल्यामुळे अगोदर सांगितल्याप्रमाणे ही सगळी प्रकरणे हायपावर कमिटीकडे हायकोर्टाचा अवमान न होता देण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक भूमिका घेईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

**उपसभापती** : यानंतर मी पुढची लक्षवेधी सूचना पुकारणार आहे तत्पूर्वी माननीय मंत्रिमहोदयांना एक गोष्ट खात्रीशीर सांगू इच्छितो की, अशी प्रकरणे उद्‌भवतात याचा अर्थ म्हाडामध्ये काही जे अधिकारी बसलेले आहेत ते करीत असलेला भ्रष्टाचार देखील याला कारणीभूत आहेत. मी खाजगीमध्ये काही उदाहरणे आपल्याकडे पाठवीन त्याची आपण जरुर तपासणी करावी. एखादे प्रकरण ॲन्टी करप्शनकडे देऊ नका हे मान्य आहे पण सरसकट अशा प्रकारचा भ्रष्टाचार त्या ठिकाणी चालत असेल तर हायपावर कमिटी काय करणार ? ॲन्टी करप्शन ॲथॉरिटी शासनाने का निर्माण केली ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, म्हणूनच मी सांगितल्याप्रमाणे आता आपण निव्वळ आपल्यापुरता हा विषय मर्यादित न ठेवता नियम प्राधिकरणाची स्थापना करुन त्यांना क्वासी ज्युडिशियल अधिकार देण्याचा प्रयत्न करीत आहोत. अशी सर्व प्रकरणे आल्यानंतर अनेक वेळा राजकीय हस्तक्षेप होतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे घेतलेल्या लोकांना परत आणण्याची भूमिका काही लोकांकडून घेतली जाते. ते होऊ नये यासाठी नियामक प्राधिकरण स्थापन करणार आहोत, त्यांना क्वॉसिज्युडिशिअल अधिकार दिले जातील. पुढील अधिवेशनपर्यंत हे आणण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामध्ये ऑब्जेटस् बरेच असतील, मग भ्रष्टाचार झालेला असेल, भाडेकरुना घर मिळाले नसेल एखाद्या बिल्डरने चौ.फू.प्रमाणे घर देण्यामध्ये फसवणूक केली असेल, म्हणजे अशी जास्तीत जास्त कारणे त्यामध्ये असतील आणि तसे विधेयक चर्चेसाठी आणले जाणार आहे.

**उपसभापती** : ठाणे जिल्हयातील एक गरीब व्यक्तीचे प्रकरण होते. दोन वर्षे म्हाडाच्या अधिका-यांनी फाईल क्लिअर केली नव्हती. हा राजकीय हस्तक्षेप होऊ शकत नाही. मी स्वत: अधिका-यांना फोन केला होता, हा राजकीय हस्तक्षेप होऊ शकत नाही. शेवटी श्री.गौतम चटर्जी यांना फोन केल्यानंतर त्यांनी दोन दिवसात फाईल क्लिअर केली. परंतु संबंधित अधिका-यांनी दोन वर्षे त्यांना अडवून ठेवले होते. त्याठिकाणी लोकांकडे सरळ सरळ पैशाची मागणी केली जाते, हे कोठे तरी थांबले पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांकडे माझ्याकडील प्रकरणांची माहिती देतो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

NTK/ KGS/ KTG/

**पृ.शी.**: पुणे या शहरासाठी शासनाने पाण्याचे प्रयोजन व नियंत्रण करणे

**मु.शी.**: पुणे या शहरासाठी शासनाने पाण्याचे प्रयोजन व नियंत्रण करणे यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती दिप्ती चवधरी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मागील दीड महिन्यात पुण्यातून पावसाने मारलेली दडी, दोन दिवसांपूर्वी पुणे म.न.पा.आयुक्तांनी पुण्याला एक दिवसाआड पाणी मिळेल असे जाहीर करणे, अशा प्रकारे पावसाने दडी दिल्यास पुण्याच्या पाणी प्रश्नाविषयी शासनाचे प्रयोजन, पवना धरण व टेंबघर धरणातील पाणी पुणेकरांसाठी राखीव करण्यात येणे, पुण्यासाठी शासनाने पाण्याचे प्रयोजन व नियंत्रण करण्यात येणे, मुळशी धरण (टाटा) वीज निर्मितीसाठी पाणी वापरत असून पुण्यातील आणीबाणीच्या वेळेला पुणेकरांसाठी तेथील पाणी उपलब्ध करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता पुणे शहरासाठी 8 टीएमसी पाणी पुरवठा होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात 14 टीएमसी पाणी उचलले जाते. याचे प्रमुख कारण पाण्याची चोरी व गळती हे आहे. ही गळती थांबविण्यासाठी पुणे महानगरपालिकेने एक योजना तयार केली आहे. या योजनेनुसार संपूर्ण पाईप लाईन बदलण्यात येणार आहे. या कामासाठी 1100 कोटी रुपये लागणार आहेत. हा निधी शासन उपलब्ध करुन देणार आहे काय ? त्याचप्रमाणे पाईप लाईनमधून किती कोठे पाणी पुरवठा केला जातो ते मोजण्यासाठी मीटर लावलेले आहेत ते सध्या बंद आहेत. उपलब्ध साठयाचा नेहमी जून महिन्यामध्ये आढावा घेतला जातो त्यानंतर अधिका-यांची पळापळ सुरु होते. म्हणून दर महिन्याला आढावा का घेतला जात नाही ? मार्च महिन्यात बैठक घेऊन उपलब्ध साठयाचा अंदाज येईल आणि पाण्याचे नियोजन करता येईल. त्याप्रमाणे का कार्यवाही केली जात नाही ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे शहरासाठी खडकवासला धरणाच्या वरती वरसगांव, टेमघर व पानशेत या चार धरणातून 14 टीएमसी पाणी उचलले जाते. खरे तर त्यांना 14 टीमसी पाणी उचलताच येत नाही. सन 1997 मध्ये महानगरपालिकेने वार्षिक 11.5 टीएमसी पाणी वापरण्याबाबतचा करारनामा पाटबंधारे विभागाशी केला होता. परंतु पुणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन सन 2009-2010 या वर्षासाठी पाटबंधारे विभागाने 14 टीएमसी इतके पाणी उचलण्याची परवानगी दिली होती. पुणे शहराला पाणी का कमी देण्यात आले यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. यंदा या धरणामध्ये जवळजवळ पाणीच शिल्लक राहिले नव्हते. काल परवापर्यंत पाऊस पडला त्यावेळेपर्यंत या धरणांमध्ये 1.22 टीएमसी पाणी शिल्लक राहिले होते. गेल्या वर्षी या तारखेला या धरणांमध्ये 10.9 टीएमसी पाणी शिल्लक होते. या वर्षी एवढी पाण्याची पातळी खाली आली आहे. आजच्या तारखेपर्यंत या धरणांमध्ये 5.52 टीएमसी पाणी साठा झालेला आहे, गेल्या वर्षी 16.66 टीएमसी पाणीसाठा झाला होता. एकंदरीत पाहिले तर या धरणांमध्ये पाणी साठाच कमी आहे. तसेच दिवसेंदिवस तेथील लोकसंख्या प्रमाणापेक्षा वाढत आहे. सन्माननीय सदस्या म्हणतात त्याप्रमाणे महानगरपालिकेशी संबंधित हा विषय आहे, त्यांनी पाण्याचे ऑडिट करणे, मार्च महिन्यात आढावा घेणे, वॉटर मीटर चालू नसल्यामुळे ते सुस्थितीत ठेवणे, पाईप लाईन बदलण्याचा खर्च करणे, त्याबाबत निश्चितपणे महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...

सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे एवढे करुन सुध्दा पाईप लाईन बदलण्याकरिता शासनाला मदत करण्याची वेळ आलीच तर त्यावेळच्या परिस्थितीनुसार शासन विचार करील.

श्रीमती दिप्ती चवधरी : सध्याची पुण्याची पाणी कपात कमी करण्याचा विचार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : जे पाणी अगदीच कमी मिळत होते ते पाणी अधिक देण्याचा निर्णय झालेला आहे. गेल्यावर्षी आजच्या तारखेला धरणामध्ये 16 टीएमसी पाणी होते आणि यावर्षी आजच्या तारखेला चार दिवस पाऊस चांगला झाल्यामुळे 5.52 टीएमसी पाणी धरणामध्ये आहे. त्यामुळे पाणी कपात पूर्णपणे रद्द करता येणार नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : पिण्याच्या पाण्याकरिता मुंबई उपनगरासाठी ज्या प्रमाणे एक धरण राखीव ठेवण्यात येते किंवा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात येते त्याप्रमाणे पुणे शहराच्या आजुबाजूला असलेल्या पवना, मुळा धरणापैकी एखादे धरण राखून ठेवण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : पवना आणि मुळशी या धरणाची क्षमता 9 टीएमसी आहे. पिण्यासाठी पाणी की शेतीसाठी पाणी असे दोन मतप्रवाह आहेत. धरणातील पाणी देण्याकरिता शेतकरी तयार नाहीत. 9 टीएमसी पाण्यापैकी 4 टीएमसी पाणी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला देण्यात येते. उर्वरित पाण्यावर एमआयडीसीनेही दावा केलेला आहे. शेतक-यांच्या शेतीसाठीही पाणी द्यावे लागते. त्यामुळे तूर्त तरी या धरणातून पाणी मिळणे कठीण आहे.

श्री. रमेश शेंडगे : पुणे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पुणे महानगरपालिका आणि त्या पालिकेमध्ये समाविष्ट होणा-या गावांची संख्या वाढत चालली आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता पुणे शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. गेल्यावर्षी देखील अशा प्रकारचा प्रसंग उद्‌भवला होता. पाटबंधारे आणि पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांनी एकत्रित बैठक घेऊन पाणी कपातीची घोषणा केली. सभापती महोदय पुण्याची वाढती लोकसंख्या आणि भविष्यात वाढत जाणारे पुणे, पिण्यासाठी लागणारे पाणी, शेतीसाठी लागणारे पाणी यांचा विचार करुन उपाययोजना करण्याची गरज आहे. महापालिकेचे आयुक्त आणि पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांच्या स्तरावर हा प्रश्न सुटणार नाही. हा मंत्रीस्तरावरील प्रश्न आहे. धरणात किती पाणी शिल्लक आहे, किती पाण्याची गरज आहे, पाणी

..2..

(श्री. रमेश शेंडगे......

किती दिवस पुरेल याचा मार्च महिन्यामध्येच आढावा घेऊन त्यादृष्टीने काही उपाययोजना करण्यात येणार आहे काय ?

....नंतर श्री. भोगले....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 15:40

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.......

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी अत्यंत मूलभूत प्रश्न विचारला आहे. ज्यावेळेला नियोजन झाले त्यावेळेची पाण्याची आवश्यकता, वाढलेली लोकसंख्या आणि वाढलेली गरज यामध्ये खूप तफावत आहे, या सगळ्याचा विचार करीत आहोत. आहे त्या पाण्याबद्दल ओढाताण करण्यापेक्षा आणखी लोकसंख्या वाढणारच आहे त्या अनुषंगाने नियोजन करावे लागणार आहे. मुंबई शहराच्या पाण्याकरिता नवीन चार धरणे होत आहेत. 2021 साली ही धरणांची कामे पूर्ण झाल्यानंतर 100 टक्के लागणारे पाणी देता येईल अशाप्रकारची योजना मुंबई महापालिका आणि शासन यांच्या पुढाकाराने आखली जात आहे. त्या पध्दतीने सकाळी चर्चा करीत असताना विचार करीत होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगितले की, पवना, मुळशी, टेंबघर, पानशेत या धरणांची क्षमता किती आहे, किती पाणी देता येईल? पाणी उपलब्ध नसेल तर या शहराला पाणी येणार कुठून? म्हणून यासंबंधी नियोजन करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे एखादा निवृत्त मुख्य अभियंता किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी वा कोणत्या दर्जाचा अधिकारी असावा यापेक्षा ज्या पध्दतीने मुंबई शहराच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी चितळे समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीकडून सर्वंकष अहवाल मागविण्यात आला. तशाच प्रकारे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुध्दा अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे शासन पुढाकार घेईल आणि तशाप्रकारची समिती नेमण्याचा शासनाचा विचार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज दुपारी 2.05 वाजता दैनिक सकाळ या वृत्तपत्राच्या प्रतिनिधींकडून मला एसएमएस प्राप्त झाला असून त्यात म्हटले आहे की, पुणे शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जात होता आता रोज पाणीपुरवठा केला जाणार आहे. अधीक्षक अभियंता श्री.अविनाश सुर्वे यांची महापालिकेशी चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे लक्षवेधी सूचनेचा हेतू साध्य झाला आहे असे मला वाटते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहात मोबाईल फोन सुरु ठेवण्यास किंवा मोबाईल फोन ऑपरेट करण्यास बंदी आहे. असे असताना सन्माननीय सदस्यांना एसएमएस कसा प्राप्त झाला?

.2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी लॉबीमध्ये गेले होते त्यावेळी एसएमएस आला होता.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आज पुणे शहराची पाण्याची समस्या उग्र बनलेली आहे. महाराष्ट्रात शहरीकरणाची वेगाने वाढ होत आहे. नाशिक, नागपूर, रत्नागिरी याबरोबरच नवीन शहरे उदयास येत आहेत. त्यामुळे पाण्याची मागणी वाढणारच आहे. त्यादृष्टीने नियोजन करण्याचा शासन विचार करीत आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, होय. आज शहरी लोकसंख्या 50 टक्क्यापेक्षा अधिक झालेली आहे. यंदा सुवर्ण महोत्सवी नगरोत्थान अभियान शासनाच्या नगरविकास विभागाने हाती घेतले असून त्या अभियानामध्ये पुढील 25 वर्षात वाढणारी लोकसंख्या लक्षात घेऊन लागणाऱ्या पाण्याचे नियोजन करावे अशा गोष्टीचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

-------

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : धनगर समाजातील लोकांवर होणारे अत्याचार

**मु. शी.** : धनगर समाजातील लोकांवर होणारे अत्याचार यासंबंधी श्री.मोहन जोशी,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"हडपसर (पुणे) येथील डोंगरदऱ्यात व राना-माळयात जीवन जगणाऱ्या धनगर समाजाला बकरी व मेंढी चारण्यासाठी या रानातून त्या रानात भटकंती करावी लागणे, स्थानिक गुंड व परिसरातील काही लोक त्यांना तुच्छतेची वागणूक देत असणे, अनेकदा मेंढयाची व बकऱ्यांची चोरी होणे, काही वेळा या समाजाच्या बायकांवर बलात्कारासारख्या भयंकर घटना घडणे, त्यांना मारहाण करणे अशाप्रकारे विविध गावातील गुंडाकडून होत असलेला त्रास व त्याबद्दल पोलीस स्टेशनवर तक्रार करण्यास गेले असता तक्रार नोंदवून न घेता त्यांना धमकावून हाकलून लावणे यामुळे या धनगर समाजात निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.7.......

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, लोकसंख्येच्या मानाने बहुसंख्य असणारा आणि भटकंती करणारा हा समाज आहे. हा समाज ज्या ज्याठिकाणी जातो त्या त्याठिकाणी त्यांच्यावर अत्याचार होत आहेत. या समाजाचा विकास करण्यासाठी शेळी मेंढी विकास महामंडळाची निर्मिती झाली. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे हे त्या महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी या सभागृहात अनेकदा हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी विकास महामंडळाची स्थापना केली गेली. परंतु त्या महामंडळाला अद्याप आर्थिक निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. या समाजाच्या विकासासाठी शासन योजना राबविणार आहे काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न फार वेगळा आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी उपेक्षित घटकाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, अतिशय कष्टाचे जीवन या समाजातील लोकांना जगावे लागते. भटकंतीचे जीवन जगावे लागते. अनेकवेळेला लांडग्यांपासून ते वाघापर्यंत आणि चोरांपासून देखील मेंढ्यांना धोका असतो. दुसऱ्याच्या शेतामध्ये चरण्यासाठी सोडलेल्या मेंढ्या राखत असताना अपमानास्पद वागणूक मिळते. हा समाज पिढ्यान्‌पिढ्या या गोष्टी सहन करीत आहे हे मान्य करावे लागेल.

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

यातून या समाजाला बाहेर काढून त्याला स्थैर्य देण्यासाठी आवश्यक त्या दृष्टीने या शेळी-मेंढी विकास महामंडळाला भरीव भांडवल देण्यासाठी माननीय अर्थमंत्र्यांना तशी विनंती करुन मी स्वत: प्रयत्न करीन. तसेच या महामंडळाला चांगल्या प्रकारचे सहकार्य करण्याची भूमिका घेण्यात येईल. त्याचबरोबर अनेक वेळा या समाजावर जे अत्याचार होतात त्याची नोंद पोलीस स्टेशनमध्ये घेतली जात नाही, त्यांच्या तक्रारी सुध्दा नोंदविल्या जात नाहीत त्यामुळे ते निमुटपणे सहन करतात. त्यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशन्सना एका परिपत्रकाच्या माध्यमातून या समाजाचा अवमान होणार नाही, त्यांची मालमत्ता म्हणजे शेळ्या-मेंढ्या यांना त्रास देऊ नये अशा सूचना देण्यात येतील.

श्री. रमेश शेंडगे : महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे मी आभार मानतो. त्यांनी सभागृहात अतिशय महत्वाचा निर्णय जाहीर केला. तो म्हणजे मेंढपाळांसारख्या भटकंती करणाऱ्या समाजाला त्यामुळे मदत होईल. धुळे आणि जळगांव या भागात अशी भटकंती करणारा समाज आहे. ज्याच्या सोबत एक घोडा, त्यावर एक कोंबडी, त्यावर कुत्र्याचे पिल्लू आणि त्यावर बकरीचे पिल्लू आणि त्याच घोड्यावर त्या मेंढपाळाचे पिल्लू असा संपूर्ण संसार घोड्याच्या पाठीवर भटकंती करतो. सप्टेंबर ते मे महिना असे वर्षातील आठ महिने हा समाज राना-वनातून फिरत असतो. त्याच्यावर अशा प्रकारचा अन्याय होतो, त्यांच्या तांड्यांवर दरोडे पडतात, बलात्कार होतो. ही गोष्ट खरी आहे की, हा प्रश्न जरी केवळ पुण्यापुरताच मर्यादित असला तरी संपूर्ण राज्यात हीच समस्या भेडसावत आहे. मुक्ताईनगर भागात सुध्दा मागील काळात अशा मेंढपाळांच्या तांड्यावर दरोडा पडला होता, तेथे बलात्कार व खून सुध्दा झाला ा होता. या माध्यमातून मी शासनाला विचारु इच्छितो की, अशा प्रकारे भटकंती करणारा समाज ज्या ज्या ठिकाणी जातो ते ते मार्ग त्यांचे ठरलेले असतात. त्या भागात शासन जे परिपत्रक काढणार आहे त्या माध्यमातून पेट्रोलिंग करणारे वाहन उपलब्ध असेल तर या लोकांच्या तांड्यावर जाऊन पेट्रोलिंग करण्याच्या सूचनाही देण्यात याव्यात.....अडथळा......ज्या ज्या वेळी धनगर समाजाचा प्रश्न या सभागृहात उपस्थित होतो तेव्हा तेव्हा सभागृहातील सदस्य हसत असतात, या समाजाची एक प्रकारे खिल्ली उडवित असतात. खाण्या-पिण्यात जर एखादा दिवस मटन मिळाले

नाही तर त्रासून देतात पण ज्यावेळी या महामंडळाचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा मात्र त्याची मस्करी

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .......

केली जाते. या मेंढपाळांच्या, धनगर समाजाच्या लोकांच्या बाबतीत या राज्यात हे काय चालू आहे हेच मला समजत नाही. म्हणून शासनाला माझी विनंती आहे की, या अनुषंगाने शासनाने दखल घ्यावी. मी सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांचे विशेष आभार व्यक्त करतो. कारण धनगर समाजाव्यतिरिक्त सदस्य असतानाही त्यांनी आमच्या समाजाच्या व्यथा सभागृहासमोर मांडल्या आहेत. अनेक वेळा आम्ही मागणी केली तरी देखील या महामंडळाला एक रुपयाचाही निधी दिला जात नाही. महामंडळाकडे बघितले सुध्दा जात नाही. त्यांच्या सोई-सवलतींचा विचार केला जात नाही. सभागृहात वेळोवेळी आश्वासने दिली जातात पण त्यांची अमलबजावणी मात्र होत नाही. कृपया आपण तरी माझी, या समाजाची व्यथा समजून घ्यावी अशी आपल्याला विनंती करतो. आमच्या समाजावर जे अन्याय होतात त्यासाठी आम्ही मरतो, झगडतो, मोर्चे काढतो, आंदोलने करतो, रस्त्यावर उतरतो पण कोणीही आम्हाला न्याय देत नाही. आदरणीय पवार साहेबांनी आम्हाला या सभागृहात पाठविले आणि आमच्या व्यथा शासनासमोर मांडण्याची संधी आम्हालादिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या व्यथा जर सोडविल्या जात नसतील तर आम्ही जायचे कोठे, आत्महत्त्या करायच्या काय ? मला शासनाला विनंती करावयाची आहे की, या समाजाकडे, त्यांच्या व्यवसायाकडे शासन पाहणार की नाही? राज्याचा 50 हजार कोटीचा अर्थसंकल्प मांडला जातो, त्याचे नियोजन केले जाते पण या समाजाचा विकास होण्यासाठी एक रुपयाचा निधी सुध्दा दिला जात नाही. म्हणून आम्हाला अशा प्रकारे आमच्या मागण्या कराव्या लागतात. या समाजाकडे शासनाने दुर्लक्ष न करता प्रामाणिकपणे आणि योग्य ती दखल घेऊन शासन त्यांना संरक्षण देणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या समाजाच्या मांडलेल्या व्यथा आणि त्यांच्या भावनेतील कळवळा माझ्या लक्षात येतो. मी त्यांना इतकेच सांगणार आहे की, त्यांनी ज्या गांभीर्याने या समाजाच्या व्यथा मांडल्या तितक्याच गांभीर्याने या समाजाच्या प्रश्नांमध्ये शासन लक्ष घालील. तसेच या समाजाचा भटकंतीचा मार्ग जसा ठरलेला असतो तसेच त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेणारे लोक सुध्दा ठरलेले असतात. म्हणून यापुढील काळात, त्या परिसरात हा समाज फिरत असताना कोणती व्यक्ती अथवा चोर त्यांना त्रास देऊ शकतो त्यांच्यावर पोलीस बारकाईने लक्ष ठेवतील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून राज्याच्या धनगर समाजाला अभिवचन देऊ इच्छितो की, धनगर समाजाच्या संदर्भात घडणारे गुन्हे महाराष्ट्रात कमी करुन दाखवू, या समाजाच्या पाठीशी मी पोलीस उभाच करुन दाखवीन, अशी या निमित्ताने ग्वाही देतो. त्याच बरोबर सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी शेळी-मेंडी महामंडळाच्या संदर्भात, विकासाच्या संदर्भात, स्थैर्याच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्यासंदर्भात अर्थ व नियोजन मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन धनगर समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनामार्फत पुढाकार घेतला जाईल, असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी धनगर समाजाच्या व्यथा पोटतिडकीने मांडलेल्या आहेत व तितक्याच ताकदीने मा. गृहमंत्र्यांनी आश्वासन दिलेले आहे. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, शेळी-मेंढी महामंडळाला आतापर्यंत एक पैशाचाही पुरवठा का करण्यात आला नाही ? शेळी-मेंढी महामंडळास शासन पैसा देणार असेल तर किती दिवसात पतपुरवठा केला जाईल ?

**उपसभापती** : सदर लक्षवेधी सूचनेचा प्रश्न गृहविभागाशी संबंधित आहे. आता सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न गैरलागू आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यावर मा.गृहमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, यासंदर्भात मी 15 दिवसाच्या आत वित्तमंत्र्यांबरोबर बैठक घेईन व एक महिन्याच्या आत शेळी-मेंढी महामंडळाला काही ना काही निधी निश्चितपणे उपलब्ध करुन दिला जाईल.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : मोबाईल टॉवर्सच्या रेडीएशन उत्सर्जनामुळे माणसांच्या शरीरावर होणारे दुष्परिणाम
**मु. शी.** : मोबाईल टॉवर्सच्या रेडीएशन उत्सर्जनामुळे माणसांच्या शरीरावर होणारे दुष्परिणाम यासंबंधी डॉ. दीपक सावंत,सर्वश्री रामदास कदम, श्री. किरण पावसकर, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई व उपनगरामध्ये मोठया प्रमाणात उभारण्यात येत असलेले मोबाईल टॉवर्स, सदरहू मोबाईल टॉवर्समधून बाहेर पडणारे इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिएशन्स (electro magnatic radiations) उत्सर्जन हे ४५०० ते ६००० मिली वॅटस असल्याचे कोजेंट कंपनीने केलेल्या सर्व्हेत सिध्द होणे, ह्या उत्सर्जनामुळे मानवी शरिराच्या मज्जासंस्था, पेशी, डी.एन.ए इत्यादीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त करणे, सदर मोबाईल टॉवर्स उभारण्याबाबत युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका यांची नियमावली असणे, मात्र राज्यात याबाबत कायदा अस्तित्वात नसल्यामुळे मोबाईल कंपन्या सर्रासपणे सोसायटयांना दोन लाख रुपयांची रक्कम देवून मोबाईल टॉवर उभारण्यासाठी देत असलेले आमिष. मोबाईल टॉवरमुळे होणाऱ्या आजारांमुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन संबंधित कंपन्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सचिन अहिर ( पर्यावरण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ... 3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई आणि महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने ही लक्षवेधी सूचना महत्वाची आहे. अनेक मोबाईल कंपन्या गृह निर्माण सोसायटयांशी करार करुन इमारतींवर मोबाईल टॉवर्स उभे करीत आहेत. यासाठी कोणाची परवानगी घेतली जाते, हा प्रश्न अजूनही गुलदस्त्यात आहे. कोजंट कंपनीचा जो अहवाल आलेला आहे तो मुंबईच्या जनतेच्या दृष्टीने फार भयानक आहे. मोबाईल टॉवर्समुळे इलेक्ट्रो मॅग्नेटीक रेडीएशनचे 4500 ते 6000 मि.वॅ.चे उत्सर्जन होत असते व त्याचा परिणाम माणसाच्या मज्जासंस्थेवर होतो तसेच माणसांच्या शरीरातील डीएनएवर त्याचा परिणाम होतो तसेच माणसाला कॅन्सर सारखे अनेक भयानक आजार सुध्दा होऊ शकतात, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटलेले आहे. यासंदर्भात राज्यशासनाने कोणती कारवाई केलेली आहे, याची मला माहिती नाही परंतु आज मुंबईमध्ये 5364 मोबाईल टॉवर्स विविध गृह निर्माण सोसायटीच्या इमारतीवर आहेत. यातील 2900 टॉवर्स ॲथोराईज्ड आहेत. या मोबाईल टॉवर्सच्या रेडीएशनचा परिणाम येत्या 10 वर्षात आपल्याला दिसून येणार आहे त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, 35(2)(यु) या कायद्यात शासनाने बदल केला आहे काय व मोबाईल टॉवर्संना मंजूरी देण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे काय ? लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "या समितीमध्ये दोन तज्ञांचा समावेश झाला असून या समितीच्या दोन बैठकाही झाल्या आहेत." मोबाईल टॉवर्समुळे आरोग्यावर परिणाम होतो असे केंद्रशासनाने सुध्दा सांगितलेले आहे. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात असेही म्हटले आहे की, "केद्र सरकारच्या दूरसंचार मंत्रालयाच्या दि. 18.5.2009 च्या पत्रानुसार मोबाईल टॉवर्समुळे आरोग्यावर परिणाम झाल्याचे सिध्द झाले नसल्याचे नमूद केले आहे". त्यानुसार आपण यासंदर्भात पुन्हा छाननी करणार आहात काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी देखील वर्तमानपत्रात एक बातमी गेल्या आठवड्यामध्ये वाचली होती की, नगरविकास विभाग उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करणारआहे. अनेक वेळा इमारतीच्या वर कुठलीही परवानगी न घेता सरसकट टॉवर लावले जातात. सदर टॉवर लावताना कुठलीही गाईड लाईन पाळण्यात येत नाही. त्यामुळे मोबाईल कंपनींना टॉवर लावण्यासंबंधी निश्चितपणे काही सूचना देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. कायद्यामध्ये बदल करीत असताना या टॉवरकडे महसूल म्हणून बघू नका, पर्यावरण म्हणून बघा असे मला सुचवावयाचे आहे. मोबाईल टॉवर्समधून निघणारे इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिशएशनमुळे आजुबाजूच्या पसिरातील जनतेच्या आरोगयावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विधिमंडळामध्ये मागणी करण्यात आल्यामुळे एक समिती गठित करण्यात आली आहे. आम्ही निव्वळ समिती गठित केली नाही तर त्यात समन्वय साधण्याचे देखील केले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमच्या माहितीप्रमाणे विधिमंडळाच्या सदस्यांची अशी कुठलीही समिती शासनाने गठित केलेली नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या समितीमध्ये विधान परिषदेतील कोण कोण सदस्य आहेत त्यांची नावे मंत्रिमहोदयांनी सांगावीत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या विषयासंबंधी खालच्या सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी शासनाने समिती नेमावी अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, सचिव, पर्यावरण विभाग, टेलिकॉम निगम प्राधिकरण,भाभा अणुसंशोधन केंद्रातील नामवंत शास्त्रज्ञ, टाटा मेमोरियल हॉस्पिटल, MPCB यांचा देखील समावेश आहे. या समितीच्या दोन बैठका झाल्या आहेत. या महिन्या अखेर या तज्ज्ञ समितीचा अहवाल अपेक्षित आहे. या अहवालाच्या अनुषंगाने ज्या काही सुधारणा सुचविण्यात येतील त्या संबंधित विभागांना देण्याचे देखील काम करण्यात येईल. या समितीच्या दोन बैठक झाल्या असून या महिना अखेर अहवाल अपेक्षित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना मोबाईल टॉवर्समुळे निर्माण होणाऱ्या इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिशएशनसंबंधातील आहे. इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिशएशनमुळे हवेत प्रदूषण होत आहे. हा विषय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारित येत असला तरी या विषयाची जाण असणारे अधिकारी आपल्या प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये आहेत काय ? असे अधिकारी आपल्याकडे उपलब्ध नसतील तर आपण सेंट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्डाकडे हा विषय घेऊन जावा. या विषयासंबंधी इतर राज्यांमध्ये ज्याप्रमाणे अभ्यास झाला असेल तर त्याचा देखील विचार करावा व त्यांच्या यासंबधातील काही मार्गदर्शक सूचना असतील तर त्याचा अवलंब आपले पर्यावरण राखण्यासाठी करण्यात येईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डामध्ये तज्ज्ञ अधिकारी आहेत. ते शास्त्रज्ञ दर्जाचे आहेत. इलेक्ट्रो मॅग्नेटिक रेडिशएशनचा विषय असल्यामुळे शासनाने एक वेगळी तज्ज्ञ समिती नेमली आहे. या समितीमध्ये या विभागाच्या तज्ज्ञांना नेमण्याचे देखील काम शासनाने केले आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर निश्चितपणे त्याची अंमलबजावणी केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, आपल्या राज्याने सेंट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्डाशी काही तांत्रिक माहिती जाणून घेण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाने आपल्या स्तरावर अहवाल तयार करण्याचे काम केले आहे. केंद्र सरकारने या अगोदर सन 2009 मध्ये सर्व्हे केला आहे. त्यांच्या अहवालानुसार कोणताही दुष्परिणाम होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. राज्य शासनाने एक पाऊल पुढे टाकले आहे. मुंबई शहरापासून संपूर्ण महाराष्ट्रात वाढत चाललेल्या मोबाईल टॉवर्ससंबंधी शासनाने समिती गठित केली. यासाठी केंद्राची गरज भासली तर ती देखील आमच्या विभागामार्फत घेण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबईमध्ये मोबाईल टॉवर्सची संख्या वाढत आहेत. यात अधिकृत किती व अनधिकृत किती असा देखील प्रश्न आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ...

दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, याबाबतीत राज्यसरकारकडे विचारणा केली की असे उत्तर देण्यात येते की दूर संचार हा विभाग केन्द्र सरकारच्या अखत्यारित येत असून मोबाईल टॉवर उभारण्यासाठी प्रथम परवानगी दूर संचार विभागातर्फे देण्यात येते " म्हणजे राज्य सरकार केन्द्र सरकारकडे बोट दाखवत असते. महानगरपालिकेला या बाबतीत विचारल्यानंतर त्यांच्याकडून असे सांगण्यात येते की, नगरविकास खात्याने विकास नियंत्रण नियमावलीत कलम 35 (2) यु अंतर्गत बदल करुन टॉवर उभारण्यास मंजुरी देण्याची तरतूद केली आहे." महानगरपालिकेला विचारले तर राज्य सरकारने केलेले आहे असे सांगितले जाते आणि राज्य सरकारला विचारले की केन्द्र सरकारशी ही बाब संबंधित आहे असे सांगितले जाते. मुंबईतील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली असून त्या प्रमाणात मोबाईलच्या वेगवेगळया कंपन्या आल्या असल्यामुळे त्यांच्या टॉवर्सची संख्या देखील वाढत चवालली आहे त्यावर राज्य सरकारचे काहीही नियंत्रण नाही काय ? राज्य सरकार एकमेकाकडे टोलवाटोलवी करीत असल्यामुळे या मोबाईल टॉवरमुळे इलेक्ट्रो मॅग्नेटीक रेडिएशनचा त्रास दिवसेंदिवस वाढत जाईल व त्यावर जर शासनाला कन्ट्रोल करता आले नाही तर भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकेल. माननीय शिवसेना प्रमुखांना ज्यावेळी अटक करण्यात आली होती त्यावेळी शासन सर्व मोबाईल स्वीच ऑफ करु शकले होते परंतु अनधिकृतपणे जे टॉवर्स उभारण्यात येत आहेत ते ताबडतोब बंद करण्यात येत नाहीत त्याबाबतीत तातडीने निर्णय न घेता केन्द्र सरकारकडे बोट दाखविण्यात येते तेव्हा या प्रकरणामध्ये केन्द्र सरकारकडे बोट न दाखविला मोबाईल टॉवर्स उभारण्यामध्ये सबंधिताकडून पैसे घेऊन वेगवेगळया कंपन्याकडून शासनाला अधिकाधिक रेव्हेन्यू कसा मिळेल यासाठी प्रयत्न न करता यामधील भ्रष्टाचार जर थांबविण्यात आला तर टॉवर्स बांधण्यामध्ये कन्ट्रोल करता येईल असे मला वाटते तेव्हा यासंदर्भात राज्य सरकार काही कन्ट्रोल करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,सॅटेलाईटच्या दृष्टीकोनातून टॉवर्सचा वापर केला जात आहे सॅटेलाईटच्या टॉवर्ससाठी ऑपरेशनल परवानगी केन्द्र सरकारकडून देण्यात येते याबाबतीत राज्य शासनाच्या असे लक्षात आले होते की, केन्द्र सरकारकडून परवानगी घेतल्यानंतर सबंधित कंपनी सरसकट कोणत्याही इमारतीवर टॉवर उभे करीत आहे. त्यासाठी संबंधित को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या कमिटीने परवानगी दिल्यानंतर त्या परवानगीच्या आधारे टॉवर उभारले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जातात त्याकरता महानगरपालिकेची कधी परवानगी घेतली जाते तर कधी परवानगी घेतली जात नाही इतकेच नव्हे तर ग्रामीण भागात खाजगी जागेमध्ये हे टॉवर बांधण्याचा प्रयत्न संबंधित कंपन्या करीत असतात त्यासबंधी राज्य सरकारला कोणताही रेव्हेन्यू मिळत नाही म्हणूनच नगर विकास विभागाच्या माध्यमातून एमआरटीपी मध्ये अशा प्रकारचा काही बदल करावयाचा काय यासबंधी विचार करुन त्यामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला होता व त्याच्याशी राज्य सरकारचा सबंध आहे. मात्र टॉवरच्या नेटवर्कीग संबंधीची बाब केन्द्र सरकारशी संबंधित आहे.सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना उत्तर देऊ इच्छितो की, त्यावेळी केन्द्रामध्ये आपल्या पक्षाचे सरकार होते व हे खाते आपल्या पक्षाकडे होते.परंतु हे काम केले गेले नाही. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातूनच ही समिती नेमण्यात आली आहे. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, पुढील काळात सबंधित सोसायटयांची परवानगी घेतल्याशिवाय त्या इमारतीवर टॉवर उभारत येणार नाही व सोसायटीने देखील जनरल बॉडीची मिटीग घेतली पाहिजे तसेच त्या मिटीगमध्ये 70 टक्क्यापेक्षा जास्त सदस्यांनी यासाठी पाठिंबा देणे क्रमप्राप्त आहे.ही बाब त्यांच्यावर बंधनकारक करण्यात येईल. केवळ त्यांना पैसे मिळतात म्हणून सरसकट सर्वांना टॉवर उभारता येणार नाही. विशेषता शाळा आणि हॉस्पिटल ज्याठिकाणी आहेत त्या ठिकाणी टॉवर उभारण्यावर लिमिटेशन आणण्याचा प्रयत्न राज्य सरकार निश्चितपणे करील.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, ज्या ठिकाणी अनधिकृत टॉवर्स बांधण्यात आलेले आहेत ते टॉवर्स ताबडतोब काढून टाकण्याच्या दृष्टीने राज्य सरकार प्रयत्न करील काय ? त्याचबरोबर सोसायटीने सर्वसाधारण सभा घेऊन त्या सभेमध्ये 70 टक्के सदस्यांनी टॉवर उभारण्यास मंजुरी दिली पाहिजे असे माननीय मंत्रीमहोदयांनी सागितले आहे.मी ज्या इमारतीमध्ये राहतो त्या इमारतीमध्ये अशा प्रकारचा टॉवर उभारला नाही परंतु माझ्या बाजूच्या इमारतीमध्ये हा टॉवर उभारण्यात आला आहे त्याचे दुष्परिणाम आम्हा सर्वांना भोगावे लागत आहेत अशा प्रकरणामध्ये तातडीने कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या टॉवरेचे दुष्परिणाम पशु पक्ष्यांवर देखील मोठया प्रमाणावर झालेले आहेत

विशेषतः मुंबईमध्ये चिमण्यांवर परिणाम झालेला असल्यामुळे त्यांची संख्या आता कमी होत चालली आहे.पर्यावरणावर तसेच पशु पक्ष्यांवर या टॉवर्सचा परिणाम मोठया प्रमाणावर व्हावयास लागला आहे या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अशाप्रकारे टॉवर्स उभारण्याच्या बाबतीत संबंधित कंपनीने त्या सोसायटीकडून परवानगी घेतल्यानंतर महानगरपालिकेकडून देखील परवानगी घेणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे एमआरटीपीमध्ये बदल करण्याचा प्रयत्न संबंधित विभाग करीत आहे आमच्या विभागाशी या विषयाचा सबंध आल्यानंतर प्रोॲक्टीव्हली कमिटी केली असून तिचा अहवाल 30 जुलै 2010 पर्यत येणे अपेक्षित आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

तो अहवाल आल्यानंतर गाईडलाईन्स तयार करुन निश्चितपणे येत्या पुढील काळात त्याचे दुष्परिणाम होणार नाहीत याची काळजी घेण्याचा प्रयत्न होईल.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने इस प्रश्न के बारे में उत्तर तो बहुत दे दिया है, लेकिन अब उन्हें इस बारे में कानून बनाना चाहिए. माननीय सदस्य डॉ. सावंत ने बताया कि 5364 टावर्स में से 2900 टावर्स अधिकृत हैं. इसका मतलब यह हुआ कि बाकी के टावर्स अनधिकृत हैं. महानगरपालिका या नगरपालिका की लिमिट में बिना उनकी परवानगी के टावर्स नहीं लगने चाहिए. मेरा प्रश्न यह है कि इस बारे में जानकारी लेने के बाद क्या शासन उनके ऊपर कड़क कार्रवाई करेगा ?

सभापति महोदय, दूसरे प्रश्न के रुप में मेरा पॉइंट ऑफ आर्डर है. कई बार ऐसा हो रहा है और जैसा कि अभी मंत्री महोदय ने बताया कि एक कमेटी बनाई गई है और उसमें आमदार नहीं है. इस कमेटी में केवल अधिकारी हैं और उन्हें लगता है कि वही सब कुछ हैं. अगर महाराष्ट्र सरकार कोई हाई पावर कमेटी बनाती है, कोई टेक्नीकल कमेटी बनाती है तो उसकी सूचना भी आमदारों को नहीं भेजी जाती है. इस सभागृह के सभी सदस्यों की भावना है कि यह आमदारों का अपमान है. आज सुबह हमने देखा कि कुछ महामंडलों के वर्ष 1998-99 के अहवाल अभी हमारे सामने आ रहे हैं. करोड़ों रुपए खर्च करने के बाद 1998-99 का अहवाल आज 2010 में हमारे सामने आता है तो इस अहवाल का कोई मतलब नहीं है. सभापति महोदय, मेरा आपके माध्यम से पॉइंट ऑफ आर्डर है कि अगर सरकार क्रीड़ा धोरण तय करने के लिए कमेटी बनाती है या अन्य किसी प्रश्न के बारे में कोई कमेटी बनाई जाती है तो उसकी जानकारी आमदारों को होनी चाहिए. इसलिए महाराष्ट्र सरकार ने किस किस विषय पर कमेटी बनाई है और उसके सदस्य कौन हैं, इसकी ऑफिसियल जानकारी हमारे पास आनी चाहिए, ऐसा मेरा आपके माध्यम से अनुरोध है.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी पहिला प्रश्न विचारला होता त्याला उत्तर देण्याचा मी प्रयत्न केला आहे. यामध्ये परवानगी देण्याचे काम नगर विकास विभाग करतो. मुंबई शहरामध्ये 3489 मोबाईल टॉवर आहेत त्यापैकी अधिकृत फक्त 1500 आहेत तर बाकीचे सर्व अनधिकृत आहेत. त्याकरिता एमआरटीपी कायद्यामध्ये सुधारणा करण्यात येईल. माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नासंबंधी सजेशन फॉर ॲक्शन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

ॲड. वंदना चव्हाण : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या दूर संचार विभागाकडून पत्र पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मोबाईल टॉवरमुळे आरोग्यावर काहीही परिणाम होणार नाही. त्यामुळे खरोखरच आरोग्यावर परिणाम होत नाही अशाप्रकारचा विश्वास ठेवणे चुकीचे आहे. डब्लूएचओ व इतर वेगवेगळया संस्था या निष्कर्षाप्रत आल्या आहेत की, यामुळे कॅन्सर होतो, डीएनएवर परिणाम होतो, इम्पोटन्सी सारख्या व्याधी होऊ शकतात अशाप्रकारचे वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते. मधमाशांच्या पोळयाच्या ठिक्राणी रेडिएशनचे वेव्ह सोडून याची चाचणी घेण्यात आली होती. त्यानंतर असे लक्षात आले की, त्याठिक्राणी मधमाशा यायच्या बंद झाल्या. त्याठिकाणी याबाबत चाचणी घेण्यात आली असता क्वीन बीने सुध्दा रिप्रॉडक्शन करण्याचे काम बंद केले होते. त्यावरुन यामध्ये तथ्य असल्याचे लक्षात येते. त्यामुळे हा विषय सहजपणे घेऊ नये, या विषयाबाबत सरकारने खोल जाऊन अभ्यास केला पाहिजे, तो करणार काय? दुसरा प्रश्न असा की, इमारतीच्या गच्चीवर टॉवर उभे करण्यासाठी सोसायटीच्या सभासदांची परवानगी घेतली पाहिजे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. परंतु माझ्या माहितीप्रमाणे ज्या इमारतीच्या गच्चीवर टॉवर असेल तर त्याठिक्राणी त्याचे फारसे दुष्परिणाम होत नाहीत. परंतु त्या टॉवरमधून निघणारे रेडीएशन आजूबाजूला पसरतात, आजूबाजूच्या लोकांना त्याचा त्रास होतो.त्यामुळे अशाप्रकारे परवानगीची पध्दत स्वीकारणार असाल तर ते चुकीचे होईल. त्याकरिता मंत्रिमहोदय कोणती व्यवस्था करणार आहेत?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शासन या विषयाच्या बाबतीत गंभीर आहे. म्हणून त्याकरिता ही समिती गठीत करण्याचा आपण प्रयत्न केला आह. त्या संदर्भात केंद्र सरकारकडून ओव्हर ऑल रिपोर्ट आला असला तरी त्याच्या भरंवशावर आपण राहिलेलो नाही. आपण प्रोॲक्टिव्हली कमिटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला असून या संदर्भात आपण अनेक डिबेट केले आहेत. याबाबतीत अनेक रिपोर्ट उपलब्ध आहेत. त्यामध्ये जर्मनी हॉस्पिटल, एल अँड डी युनिव्हर्सिटी, स्वीडन यांच्याकडून रिपोर्ट इंपोर्ट करुन ते इंटरनेटवरुन डाऊनलोड करण्याचा प्रयत्न केला आहे. अशाप्रकारे या समितीचा अहवाल आल्यानंतर या संदर्भात एक धोरण आपण करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

ती पॉलिसी लगेच जाहीर होईल त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येतील. आज असे होते की, सरसकट डायरेक्ट निर्णय घेण्यात येतो. त्याबाबतीत सोसायटी कोणत्याही सदस्यांना सांगत नाही. कारण सोसायटीचे जे पदाधिकारी असतात त्यांना मेन्टेनन्सचा खर्च भागविण्यासाठी हे टॉवर्स फार उपयोगी पडत असतात म्हणून ते निर्णय घेतात सदस्यांना विश्वासात घेत नाहीत म्हणून सोसायटीच्या संदस्यांना देखील विश्वासात घेण्यात यावे असे सांगण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कुठच्या बिल्डिंगमध्ये हे टॉवर असावे अथवा असू नयेत याबातीत राज्य शासन ठरवू शकत नाही. ते त्या बिल्डिंगच्या लोकांनी ठरविले पाहिजे. मला वाटते लोकांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे की, जास्त मोबाईलचा वापर करण्यात येऊ नये. पण कुठेच टॉवर देता येणार नाहीत अशी भूमिका राज्य शासनाला घेता येणार नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मोबाईल टॉवरचा आरोग्यावर होणारा दुष्परिणाम या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सभापती महोदय, मी या ठिकाणी निदर्शनास आणू इचिछतो की, या टॉवर्सच्या संदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. उल्हासनगरमधील इमारती अनधिकृत आहेत. कच्च्या इमारती आहेत. इमारती कोसळायला लागलेल्या आहेत. या ठिकाणच्या एकाही मोबाईल टॉवरला महापालिकेने परवानगी दिलेली नाही असे रेकॉर्डवर आहे. यासंदर्भात या सभागृहात चर्चा झाली होती. तत्कालीन नगरविकास राज्य मंत्री माननीय श्री. टोपे यांनी तीन बैठका घेतल्या संबंधित आयुक्तांना आदेश देण्यात आले पण त्यासंदर्भात कारवाई झालेली नाही. माझ्या पत्राला सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. या संदर्भात जी चर्चा झाली होती त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी दोन वर्षापूर्वी जे निर्देश दिलेले आहेत त्याची कार्यवाही किती दिवसात करणार?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, एका आठवडयात तो अहवाल मागवून घेण्यात येईल आणि त्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खाजगी सोसायटया कोणाचीही परवानगी न घेता हे टॉवर्स उभे करतात. पण शासनाच्या जागेवर जेथे टॉवर्स असतील त्या संदर्भात निर्णय

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

घेण्याचा अधिकार शासनाला आहे. मुंबईतील सगळया फ्लाय ओव्हर्सवर चार-चार, पाच-पाच टॉवर्स आहेत त्यांना कुणी परवानगी दिली? हे कसे उभे करण्यात आले? हे उभे करण्याकरिता परवानगी देणाऱ्यांनी टेबलाखालून किती पैसे आणि हप्ते घेतले असतील याचा शोध घेण्यात यावा. तसेच हे टॉवर्स काढण्यात येतील काय? कारण हे सरकारच्या अधिकार कक्षेतील टॉवर्स आहेत. मुंबईत फ्लाय ओव्हर्सवर असे किती टॉवर्स उभे केले आहेत?त्यापैकी कितीला मान्यता देण्यात आलेली आहे ते सांगावे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे पण शासनाच्या जागेवर इललिगल टॉवर्स उभे करण्यात आले असतील तर त्याची माहिती निश्चितपणे घेण्यात येईल. ज्या ज्या खात्यांमध्ये अशा प्रकारच्या परवानग्या देण्यात आल्या असतील आणि ते टॉवर्स नियमाप्रमाणे नसतील तर ते त्वरित काढण्यात यावेत अशा सूचना त्या त्या विभागांना देण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना सूचित करु इच्छितो की, जोगेश्वरी आणि अंधेरी भागामध्ये जेवढे टॉवर्स उभे आहेत ते सर्व अनधिकृत आहेत असे अहवाल म्हणतो त्यांना किती दिवसात नोटिसा देऊन ते काढण्यात येतील? ही विशेष सायकल आहे. मोबाईल पाहिजे असतील तर टॉवर्स पाहिजे आणि टॉवर्स पाहिजे असतील तर त्याचा आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे या बाबतीत निर्णय घेताना अडचणीचे आहे हे मी समजू शकतो. तरी देखील या अनधिकृत टॉवर्सवर किती दिवसात कारवाई करण्यात येईल? दुसरा प्रश्न असा की, केंद्र सरकारने तज्ज्ञांचा रिपोर्ट दिलेला आहे, या ठिकाणी जी समिती स्थापन करण्यात आलेली आहे त्यामध्ये शासकीय लोक आहेत. माझी अशी मागणी आहे की, आरोग्य क्षेत्रातील या विषयाच्या तज्ज्ञांची आणि भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरमधील तज्ज्ञांची समिती तयार करण्यात येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबईत अनधिकृत टॉवर्स आहेत त्या संदर्भात त्वरित नियम करण्याच्या बाबतीत नगरविकास विभागाला सूचना दिल्या जातील तसेच जे अनधिकृत टॉवर्स आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या बाबतीतील प्रश्न नगरविकास विभागाशी संबंधित आहे त्यामुळे त्या बाबतीत मी बोलणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की, अपर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

विभाग, टेरी संस्थेचे अधिकारी, भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरचे वैज्ञानिक, टाटा मेमोरिएल हॉस्पिटल तसेच प्रदूषण विभागाचे अधिकारी या सर्वांचा समावेश करुन ही समिती तयार केलेली आहे. त्या समितीने एकत्र येऊन दोन बैठका देखील घेतलेल्या आहेत. या महिन्याच्या अखेर पर्यंत त्यांचा रिपोर्ट अपेक्षित आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डोंबिवली येथील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे त्या परिसरातील रहिवाशांना विविध आजारांचा होत असलेला त्रास

**मु. शी.** : डोंबिवली येथील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे त्या परिसरातील रहिवाशांना विविध आजारांचा होत असलेला त्रास यासंबंधी सर्वश्री सुभाष भोईर, हुसेन दलवाई, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष भोईर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"डोंबिवली ता.कल्याण, जि.ठाणे येथील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यातून सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्याच्या प्रदुषणामुळे स्टार कॉलनी, नांदिवली, सुनीलनगर मधील रहीवाशांना डोळे झोंबणे, घशाला खवखव,खोकला या सारखा कायमचा होत असलेला त्रास, एम.आय.डी.सी. तील कंपन्यांच्या विरोधात लोकप्रतिनिधी मार्फत अलिकडेच मानपाडा पोलीस ठाण्यात करण्यात आलेली तक्रार, एम.आय.डी.सी.तील 28 कंपन्यांविरुध्द प्रदुषणाच्या पातळीवरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कंपनीच्या बंदीच्या काढलेल्या नोटीसा, तथापि, याबाबत पुढे कोणतीच कार्यवाही न होणे, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे येथील रासायनिक कारखान्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासन स्तरावरुन या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विनाविलंब करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सचिन अहिर ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, डोंबिवली या ठिकाणीच नव्हे तर ठाणे जिल्ह्यात तसेच मुंबईमध्ये नियम मोडून औद्योगिक क्षेत्रामधील रासायनिक पाणी सोडण्याचे काम कारखानदार करीत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नांदिवली, सुनील नगर, स्टार कॉलनी परिसरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्या ठिकाणी जी थोडीफार शेती होती ती नष्ट होण्यास सुरुवात झालेली आहे. त्या ठिकाणी मासेमारी व्यवसाय सुरु होता तो संपुष्टात आलेला आहे. त्या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी येऊन कारखानदारीची पाहणी केली. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, दोषी आढळलेल्या एकूण 32 कारखान्यांवर उत्पादन बंदीची कारवाई करण्यात आली व 26 कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. अशा प्रकारच्या कारखान्यांवर शासनामार्फत फौजदारी खटले दाखल करणार काय ? अशा प्रकारे दूषित पाणी सोडणारे जे कारखाने आहेत त्यांना प्रतिबंध करणार काय जेणेकरुन अशा प्रकारचे रासायनिक पाणी त्या भागात खाडीत जाणार नाही ? त्या ठिकाणी जी शेती होती तसेच जी मासेमारी होत होती ती नष्ट होत आहे. त्या ठिकाणी जे एमआयडीसी क्षेत्र आहे त्याच्या बाजूबाजूला रहिवाशी क्षेत्र आहे. अशा वस्त्यांमध्ये रासायनिक पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोगराई निर्माण झाली आहे. मासे नष्ट झालेले आहेत. शेती नष्ट झालेली आहे. याबाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे ? त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन रासायनिक पाणी सोडू नये यासंबंधी उपाययोजना करणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे की, अनेक कंपन्यांवर कारवाई केलेली आहे. पुढच्या काळात त्यांचे डिपॉझिट देखील जप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांना एन्व्हायरमेंटची जी परवानगी पाहिजे ती थांबविण्याचा आपल्याला अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे डोंबिवली आणि त्या परिसराचा ज्यावेळी विचार करतो त्यामध्ये जसे एमआयडीसीतील सिवरेज आहे तसेच सिवरेज मोठ्या प्रमाणावर लोकवस्तीतून सुध्दा निर्माण होत आहे. एमआयडीसीतील उद्योगातून निर्माण होणाऱ्या वेस्टचे प्रमाण 10 ते 20 टक्के आहे तर बाकीच्या भागातून 80 टक्के वेस्ट निर्माण होत आहे. संपूर्ण नाला दूषित झालेला आहे. त्या विभागातील सन्माननीय सदस्यांचा आग्रह होता त्याप्रमाण् मी त्या ठिकाणी जाऊन पाहणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. सचिन अहिर .....

केली. संबंधित आयुक्तांना बोलावले. जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी देऊन त्यांच्याकडून काम करुन घेण्याचा प्रयत्न आहे. त्यांनी त्या कामास सुरुवात केलेली आहे. आमचा सेंट्रल ॲफ्ल्यूएंट ट्रिटमेंट प्लांट ओव्हरफ्लो झालेला आहे. तो प्लांट ओव्हरफ्लो होत असताना त्याचे पाणी ट्रिट करुन समुद्रामध्ये सोडण्याच्या दृष्टीने पूर्ण् लाईन समुद्र किनाऱ्यापर्यंत घेऊन जाण्यासाठी संबंधित महापालिकेला परवानगी मागितलेली आहे. ती परवानगी कालच प्राप्त झालेली आहे. ते काम सुरु करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय स्वतः त्या ठिकाणी गेले याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु कितीही केले तरी हे कारखानदार ऐकावयास मागत नाहीत. अशा कारखानदारांवर फौजदारी खटले भरणार काय ? हा केवळ डोंबिवलीपुरता प्रश्न नाही. लोटे तसेच चिपळूण येथे असे प्रकार झाले. पाणी दूषित झाल्यामुळे गुरे मरतात तसेच लोकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. तरी सुध्दा त्या ठिकाणचे संयत्र नीट चालत नाही आणि त्याबाबतीत काही केले जात नाही. अनेक कारखाने काही दिवस बंद केले जातात आणि त्यानंतर बरेच व्यवहार होऊन ते कारखाने पुन्हा चालू होतात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई....

महाडला तेच घडले आहे. सावित्री व वसिष्ठी नदीमध्येही प्रदूषित पाणी सोडण्यात येते. म्हणजे जवळजवळ सर्वच एमआयडीसीमध्ये हे सुरु आहे. प्रदूषण करणारे कारखाने कोकणामध्येच आले पाहिजेत असा काही दंडक आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे शासनाने कार्यवाही केलेली आहे. सध्याच्या निकषाप्रमाणे शासनाकडून कारवाई केली जाते. जेथे फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता आहे तेथे मागेपुढे न पाहता फौजदारी गुन्हाही दाखल केलेला आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे. तरी देखील मी सांगतो की, त्याठिकाणच्या लोकप्रतिनिधींबरोबर माझी बैठक झालेली आहे. तेथे जी सूचना दिली होती तशी येथेही दिलेली आहे. तशा सूचना या अधिका-यांना देण्याचे काम शासनाने केलेले आहे आणि काही कारखाने बंद करण्याची भूमिका सुध्दा शासनाने घेतलेली आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या सभागृहात शब्द दिला होता त्याप्रमाणे त्यांनी 4 जुलै, 2010 रोजी एमआयडीसीला भेट देऊन तो पाळला आहे. या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, "सामुहिक सांडपाणी शुध्दीकरण यंत्रणेतील प्रक्रिया झ ालेल्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीसाठी नि:सारणाची पाईप लाईन टाकण्याचे एमआयडीसीने ठरवलेले आहे. सदर नि:सारणाची पाईप लाईन कार्यान्वित झाल्यावर नाल्याकाठच्या लोकवस्तीचे रासायनिक वासाचे प्रश्न सुटू शकतील." हा प्रश्न मोठा आहे. पाईप लाईन टाकण्याचे एमआयडीसीने ठरविले आहे, परंतु किती पाईप लागणार आहेत त्यासाठी किती तरतूद केली आहे, त्याचे काम केव्हा सुरु होणार आहे त्याची माहिती द्यावी. या निवेदनात असेही म्हटले आहे की, "स्थानिक पर्यावरण दक्षता समिती स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या." या समितीला किती अधिकार देणार आहे ते स्पष्ट होणे आवश्यक आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सुदैवाने माझ्याकडे पर्यावरण खात्याबरोबरच उद्योग खाते सुध्दा आहे.  मी त्या एमआयडीसीला भेट दिली आहे. तसेच या पाईप लाईनसाठी 3.4 कोटींची तरतूद देखील केली आहे. त्या मंडळाचा तसा प्रस्ताव तयार झालेला आहे.  तेथील महानगरपालिकेची एनओसी आजच प्राप्त झाली आहे.  त्यामुळे 1 महिन्याच्या आत तेथे काम सुरु होईल आणि डोंबिवलीकर ज्या परिस्थितीतून जात आहेत ते थांबेल, किमान 50-60 टक्के लोकांना रिलीफ मिळेल. सन्माननीय सदस्य सांगत आहेत तीच शासनाची भूमिका आहे.  त्याठिकाणी जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यातून न्याय देण्याची भूमिका शासनाची आहे.

-----

3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**मु.शी.**: कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणे

**मु.शी.**: कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नाकिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांसाठी कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरु करण्याची मागणी गेली 23 वर्षे प्रलंबित आहे. मुंबई उच्च न्यायालयात वरील सहा जिल्हयांचे खटल्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

खटल्यांसाठी पक्षकारांना मुंबई उच्च न्यायालयात येण्यासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे म्हणून आंदोलनाची सुरुवात केली असून त्यास जन आंदोलन देखील होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सबब शासनाचे या महत्वाच्या व गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधून कार्यवाही होण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

**पृ.शी.**: ग्रामसभेने गावातील दारुची दुकाने बंद करण्याचा ठराव संमत करुनही जिल्हाधिका-यांकडून त्याची अंमलबजावणी न होणे

**मु.शी.**: ग्रामसभेने गावातील दारुची दुकाने बंद करण्याचा ठराव संमत करुनही जिल्हाधिका-यांकडून त्याची अंमलबजावणी न होणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"केंद्र शासनाने 73 वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज सबलीकरणास प्रारंभ केला. त्यातूनच ग्रामसभेला विशेष महत्व प्राप्त झाले. मात्र ग्रामसेने गावातील दारुची दुकाने बंद करुन "बाटली आडवी" करण्याचा ठराव संमत केला तरी मा.जिल्हाधिकारी त्याची कार्यवाही करीत नाहीत. त्यासाठी महिला ग्रामसभेचा स्वतंत्र आवाजी किंवा गुप्त मतदानाने केलेल्या ठरावाचा आग्रह धरतात. वास्तविक पाहता ग्रामसभेमध्ये प्रामुख्याने महिलांचाच समावेश असताना महिलांच्या स्वतंत्र ठरावाची आवश्यकता नसताना केवळ गावातील काही हितसंबंधींचा मतलब जपण्यासाठी हा प्रकार सुरु असावा असे वाटते. सारांश ग्रामसभेने जर दारुबंदीचा ठराव पारित केला असेल तर त्याची अंमलबजावणी सत्वर केली जावी असे आदेश दिले जावेत."

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:25

**पृ.शी.** : बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील पाणी पुरवठा योजना वीज कनेक्शन तोडल्यामुळे बंद होणे

**मु.शी.** : बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील पाणी पुरवठा योजना वीज कनेक्शन तोडल्यामुळे बंद होणे याबाबत ॲड. उषा दराडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

"बीड जिल्हयातील परळी तालुक्यातील 18 गावांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूसमार्फत करण्यात येणे, सदर पाणी पुरवठा योजनेसाठी पूर्वी वर्षातून एकदा वीज बिल येत होते. मात्र वीज मंडळाचे विभाजन झाल्यापासून प्रत्येक महिन्याला वीज बिल मागितले जाते व वीज बिल भरणा करण्यास विलंब होत असल्याने ऐन पावसाळयात वीज कनेक्शन तोडीमुळे पाणी टंचाई भासत असणे, याबाबत योजनेतील गावक-यांकडून वीज देयक वर्षातून एकदा भरणा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेमध्ये कोकण डोंगरी भागाला वगळल्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय

**मु.शी.** : वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेमध्ये कोकण डोंगरी भागाला वगळल्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"राज्य शासनाने वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेच्या जाहिरातीत डोंगरी भाग म्हणून फक्त विदर्भाची नोंद केली आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी कोकण डोंगरी भागातून वगळलेला आहे. डोंगरी भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा असताना व कोकण सपाट भाग नसून डोंगरद-यांनी व्यापलेला असताना त्याचा उल्लेख डोंगरी भागातून वगळण्यात आला आहे. त्यामुळे या राखीव जागांचा विद्यार्थ्यांना फायदा मिळणार नाही ही अन्यायजनक बाब आहे. या सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधीत आहे."

----

...3...



MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:25

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : गोंदिया जिल्हयातील आमगाव येथील श्रीराम राईस व
अन्य राईस मिलने केलेल्या धान भरडाईचे देयक
प्रलंबित असणे

**मु.शी.** : गोंदिया जिल्हयातील आमगाव येथील श्रीराम राईस व
अन्य राईस मिलने केलेल्या धान भरडाईचे देयक
प्रलंबित असणे याबाबत श्री. केशवराव मानकर,वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानक यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथील श्रीराम राईस मिल, आनंद राईस मिल आणि माल्ही (ता. आमगाव) येथील महालक्ष्मी बासमती राईस इंडस्ट्रीज यांनी आर्थिक वर्ष 2007-2008 च्या हंगामात धानाची भरडाई केली आहे. परंतु श्रीराम राईस मिलचे 1 लाख 10 हजार 120 रुपये तर आनंद राईस मिलचे 51 हजार 945 रपये आणि महालक्ष्मी बासमती राईस मिलचे 1 लाख 34 हजार 548 रु. असे 2007-2008मधील केलेली धान भरडाई आणि वाहतुकीचे बिल त्यांना प्राप्त न होणे, सदर देयके महाराष्ट्र शासनाच्या वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न व नागरी पुरवठा यांच्याकडे प्रलंबित असणे, संपूर्ण गोंदिया जिल्हयातील सर्वच राईस मिलची देयके 2007-2008 पासून प्रलंबित आहेत, त्यामुळे राईस मिलधारकांमध्ये पसरलेला असंतोष व राईस मिलधारकांनी शेतक-यांचे धान खरेदी न केल्यामुळे धान सडून त्यांच्यावर आत्महत्या करण्याची आलेली वेळ आणि गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण राईस मिलधारकांची मागील देयके तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याकडे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

----

..4..



**पृ.शी.**: बंदी अबू सालेम व बंदी मुस्तफा डोसा यांच्यामध्ये झालेल्या

भांडणाबाबत

**मु.शी.**: बंदी अबू सालेम व बंदी मुस्तफा डोसा यांच्यामध्ये झालेल्या भांडणाबाबत माननीय गृहमंत्र्यांचे निवेदन

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

बंदी अबू सालेम आणि बंदी महम्मद मुस्तफा डोसा हे दोन्ही 1993च्या बॉम्बस्फोटातील आरोपी मध्यवर्ती कारागृह, मुंबई येथे बंदीस्त होते. या दोघांना कारागृहातील मंडल क्रमांक 10 मधील वेगवेगळया खोल्यामध्ये ठेवण्यात आलेले होते. दिनांक 24.7.2010 रोजी सकाळी 10.15च्या दरम्यान कारागृह खुले झाल्यावर बंदी महम्मद मुस्तफा डोसा याने बंदी अबू सालेम यास शिवीगाळ केली. याबाबत अबू सालेम याने विचारणा केली असता दोन्ही बंद्यांमध्ये मारामारी होऊन बंदी महम्मद मुस्तफा डोसा याने बंदी अबू सालेम याच्यावर छोटया धार लावलेल्या चमच्याने गाल, नाक, मान व दंडावर किरकोळ स्वरुपाची जखम केली आहे. बंदी अबू सालेम याच्यावर कारागृहाच्या वैद्यकीय अधिका-याने उपचार केले आहेत. बंदीची प्रकृती चांगली आहे. सदर प्रकरणी बंदी मुस्तफा डोसा व कयुम करीम शेख या दोन बंद्यांविरुध्द ना.म.जोशी पोलीस ठाणे येथे दिनांक 24.7.2010 रोजी गुन्हा क्रमांक 215/2010 दाखल करण्यात आला आहे. बंदी अबू सालेम याला दिनांक 24.7.2010 रोजी रात्री तळोजा मध्यवर्ती कारागृह येथे हलविण्यात आले आहे.

कसाबच्या सुरक्षेबाबतही प्रश्न उपस्थित केले होते. कसाबला अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आले असून त्यासाठी कारागृह सुरक्षा व्यतिरिक्त इंडो-तिबेटियन बॉर्डर पोलीस तैनात करण्यात आलेले आहेत. मध्यवर्ती कारागृह आर्थररोड याची अधिकृत बंदी क्षमता 804 असून सध्या या कारागृहात सरासरी 2100 बंदी ठेवण्यात येतात. या कारागृहात विविध गुन्ह्यातील न्यायालयीन बंदी ठेवण्यात आलेले आहेत. मुंबई शहरामध्ये बाहेरुन आणि राज्यातून येणा-या लोकांचे स्थलांतराचे प्रमाण अधिक असून या स्थलांतरणा बरोबर या शहरातील गुन्हेगारीच्या प्रमाणात झालेल्या वाढीमुळे कारागृहातील बंद्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:30

श्री.आर.आर.पाटील........

सदर गुन्हेगारांना मुंबईतील वेगवेगळया न्यायालयात कोर्ट पेशीकरिता न्यायालयाच्या आदेशानुसार हजर करावे लागत असते. सदर गुन्हेगारांना मुंबईबाहेरील कारागृहात हलविल्यास मुंबईतील न्यायालयात हजर करण्यासाठी पोलीस पथक वेळेवर उपलब्ध करावे लागेल. अधिकचे मनुष्यबळ लागते म्हणून त्यांना मुंबईतील कारागृहातच बंदिस्त करुन ठेवणे आवश्यक होऊन बसते. सदर घटनेतील न्यायाधीन बंद्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार घरचे जेवण, कँटीन व इतर सोयी देण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त कारागृह नियमावलीनुसार त्यांना सुविधा पुरविण्यात येतात. प्रत्येक बंदी दर महिन्याला रक्कम रु.1500/- एवढ्या रक्कमेपर्यंत कारागृह कँटीनमधून वस्तूंची खरेदी करु शकतात. दि.13 नोव्हेंबर, 2005 च्या कोर्टाच्या आदेशाप्रमाणे त्याला होमफूड ही फॅसिलिटी देण्यात आलेली आहे. दि.24.10.2007 च्या न्यायालयाच्या आदेशानुसार फॅन (पंखा) ही फॅसिलिटी देण्यात आलेली आहे. दि.11.7.2007 च्या न्यायालयाच्या आदेशानुसार एक लीटर क्षमतेचा थर्मास व प्लेट तसेच ट्रान्झिस्टर ही फॅसिलिटी देण्यात आलेली आहे. दि.1.8.2007 च्या कोर्टाच्या आदेशानुसार नेलकटर, व्यायाम करण्यासाठी डम्बेल्स, वेस्टबेल्ट आणि सूटकेस ही फॅसिलिटी देण्यात आलेली आहे. दि.9.3.2006 च्या कोर्टाच्या आदेशानुसार मिनरल वॉटर स्वखर्चाने त्याला प्रोव्हाईड केले जाते. न्यायाधीन बंदी हे न्यायालयाच्या ताब्यामध्ये असतात त्यामुळे त्यांना जेलमध्ये कोणत्या विभागात ठेवायचे ही गोष्ट सुध्दा न्यायालय ठरवित असते. न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. अधूनमधून मानवी हक्क आयोगाचे प्रतिनिधी, कोर्टाचे प्रतिनिधी बंद्यांची चौकशी आणि पाहणी करीत असतात त्याचप्रमाणे सूचनाही देत असतात.

सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर राज्याचे गृहराज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांनी तेथे भेट दिली आणि त्यांना काही अश्लील चित्रे भिंतीवर लावल्याचे आढळून आले. यासंदर्भात मी त्यांच्याकडून सविस्तर माहिती घेण्याचा प्रयत्न केला. लग्नाच्या काही कामानिमित्ताने ते पुण्यात आहेत, दुपारपर्यंत ते मुंबईत येत आहेत. मी या संदर्भात जेल ॲथॉरिटीकडून माहिती घेतली तेव्हा असे कळले की, बंद्यांना वृत्तपत्रे पुरविली जातात. त्यामध्ये जे रिसेंट फोटो आलेले होते त्यातील काही फोटो त्यांनी आपल्या रुममधील तीन ठिकाणी भिंतीवर लावल्याचे आढळून आले. एक तर आर्थर रोड जेलमध्ये 804 कैद्यांची क्षमता असताना 2100 कैदी आहेत. क्षमतेपेक्षा तीनपट अधिक कैदी आहेत. आज सकाळी मी ब्रिफिंग घेत असताना लक्षात आले की, 804 कैद्यांसाठी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:30

श्री.आर.आर.पाटील....

265 कर्मचारी तेथे आवश्यक आहेत. परंतु 2100 कैदी असताना कर्मचाऱ्यांची संख्या मात्र 265 आहे. त्यातही 265 पैकी 107 पदे भरलेली असून उर्वरित पदे रिक्त आहेत. आज जेलमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 14 ते 15 तास ड्युटी करावी लागते आणि कोर्टामधून निरनिराळे कैदी संध्याकाळी 6 वाजता मोठ्या संख्येने जेलमध्ये आणले जातात. त्या सर्वांची बारकाईने तपासणी करावी लागते. एक तर दिवस मावळण्यापूर्वी त्यांना जेलमध्ये बंद करणे आवश्यक असते आणि 200-300 कैदी एकदम बाहेरुन आले की, त्यांना तपासणे सुध्दा मुश्किल होऊन जाते अशी स्थिती आहे. चमचासह ज्या वस्तू पुरविण्यात आलेल्या आहेत त्या सर्व कोर्टाच्या परवानगीने पुरविण्यात आलेल्या आहेत. हा प्रकार घडल्यानंतर शासनाने निर्णय घेतला आहे. शासन पुन्हा कोर्टात जाईल आणि त्यांना ज्या फॅसिलिटी दिल्या आहेत या फॅसिलिटी रद्द केल्या पाहिजेत म्हणून शासन आपल्या वकिलांमार्फत प्रयत्न करेल. अलिकडच्या काळात मानवी हक्क आयोग असेल, वेगवेगळया न्यायालयाचे निर्णय असतील, परंतु ही गोष्ट मला कबूलच करावी लागेल की, रोहयोच्या कामावर आठ तास कष्ट करणाऱ्या माणसापेक्षा अधिक खर्च या बंद्यावर शासनाला करावा लागतो. त्याला आठवड्यातून कोणता साबण द्यावा येथपर्यंतचे डिटेल्स निदेश असतात.

(नंतर 3एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

आणि त्यावेळी काही वस्तू तुरुंगात आढळून येतात. त्यात फळे आढळून आली असली तरी अशी फळे व बेकरीचे पदार्थ ते घेऊ शकतात. त्यात 1500 रुपयापर्यंतची मर्यादा दिलेली असून तितक्या मर्यादेपर्यंत कँटीनमधून कैद्यांना पर्चेस करण्याचा अधिकार आहे. अशा स्थितीत तेथील रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच अशा भांडणांच्या पाठीमागे सर्वसाधारण कारणे काय आहेत की त्यांना या जेलमधून बदलीच पाहिजे होती हेही शोधून काढण्यात येईल. कारण सन 1993 मधील एकाच घटनेचे हे आरोपी असून जेलमधील अधिकाऱ्यांचाही अनुभव असा आहे की, ते आतापर्यंत अत्यंत मैत्रीने एकमेकांशी वागत होते पण अचानक त्यांच्यामध्ये भांडण झाले त्याचे कारण काय याचा तपास निश्चितपणे केला जाईल. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी स्वत:हून ऑर्थर रोड जेलला भेट देऊन काही गोष्टी बघितल्या आहेत. त्यांच्याकडून माहिती घेऊन कोर्टाने दिलेल्या निदेशापेक्षा, आदेशापेक्षा तेथे नेण्यात येणाऱ्या अथवा दिल्या जाणाऱ्या कोणत्या वस्तू गैरवाजवी असल्याचे आढळून आले तर त्यानुसार कडक कारवाई करण्याचे अभिवचन देखील मी सदनाला देऊ इच्छितो. तसेच या दोन बंद्यांना वेगवेगळ्या जेलमध्ये ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संततधार पावसामुळे कोकण रेल्वे सेवा कोलमडल्याने पर्यायी व्यवस्था करणेबाबत**

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कोकण रेल्वे बंद पडलेली असल्याने कोकणात वाहतुकीच्या व्यवस्थेची जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबत प्रवाशांमध्ये चिंता आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने काय व्यवस्था केली, यासंबंधीची माहिती सभागृहाला मिळावी, अशी मी विनंती करतो.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले ती परिस्थिती बरोबर आहे. कोकण रेल्वेच्या मार्गातील भराव वाहून गेल्यामुळे रेल सेवा बंद पडलेली असल्याने रत्नागिरी आणि परिसरात जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यासाठी अतिरिक्त बसेस एस.टी. महामंडळाच्या वतीने अगोदरच पाठविल्या आहेत. आज आणखी 100 बसेस तसेच वरिष्ठ अधिकारी सुध्दा महामंडळाच्या वतीने पाठविलेले आहेत. आवश्यकता भासल्यास आणखी बसेसची व्यवस्था करुन कोकणातील जनजीवन सुरळीत करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत असून सायंकाळी 5.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.37 वाजेपासून 5.00 वाजेपर्यत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/ KGS/ KTG/ जुन्नरे... 17:00

(मध्यंतरानंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : आता म.वि.प.नियम 97 अन्वये मालेगावच्या अल्पकालीन चर्चेला सुरूवात होईल. या चर्चेसाठी माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह 30 मिनिटे इतका वेळ देण्यात आलेला आहे. मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासंबंधीच्या प्रस्तावासंबंधी माननीय सभापती निदेश देतील. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अल्पकालीन चर्चेला सुरूवात करावी.

**पृ.शी.**: मालेगाव जिल्हा नाशिक येथे आषाढी एकादशी
या दिवशी झालेल्या गोहत्त्या.

**मु.शी.**: मालेगाव जिल्हा नाशिक येथे आषाढी एकादशी या
या दिवशी झालेल्या गोहत्त्या या विषयावर
सर्वश्री श्री.दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर,वि.प.स यांनी
उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अर्धा तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"मालेगांव (जि.नाशिक) येथे बुधवार, दिनांक 21 जुलै, 2010 रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी गोमाता म्हणून पूजनीय असलेल्या काही गाईंच्या मुसक्या बांधून तीक्ष्ण हत्यारांनी वार करुन त्यांची कत्तल केल्याची घडलेली घटना, या घटनेच्या निषेधार्थ संपूर्ण नाशिक जिल्ह्यात पाळण्यात आलेला कडकडीत बंद, या गोहत्यांचे प्रकरण दडपण्यासाठी नाशिक जिल्हा प्रशासनाने या गाईंचा गुदमरुन मृत्यु झाल्याचा अंदाज वर्तविला असल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, मालेगांवातील या घटनेची सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत, तसेच



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मिरज (जि.सांगली) येथेही दंगलीच्यावेळी निरपराध नागरिकांना तुरुंगवास भोगावा लागल्यानंतर तत्कालीन मा.उपमुख्यमंत्र्यांनी ही दंगल सर्वपक्षिय कार्यकर्त्यांनी घडविल्याचे सांगून निर्माण केलेले संभ्रमाचे वातावरण, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

सभापती महोदय, या अल्पकालीन चर्चेमध्ये दोन विषय एकत्रित केले आहेत. एक विषय दंगल उद्‌भवण्याच्या संबंधातील आहे तर दुसरा विषय आषाढी एकादशीला गाईंचा झालेला मृत्यू. आषाढी एकादशीला जो प्रकार घडला तो निंदनीय होता. गो हत्या बंदी विधेयकाचे काय झाले हा देखील चर्चेचा विषय आहे. पण तो अल्पकालीन चर्चेचा विषय नसल्यामुळे मी त्यावर आता तरी काही बोलणार नाही. महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशामध्ये गो मातेला सर्वसाधारण जनतेच्या मनामध्ये आदराचे स्थान आहे. गाईसंबंधी कोणी काही बोलले तर हिंदुंच्या भावना दुखावल्या जातात आणि दंगलीची परिस्थिती निर्माण होते. आषाढी एकादशीच्या दिवशी अनेक गाईंना कापून टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. आषाढी एकादशी महाराष्ट्रात प्रत्येक घरात साजरी केली जाते. त्यावेळी भावना धार्मिक झालेल्या असतात. आषाढी एकादशीच्या दिवशी एक मैलाच्या परिसरात 22 गाईंची हत्या झाल्याचे लक्षात आल्यानंतर लोक प्रचंड संख्येने जमा होऊ लागले. त्यावेळी रस्ता रोको झाले. लोकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. नाशिक ग्रामीण भागामध्ये लोकांनी कडकडीत बंद पाळून घटनेचा निषेध नोंदविला.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

लोकांना कापलेल्या अवस्थेत गायी दिसत होत्या, गायींच्या ्गुप्तांगावर कापल्याच्या खुणा दिसत होत्या. इतके स्पष्ट दिसत असूनही त्या गायी गुदमरुन मेल्याचे सांगण्यात आले त्यामुळे लोकांच्या भावना आणखी तीव्र झाल्या. गायींची जाणूनबुजून कत्तल केली असताना प्रशासन ते लपविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे लोकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. या गायींचे पोस्टमार्टेम करण्यात येईल असे सांगण्यात आल्यानंतर तेथील लोकांनी सांगितले की, पोस्टमार्टेमच्या निकालावर आमचा विश्वास नाही. कारण स्थानिक पोस्ट मार्टेमकडून आपणास पाहिजे असलेला अहवाल मिळवू शकता. तेव्हा बाहेरील डॉक्टर्स आणून पोस्टमार्टेम करावे असे तेथील लोकांनी सांगितले. आषाढी एकादशीच्या दिवशी गोहत्या करुन हिंदुचा अवमान करण्यात आलेला आहे. त्यावेळी प्रशासनाने माननीय खासदारांना सुध्दा प्रतिबंध केला होता. तसेच पत्रकांराना तंबी दिली. अन्यथा एखादी घटना घडल्यानंतर लगेच ब्रेकींग न्यूज दाखविण्यात येते आणि ही न्यूज इतक्यावेळा दाखविण्यात येते की, आपण ती बातमी सतत ऐकून बेजार होतो. परंतु याच्या नेमकी उलट घटना येथे घडली. गायींच्या झालेल्या कत्तलीबाबत नाशिक जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. हाय-वे बंद करण्यात आला होता. रास्ता रोको करण्यात आला होता. लोकांनी प्रचंड प्रमाणावर निदर्शने केली. परंतु इतकी मोठी घटना घडूनही एकाही वाहिनीने एका सेकंदाची देखील बातमी दाखविली नाही. तेव्हाच आमच्या मनात शंकेची पाल चुकचुकली ही यामध्ये काही तरी काळेबेरे आहे. माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्यात आली होती तेव्हा सर्व मोबाईल बंद करण्यात आले होते. तशाच प्रकारे ही बातमी वाहिन्यांवर दाखविली जाणार नाही याची प्रशासनाने व्यवस्था केली इतकी जागरुकता सरकारने दाखविली. मनमाड, मालेगाव, येवला, सटाणा, चांदवड, देवळा, कळवण, नांदगाव येथे उत्स्फूत बंद पाळण्यात आला. परंतु असे असताना मुस्लिम भागामध्ये जाणूनबुजून सर्व व्यवहार सुरु ठेवून या बंदला विरोध करुन झालेल्या कृत्याचे समर्थन करण्याचा दुर्दैवी प्रयत्न झाला. हे प्रकरण दडपण्याचा सरकारच्या माध्यमातून प्रयत्न झाला त्याचा तीव्र निषेध मी नोंदवित आहे.

सभापती महोदय, काल संभाजीनगरमध्ये मोठ्या प्रमाणावर मोर्चा निघून कत्तलखान्याकडे जात असलेल्या गायी रोखण्यात आल्या. असे प्रकार महाराष्ट्रात वारंवार घडत आहेत. या

..2..

श्री.दिवाकर रावते..

प्रकरणामध्ये एका टेम्पो वाहनचालकास पकडण्यात आले असे सांगण्यात आले. परंतु धार्मिक भावना भडकाविणे, दंगल निर्माण करण्यास प्रवृत्त करणे असा प्रकार ज्यांनी केला असेल त्या गुन्हेगारांना ताबडतोब पकडून त्यांच्यावर तशाप्रकारचे गुन्हे दाखल करावेत अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, अल्पकालीन चर्चेतील दोन्ही विषय दंगली संदर्भातील आहेत. हिंदू धर्माच्या भावना भडकाविणारे आहेत. यातील दुसरा विषय आणखी गंभीर आहे. खरे म्हणजे तो जुना विषय आहे. मेलेले मढे उकरुन काढण्याची हौस सत्ताधारी पक्षाला असेल तर त्याबाबत आम्ही काय करायचे ? मागील अधिवेशनात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले होते की, आमच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरु असून त्यांची कारण नसताना नार्को टेस्ट करण्यात येत आहे. आमच्या कार्यकर्त्यांच्या मागे नार्को टेस्टचे षडयंत्र लावण्यात आले आहे. मिरज दंगली संदर्भात विनाकारण धरपकड होत असल्याबाबत आम्ही टाहो फोडत होतो, त्याकडेही प्रशासनाने दुर्लक्ष केले. सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा माननीय सर्वोच्च न्यायालयाने नार्को टेस्टवर बंदी आणली म्हणून नार्को टेस्ट प्रकरण तेथे थांबले. अन्यथा तेथील एस.पी. श्री.कृष्ण प्रसाद सर्वांच्या मागे हात धुवून लागले होते. आरोपी पकडणे मी समजू शकतो. परंतु रोज पत्रकारपरिषद घेऊन आज अमक्याची नार्को टेस्ट करणार, उद्या तमक्याची नार्को टेस्ट करणार अशाप्रकारचे वक्तव्य करणे हे योग्य नाही. उच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्याने प्रसिध्दी माध्यमातून स्वत:च्या प्रसिध्दीची हाव करु नये. त्यांना प्रसिध्दीची हाव असेल तर त्यांनी वेगळ्या मार्गाने ती भागवून घ्यावी. स्वत:ची प्रसिध्दी आणि लोकांमध्ये धाकदपटशा निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. सांगली दंगलीमध्ये ते बदनाम झाले म्हणून त्याचा वचपा काढत आहेत की काय असा प्रश्न निर्माण होतो. त्यावेळी आपल्याकडे गृह विभागाचा कार्यभार नव्हता. परंतु सांगली जिल्ह्यातील गृहमंत्री होते. सांगली जिल्ह्यातील एस.पी.श्री.कृष्ण प्रसाद यांच्या गाडीवर उभे राहून पाकिस्तानचा ध्वज फडकाविण्यात आला आणि त्यातून ही दंगल झाली. याठिकाणी असे सांगण्यात आले की, या प्रकरणी ज्याने एस.एम.एस.केले त्याचा कसून शोध घेऊन त्यांना तुरुंगात टाकणार आहोत. खरे म्हणजे त्यावेळी श्री.कृष्णा प्रसाद यांचे नाक कापले गेले. आपल्या गाडीवर पाकिस्तानचा ध्वज फडकावला जातो हा राग काढण्याकरिता तेथील हिदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

त्यामध्ये काय घडले हे मला माहीत नाही. माननीय गृह मंत्री आपल्या उत्तराच्या भाषणात त्यासबंधीचा खुलासा करतील आणि महाराष्ट्रातील जनतेला खास करुन सांगली मधील जनतेला विदित करुन देतील तर ते महत्वाचे ठरेल. त्या ठिकाणी झालेल्या दंगलीनंतर कृष्णाप्रसाद यांची बदली करण्यात यावी यासाठी आम्ही सातत्याने मागणी करीत होतो श्री.भिडे गुरुजींचे प्रकरण झाले होते त्यावेळी त्यावेळी मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन श्री भिडे गुरुजीं यांची भेट घेतली होती तसेच काय घडले याची माहिती घेतली होती व त्यानंतर आपली देखील भेट घेतली होती . त्यावेळी मला आपण असे सांगितले की, श्री भिडे गुरुजी हे सर्वांनाच वंदनीय आहेत. त्यामुळे आपण हे प्रकरण त्या ठिकाणी थांबवले होते. श्री भिडे गुरुजी हे सर्वांनाच आदर्शवत आहेत माननीय गृह मंत्री श्री.आर आर पाटील, माननीय मंत्री श्री जयंत पाटील व त्या भागातील इतर सर्व मंत्र्यांना व सन्माननीय सदस्यांना श्री.भिडे गुरुजी वंदनीय आहेत त्या ठिकाणी एखाद्या पक्षाचेच लोक त्यांना आदर्शस्थानी मानतात असे नाही तर सर्व पक्षातील लोक त्यांना आदर्शस्थानी मानतात.त्या प्रकारानंतर श्री कृष्ण प्रसाद प्रकाश् झोतात जास्त आले होते.ही ंदगल झाल्यानंतर दहा महिन्यानंतर श्री कृष्णप्रसाद यांनी प्रेस कॉन्फरन्स घेऊन असे सागितले होते की,या दंगलीस श्री.बागवान हे जबाबदार आहेत.त्यावेळी डयुटीवर असताना त्यांनी या संदर्भात त्यांच्यावर कारवाई का केली नाही असा प्रश्न निर्माण् होतो .श्री. कृष्ण प्रसाद यांच्या माध्यमातून काही कट कारस्थान शिजले आहे की काय अशी शंका निर्माण होते.सांगली मिरजचे अधीक्षक श्री कृष्ण प्रसाद यांची नागपूरला बदली झ ाल्यानंतर त्यांनी ताबडतोब दिनांक 6.7.2010 रोजी पत्रकार परिषद घेतली आणि श्री.बागवान हे दंगलीस कारणीभूत होते असे जाहीर केले होते. श्री.बागवान जर दंगलीस कारणीभूत होते तर त्या भागात त्यावेळी श्री बागवान हे खुलेआम फिरत होते ते कोठेही लपलेले नव्हते अशा वेळी त्यांना अटक का करण्यात आली नाही.? आपली बदली झाल्यानंतर जातांना पत्रकार परिषद घेऊन दंगलखोर कोण आहे हे सांगण्याचा प्रयत्न करावयाचा व एक प्रकारची हवा निर्माण करावयाची हा प्रकार योग्य नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, त्यावेळी निवडणुका जाहीर झाल्यामुळे आचारसंहिता लागू होती. सहयाद्रीच्या बैठकीच्या वेळी तत्कालीन गृहमंत्री श्री. जयंत पाटील उपस्थित होते, उपमुख्यमंत्री होते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि मी देखील उपस्थित होतो.त्यावेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

तत्कालीन गृहमंत्र्यांनी असे सगितले की, एकाही निरपराध व्यक्तीवर गुन्हा दाखल करु देणार नाही आज पासून कोणालाही अटक केली जाणार नाही आणि जे कोणी निर्दोष असेल त्यांना सोडून देण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी सहयाद्री येथे जी बैठक आयोजित केली होती त्या बैठकीला सर्व पक्षीय प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी उभ्या राहिलेल्या एका मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधीचा मला अभिमान वाटतो. या प्रतिनिधीने उभे राहून माननीय मुख्यमंत्र्यांना असा प्रश्न विचारला की, "आप हमारे ऊपर दाग क्यों लगाते हो ? अफजलखान हमारा कोई नहीं लगता. वह गुनाहगार है. हमारा उससे कुछ लेना देना नहीं है." अशा प्रकारचे वक्तव्य त्या बैठकीमध्ये मुस्लिम समाजाच्या एका व्यक्तीने केले होते. ज्यावेळी मुस्लिम समाजाची व्यक्ती अफजलखानाला कोणत्याही प्रकारची दया दाख्वत नाही. अफजलखानला आपला मानत नाही अशावेळी असा प्रकार का घडला हा मोठा संशोधनाचा विषय होता. मिरज दंगलीच्या संदर्भात लवकरात लवकर सोक्षमोक्ष लावावा अशा प्रकारचे आवाहन स्वत: माननीय गृहमंत्री श्री.जयंत पाटील यांनी केले होते. तत्कालीन गृहमंत्री माननीय श्री जयंत पाटील हे सांगलीचे असून त्यांनी शासनाला अशा प्रकारचे स्वत: आवाहन केले होते. त्यांनी शासनाला असे सागितले की, या दंगलीचा सोक्षमोक्ष तातडीने लावण्यात यावा. लहान मासा कोण आहे आणि मोठा मासा कोण आहे हे सांगण्यावरुन पक्षामध्ये आपआपसात युध्द सुरु झ ाले होते. श्री बागवान हा लहान मासा आहे व यामागे मोठे मासे दडलेले आहेत अशा प्रकारचे वक्तव्य कॉग्रेसच्या पदाधिका-यांकडून आणि मंत्र्यांकडून व्हावयास लागल्यानंतर श्री जयंत पाटील यांनी शासनाला सांगितले की, लहान मासा कोणता आहे आणि मोठा मासा कोणता आहे यासबंधी जनतेमध्ये जो संभ्रम निर्माण झालेला आहे तो संभ्रम त्वरित दूर करण्यात यावा.

सभापती महोदय, श्री.जयंत पाटील यांनी या दंगलीच्या चौकशीची मागणी करीत असतांना व स्वत:ची भूमिका मांडत असतांना श्री.कृष्ण प्रसाद यांच्या हेतूबद्दल शंका व्यक्त केली होती. श्री जयत पाटील हे तत्कालीन गृहमंत्री होते आणि एका पोलीस अधिका-याबद्दल स्वत: गृहमंत्र्यांनी शंका उपस्थित करणे ही बाब प्रशासकीय दृष्टया अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. सभापती महोदय, तत्कालीन गृह मंत्री श्री.जयंत पाटील यांनी त्यांच्या काळात या पोलीस अधिका-याच्या बाबतीत जे

3...





श्री.दिवाकर रावते ...

मत व्यक्त केले होते त्याबाबतीत माननीय गृह मंत्री श्री आर. आर. पाटील यांनी खुलासा करावा असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, त्याच वेळेस श्री बागवान यांच्याबरोबर अन्य सहा सात बडया नेत्यांचा त्या दंगलीमध्ये सहभाग आहे याची माहिती श्री.कृष्ण प्रसाद यांना होती तर त्यांनी या नेत्यांना अटक का केली नाही ?.हे सर्व प्रकार चालू असतांना या दंगलीची उच्च स्तरीय चौकशी करण्यात येईल अशी माहिती श्री.जयंत पाटील यांनी दिली होती .सीबीआय चा त्यावेळी उल्लेखही करण्यात आला होता. हे ठीक आहे.त्यावेळच्या दंगलीसबंधी वर्तमानपत्रात बातम्या आल्यानंतर आणि जे काही वातावरण निर्माण झाले होते त्यानंतरच्या चर्चेमध्ये आबा आपण स्वत: उडी घेतली होती .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, आता कृष्ण प्रसादबाबत त्यांनी शंका व्यक्त केली आहे. कृष्ण प्रसादांची संपूर्ण कारकीर्द वाद निर्माण करणारी आहे. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून स्वत:ची ओळख करणाऱ्या या कृष्ण प्रसादांना प्रसिध्दीचा प्रचंड हव्यास आहे. ते सारखे वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींसमोर असतात. ते फिल्मी स्टाईलने वागतात, प्रसार माध्यमांबरोबर चर्चेत रहातात. जनतेचा मसिहा बनण्याची धडपड करतात. दारुचा अड्डा बंद करतो,मटक्याचा अड्डा बंद करतो असे सांगतात प्रत्यक्षात काहीच करीत नाहीत. सभापती महोदय, त्यावेळी मिरजची दंगल हाताबाहेर जाण्यास ते कारणीभूत ठरले असते. दंगलीचा वेध घेत असतांना जोधा-अकबर प्रकरणामध्ये भिडे गुरुजींची कॉलर पकडून मोठया प्रसिध्दीमध्ये तेच आले होते. मला वाईट एवढेच वाटते की, भिडे गुरुजींची गठली आवळण्याचा प्रयत्न करणारे, बागवानची गठली आवळण्याचा प्रयत्न करणारे काल नगरमध्ये गेले, आमच्या तालुका प्रमुखाची फसली तोडण्याचे काम त्यांनी व्यवस्थित केले. आणि पुन्हा प्रसार माध्यमांपुढे जाऊन जुगारचा अड्डा कसा चालतो, तेथील माणसे कशी चालून आली इत्यादी फिल्मी स्टाईल बनाव रचून आणि आपण कसे चांगले आहोत, आणि बाकीचे सर्वजण कसे बदमाश आहेत, राजकीय पक्षातील लोक कसे बदमाश आहेत हे सांगण्याचा वारंवार प्रयत्न केला. सभापती महोदय, आणि म्हणून माननीय आबांनी ज्यावेळी यामध्ये उडी घेतली त्यावेळी त्यांनी ही दंगल सर्वपक्षीय आहे असे जाहीर केले. दंगलखोरांना चव्हाटयावर आणू असे माननीय मंत्री श्री. जयंत पाटील म्हणाले त्यावेळी आबा म्हणाले की, ही दंगल सर्वपक्षीय आहे. आपण असे म्हटल्यावर मला खूप बरे वाटले. कालपर्यंत आम्ही दंगलखोर होतो, आम्ही हिंदू-मुस्लिम दंगल घडवून आणतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस हा सुध्दा एक दंगलखोर पक्ष या महाराष्ट्रामध्ये आहे हे आपण जाहीर केल्याबद्दल आपले आम्हाला कौतुक करावेसे वाटते. आम्हाला तर तुम्ही शिक्का मारलेलाच आहे. तुम्ही दंगलखोर असल्यामुळे आता कॉंग्रेस पक्षापुढे मोठा पेच निर्माण झाला आहे की, या महाराष्ट्रामध्ये जातीय दंगलीमध्ये सहभागी असलेल्या पक्षाबरोबर आपल्या पक्षाचे सरकार ठेवायचे की नाही? अशाप्रकारचे वेगळे आव्हान आपल्या निवेदनामधून पुढे आले आहे. म्हणून मी आपल्या निवेदनाची नोंद घेतो. हा विषय जुना झाला असला तरी यामध्ये ज्या लोकांना हकनाक अटक केली, काही लोकांना तुरुंगामध्ये पाठविले, त्यामुळे त्यांचे झालेले नुकसान भरुन येणार नाही. परंतु कृष्ण प्रसादने सरकारचे सुध्दा मानले नाही हे सत्य आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री.दिवाकर रावते...

साहेब आपण त्यावेळी सहयाद्री अतिथीगृहावर उपस्थित होता. यापुढे कुणालाही अटक होणार नाही, निरपराध्यांना सोडून अपराध्यांना अटक होईल असा आपण शब्द दिला होता. परंतु आपण निरपराध्यांना सोडले नाही. अनेक लोकांना अटक केली, आणि त्यांची नार्को टेस्ट करतो असे जाहीरपणे सांगितले. त्यामुळे हा दंगलखोर कृष्ण प्रसादच आहे काय? असा आमच्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे. आणि म्हणून या दंगलीतील मोठे मासे कोण? हे इतक्या दिवसानंतर आपण शोधले असेल तर आजच्या निवेदनामध्ये आपण ते सभागृहामध्ये सांगाल अशी माझी अपेक्षा आहे.

मिरजेच्या दंगलीवरील चर्चेच्यावेळी हजर रहाणार असल्याचे माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम म्हणाले होते, म्हणून मी त्यांची वाट पहात होतो. आम्ही सर्व सांगलीकर असल्यामुळे आम्हाला चिंता लागून राहिली आहे, असे ते म्हणाले. त्यानिमित्ताने निवडणुकीचे डावपेच निर्माण झाले. माननीय आबा आपण यासंदर्भात शासनाची सुस्पष्ट अशी भूमिका मांडली पाहिजे. अफजलखानाचा कोथळा काढला हा त्याठिकाणी दंगलीचा विषय कधीच नव्हता असे माझे ठाम मत आहे. गणपतीच्या पुढयात मांस टाकण्याचा प्रयत्न झाला, गणपतीची मूर्ती भंग पावली त्यामधून ही दंगल घडली. हा विषय मी याठिकाणी आवर्जून मांडतो. आपण या दंगलीमधील मोठे मासे कोण असतील ते रोखठोक सांगावेत अशी मी सभागृहाच्या माध्यमातून आपणा विनंती करतो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये नियम 97 अन्वये माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी चर्चा उपस्थित केली आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्रामध्ये आषाढी एकादशी हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. या दिवशी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून नव्हे तर कर्नाटक, आंध्र प्रदेशामधून सुध्दा वारकरी 300 ते 400 किलोमीटर पायी चालत पंढरपूरला येतात. यावर्षी 10 लाखाच्यावर वारकरी पंढरपूरला आले होते. त्या दिवशी आम्ही दुपारी पंढरपूरहून दर्शन घेऊन परत येत असतांना...

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

सोलापूर आणि पंढरपूरच्या मध्ये असताना मला आणि सन्माननीय श्री. खडसे-पाटील यांना एक फोन आला. त्या फोनवर त्यांनी असे सांगितले की, नाशिक-मालेगाव रस्त्यावर 10 ते 12 गाई मृतावस्थेत फेकल्या गेलेल्या आहेत. आम्हाला पहिल्यांदा हे खरे वाटले नाही.याचे कारण असे की, त्या दिवशी आषाढी एकादशीचा दिवस होता. लाखो वारकरी पंढरपूरला जात असताना अशा प्रकारचे धर्मांध कृत्य कोणी करील असे आम्हाला वाटले नाही पण आम्ही खोलात जाऊन माहिती घेतली तेव्हा ती बातमी खरी आहे असे कळले.

सभापती महोदय, दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी छापून आली. गाईंचा मृत्यू गुदमरुन झाल्याचा सांशय पशू वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला होता. त्या गाईंचे पोस्टमॉर्टेम झालेले नव्हते. त्या गाईंचे काही फोटोग्रफ्स काढण्यात आलेले आहेत. ते फोटोग्राफ्स माझ्या जवळ आहेत. त्या गाईंच्या गुप्तांगावर वार केलेले होते. त्यांचे स्तन कापलेले होते. अतिशय तीव्र अशा प्रकारच्या हत्याराने त्या गाईंवर जखमा केलेल्या होत्या. मी या बाबतीत असा विचार करीत होतो की, आषाढी एकादशीच्या दिवशी असे कां घडावे? दोन दिवसासपूर्वीच मालेगावमध्ये शांतता समितीची बैठक झालेली होती. पाहिजे तर माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतची चौकशी करावी. दोन दिवसांपूर्वीच शांतता समितीची बैठक झाली होती. त्यानंतर लगेच दोन दिवसानंतर ही घटना घडली. सभापती महोदय, मी या बाबतीत थोडीशी माहिती घेतली. माननीय गृह मंत्री एका क्षणात याबाबतची माहिती मिळवू शकतात. 1967 साली आषाढी एकादशीच्या दिवशी व्यायलेल्या गाईला कापून मारण्यात आले होते. तिच्या पोटातील वासरु जीवंत होते. तेथील एका कार्यकर्त्याने त्या वासराला खांद्यावर घेऊन मालेगाव शहरात मिरवणून काढली होती.त्यानंतर घडलेला पुढचा प्रसंग मी या ठिकाणी सांगत नाही. 1967 साली ज्या दिवशी अशा प्रकारची घटना घडली होती त्याच दिवशी ही घटना घडलेली आहे. सभापती महोदय, या घटनेची माहिती घेतल्यानंतर असे लक्षात आले की, त्या गाईंचे मरण दोन दिवसापूर्वीच झालेले होते. अतिशय सडलेल्या आणि कुजलेल्या अवस्थेत त्या गाई होत्या. त्यांचा वास येत होता. बरोबर आषाढी एकादशीच्या दिवशी त्यांना टाकून जाणीवपूर्वक हिंदूंच्या भावनेला हात घालण्याचा प्रयत्न केला होता. साहजिकच त्याची प्रतिक्रिया उमटली आणि नाशिक, मालेगावच्या बाजुबाजूच्या पंचक्रोशीतील गावांममध्ये बंद पाळण्यात आला. गाईंची प्रेते

..2..

श्री. पांडुरंग फुंडकर....

बघण्यास माणसे यायला लागली. प्रशासनाने या घटनेला कसे दाबावयाचे याचा विचार आधीच केला होता. त्यामुळे ती घटना दाबून टाकण्याचा प्रयत्न झाला. या गाई गुदमरुन मेल्या असे सांगण्याचा प्रयत्न झाला. सभापती महोदय, मी या ठिकाणी आरोप करतो की, टी.व्ही. माध्यमांचे तोंड बंद करण्यात आले. ही बातमी कुठल्याही पध्दतीने टी.व्ही.वर येता कामा नये. यामुळे महाराष्ट्रात प्रक्षोभक अशा प्रकारचे वातावरण निर्माण होईल म्हणून कुठल्याही टी.व्ही.च्या माध्यमातून चॅनल्सवरुन ही बातमी येणार नाही अशी व्यवस्था केली गेली.

सभापती महोदय, ही घटना 12.00 ते 12.30 च्या दरम्यान घडली होती. या घटनेचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडा आहे, अशा प्रकारची ही घटना आहे. वेळ कमी असल्यामुळे मी जास्त बोलणार नाही पण 14 वर्षापूर्वी याच विधिमंडळामध्ये दोन्ही सभागृहाने प्राणी संरक्षण विधेयक या ठिकाणी मंजूर केले होते. मी गोहत्या असे म्हणार नाही.पण प्राणी संरक्षण विधेयक दोन्ही सभागृहाने मंजूर केले. या महाराष्ट्रातील असे एकही विधेयक नाही की, ज्या विधेयकाला दोन्ही सभागृहाने मंजूर केलेले आहे पण त्या विधेयकाला चौदा वर्षे माननीय राष्ट्रपतींनी मान्यताच दिलेली नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

माझी अशी माहिती आहे की, या बिलाच्या बाबतीत शासनाने पुन्हा एक समिती नियुक्त केलेली आहे. विधानमंडळामध्ये जो कायदा मंजूर झालेला आहे, माननीय राष्ट्रपतींनी मान्य केलेला आहे त्या कायद्याच्या बाबतीत अधिकाऱ्यांची समिती नेमलेली आहे. ती समिती दोन्ही सभागृहातील सदस्यांपेक्षा, मंत्रिमंडळापेक्षा मोठी आहे काय, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. ही समिती कोण आहे ? एकदा विधिमंडळामध्ये कायदा मंजूर झाल्यानंतर, कॅबिनेटने त्याला मान्यता दिल्यानंतर, माननीय राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतर आता त्या कायद्याचे सर्वेक्षण करण्यासाठी एक समिती नियुक्त केली आहे. यामध्ये काही गोष्टींचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे. ही समिती कोण आहे ? त्या समितीच्या म्हणण्याप्रमाणे शासन निर्णय घेणार आहे काय ? या विधिमंडळामध्ये जे कायदे केले जातात ते कायदे मंजूर झाल्यानंतर पुन्हा आपण अधिकाऱ्यांचा सल्ला घेता काय ? त्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने त्या कायद्यामध्ये दुरुस्ती करता येते काय ? मग विधिमंडळाला काय अर्थ राहतो ? या विधिमंडळाचे अधिकार काय आहेत ? या विधिमंडळापेक्षा अधिकारी मोठे आहेत काय ? असे प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण होत आहेत. 14 वर्षापूर्वी कायदा मान्य झालेला आहे. त्याला त्यावेळी मान्यता मिळाली असती, त्यावेळी ॲनिमल प्रोटेक्शन ॲक्ट झाला असता तर या राज्यामध्ये या घटना घडणे कमी झाले असते.

या राज्यामध्ये गायींची चोरटी आयात फार होते. ग्रामीण भागातून त्याची सुरुवात होते. ती चोरटी आयात रोखली जात नाही. काही सामाजिक संस्था ती रोखण्याचा प्रयत्न करतात. जैन धर्मियांच्या काही संस्था आहेत त्यांना माहिती मिळाली की ते रोखण्याचा प्रयत्न करतात. परंतु पोलीस त्यांना दाद देत नाहीत. मी हा विषय वाढविणार नाही. मालेगाव येथे जी घटना घडली त्या ठिकाणी एसडीएमला निवेदन देण्यासाठी जमाव गेला असता त्या जमावावर पोलीस प्रशासनाने किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिल्यामुळे लाठीहल्ला करण्यात आला. त्या ठिकाणी अशा पध्दतीने लाठी चालविण्याचे कारण नव्हते. त्यांचे पोलिसांशी काही भांडण नव्हते. आम्हाला निवेदन देऊ द्या असे लोकांचे म्हणणे आहेत. त्या ठिकाणी पत्रकारांनी एसडीएमला एक प्रश्न विचारला. पत्रकाराने एसडीएमला प्रश्न विचारला म्हणून एसडीएमने लाठीचार्ज करण्याचे आदेश दिले. क्रियेची प्रतिक्रिया

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

ही होणारच. ज्या गोमातेला हिंदू समाजाने आपली माता मानलेले आहे तिला कापून, तिची निर्घृण हत्या करुन हिंदू वस्तीतील रस्त्यांवर गायी फेकल्या असतील तर समाजामध्ये त्याची प्रतिक्रया उमटणे योग्य आहे. त्यावर आपण लाठीचार्ज करता. त्या ठिकाणी लाठीहल्ला कसा केला याची चौकशी होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आरोपींना पकडल्याचे अजून ऐकिवात नाही. आज 26 तारीख आहे. घटना घडून सहा दिवस झाले तरी ज्यांनी गाईंची हत्या करुन रस्त्यावर फेकल्या त्यांना अटक झालेली नाही. हे आरोपी पकडले गेले आहेत काय ? पकडले असतील तर ते आरोपी कोण आहेत ? जर आरोपी पकडले गेले असतील तर ते मुख्य आरोपी नाहीत. त्यांच्या पाठीशी कोण आहे आणि या राज्यामध्ये अशा पध्दतीने गायींची चोरटी वाहतूक करणारे कोण आहेत इर्थपर्यंत चौकशी केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. गोहत्या बंदीचा कायदा आपल्याला या राज्यामध्ये लागू करावयाचा असेल किंवा नसेल. शेवटी मतांचे राजकारण करण्यासाठी काही गोष्टी सरकार करते तर काही गोष्टी करीत नाही. एक मागणी मी या ठिकाणी करतो. या राज्यामध्ये आपण ॲनिमल प्रोटेक्शन सेल तयार करणार काय ? या राज्यामध्ये जनावरे कापली जातात, देवनार येथे लाखो जनावरे रोज कापली जातात, त्यांचे प्रोटेक्शन करणारा ॲनिमल प्रोटेक्शन सेल या राज्यामध्ये स्थापन करावा अशी प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, दुसरा एक विषय सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सविस्तरपणे मांडलेला आहे. त्यावर मी फार भाष्य करणार नाही. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांना सांगू इच्छितो की, सांगलीला जी दंगल झाली त्या बाबतीत मी आपल्याला बऱ्याचदा भेटलो. त्या ठिकाणचे नौटंकी एस.पी. यांनी ती दंगल हाताळली नाही तर ती चिघळविण्याचा प्रयत्न केला. त्याही आधी त्यांनी सांगली शहरामध्ये त्यांच्या अनेक लिला आपल्याला दाखविलेल्या आहेत. भिडे गुरुजींच्या बाबतीत जे लिहिले गेले त्या बाबतीत मी या ठिकाणी फार बोलणार नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

कारण ही नौटंकी माझ्याही जिल्हयामध्ये 2 वर्षे होती. त्यांची नौटंकी मी अधिक जवळून पाहिली आहे. कोणत्या नियमानुसार पोलीस अधीक्षकांची बदली झाल्यानंतर ते त्याठिकाणी पत्रकार परिषद घेतात आणि सांगतात की, जी दंगल झाली त्या दंगलीस राष्ट्रवादी पक्ष जबाबदार आहे. त्यांनी राष्ट्रवादी हा शब्द वापरलेला आहे. बागवान हा शब्द वापरलेला नाही. राष्ट्रवादी शब्द वापरलेला आहे. माननीय मंत्री महोदय, आपण त्यावेळी गृह मंत्री नव्हता. परंतु ते अधिकारी तुमचे लाडके आहेत, आमच्या जिल्हयामध्ये असल्यापासून ते तुमचे लाडके आहेत. त्याचे कारण काय आहे ते मला समजलेले नाही, ते कारण जाणून घेण्यासाठी मी एखाद्या दिवशी भेटण्यासाठी येईन. परंतु त्यांच्यामध्ये काय दडले आहे ते समजत नाही. राज्यात कृष्ण प्रसाद पॅटर्न राबवावयाचा आहे असे आपण एकदा म्हटले होते. एक अधिकारी अशाप्रकारे पत्रकार परिषद घेऊन स्टेटमेंट करतात. सत्तारुढ पक्षातील एका घटक पक्षाला बदनाम करतात. त्याबाबत माननीय गृहमंत्र्यांना खुलासा करावा लागला की, या दंगलीस राष्ट्रवादी पक्ष नाही तर सर्वच राजकीय पक्ष जबाबदार आहेत. त्याबाबतही खुलासे झाले पाहिजेत. सांगली-मिरज दंगलीत निरपराध माणसांवर कारवाई करण्यात आली. माननीय गृहमंत्र्यांनी कबूल केले होते की, निरपराध लोकांना पकडले असेल तर कृष्ण प्रसाद यांच्या माध्यमातून केसेस काढून घेण्यात येतील. निरपराध लोकांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. तुमचे अंतर्गत काय राजकारण आहे त्यासंबंधी मी बोलणार नाही. परंतु एकमेकांवर कुरघोडी करण्याचा जो प्रकार चालला आहे तो थांबला पाहिजे. सांगली-मिरज दंगल हे त्याचे माध्यम असू नये. तुम्हाला अंतर्गत राजकारण करावयाचे असेल तर त्यासाठी विधान भवन वा मंत्रालयाला आखाडा करावे. परंतु गावाला वेठीला धरणे, अंतर्गत राजकारणासाठी समाजाला वेठीला धरण्याचा प्रकार राज्यामध्ये होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करतो.

त्याचप्रमाणे या दंगलीची चौकशी सुरु आहे त्याला फाटे फुटण्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे ही चौकशी लवकरात लवकर संपवावी. अन्यथा, कोणी ही चौकशी सीआयडीकडे सोपवावी, कोणी ही चौकशी सीबीआयकडे सोपवावी असे म्हणतील. माझे म्हणणे असे आहे की, आपल्या राज्याचे गृह खाते

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

सक्षम नाही काय ? सीआयडी किंवा सीबीआयची चौकशी कशासाठी पाहिजे ? ज्या माध्यमातून ही चौकशी सुरु आहे ती तातडीने संपवावी आणि एकदा महाराष्ट्राला दूध का दूध आणि पानी का पानी दाखवून द्यावे अशी मी मागणी करतो. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे या राज्यात ॲनिमल प्रोटेक्शन सेल निर्माण करण्याची घोषणा या सभागृहात करावी अशी मी विनंती करतो आणि माझे वक्तव्य येथेच संपवितो.

-----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, मनमाड, चौफुली, मालेगांव येथे मृत अवस्थेमध्ये मिळालेल्या गायींच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, गट नेते आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्याला मी थोडक्यात उत्तर देणार आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट अतिशय संवेदनशील असल्यामुळे आणि नेमकी आषाढी एकादशीसारख्या एका पवित्र सणाच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे त्याबाबतच्या थोडाशा प्रतिक्रिया त्या परिसरामध्ये उमटल्या. या घटनेबाबत सर्व ठिकाणी हळहळ व संताप व्यक्त केला गेला. आज मला दुःखाने सांगावे लागत आहे की, या घटनेतील आरोपी सापडलेले आहेत, आरोपी निश्चित केलेले आहेत. परंतु ही घटना घडल्यानंतर ताबडतोब एका धर्माच्या समुदायाबद्दल लोकांच्या मनामध्ये ज्या पध्दतीच्या शंका निर्माण करण्याचा प्रयत्न झाला किंवा झाल्या. या घटनेचा सर्व तपास केल्यानंतर तशी वस्तुस्थिती आढळून येत नाही. इलेक्ट्रॉनिक माध्यमांबद्दल आपण दोघेही बोललात. एखादी घटना घडत असते, समाजकंटक ते करीत असतात. परंतु अलिकडे माध्यमे खूप प्रभावशाली झालेली आहेत. एखाद्या घटनेमुळे राज्यामध्ये दंगल घडणे शक्य आहे, ज्यावेळी दंगली होतात त्या दंगलींपैकी अनेक दंगलींचा इतिहास आपण पाहिलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

(श्री. आर.आर.पाटील...

मी महाराष्ट्रातील आणि देशातील इलेक्ट्रॉनिक मिडियाचे मनापासून अभिनंदन करीन. पहिल्यांदा सामंजस्यपणाची भूमिका घेत या घटनेचा तपास लागे पर्यन्त कोणतेही भाष्य न करण्याची भूमिका त्यांनी घेतली. विरोधी पक्षाने असे म्हटले की, सरकारने मिडियाचे तोंड बंद केले. सभापती महोदय, या देशातील आणि राज्यातील इलेक्ट्रॉनिक मिडियाचे तोंड कोणी बंद करावे इतका तो दुबळा नाही आणि तो तसा असता तर अनेक दिग्गज राजकारण्यांच्या ज्या बातम्या आल्या त्या येऊ शकल्या नसत्या. त्यांनी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी राज्याचे हित डोळयासमोर ठेवून पार पाडली. 8 गायी मृतावस्थेत आढळल्या.

या गुन्ह्यामध्ये जे आरोपी निष्पन्न झालेले आहेत त्यामध्ये हबू पोईम, राहाणार जावरा, जिल्हा रतलाम, मध्यप्रदेश, या नावाचा आरोपी निष्पन्न झालेला आहे. त्याच्या मालकीचा ट्रक क्रमांक MP 09 HF 9056 वरील चालक शेरु व त्याचा सहकारी आरोपी म्हणून निष्पन्न झालेले आहेत. या गुन्ह्यातील आरोपी हबू पोईम आणि शेरु यांच्या मोबाईल फोनवरील संभाषणावरुन ते वेळोवेळी एकमेकांच्या संपर्कात असल्याचे पुराव्याच्या आधारे अतिशय सुस्पष्ट होत आहे. हा भक्कम पुरावा पोलिसांच्या हातामध्ये आलेला आहे. निष्पन्न झालेल्या गुन्ह्यातील ट्रक हा विविध टोल नाक्यावरुन कोणत्या वेळ गेला खात्री करण्यामध्ये पोलिसांना यश आलेले आहे. गुन्ह्यातील आरोपी हबू पोईम व शेरु यांच्यामध्ये झालेल्या संभाषणावरुन मृत गायींची विल्हेवाट लावण्याचे ठिकाण व वेळ याची माहिती पोलिसांना मिळालेली आहे. साक्षीदार देखील पोलीसांना मिळालेला आहे. ही गुन्ह्याची ठिकाणे शोधली. एका भागात ट्रक ऊभा होता आणि एका प्रत्यक्षदर्शीने ट्रक चालकाला पाहिले असल्याचा साक्षीदार पुढे आलेला आहे. या गायी मध्यप्रदेशातून चावरा, रतलाम, धार, सिंदल मार्गे आणि महाराष्ट्रात पळसने शिरपूर, धुळे,मालेगाव, मनमाड, यावल, कोपरगाव, शिर्डी, रहाता मार्गे नगरला आणल्या. जवळ जवळ 600 कि.मीचा प्रवास करीत ह्या गायी आणल्या होत्या. गायी विकत घेणा-या व्यक्तीचे नाव जुबेर आहे. याचा नगरला जनावरे विकत घेण्याचा व्यवसाय आहे. 10 चाकी ट्रक मध्ये सरकारच्या नियमाप्रमाणे जास्तीत जास्त 15 गायी असणे आवश्यक होते. त्यापेक्षा अधिक गायी ट्रकमध्ये नियमाप्रमाणे कोंबता येत नव्हत्या. परंतु या ट्रकमध्ये 43 गायी कोंबून आणल्या होत्या. त्यातील 35 गायी त्याने स्वीकारल्या आणि 8 गायी त्या व्यापा-याने मेलेल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

आहेत म्हणून घेणार नाही अशा पध्दतीची भूमिका घेतली. त्यानंतर या गायींचे काय करायचे असा प्रश्न पडला आणि निर्मनुष्य ठिकाणी त्यांनी या गायी टाकण्याचा प्रयत्न केला. गायींचा पोस्टमार्टेम रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. Due to travelling suffocation असा पोस्टमार्टेम रिपोर्ट प्राप्त झालेला आहे.

शंका येण्यासारखी आणखी एक बाब घडली. ती म्हणजे एका गायीच्या अंगावर जखमा झालेल्या होत्या. तेथील आरोपी देखील पोलिसांनी ताब्यात घेतलेला आहे. या गायी माळरानावर मृतावस्थेत पडलेल्या असल्यामुळे त्यांची कातडी काढण्याच्या दृष्टीने स्थानिक चांभाराने छेद घेतले होते. तोपर्यन्त बाकीच्या लोकांनी या मेलेल्या गायी कोणी टाकलेल्या नसून काही वेगळीच भानगड आहे तू विनाकारण अडचणीत येशील अशी त्या चांभाराला भीती दाखवल्या नंतर तो पळून गेला. चांभाराने कातडी काढण्याचा प्रयत्न केला होता ही गोष्ट त्याठिकाणी आढळून आलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

पोस्टमार्टेम अहवालावरुन काही गायींचा पृष्ठभाग तर काही गायींचा तोंडाकडील भाग जखमी झालेला आढळला. कुत्रे, उंदीर, घुशींसारख्या प्राण्यांनी हा भाग कुरतडल्याचे स्पष्ट होत आहे. साधारणत: त्या जावरा परिसरात जंगलाच्या भागामध्ये गायी सोडल्या जातात. आढळलेल्या गायी अशा पध्दतीने ट्रान्सपोर्ट केल्या जात होत्या. दरम्यान सफोकेशनने मेलेल्या गायी व्यापाऱ्याने न स्वीकारल्यामुळे वाटेत टाकून जायची भूमिका स्वीकारली. आरोपी आणि वाहन ताब्यात घेण्यासाठी पोलीस पथक तेथे पोहोचले आणि आरोपी स्पष्ट झाले. त्यांनी इत्यंभूत माहिती पोलिसांना दिलेली आहे. हा सगळा तपास आणि तपासात वापरलेले कौशल्य निश्चितच वाखाणण्यासारखे आहे. या प्रकरणाचा तपास लागला नसता तर दोन समुदायांमध्ये एकमेकांबद्दल साशंकतेचे वातावरण निश्चितच राहिले असते. महाराष्ट्रामध्ये जनावरांच्या वाहतुकीचे नियम असताना सुध्दा त्या नियमांचे उल्लंघन केले जाते. विशेषत: रात्रीच्या वेळी अशा अवैध आणि अमानुष पध्दतीने वाहतूक केली जाते आणि यातून असे प्रकार घडतात. याबाबत शासनाचे जे प्रस्थापित नियम आहेत त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची दक्षता परिवहन विभाग, टोल नाके आणि पोलिसांकडून घेतली जाईल. या घटनेमध्ये वेगवेगळे कौशल्य वापरुन आणि खूप मोठया प्रमाणात चौकशी करुन अधिकाऱ्यांनी कौशल्याने तपास पूर्ण केला. मी यापूर्वीच तेथील एस.पी.ना सांगितले होते की, जो अधिकारी पहिल्यांदा हा तपास पूर्ण करेल त्याला 25 हजार रुपयांचे बक्षिस शासनाकडून मी घोषित केले होते ते बक्षिस एस.पी.कडे देण्यात येईल. कोणाच्याही मनात कोणतीही साशंकता राहू नये यासाठी निश्चितपणाने या प्रकरणातील सर्व पुरावे तर निश्चित दिले जातील. पण माननीय विरोधी पक्षनेत्यांना सुध्दा निश्चित यातील पुरावे देण्याची शासनाची तयारी राहील. ट्रान्सपोर्ट करताना या गायी मेल्या. त्यांनी योग्य पध्दतीने ट्रान्सपोर्टेशन केले असते तर कदाचित या गायी मेल्या नसत्या. म्हणून ज्या गोष्टींचे त्यांनी उल्लंघन केले त्याबाबत सगळे गुन्हे त्यांच्याविरुध्द नोंद केले जातील. या घटनेमध्ये मी आणखी काही स्पष्टीकरण दिले पाहिजे अशातला कोणताही भाग नाही. सभापती महोदय, सांगलीची दंगल कधी झाली? पण त्याची चर्चा किती वेळ करायची?

श्री.पांडुरंग फुंडकर : या संदर्भात प्रोटेक्शन सेल निर्माण करण्यात येईल काय?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबत हायकोर्टाने नेमलेली न्या.धर्माधिकारी साहेबांच्या अध्यक्षतेखालील समिती आहे, या समितीला एनजीओ नियुक्त करण्याचा अधिकार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

ज्यावेळी अशा प्रकारची वाहतूक एनजीओंच्या निदर्शनास येईल आणि त्यांच्याकडून ज्यावेळी पोलीस प्रोटेक्शन मागितले जाईल त्यावेळी तसे प्रोटेक्शन देण्याची तरतूद आहे. या संदर्भात त्यांच्याशी माझ ी चर्चाही झालेली आहे. एनजीओ अपॉईंटमेंट केल्यानंतर त्यांच्या असा प्रकार निदर्शनास आला आणि त्यांनी मागणी केली तर त्यांना पोलीस प्रोटेक्शन पुरविण्यात येईल. गायींची अशा प्रकारे वाहतूक केली जाते म्हणून पुन्हा एकदा सर्व एस.पी.ना परिपत्रक काढून सूचना देण्यात येतील. कोर्टाची अशीच अपेक्षा आहे. हे प्रकार केवळ पोलिसांमुळे थांबणार नाही. गायींचे संरक्षण करण्यासाठी एनजीओ पुढे आल्या पाहिजेत. त्यांना योग्य प्रकारे संरक्षण देण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

सभापती महोदय, सांगली येथे जी दंगल झाली त्याबाबत माझे एक वक्तव्य सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी वारंवार उच्चारले की, ही सर्वपक्षीय दंगल आहे. एखादी बातमी आली की ताबडतोब त्यावर विश्वास ठेवायचा. पण त्या बातमीचा खुलासा मात्र वाचायचा नाही, ऐकायचा नाही. सन्माननीय सदस्यांना मी बोललो तेवढेच ऐकायची कला चांगल्याप्रकारे प्राप्त झाली आहे. मी दुसऱ्या दिवशी केलेला खुलासा वाचला असता तर पहिलाच मुद्दा उपस्थित केला असता, दुसरा मुद्दा उपस्थित केला नसता. श्री.मैनुद्दीन बागवान यांचा उल्लेख केल्यानंतर दंगल राष्ट्रवादीने घडविली अशा मोठमोठया बातम्या आल्या. दोन दिवसांनी मी सांगलीच्या दौऱ्यावर गेलो असता पत्रकारांनी मला थेट प्रश्न विचारला की, बागवान यांना अटक झाली का? ही दंगल राष्ट्रवादीने घडविली का? किती लोकांना अटक केली? त्याची आकडेवारी पाहिली तर 1082 वेगवेगळया जातीचे, वेगवेगळ्या धर्माचे आहेत......

नंतर 3एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

अशा लोकांना पोलिसांनी आतापर्यंत अटक केली आहे. आपला प्रश्न आणि महत्वाचा ठराव दाखल झाल्यानंतर मी ताबडतोब याच्याशी संबंधी आकडेवारी काढण्यास सांगितले. ही आकडेवारी म्हणजे स्कोअर आहे असे मी मानत नाही. ती लांबून आपल्याला दाखवितो. आणखी नावे दाखविण्याची आवश्यकता नाही. कारण बऱ्याच लोकांना यामध्ये अटक झालेली आहे. यातील सर्वात मोठा व एक नंबरचा रकाना हा शिवसेनेसाठी सोडलेला आहे. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तसेच सनातन प्रभातचे कार्यकर्ते सुध्दा यात दोषी आढळून आले आहेत. मनसे हा पक्ष नवीन असला तरी तोही त्यात पाठीमागे राहिला नाही. काँग्रेस पक्षासाठी चौथा व पाचवा रकाना आहे. त्यात त्या पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते आढळून आले आहेत. त्यानंतर शिव प्रतिष्ठान, जनसुराज्य आणि राष्ट्रवादी पक्षाचा एक-एक कार्यकर्ता आढळून आला आहे. एकूणच एखाद्या पक्षाचा कार्यकर्ता यात आढळून आला असला तरी ती त्या पक्षाची भूमिका असेल अथवा त्या पक्षाचा त्या भूमिकेला पाठिंबा असेल असे मानणे हे चुकीचे आहे. शिवसेनेचा एखादा गावातील कार्यकर्ता असेल आणि त्याने अशी चूक केली तर त्याचा संबंध थेट माननीय बाळासाहेब ठाकरे अथवा माननीय श्री. दिवाकर रावते यांच्याशी जोडणे हे त्यांच्यावर पूर्णपणे अन्याय करणारे आहे आणि असा अन्याय आपल्या राज्यात होता कामा नये म्हणून पक्षातील कार्यकर्ते दोषी असतील, एखाद्याने चूक केली म्हणून पूर्ण संघटनाच दोषी आहे असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे.

मी एवढेच म्हटले होते की, या दंगलीमध्ये सर्वच पक्षाचे राजकीय कार्यकर्ते असल्याचे आढळून आले आहेत. त्यामुळे कुठल्याही एका पक्षाने अथवा कुठल्याही एका नेत्याने दंगल घडविली अशी परिस्थिती नाही. शेवटी तर अत्यंत वाईट परिस्थिती आढळून आली आणि सूतावरुन स्वर्ग गाठणार नाही त्याला विरोधक कसे म्हणणार ? यामध्ये मोठे मासे कोण आणि छोटे मासे कोण अशी भाषाही शेवटी सुरु झाली. पण मी आपल्याला समोर ठेवून आणि सगळ्यांसाठी उत्तर देतो, कोणालाही बघून उत्तर देत नाही. मी इतकेच सांगू इच्छितो की, आतापर्यंत झालेल्या सर्व दंगलींची माहिती घेतल्यानंतर या दंगलीत जे जे प्रमुख होते त्यांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हात असल्याचे आढळून आले आणि ते सर्व पकडलेले आहेत. त्यामध्ये हे छोटे मासे आहेत आणि मोठे मासे कुठेतरी समुद्रात फिरत आहेत असे म्हणत असाल तर दंगलीसारख्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

संवेदनक्षम बाबीकडे कुठल्याही प्रकारचे राजकारण आणण्याची गरज नाही. जेथे गोरगरीब माणसांचे प्रपंच जळून खाक झाले त्यांच्यावर कोणी आपल्या राजकीय पोळ्या भाजण्याची आवश्यकता नाही. काही जणांनी माझ्या आणि माननीय मंत्री श्री. जयंत पाटील यांच्यामधील संघर्षाच्याही वावड्या उठवायला सुरुवात केली. परंतु मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की,माझे 25 वर्षाचे राजकीय जीवन राज्यासमोर आणि 35 वर्षाचे सांगली जिल्ह्यासमोर आहे. मी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणाने पक्षात किंवा पक्षाबाहेर कधीही गटबाजी केलेली नाही त्यामुळे कोणी आमच्यात लावून देण्याचा प्रयत्न करतो म्हटले तरी लागणार नाही. मी पक्षाचा अध्यक्ष होतो तेव्हा जयंत पाटील बहुतांश वेळ सांगली मध्ये आणि फार थोडा वेळ मुंबईत असायचे. तेव्हा सांगलीमध्ये दंगल शमविताना कुठल्याही एका कार्यक्षम गृहमंत्र्यांनी जी भूमिका बजवायला पाहिजे, त्यात कुठलाही कसूर झालेला नव्हता तर अत्यंत कार्यक्षमपणाने दंगल शमविण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी कोणाला तरी डोळ्यासमोर ठेवून बदनाम करण्याचा प्रयत्न कोणी करता उपयोगाचे नाही. प्रश्न राहिला कृष्ण प्रकाश यांनी जाताना जे स्टेटमेंट केले त्याबाबत आय.जी. कडून मी थोडी माहिती घेतली असता त्यांनी यासंदर्भात प्रेस वगैरे घेतली नव्हती असे रिपोर्टिंग मला मिळाले. तरी सुध्दा त्यांनी स्टेटमेंट का केले याबाबतीत काही भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. अलिकडच्या काळात ही गोष्ट कबूल केली पाहिजे की, तपास चालू असताना सुध्दा काही हिरोगिरी करण्याचा प्रयत्न काही ठिकाणी झाला हे मला नाकबूल करुन चालणार नाही....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ KTG/ जुन्नरे.... 17:50

श्री.आर.आर.पाटील...

केंद्रीय गृह सचिवांनीसुद्धा महाराष्ट्र पोलिसांनी कमी बोलावे अशा प्रकारच्या सूचना केल्या आहेत. त्यानंतर आम्ही आता दोन परिपत्रके काढली आहेत. महाराष्ट्रामध्ये ज्या घटनेचा तपास सुरू आहे, ज्याची चौकशी सुरू आहे अशा कोणत्याही बाबीसंबंधी कोणीही वक्तव्य करता उपयोगी नाही. जर कोणी वक्तव्य केले तर सेवा शर्तीचा भंग केल्याचा आरोप ठेवून कारवाई करण्याची भूमिका शासन स्वीकारील असा देखील उल्लेख करण्यात आला आहे. त्याचे काटेकोरपणे पालन देखील करू. हे स्टेटमेंट का केले आहे ? यासंबंधी ACS Home मला निश्चितपणाने अहवाल देतील. त्यात जर चुकीचे काही असेल तर परिणाम भोगावे लागतील.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मी काही अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्यासंबंधीच्या भावना व्यक्त केल्या. आपण सदनामध्ये बघतो, बातम्या आल्यानंतर, माहिती कळल्यानंतर आपण आपली एक बाजू सदस्य सदनात मांडत असतात. पण प्रशासन म्हणून दुसरीही बाजू असते आणि त्यांचेही ऐकून घेऊन गृह मंत्र्याला आपले काम करावे लागते. याचा अर्थ स्पष्ट आहे. महाराष्ट्रामध्ये अधिकाऱ्यांना थोडासा पाठिंबा देत त्यांचे मॉरल कुठे खचणार नाही, हे मला पहावे लागते. त्यांच्याकडून काम करून घेणे हे माझे कर्तव्य आहे. पण चुकीला पाठीशी घालण्याची भूमिका मी कधीच स्वीकारली नाही. मी विनम्रपणे सदनाच्या लक्षात आणून देईन की, महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त निलंबनाची कारवाई आणि नोकरीत काढून टाकण्याचे प्रकार मी मजबूतीने करून दाखविले आहेत. त्यामुळे कुणालाही पाठीशी घालण्याची भूमिका मी कधीही स्वीकारली नाही आणि भविष्यात देखील ती मला स्वीकारता येणार नाही. पोलीस अधिकाऱ्यांवर राजकीय लोकांनी आरोप करण्याचे थांबविले पाहिजे. राजकारणामध्ये काही आरोप करायचे असतील ते राजकीय नेत्यावर करावे. अधिकारी उत्तर देऊ शकत नाही. त्यांच्यावर एकतर्फी आरोप करायला लागलो तर प्रशासनाचे सुद्धा खच्चीकरण होईल. प्रशासनाचे खच्चीकरण करण्याचे पाप करता कामा नये. तसेही कुणी केले तर कायद्याप्रमाणे जे करणे शक्य आहे ते विभागामार्फत करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

हाच प्रश्न आपण उद्याही विचारणार आहात. त्याचेही उत्तर कुठे तरी देणे आवश्यक आहे.

अकोला, जिल्हा नगर येथे एक घटना घडली. त्या घटनेचा या चर्चेशी श्री.रावते साहेबांनी संबंध जोडून भाष्य केले. मी विनम्रपणे एवढेच सांगेन की, ती घटना आपण स्वत: जाऊन बघणे आवश्यक आहे. ते बघितल्यावर आपल्या सर्व लक्षात येईल. एका ठिकाणी जुगार चालू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. स्थानिक पोलिसांनी 6 जणांना अटक केली. अटक करून पोलीस ठाण्यामध्ये आणले होते. कागदपत्र तयार करण्याचे काम पोलीस करीत होते. एवढ्यात शाखाप्रमुख श्री.धुमाळ तेथे पोहचले. त्यांनी त्याचा जाब विचारला आणि सरळ त्यांनी त्या आरोपींना धरले आणि तुम्ही येथून जा असे सांगू लागले. त्या आरोपीनां पोलीस ठाण्यामधून घालवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. राजकीय कार्यकर्ते म्हणून माहिती मागण्याचा आपल्याला जरूर अधिकार आहे. पण पोलीस ठाण्यामध्ये अटक करून ठेवलेले आरोपी आपण जाऊन सोडायला लागलो तर कायदा व सुव्यवस्था राहील का ? पोलिसांचे, न्यायालयाचे अधिकार आपण शाबूत ठेवले पाहिजेत. स्वत: जाऊन बसवलेले आरोपी सोडून द्यायला लागलो तर मग पोलिसांचा नाईलाज होतो. तरी देखील पोलिसांनी समजूतदारपणाने घेतले. आपण जे कृत्य करीत आहात ते बरोबर नाही असे सांगून अटकाव करण्याचा प्रयत्न केला. श्री.तायडे नावाच्या पोलीस निरीक्षकाचा संपूर्ण शर्ट फाटला गेला. सहा पोलीस जखमी झाले आहेत. पोलीस ठाणे आणि तहसीलदार कार्यालयावर दगडफेक झाली आहे. एवढेच नाही तर पोलिसांचे एक वाहन तोडले आहे, तर दुसरे वाहन पेटविले आहे. एवढे सगळे घडल्यानंतर सुद्धा पोलिसांनी हवेमध्ये गोळीबार केला आहे. दीडशे मीटरवर एक मृत व्यक्ती आढळली आहे. ज्या ठिकाणी गोळीबार झाला त्या ठिकाणाहून रिव्हॉल्व्हरच्या गोळ्या तेथ पर्यंत पोहचू शकत नाही. त्याच्या मृत्यूचे कारण डोक्यावर जबरी मार हे आहे. तो शिवसेनचा कार्यकर्ता नव्हता. आरपीआयचा कार्यकर्ता आहे. हा पोलिसांच्या लाठीहल्ल्यामध्ये, गोळीबारामध्ये मृत्यू झाला की कोणी मारले आहे याचा तपास करण्याची आवश्यकता आहे. जरूर तो तपास केला जाईल आणि ते ही सत्य न्यायालयासमोर आणले जाईल. एका बाजूने एवढे गुन्हे नोंद झाल्यानंतर, सरकारी दवाखान्यामध्ये ॲडमिट करण्याची आवश्यकता नाही म्हटल्यावर, ज्यांनी पोलीस ठाण्यावर हल्ला केला .......

यानंतर श्री.अजित....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील..

पोलिसांनी अटक करु नये म्हणून ते आरोपी खाजगी दवाखान्यात जाऊन ॲडमिट झाले आणि पहाटे त्यांनी तेथून पोबारा केलेला आहे. जे आरोपी पळून जाऊ शकतात ते हॉस्पीटलमध्ये ॲडमिट का झाले ? पोलीस चुकले तर त्यांच्यावर जरुर टीका केली पाहिजे. परंतु कायदा हातात घेऊन पोलीस स्टेशनवर दगडफेक करायची, पोलिसांना जखमी करायचे व त्यांची वाहने पेटावावयाची अशा पध्दतीचे गुंडाराज महाराष्ट्रामध्ये कोणीच चालवू देता उपयोगाचे नाही. राज्य कायद्याचे असले पाहिजे. जे चुकतील त्यांना कायद्याने अद्दल घडविण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे. चुकणारा विरोधक असेल तर कठोर कारवाई करायची आणि चुकणारा आपला असेल तर चुकणारे पोलीस होते अशापध्दतीची भूमिका घेणे योग्य नाही. या घटनेच्या माध्यमातून एकच सांगू इच्छितो की, पोलिसांवर अशापध्दतीने हल्ले व्हावयास लागले तर पोलीस असे हल्ले् सहन करणार नाहीत. कुणाचा मार खाण्यासाठी पोलिसांनी अंगावर वर्दी घातलेली नाही. तेव्हा अशा पध्दतीने धमकाविण्याचा प्रयत्न होता कामा नये. कार्यकर्ते एका विशिष्ट राजकीय पक्षाचे आहेत म्हणून पोलीस त्यांना नामोहरम करीत आहेत अशा पध्दतीची भूमिका घेतली जाऊ नये. पोलीस नि:पक्षपातीपणे काम करतील या गोष्टीची मी ग्वाही देतो.

सांगली-मिरज दंगलीमधील सर्व आरोपी पकडलेले आहेत. त्यामुळे सूतावरुन स्वर्गात जाण्याचा प्रयोग कोणी करु नये. अन्यथा बाप दाखव नाहीतर श्राध्द कर अशापध्दतीची भूमिका घ्यावी लागेल. जे कोणावर आरोप करीत आहे त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून आपण जे आरोप केलेले आहेत त्याचे पुरावे द्यावेत असे पोलिसांना स्पष्टपणे सांगावे लागेल. तेव्हा या दंगलीचा कोणी राजकीय लाभ घेऊ नये. गायींच्या कत्तल प्रकरणी पोलिसांनी अत्यंत चांगलेपणे काम केलेले आहे. विरोधी पक्षाकडून उपस्थित असलेल्या सर्व प्रश्नाची उत्तरे मी दिलेली आहेत तेव्हा ही अल्पकालीन चर्चा येथे थांबवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माजी खासदार व हिंद केसरी मारुती माने यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत देण्याबाबत**

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, माजी खासदार व हिंद केसरी मारुती माने यांच्यावर मिरज येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून त्यांच्या वैद्यकीय उपचारासाठी पाच लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यास माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी मान्यता दिलेली आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा अरबी समुद्रात उभारण्याबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा अरबी समुद्रात उभारण्याबाबतचे निवेदन आपण आज सभागृहात करण्यास सांगितले होते. आता संध्याकाळचे सहा वाजत आहेत. परंतु सरकारकडून अजून पर्यंत निवेदन करण्यात आलेले नाही. यासंबधीचे निवेदन सभागृहात आज होणार आहे की नाही ?

**उपसभापती** : शासनाच्या वतीने निवेदन केव्हा करण्यात येईल ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे निवेदन आज करण्याबाबत आपण निदेश दिले होते. उद्या अधिवेशन संपणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत समोरच्या बाकावरुन इतके नैराश्याचे वातावरण असावे हे बरोबर नाही...

**उपसभापती** : सभागृहाचे आजचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन करण्यात यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील निवेदन उद्या करण्यात येईल.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महिलांवरील अत्याचार रोखण्यासबंधात प्रचलित कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी समिती स्थापन करणे

**मु.शी.**: महिलांवरील अत्याचार रोखण्यासबंधात प्रचलित कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी समिती स्थापन करणे या संबंधी माननीय गृह मंत्र्यांचे निवेदन

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

महिलावंरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असून त्या अनुषंगाने न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याचे प्रमाण तसेच यातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा होण्याचे प्रमाण देखील कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत विधिमंडळात माननीय लोकप्रतिनिधींनी सध्या अस्तित्वात असलेल्या कायदेशीर तरतूद / शिक्षा अजून कठोर करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

त्यानुसार महिलांवरील अत्याचार रोखण्याच्या संदर्भात करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी माननीय न्यायमूर्ती (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सध्याच्या कायद्यातील तरतुदी, न्यायालयीन प्रकरणे, पोलीस यंत्रणेने करावयाची कामे इत्यादी बाबीवर सुधारणा सुचविण्यासाठी एक समिती गठीत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे . माननीय निवृत्त न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली असून या समितीमध्ये माननीय न्यायमूर्ती श्री. भास्कर शेटये (निवृत्त), अध्यक्षा, राज्य महिला आयोग, डॉ.नीलम गो-हे, विधान परिषद सदस्या, ॲड. उषाताई दराडे, विधान परिषद सदस्या , श्रीमती प्रणिती शिंदे, विधान सभा सदस्या,श्रीमती पंकजा मुंडे - पालवे,विधान सभा सदस्या, अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, प्रधान सचिव (अ. व सु.) गृह विभाग, प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, श्रीमती मीरा बोरवणकर, विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक (म.अ.प्र.क), श्रीमती रश्मी करंदीकर, सहाय्यक पोलीस आयुक्त,श्री.विजय राघवन,प्रयास स्वयंसेवी संस्था, श्रीमती राणी बंग, श्रीमती प्रतिभा जोशी, पत्रकार, प्रा.सौ.साधना झाडबुके, सामाजिक कार्यकर्त्या, कोल्हापूर ,ॲड.ललिता पाटील,जळगाव, आणि श्रीमती अलका आवडसकर, सामाजिक कार्यकर्त्या इत्यादी 20 व्यक्तींची समिती शासनाने गठीत केली आहे. या समितीचे कामकाज लवकरच सुरु होईल आणि महिलांवरील अत्याचार रोखण्याच्या संदर्भात या समितीकडून सरकारला ज्या शिफारशी प्राप्त होतील त्या शिफारशी शक्यतो पुढच्या अधिवेशनामध्ये दोन्ही सदनासमोर सादर करण्यात येतील आणि त्या अनुषंगाने कायद्यामध्ये ज्या ठिकाणी बदल करण्याची आवश्यकता आहे तशा प्रकारचे बदल प्रस्तावित केले जातील.

---

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## वि.स.वि.क्रमांक 41 संबंधी

**उपसभापती** : यानंतर वि.स.वि.क्रमांक 41 चर्चेला घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, 41 नंबरचे विधेयक न घेता विधेयक क्रमांक 60 घेण्यात यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, 41 नंबरच्या विधेयकावरील चर्चा ऑन लेग आहे.

श्री.दिवाकर रावते : तसे नाही. आता विधेयक क्रमांक 60 घेण्यात यावे

**उपसभापती** : ठीक आहे. आता विधेयक क्रमांक 60 चर्चेला घेण्यात येईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

पृ.शी. : मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा ) विधेयक

L. A. BILL NO. LX OF 2010

A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 60 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 60 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ,1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,या विधेयकाच्या संदर्भात माझी एक शंका आहे त्याबाबतीत माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्याच्या आत संबंधित व्यक्तीला जात वैधता प्रमाणपत्र सादर करता येणार आहे या बाबतीत मला माननीय मंत्रीमहोदयांना एक महत्वाचा प्रश्न विचारावयाचा आहे की, आज सगळयाच पक्षातील लोकांमध्ये अशी प्रवृत्ती दिसून येते की, आपण अमुक एका जातीचे आहोत म्हणून निवडणुकीसाठी उभे रहावे परंतु चार महिन्यानंतर त्याच्याकडील जात प्रमाणपत्र जर वैध ठरले नाही तर पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात त्यातून निवडणुकीच्या खर्चाचा बोजा शासनावर पडतो तसेच पुन्हा मतदारांचा प्रश्न निर्माण होतो इतकेच नव्हे तर जो खरोखर त्या समाजाचा आहे त्या व्यक्तीवरही अन्याय होत असतो तेव्हा असे होऊ नये म्हणून शासनाने कोणता तोडगा काढला आहे.?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय,जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या संदर्भात आपण आता अट टाकली आहे. या पूर्वी असे घडत असे की, कोणतीही व्यक्ती जातीचे सर्टिफिकेट आणत असे, ते सर्टिफिकेट सादर करीत असे व त्यानंतर त्या सर्टिफिकेटच्या बाबतीत दुसरी

4..



श्री.रणजित कांबळे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्ती तक्रार करावयाची आणि त्याची तक्रार योग्य आहे असे सिध्द झाल्यानंतर पुन्हा फेर निवडणूक व्हावयाची त्यामुळे शासनावर निवडणुकीच्या खर्चाचा बोजा पडावयाचा त्याचबरोबर त्या पदापासून कोणी तरी व्यक्ती वंचित रहावयाची. त्यामुळे आता अशा प्रकारची अट घालण्यात आली आहे . संबंधित व्यक्तीने जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असले पाहिजे असे कोर्टाने सांगितल्यामुळे आता आपण अशी अट घातली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

तसेच, साडे बाराशे ग्रामपंचायतीच्या निवडणुका एकाच वेळी आल्या होत्या. तसेच, इयत्ता अकरावी व बारावीच्या परिक्षादेखील एकाच वेळी आल्या होत्या. त्याचवेळी 1 लाख 40 हजार उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. ही सर्व प्रक्रिया चार महिन्याच्या आत पूर्ण करावयाची होती. त्यामुळे निवडणुकीला उभे रहाण्यासाठी व्हॅलिडिटी सर्टिफिकेट बंधनकारक होते. याठिकाणी कास्ट सर्टिफिकेट हा वेगळा भाग आहे. कास्ट सर्टिफिकेट समितीपुढे ठेवून ते व्हॅलिड करुन घेणे बंधनकारक आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 60 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 60 संमत झाले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LIII OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY ENTERTAINMENTS DUTY ACT, 1923.)

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 53 मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

सभापती महोदय, मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1923 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक याठिकाणी आणले आहे. त्यामध्ये प्राधान्याने केबल दूरचित्रवाणी व थेट घरपोच प्रसारण सेवा याव्दारे घरगुती करमणुकीकरिता इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीचा नवीन पर्याय मार्केटमध्ये आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक वापरकर्त्यांकडून मिळणाऱ्या महसूलामध्ये वाढ व्हावी म्हणून दूरध्वनी सेवा पुरवठाकार, दूरध्वनी जाळयामार्फत मूलभूत दूरध्वनी, इंटरनेट आणि व्हिडिओ यांसारख्या तीन प्रकारच्या सेवा पुरवितात. भविष्यात, या सेवांच्या माध्यमातून राज्य शासनाला उत्पन्न मिळाले पाहिजे यासाठी आपण संबंधित अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने उक्त अधिनियमाच्या कलम 3 पोट कलम (11) च्या तरतुदीनुसार, नृत्य बारवर करमणूक शुल्क बसविण्यात आले आहे. ऑगस्ट 2005 पासून नृत्य बार बंद करण्यात आले.त्यामुळे आता बार मालक ग्राहकांच्या मनोरंजनासाठी प्रत्यक्ष वाद्यवृंदांच्या कार्यक्रमाची सुविधा उपलब्ध करुन देत असतात.त्यामध्ये पुरविण्यात येणारी सर्व प्रकारची मद्ये, वाईन व पेये यांच्यावर अवाजवी कर आकारीत असतात. आणि म्हणून राज्याच्या महसूलात वाढ होण्यासाठी प्रत्यक्ष वाद्यवृंदाचा कार्यक्रम असलेल्या अशा परमिट रुम किंवा बिअर बारवर करमणूक शुल्क बसविण्यासाठी या पोट नियमामध्ये सुधारणा सुचविली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.प्रकाश साळंके....

त्याचप्रमाणे् उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या पोट कलम (17) मध्ये डिस्कोथेकवर करमणूक शुल्क बसविण्यात आले आहे. सद्या पंच तारांकित हॉटेल व पब सारख्या ठिकाणी सर्व प्रकारची मद्ये, वाईन व पेये यांच्यासह मनोरंजनासाठी डिजे संगीत,पाश्चिमात्य संगीत आणि आवश्यक ती प्रकाश योजना उपलब्ध केली जाते. अशाप्रकारे पबमध्ये पुरविण्यात आलेल्या करमणूक सुविधेवर शुल्क बसविण्यासाठी या अधिनियिमात तरतूद केली आहे. या सर्व तरतुदींमुळे राज्याच्या उत्पन्नामध्ये 9 ते 10 कोटी रुपयांची वाढ होईल.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकाश सोळंके....

या तरतुदीमुळे या राज्याचे उत्पन्न दर वर्षी साधारणत: 9 ते 10 कोटी रुपये वाढेल अशा प्रकारचा या विभागाचा अंदाज आहे.म्हणून ज्या सेवा पुरविल्या जाणार आहेत त्या बाबतच्या या सुधारणा विधेयकाला सभागृहाने मान्यता द्यावी अशा प्रकारची विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय,महाराष्ट्र विधानसभेत आणि विधानपरिषदेमध्ये जे विधेयक मांडण्यात येते ते मराठी भाषेतच मांडले पाहिजे. मराठी भाषेच्या बाबतीत काही अडचण असेल आणि समजण्याकरिता त्या शब्दाचे काही स्पष्टीकरण पाहिजे असेल तर कंसामध्ये इंग्रजी शब्द लिहिले पाहिजेत. शासनाने उत्कृष्ट पाचचा जो आदेश काढला त्यामध्ये बेस्ट ऑफ फाईव्ह हे कंसात टाकण्यात आले होते. त्यामुळे लोकांमध्ये तोच शब्द प्रचलित झाला. ते कंसात टाकले नसते तर उत्कृष्ट पाच हाच शब्द वर्तमानपत्रातून आणि सगळीकडे वापरला गेला असता. माननीय मंत्रिमहोदय, सर्व माध्यमांसमोर बेस्ट ऑफ फाईव्ह असे म्हणत होते त्यामुळे बेस्ट ऑफ फाईव्ह हा शब्द प्रचलित झाला. खरे म्हणजे आदेशामध्ये उत्कृष्ट पाच ( बेस्ट ऑफ फाईव्ह) असे म्हटले आहे. तसे येथे केले असते तर चालले असते.

सभापती महोदय, या विधेयकाच्या खंड एकमध्ये असे म्हटले आहे की, "इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणी" शासनानेच हा इंग्रजी शब्द वापरल्यामुळे तो या कायद्यामध्ये कायम झाला. यासाठी मराठी शब्द वापरुन कंसामध्ये इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणी असा शब्द वापरला असता तर ते जमले नसते काय? या विधेयकात प्रत्येक ठिकाणी इंग्रजी शब्दांचा वापर करण्यात आलेला आहे. "नृत्य-बार" 'बार' या शब्दासाठी मराठी शब्द नाही काय? 'बार' या शब्दासाठी मधुशाला, मद्यालय, मदिरागृह असे शब्द सुचवता आले असते. मराठीमध्ये हे चांगले शब्द असताना इंग्रजी शब्दांचा वापर कशासाठी करण्यात येतो? सभापती महोदय, हे विधेयक अगोदर आले असते तर मी या विधेयकाला उप सूचना दिल्या असत्या. तसेच यामध्ये, "केबल दूरचित्रवाणी" असे म्हटले आहे. दूरचित्रवाणी म्हणजेच 'केबल.' मग "केबल दूरचित्रवाणी" म्हणजे काय समजायचे? केबललाच दूरचित्रवाणी असे म्हणतो असे असताना 'केबल' हा शब्द कशासाठी वापरण्यात आला?

सभापती महोदय, कायद्याच्या बाबतीत अशा प्रकारचे धेडगुजरी काम करायचे आणि असे कायदे आम्ही या सभागृहात मंजूर करायचे काय? मराठी भाषेच्या संदर्भात या सदनामध्ये साडेसहा तास चर्चा झालेली आहे त्याला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. या महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात राज्य भाषा मराठी कशी असावी याबाबतचे धोरण ठरविण्यात येत आहे. असे असताना या ठिकाणी आलेले विधेयक शुध्द मराठीतून देता येत नसेल तर शासन मराठीच्या बाबतीत कुठले धोरण तयार करणार आहे? गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी मोठा गहन प्रश्न या ठिकाणी निर्माण केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

यामध्ये डिस्को थेकवर करमणूक शुल्क बसविण्यात आला आहे म्हणजे कशावर बसविला आहे ?

श्री.प्रकाश साळुंके : ती तरतूद कायद्यामध्ये आहे. सध्या पब वर कर नाही म्हणून या दुरुस्तीद्वारे पब वर कर लावण्यात येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. पब वर कर लावण्यात येणार आहे. म्हणजे नक्की कशावर लावणार आहे ? पेयावर कर लावला, मद्यावर, वाईनवर कर लावला. का ? कारण ते अवाजवी दर आकारतात म्हणून ते समजू शकतो. परंतु डिस्कोथेक म्हणजे काय, तेथे कसा अंग विक्षेप केला की किती कर लागणार ते समजले नाही. या विधेयकात डिजे संगीताचा उल्लेख आहे. डिजे संगीताची व्याख्या नमूद केलेली नाही. ते आम्हाला सांगावे. प्रत्येक गोष्टीची विधेयकात व्याख्या असते. पाश्चिमात्य संगीत कळले. "आवश्यक ती प्रकाश योजना देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे. पब मध्ये पुरविण्यात आलेल्या करमणूक सुविधेवर शुल्क बसविण्याकरिता उक्त अधिनियमात कोणतीही तरतूद नाही म्हणून करवाढ सुचविली आहे." शासनाने हा कर किती लावला आहे ते विचारलेले नाही, त्याच्या खोलात मी जात नाही. यासाठी शासनाने 25 हजार, 50 हजार, 1 लाख रुपये कर लावला आहे. परंतु माननीय गृहमंत्री आबा यांनी राज्याला 20 ते 25 कोटींना खड्डयात घातले आहे ते माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे, मी ज्या काही शंका उपस्थित केलेल्या आहेत त्याचे उत्तराच्या भाषणातून निरसन करण्यात यावे अशी मागणी करतो आणि माझे वक्तव्य येथेच थांबवितो. धन्यवाद.

------

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2......

NTK/ MMP/ SBT/

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 यात आणखी सुधारणा करण्यासाठी वि.स.वि.क्रमांक 53 सभागृहासमोर आलेले आहे. या विधेयकावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे नमूद केले आहे की, "काही दूरध्वनी सेवा पुरवठाकारांनी इंटरनेट प्रोटोकॉल तंत्रज्ञानाच्या आधारे, इंटरनेटमार्फत दूरचित्रवाणी सेवा अलिकडेच सुरु केल्या आहेत." इंटरनेटवरुन दूरचित्रवाणीवर जी सोय उपलब्ध होणार आहे त्यासाठी हे विधेयक आलेले आहे. केबल, डीटीएच आणि इंटरनेट प्रोटोकॉल सर्व्हिस या तीन माध्यमांद्वारे आपली करमणूक होते. म्हणजे इंटरनेटवर जे जे उपलब्ध असेल ते टी.व्ही.संचावर दाखविले जाणार आहे. इंटरनेटवर काय काय चालते, तेथे कोणत्या सोयी उपलब्ध असतात ते सर्वांना माहीत आहे. त्यामुळे ही सुविधा पुरविताना जे पुरवठाकार आहेत त्यांच्यावर काही निर्बंध घातले जाणार आहेत काय ? नाही तर इंटरनेटवर पोर्नोग्राफी असो किंवा इतर बाकीच्या गोष्टी असतील त्या घराघरापर्यंत पोहोचतील अशी भीती वाटते.

सभापती महोदय, झोपडपट्टीतून केबलचा व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो. इंटरनेटचा वापर करणारे केवळ 2 ते 5 टक्के ग्राहक आहेत. परंतु मुंबईत जेवढया झोपडपट्टया आहेत तेथे केबलचे ग्राहक आहेत. डीटीएचचे ग्राहक साधारणपणे 20 ते 25 टक्के आहेत. बाकी 75 टक्के लोकांकडे अगदी मोठमोठया लोकांकडेही केबल सर्व्हिस आहे. जी गोष्ट गरिबांकडे आहे त्याच्यावर जास्त टॅक्स आहे. केबलसाठी 45 रुपये टॅक्स आहे, डीटीएचसाठी 35 रुपये टॅक्स आहे. या सर्व्हिस प्रोव्हायडरसाठी किती टॅक्स लावला जाणार आहे ? जी गोष्ट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचते ती गोष्ट स्वस्त पाहिजे असे माझे मत आहे. कारण लाखो लोक केबलद्वारे टी.व्ही.पाहतात. केबलवाले किती कमवितात हा प्रश्न वेगळा आहे. इंटरनेट प्रोटोकॉल नवीन पर्याय असला तरी त्याच्यावर काळजीपूर्वक नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

(डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, यासाठी आपण वेगळे जाळे तयार करणार आहात काय ? आज प्रत्येक बिल्डिंगमधील माणसांकडे कुणाकडे डीटूएचची केबल असते, कुणाकडे इंटरनेटची केबल असते. यांची जोडणी कशा प्रकार होणार आहे हे सर्वसामान्यांना माहीत नाही. इंटरनेट प्रोटोकॉलला दूर चित्रवाणी हा उत्तम पर्याय होऊ शकतो. परंतु सर्वसामान्य माणसाला तो किती रुपयात परवडेल हा देखील प्रश्न आहे. या करामुळे महसुलात वाढ होईल असे म्हटलेले आहे. परंतु या करामध्ये सर्वसामान्यांना इंटरनेट फॅसिलिटी घेणे परवडणार आहे काय ? आपण असेही म्हटलेले आहे की, करमणूक शुल्कामध्ये रुपये 15 ते 20 कोटी रुपयाचे नुकसान झालेले आहे. मग हे झालेले नुकसान वसूल करण्यासाठी आपण हा कर लावीत आहात काय असा अर्थ यामधून ध्वनित होतो.

सभापती महोदय, लेडिज बार बंद झाले असे येथे सांगण्यात येते. हे बार शंभर टक्के बंद झाले की 50 टक्के बंद झाले हा वादाचा मुद्दा असल्यामुळे मी त्यामध्ये शिरु इच्छित नाही. नुकसान होत असले तरी समाजाच्या हिताच्या दृष्टीने ते नुकसान राज्य शासनाने सोसले पाहिजे. बारमालक ग्राहकांच्या मनोरंजनासाठी प्रत्यक्ष वाद्यवृंदाच्या कार्यक्रमाची सुविधा उपलब्ध करुन देत आहेत. उक्त सुविधेसाठी बार मालक त्यामध्ये पुरविण्यात येणा-या सर्व प्रकारची मद्ये, वाईन व पेये यांच्यावर अवाजवी दर आकारत आहेत. म्हणून, राज्याच्या महसुलात वाढ होण्यासाठी हा कर आकारण्यात येत आहे.

सभापती महोदय, जे ऑर्केस्ट्रा बार आहेत ते ऑर्केस्ट्राच्या नावाखाली रात्री तीन-तीन वाजेपर्यन्त चालू असतात. ऑकेस्ट्रा हा फक्त दाखविण्यासाठी असतो. तेथे प्रत्यक्षात काय काय चाललेले असते हे आपणा सर्वांना माहीत आहे. वाद्यसंगीत तेथे नसते. प्रत्येक रस्त्याच्या एका टोकाला अशा प्रकारचा ऑर्केस्ट्रा बार असतो.

सभापती महोदय, डिस्कोथेकवर करमणूक कर बसविला हे चांगले झाले. या डिस्कोथेक आणि पब मधून अंमली पदार्थांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. हा अमली पदार्थांचा वापर कशा प्रकारे होतो, हेरॉईन कोठून येते हे आपणास माहीत आहे. अनेक प्रकारचे अंमली पदार्थ पेयातून मिसळून दिले जातात. पंचतारांकित हॉटेलमधील पब वर 2 लाख रुपये आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये असलेल्या पब व्यतिरिक्त इतर जागांमधील पब वर 1 लाख रुपये कर बसविण्यात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...

आलेला आहे. माझे तर मत असे आहे की, अशा पब वर यापेक्षाही अधिक कर बसवायला पाहिजे. कारण मुंबईतील नाईट-लाईफ तरुण एन्जॉय करताना दिसतात. ही बाब समाजाला अतिशय घातक आहे. मरीन ड्राईव्ह येथे एका ट्राफिक पोलिसाला गाडीने उडविले होते. पब मधील मद्यधुंद अवस्थेतील तरुण गाडी चालवत होता. पब मधून बाहेर पडल्यानंतर बेफाम स्पीडने हे तरुण गाड्या चालवतात आणि नाहक दुस-यांचा बळी घेतात. म्हणून अशा पबवर 2 लाखा पेक्षा अधिक कर बसावावा अशी माझी सूचना आहे. सभापती महोदय, इंटरनेट प्रोटोकॉलच्या संदर्भात थोडेसे अधिक स्पष्टीकरण सन्माननीय मंत्री महोदयांनी करावे तसेच जे जे काही मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले गेले त्यांना समर्पक उत्तरे द्यावीत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 53 मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, विधेयकाच्या उद्देश आणि कारणांबाबत विचार करीत असताना या क्षणी नैतिक आणि अनैतिक चर्चेमध्ये मी जाणार नाही. हा विषय आणि नैतिक व अनैतिक चर्चेचा अप्रत्यक्ष संबंध आहे, प्रत्यक्ष संबंध नाही. डिस्कोथेकमध्ये किंवा इंटरनेटद्वारे दूरचित्रवाणीवर प्रक्षेपण होत असताना काही गैरव्यवहार होत असतील तर त्या गोष्टीला शासनच जबाबदार आहे. प्रत्येक ठिकाणी शासनाचा महसूल वाढला पाहिजे यादृष्टीने जे आर्थिक व्यवहार होतात त्याची माहिती आणि नोंद सरकारकडे असणे अशा मर्यादित स्वरुपाचा या विधेयकाचा संबंध आहे. अंदाजे 15 ते 20 कोटी रुपयांचे नुकसान होते त्याबद्दलची सरकारची तळमळ चांगली आहे असे मला वाटते. परंतु प्रश्न असा आहे की, जे लोक या कायद्याला मानणारच नाहीत, कायदा मानू असे सांगून नंतर प्रत्यक्ष दुर्लक्ष करतील अशावेळी सरकार कोणती भूमिका घेणार आहे?

सभापती महोदय, मी आयपीएलच्या संदर्भात तारांकित प्रश्न विचारला होता. आयपीएलला नोटीस दिली गेली. आयपीएलला मुद्रांक शुल्क विभागाने नोटीस दिली आणि करारावरील शुल्क भरण्यास त्यांनी नकार दिला का? असा प्रश्न उपस्थित केला होता. शासनाने उत्तरामध्ये म्हटले होते की, बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, 1958 नुसार या दस्तावर मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. याबाबत पत्रव्यवहार करुनही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. प्रश्न असा आहे की, हे पब आणि डिस्कोथेक यांना अशाच प्रकारची नोटीस पाठविली आणि त्यांना प्रतिसाद दिलाच नाही तर काय करणार आहात? शासनाने म्हटले आहे की, या तरतुदीनुसार न भरलेले मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. शासन ज्यावेळेला एखादा कायदा करते, जो कायदा डिस्कोथेकला लागू केला जातो तोच कायदा आयपीएलला लागू असावा असे मला वाटते. याठिकाणी कायद्यामागून कायदे करणार आणि हे कायदे धाब्यावर बसविले गेले तर त्याबाबत कशा पध्दतीने कठोर कारवाई करणार आहात? याबाबत जोपर्यंत निर्णय घेणार नाही तोपर्यंत या कायद्यातील पळवाटा कशा काढायच्या यासाठी सातत्याने वकिलांची मदत या आस्थापना घेत असतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे........

मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय शहर पूर्वीपासूनच आहे. आता जागतिक स्तरावर मोठया प्रमाणात या शहराचे महत्व वाढत आहे. माझ्या बोलण्याचा अर्थाचा अनर्थ करु नये. सुरक्षितता म्हणजे कुटुंबांना एकत्रपणे रात्रीच्या वेळी जाता येईल, तरुण-तरुणींना जाता येईल अशा प्रकारची सुरक्षित नाईट लाईफ या शहरामध्ये असली पाहिजे. रात्री 11.00 वाजता जी कोणी एकटी महिला निर्मनुष्य ठिकाणी रस्त्यावर दिसून येते ती वेश्या आहे म्हणून तिला ओरबाडणे हे योग्य नाही. परदेशात बँकॉकमध्ये लोक नाईट लाईफची मजा घेत असतात. परंतु तेथे फक्त प्रॉस्टिट्यूशन चालते असे नाही. मी मध्यंतरी कोपनहेगन येथे गेले होते. तेथे मध्यरात्री दोन-तीन वाजता आपल्या लहान मुलांना घेऊन आईवडील कॉफी पिताना, आईसक्रीम खाताना दिसून येतात. एखाद्या भागामध्ये रात्री 2-3 वाजता देखील लोकांना निर्भयपणे जाता येईल असे वातावरण असले पाहिजे. रात्रीच्या वेळी केवळ ड्रग ॲडिक्ट लोकांसमोरच बसावे लागेल असे असता कामा नये. 31 डिसेंबरच्या रात्री जे.डब्ल्यू मॅरियट हॉटेलबाहेर जो प्रकार झाला असे प्रकार होऊ नयेत असे वातावरण या शहरात निर्माण होणार नाही याचा विचार झाला पाहिजे. केवळ गर्दुल्ले, वेश्या आणि क्राईम म्हणजे हिंसाचार करणारे लोक आहेत त्यांच्याकडे अंमली पदार्थाचा साठा आढळून येतो. या शहरात जे विदेशी पर्यटक येतात, दक्षिण आफ्रिका, जपान, चीन या देशामधून पर्यटक येतात त्या पर्यटकांना पंचतारांकित हॉटेलमधील कॉफी शॉपमध्ये गेल्यानंतर रात्री 1.00 वाजता खायला मिळणार नसेल तर त्याचा विचार करणार आहात की नाही? शहरांच्या विकासामध्ये शासनाला या गोष्टीचा विचार करावा लागेल. वाईट संस्कार न होता वेगवेगळे विचार घेऊन येणारे लोक आहेत. चायनीज पदार्थ, महाराष्ट्रीयन पदार्थ खायचे असतील तर त्या संदर्भात काही प्रमाणात लवचिक धोरण ठेवले पाहिजे. मोठया प्रमाणात पंचतारांकित हॉटेलमध्ये मध्यम स्वरुपाच्या सामान्य लोकांची जायचे, तेथे मात्र रात्री 11.00 नंतर बंदी असेल तर उपयोग काय? राजकीय पक्षाच्या लोकांना माहिती आहे. रात्री 11.00 वाजता सभा संपल्यानंतर घरी निघाताना पावभाजी खायला लागेल, नाही तर घरी जाऊन स्वयंपाक करावा लागेल.

नंतर 4एच.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.......

शहराचा विचार करीत असताना फक्त डिस्को थेक आणि पबचा विचार न करता शहरात अशा पध्दतीने सुध्दा विचार केला पाहिजे की, असे अँटी सोशल एलिमेंट्स असतील, समाजकंटक असतील ते सोडून बाकीचे लोक असतील त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ? हे देखील स्पष्ट झाले पाहिजे. कारण प्रत्येकाला असे वाटते की, आम्ही सुध्दा यातून मार्ग काढू शकतो.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी कर लावण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. पण घरात सेट टॉप बॉक्स लावून बसलो तर प्रत्येक घरात तो जसा वापरला जाईल याचा अर्थ पुन्हा सामान्य माणसाला कर लावणार आहात काय किंवा त्याचा वापर करतात म्हणून या गोरगरिबांना कराच्या जाळ्यात ओढणार काय हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रकारे सुधारणा कायद्यात केली तर त्याची अमलबजावणी कशी करणार आहात हे समजत नाही. त्यासाठी नियमावली झाली पाहिजे. त्याचबरोबर जेथे नियमावली होत नाही तेथे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो ही वस्तुस्थिती आहे. एकूणच आज पबमध्ये काय चालते, किती लोक प्रत्यक्षात येतात आणि तेथे किती प्रमाणात दारुच्या बाटल्या खपतात त्यावर प्रत्यक्ष कर किती लागेल हे मोजायला कोण बसणार आहे ? मला काही वेळा असे वाटते की अशा प्रकारे सुधारणा करुन शासन कुठेतरी रंगसफेदी करण्यासाठी काहीतरी माध्यम सुरु करते काय ? की अजूनही काही रक्तरंजित पैशाने एक वादळ तयार केले की काय अशी शंका येते, म्हणून तो मुद्दा उठतो. ते करीत असताना पुढील चार-पाच वर्षात नक्की काय करणार याचाही विचार झाला पाहिजे. ज्याप्रमाणे मुंबईत हा कर लाखोमध्ये असणार तसेच संपूर्ण राज्यात, जिल्ह्याजिल्ह्यातही लाखो असणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते मघाशी विचारत होते की, डिस्को थेक याला मराठीतून काय म्हणतात ? ग्रामीण भागात देखील सांस्कृतिक केंद्रांच्या माध्यमातून तमाशाचे फड उभे राहिले आणि गावागावातील महिला आणि हे फड यांच्यामध्ये संघर्ष चालू आहेत. शिरुर आणि बीड तसेच नगर मध्ये सुध्दा आजही काही गावातील लोक म्हणतात की हे आम्हाला नको त्याच गावातील काही लोकांना असे फड पाहिजे असतात म्हणून महिलांचा त्याला विरोध होत आहे, यासाठी शासन कोणते नियम लावणार आहे ? यासंदर्भात शासनाचे एकत्रित असे धोरण असायला पाहिजे आणि त्या धोरणानुसार अल्पवयीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

मुलांचा समावेश यामध्ये असणार नाही याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. कारण डिस्को थेक आणि पब मध्ये जाणारे लोक यांच्यामध्ये बरेच प्रकार असतात. त्यात मद्यार्क नसणारे पदार्थ एक फॅशन म्हणून पितात. त्यामध्ये असे काहीच नसते, फक्त बाटलीच तशी असते. अशा प्रकारचे फॅड डिस्को थेक व पबमध्ये असते. तसेच अशा पबमध्ये गेलो तर या मॉडर्न लोकांना प्रतिष्ठा मिळते असेच त्यांना वाटते अशा प्रकारे ही संस्कृती या ठिकाणी जाणाऱ्या लोकांच्या डोक्यात घुसते आणि ती कितीही प्रयत्न केला तरी बदलणार नाही. पण अशा पब आणि डिस्को थेकच्या ठिकाणी सुरक्षितता काय आणि कशी असणार याचीही काळजी शासनाने घेतली पाहिजे.

मी पुन्हा आयपीएलकडे येऊ इच्छिते की, नियम धाब्यावर बसवून आयपीएलवर शासनाने कर लावला नाही. असेच प्रकार या डिस्को थेक आणि पबच्या बाबतीत होऊ शकते, ते सुध्दा उद्या आयपीएलप्रमाणेच वागतील, तुम्हाला विचारणारच नाही आणि आपल्या नियमांची अशाच प्रकारे वासलात लावणार. त्यावेळेस शासनाचा कायदा कोठेही शिल्लक राहणार नाही म्हणून आयपीएलबद्दल कठोर कारवाई केली तरच यापुढे निर्माण होणाऱ्या परिस्थितीत बदल होऊ शकतो आणि ते शहाणे होतील व शासनाच्या आदेशाची दखल घेतील., एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

-------

यानंतर श्री. सय्यद जमा यांचे भाषण ....(श्री. तालेवार कडे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा (विधान सभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, 2010 पर मैं अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. मंत्री जी ने बताया कि इस विधेयक के माध्यम से यह अमेंडमेंट इसलिए की जा रही है कि कुछ अनकव्हर्ड सोर्स ऑफ इन्टरटेंनमेंट को टॅक्स के दायरे में सम्मिलित किया जा सके. जो चीज़े टॅक्स के दायरे से छूट गई थी, उनको कवर करने के लिए यह संशोधन किया जा रहा है. किन चीज़ों पर टॅक्स लगाया जाएगा, इसके बारे में भी विधेयक में बताया गया है. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि किसी भी एक्ट में एक इनेबलिंग क्लाज़ होता है, जिसके द्वारा सरकार को टॅक्स तय करने का अधिकार मिलता है. इस विधेयक में टॅक्स की रकम दर्शायी गई है. इसका मतलब यह है कि टॅक्स बढ़ाना है तो अमेंडमेंट करना पड़ेगा. यह ठीक है कि सरकार ने अनकव्हर्ड सोर्स ऑफ इन्टरटेनमेंट को टॅक्स के दायरे में कव्हर किया है. लेकिन समय-समय पर टॅक्स की राशि कम-अधिक करने के अधिकार का प्रावधान इस विधेयक में नहीं किया गया है. इसलिए मंत्री जी से मैं यह जानना चाहता हूं कि टॅक्स को कम-अधिक करने के अधिकार का प्रावधान क्या इस विधेयक में किया जाएगा ? इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

........

यानंतर श्री जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय,या विधेयकावर सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे व सन्माननीय सदस्य श्री. सैय्यद ज़मा यांनी आपले विचार आणि मौलिक सूचना व्यक्त केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकामध्ये इंग्रजी शब्दांचा जास्त वापर केलेला आहे याबाबत आक्षेप घेतला आहे. त्यामुळे पुढील काळात जेव्हा विधेयक येईल त्या विधेयकामध्ये जास्तीत जास्त मराठी शब्दांचा वापर करण्यात येईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. तसेच सन्माननीय सदस्यांनी डिस्कोथेकचा मराठी अर्थ काय आहे अशी विचारणा केली आहे. याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, डिस्कोथेक या शब्दाला आपण मराठीत जास्तीत जास्त संगीतावर करण्यात येणारे नृत्य असे म्हणू शकतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी डीजेचा अर्थ काय होतो अशी विचारणा केली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, डीजेला आपण संगीताची सरमिसळ असे म्हणू शकतो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी करमणूक शुल्क ज्यांनी दिले नाही त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र जमिनीचा महसूल या उपलब्ध असलेल्या कायद्यानुसार महसूल जमा केला जात असतो. करमणूक शुल्काची भरणा न केल्यास संबंधिताला कलम 5 (अ) नुसार 6 महिन्याची कैद व दंड वसूल केला जाईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी इंटरनेटचा वापर करीत असतांना उपलब्ध असलेल्या पोर्नोग्राफीचा उल्लेख केलेला आहे. पोर्नोग्राफीमुळे लहान मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो त्यासाठी बंधने घालण्याची आवश्यकता आहे अशी सूचना केलेली आहे. सदर विषय हा गृहविभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे या बाबतीत काय करता येईल याबाबत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, नृत्य बार, डान्स बार हे सन 2005 पर्यंत अस्तित्वात होते परंतु यासंदर्भात विधानसभा तसेच विधान परिषद सदस्यांनी आक्षेप घेतल्यामुळे त्यावेळचे गृहमंत्री

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके.....

श्री. आर.आर.पाटील यांनी डान्स बारवर सन 2005 पासून बंदी आणण्याचा निर्णय घेतला व हा निर्णय अजूनही सुरु आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने त्यावेळेसचे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी हे विधेयक येथे आणले गेले नाही हे मी येथे मुद्दाम सांगू इच्छितो. परंतु निश्चितपणे नवीन कराच्या माध्यमातून करमणूक शुल्काच्या माध्यमातून महसुलामध्ये भर घालण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सदरचे सुधारणा विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. काही दूरध्वनी सेवा पुरवठाकारांनी इंटरनेट प्रोटोकॉल तंत्रज्ञानाच्या आधारे, इंटरनेटमार्फत दूरचित्रवाणी सेवा अलीकडेच सुरु केल्या आहेत. या सवेमध्ये सेट टॉपअप बॉक्सच्या सहाय्याने इंटरनेट मार्फत दूर चित्रवाणीवर प्रक्षेपणाद्वारे वेगवेगळया वाहिन्या दिसतील. दूरध्वनी कंपनी किंवा त्यासारखे सेवा पुरवठाकार यांनी पुरविलेली दूरध्वनी जोडणी आणि ब्रॉडबँड सेवा असणारा वापरकर्ता अशा सेवेकरिता वर्गणी देऊन विविध दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या सुविधेचा लाभ घेऊ शकेल. केबल दूरचित्रवाणी व थेट घरपोच प्रसारण सेवा यांसारख्या घरगुती करमणुकीकरिता इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीचा नवीन पर्याय उपलब्ध करण्यात आला आहे. प्रत्यक वापरकर्त्यांकडून मिळणा-या महसुलात वाढ व्हावी म्हणून दूरध्वनी सेवा पुरवठाकार, दूरध्वनी जाळयामार्फत मूलभूत दूरध्वनी इंटरनेट आणि व्हिडिओ यांसारख्या तीन प्रकारच्या सेवा पुरवतात. भविष्यात केबल दूरचित्रवाणी हा एक उत्तम पर्याय असू शकेल. म्हणून इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीला मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, 1923 ( 1923 चा मुंबई 1) याच्या तरतुदीखाली आणून त्यावर करमणूक शुल्क बसविण्याचे प्रस्तावित केले आहे. या निमित्ताने मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करु इच्छितो की, या ठिकाणी आपण ज्या मौलिक सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांची भविष्यात निश्चितपणे नोंद घेऊन विचार केला जाईल. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा व आपली रजा घेतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. भारवि...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्या अर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

...........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश

**मु.शी.**: आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासनास आलेले अपयश या विषयावर डॉ.दीपक सावंत वि.प.स. यांचा प्रस्ताव

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"आदिवासी विकास खात्याकडे करोडो रुपयांचा केंद्राचा निधी येऊनही जवळपास 250 कोटी रुपयांचा निधी पडून रहाणे, आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी वह्या पुस्तके, गणवेष, आहार इत्यादींसाठी निधी मिळत असतांनादेखील अनेक आश्रमशाळात या गोष्टींची वानवा असणे, शिक्षकांच्या अनुपस्थितीत अनेक शाळा सुरु असणे, आश्रमशाळातील अनागोंदी कारभाराप्रमाणेच राज्यात सुरु असलेल्या नवसंजीवनी योजना, मध्यान्ह भोजन योजना, शालेय पोषण आहार योजना आदी योजनात प्रचंड भ्रष्टाचार असल्यामुळे कुपोषणाची समस्याही दिवसेंदिवस गंभीर होणे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर्स व औषधांच्या तुटवड्यामुळे आदिवासी मातांच्या आरोग्याचा प्रश्न न सुटणे, त्यामुळे शैक्षणिक समस्येप्रमाणेच आरोग्यविषयक समस्यांही न सुटल्यामुळे करोडो रुपयांचा निधी खर्च होऊनही आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यास शासनास आलेले अपयश व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनेकदा आदिवासी विभागावर चर्चा झाली आहे. अंतिम आठवड्यातील विषय हा शिक्षण विभाग, महिला व बालविकास आरोग्य विभाग यांच्याशी निगडित आहे. आज आदिवासी मुलांना हलअपेष्टा सहन कराव्या लागत आहे. आज खरोखर आश्रमशाळेमधील मुलांना शिक्षण मिळते काय ? त्यांच्यासाठी निवाऱ्याची चांगली व्यवस्था असते काय?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

आदिवासी आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके मिळतात काय ? त्यांना वैद्यकीय सुविधा मिळतात काय या सर्व प्रश्नांची उत्तरे "आदिवासी आश्रमशाळत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा मिळत नाही असे आहे" समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांचे देखील हेच मत आहे आणि आमचे देखील हेच मत आहे. मग आदिवासींच्या विकासासाठी येणारा करोडो रुपयांचा निधी जातो कुठे असा प्रश्न आपणा सर्वांना समोर उभा राहतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये एकूण 1107 आश्रमशाळा आहेत. त्यापैकी 551 आश्रमशाळा शासकीय आहेत तर 556 आश्रमशाळा अनुदानित आहेत. या आश्रमशाळांमध्ये एकूण 4 लाख 32 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सभापती महोदय, आश्रमशाळांची निर्मिती का झाली ? आदिवासी मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे, त्यांना दोनवेळचे पोटभर जेवण मिळावे, अंगावर कपडे घालण्यास मिळावे आणि महत्वाचे म्हणजे एक चांगला सुजाण नागरिक बनविणे ही सर्व कारणे आहेत. आज या आश्रमशाळांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. निम्म्याहून अधिक आश्रमशाळांना स्वत:च्या इमारती नाहीत, त्या भाड्याच्या जागेत आहेत. काही आश्रमशाळांच्या भिंती कुडाच्या आहेत. छप्पर तुटलेली आहेत, दरवाजे तुटलेले आहेत, खिडक्यांना तावदाने नाहीत, 10x10 च्या खोलीत 70-72 विद्यार्थी बसतात इतकी वाईट अवस्था आहे. पावसाळ्यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची खूप वाईट अवस्था असते. कारण खोलीचे छप्पर तुटलेले असते, त्यातून पाणी गळती सुरु असते. मग तो एको कोपऱ्यात ट्रंकवर बसून पाऊस थांबण्याची वाट पाहत बसतो. काही ठिकाणी तर मुले जेथे शिकतात आणि तेथेच झोपतात. या सर्व आश्रमशाळांना मंत्रिमहोदयांनी कधी भेटी दिल्या आहेत काय ? ठाणे, मेळघाट, नंदूरबार, अक्कलकुवा इत्यादी ठिकाणच्या आश्रमशाळांना मी स्वत: भेटी दिलेल्या आहेत. त्या भेटीमध्ये मला जे दिसून आले ते मी येथे सांगत आहे.

मी आपणास एक उदाहरण सांगतो. मोखाडा येथे अहिना आश्रमशाळा आहे. गेल्या अनेक वर्षापासून या आश्रमशाळेची भिंत कुडाची आहे. त्याठिकाणी फळा नाही. तेथील शिक्षक कपाट आणि दरवाजाचा फळा म्हणून वापर करतात. मुंबईपासून फक्त 110 ते 120 कि.मी.अंतरावर ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

आश्रमशाळा आहे. सर्व आश्रमशाळांतील मुले भेदरलेली असतात. त्यांना काहीही विचारले तरी ते तोंड उघडत नाहीत. त्यांना माहीत असते की, आपण काही सांगितले तर उद्यापासून आपणास जेवण मिळणार नाही. इतक्या प्रचंड तणावाखाली ती मुले जीवन कंठीत असतात. गेल्या वर्षी साप चावल्यामुळे आश्रमशाळेतील दोन मुलांचा मृत्यू झाला. ते ज्या ठिकाणी राहतात त्याठिकाणी फळकुटे वगैरे असतात आणि त्याखाली सरपटणारे जीव असतात. त्या मुलांना सापाने दंश केल्यानंतर तेथील शिक्षक त्या दोन मुलांना मोटर सायकलवर बांधून प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन गेले. प्राथमिक आरोग्य केंद्रात नेहमीप्रमाणे ॲन्टी स्नेक व्हेनम नव्हते. त्यामुळे त्या दोन मुलांचा मृत्यू झ ाला. पावसाळ्यात अशाप्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून मी पावसाळ्यापूर्वी तेथे भेट दिली. परंतु त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा बदल झालेला दिसून आला नाही.परिस्थिती जैसे थै होती.

सभापती महोदय, ही आदिवासी मुले अतिशय कोंदट वातावरणात राहतात. त्यांच्या जेवणाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर गव्हामध्ये सोंडे असतात,

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

त्यांना कीडलेले धान्य आणि सडलेला तांदूळ पुरविण्यात येतो.त्याचबरोबर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना अर्धी कच्ची चपाती देण्यात येते. मेळघाट मधील आश्रम शाळेची काय स्थिती आहे हे पाहण्यासाठी अनेक सन्माननीय सदस्य तेथे गेले होते त्याप्रमाणे मी सुध्दा तेथे गेलो होतो.त्या ठिकाणी वापरण्यात येणारी भांडी पंधरा दिवस धुतली जात नाहीत. त्या भांडयावरुन जर आपण हात फिरवला तर तीन इंचाचा काळा थर जमा झाल्याचे दिसून येईल. आदिवासीच्या विकासासाठी शासनाकडून कोटयावधी रुपयांचा निधी खर्च केला जात असतांना या आश्रमशाळांची इतकी वाईट आहे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना वहया ,पुस्तके गणवेश,इत्यादी पुरविण्यात येते त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना टुथपेस्ट, साहित्य ठेवण्यासाठी ट्रंक, तेल, साबण इत्यादी वस्तुंचा देखील पुरवठा केला जातो. या ट्रंकसाठी जो पत्रा वापरण्यात येतो तो अत्यंत पातळ दर्जाचा असतो त्यामुळे हाताने जोरात दाबल्यानंतर ती ट्रंक दबली जाते त्याचबरोबर या ट्रंकची साईज देखील कमी करण्यात आली आहे. सन्माननीय आदिवासी राज्यमंत्री श्री. पद्माकर वळवी हे नंदूरबार जिल्हयातील आहेत आणि आश्रमशाळेच्या परिस्थितीची त्यांना चांगली माहिती आहे आश्रम शाळेत राहणा-या विद्यार्थ्यांना तेल आणि साबण कोणत्या कंपनीचे पुरविण्यात येते याचा आपण कधी विचार केला आहे काय ? ज्या कंपनीचे नाव आपण कधीही ऐकले नाही अशा कंपनीने तयार केलेले तेल आणि साबण या विद्यार्थ्यांना दिले जाते.

सभापती महोदय, आश्रमशाळेत राहणा-या विद्यार्थ्यांना सकाळी नास्ता, दुपारी जेवण आणि रात्री जेवण दिले जाते . सोमवार ते रविवार पर्यत सात दिवस त्यांना कोणता आहार द्यावयाचा याचे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे त्यानुसार नास्त्यासाठी उपमा, शिरा,अंडी कोणत्या दिवशी द्यावयाचे हे ठरविण्यात आले आहे त्याचबरोबर मटकीची ऊसळ, मटण, भाजी,स्वीट पदार्थ कोणत्या दिवशी द्यावयाचे हे देखील ठरविण्यात आले आहे.परंतु आहाराच्या बाबतीत जे काही वेळापत्रक ठरविण्यात आले आहे त्यानुसार विद्यार्थ्यांना आहार न देता सडलेल्या वांग्या बटाटयाची भाजी देण्यात येते त्याचबरोबर त्याची क्वांटीटीसुध्दा अत्यंत कमी असते.या विद्यार्थ्यांना दोन पेक्षा जास्त चपात्या दिल्या जात नाहीत.या आश्रमशाळांना सडके धान्य पुरविण्यात येते परंतु सडके धान्य पुरविल्याबद्दल कोणत्याही ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आलेले नाही. या संदर्भात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी आणि मी अनेक वेळा हा मुद्दा सभागृहात मांडला होता परंतु संबंधित ठेकेदाराविरुध्द कोणतीही कारवाई केली जात नाही. अन्नधान्य महामंडळाकडून जे धान्य दिले जाते ते आम्ही खरेदी करतो अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्रीमहोदय देत असतात . आश्रमशाळांना जे निकृष्ट दर्जाचे धान्य वा कडधान्य दिले जाते ते आश्रमशाळेतील शिक्षकांना व पर्यवेक्षकांना वा इतर अधिका-यांना आपण खाण्यास दिले तर ही मंडळी निकृष्ट दर्जाचे धान्य व कडधान्य खातील काय. ? आश्रमशाळेतील विद्यार्थी गरीब असल्यामुळे त्यांना निकृष्ट दर्जाचे धान्य वा भाजी खाण्यास दिली जाते हे बरोबर नाही.

सभापती महोदय, एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल नावाची एक योजना शासनाने सुरु केली आहे सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई.बोर्डाच्या धर्तीवर या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येते परंतु या शाळांची अवस्था काय आहे.? पालघर आणि बोईसर भागातील अशा एका शाळेला मी भेट दिली होती त्या शाळेत तीन मायक्रोस्कोप होते परंतु त्या मायक्रोस्कोपमध्ये ऑईल इमल्शन मेन्स नव्हते त्यामुळे या विद्यार्थ्यांनी कसा अभ्यास करावयाचा ? त्या शाळांमध्ये प्रॅक्टीकलची परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना मार्क्स दिले जातात. त्या शाळांमध्ये विषय शिक्षकही नाहीत.अशा शाळांच्या संदर्भात शासनाने लक्ष द्यावे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आश्रमशाळेमध्ये 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दिवसानंतर चार दिवस मुले शाळेत येत नाहीत त्याचबरोबर गणपतीच्या सुट्टी आणि दिवाळीच्या सुट्टी संपल्यानंतर काही दिवस मुलांची उपस्थिती कमी असते अशा वेळी विद्यार्थ्यांसाठी जो धान्याचा स्टॉक येतो तो रेशन दुकानात वा अन्य दुकानदारांना विकला जातो व त्यातून संबंधित कर्मचारी पैसे कमावत असतात. दुसरी गोष्ट अशी की या आश्रमशाळेसाठी जर 26 कर्मचा-यांची पदे असतील तर प्रत्यक्षात दहा कर्मचारी हजर असतात आणि बाकीचे कर्मचारी गैरहजर असतात.

नंतर श्री.सरफरे

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, आज मुलींसाठी न्हाणीघर, स्वच्छतागृह असणे कंपल्सरी केले आहे. परंतु महाराष्ट्रामधील 50 टक्क्याहून अधिक आश्रमशाळांमध्ये मुलींना आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नाही, त्यांच्याकरिता न्हाणीघर आणि स्वच्छतागृहे चांगल्या प्रकारची असावयास पाहिजेत. या सोयींकरिता शासनाकडून करोडो रुपयांचा निधी देण्यात येऊन सुध्दा हा पैसा अधिकाऱ्यांच्या घशामध्ये जात आहे. सभापती महोदय, नियमाप्रमाणे आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची पंधरा दिवसामधून किंवा एक महिन्यातून प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकीय तपासणी केली पाहिजे. परंतु या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी तीन ते चार महिने होत नाही. पावसाळयातील दमट आणि कोंदट वातावरणामध्ये निम्म्याहून अधिक मुले तापाने आजारी असतात,त्यांच्यावर वेळीच औषधोपचार होत नाही.

सभापती महोदय, राज्य शासनाने आदिवासींकरिता अनेक चांगल्या योजना केल्या आहेत परंतु त्याचा लाभ व्यवस्थितपणे आदिवासींना मिळत नाही. सन 2006 ते 2010 या चार वर्षाच्या कालावधीत 1433.11 लाख रुपयांचा निधी प्राप्त झाल्याचे सांगितले आहे. या निधीमधून आपण कोणकोणत्या योजना हाती घेतल्या? त्यापैकी किती योजना सुरु आहेत? हे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये सांगावे. इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलींना सायकल वाटप योजना घेण्यात आली, या योजनेमधून आतापर्यंत किती मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांना शिवण यंत्र पुरविणे, महिलांसाठी शौचकूप बांधणे,अंगणवाडी सेविकांना पुरस्कार देणे, अंगणवाडी व बालवाडीच्या महिलांना साहित्य पुरस्कार, अपंग मुलींचे पुनर्वसन करणे, कृत्रिम अवयव रोपण करणे यामध्ये किती मुलांना याचा लाभ देण्यात आला? गणवेश वाटप योजनेमध्ये मुलांचे गणवेशाचे माप घेण्यात येते, परंतु त्यांना दोन-दोन वर्षे गणवेश मिळत नाही. ऑगस्टमध्ये शिंपी शाळेमध्ये येतो व तो आश्रमशाळेमध्ये गणवेश शिवायला बसतो व एक ड्रेस शिवून द्यायला ऑक्टोबर महिना उजाडतो. ऑगस्ट ते ऑक्टोंबरपर्यंत विद्यार्थ्याला गेल्या वर्षीचा एक ड्रेस मिळतो व त्यानंतर चालू वर्षीचा एक ड्रेस मिळतो. अशाप्रकारे वर्षभरामध्ये त्याला दोन ड्रेस मिळतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना थंडीच्या हंगामाध्ये लोकरीचे स्वेटर मिळाले पाहिजे. परंतु ते सुध्दा विद्यार्थ्यांना कां दिले जात नाही ? हा माझा प्रश्न आहे. त्यांच्याकरिता आलेला निधी कुठे जातो? हे पैसे कोण खातो?

सभापती महोदय, राज्यामध्ये काही अनुदानित शासकीय आश्रमशाळा आहेत तर काही विना अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. त्याचप्रमाणे विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

डॉ. दीपक सावंत...

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या आपण सांगितली आहे. 12 वी विज्ञान आणि 12 वी कला या शाखांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची फार मोठी संख्या आहे. इयत्ता 12 वी विज्ञान शाखेमध्ये 632 मुली होत्या तर 1635 मुलांची संख्या होती. ही संख्या आपण पाहिली तर किती टक्के विद्यार्थी इयत्ता बारावीपर्यंत जातात? एकूण संख्येचा विचार केला तर फक्त दीड टक्का विद्यार्थी इयत्ता 12 वीपर्यंत जातात . त्यांच्यावर आपण करोडो रुपये खर्च करतो. इयत्ता बारावी कला शाखेमध्ये एकूण 3066 मुले होती, त्यापैकी 1330 मुली व 1636 मुले होती. म्हणजे कला शाखेमध्ये फक्त 2 टक्के मुले सुध्दा पोहोचत नाहीत हे शासनाचे मोठे अपयश आहे.

सभापती महोदय, सर्वसाधारणपणे शिक्षणावर शासनाचे 1587.55 लाख रुपये खर्च होतात. हे पैसे कुठे जातात? शासनाने विद्यार्थी व शिक्षकांना संगणक प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला आहे. त्याकरिता 199.35 लाख रुपयांची तरतूद केली आहे. त्यापैकी फक्त 31 लाख रुपये खर्च करण्यात आले. सभापती महोदय, सन 2009-10 या वर्षामध्ये किती शेतकऱ्यांना पीव्हीसी पाईप देण्यात आले याची आकडेवारी आपण पुरविलेल्या पुस्तकामध्ये दिली आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत......

पाच हजार शेतकऱ्यांना आदिवासी उप योजनेंतर्गत पाईप दिले.केवळ 400 विद्यार्थ्यांना वाहन भत्ता दिला. एकाही आश्रमशाळेचे विद्युतीकरण झाले नाही. अजूनही मेळघाटमध्ये 42 गावे विजेशिवाय आहेत. 70 गावामध्ये हातपंप नाहीत. कन्यादान योजनेचे फक्त 4500 लाभार्थी आहेत. 100 रुपये भत्याचे फक्त 15000 रुपये दिले गेले. गेल्या दोन वर्षात फक्त 3000 अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात आले. विजेच्या पंपाची मागणी जास्त असताना फक्त 2000 लोकांना विजेचे पंप देण्यात आले. एकाही आदिवासी कुटुंबाच्या घराला मंगलोरी कौले गेल्या दोन वर्षात दिली गेली नाहीत. एकाही मुलीला हवाई सुंदरी बनविले नाही. शासनानेच या संबंधीची घोषणा केली होती. आणि आदिवासी मुलींना हवाई सुंदरी बनविण्याची फार मोठी स्वप्ने दाखविली होती. पण यासाठी शैक्षणिक पात्रता किमान इयत्ता बारावी विज्ञान असली पाहिजे हे लक्षातच घेतले नव्हते. 25 हजार लोकांना एलपीजी कनेक्शन दिले आहे असा दावा करण्यात आलेला आहे. पण आजही आदिवासींच्या घरामध्ये एलपीजी कनेक्शन दिलेले नाहीत. या एलपीजी कनेक्शनचे काय झाले? गॅसच्या शेगडया कोणी दिल्या, त्याचा पुरवठादार कोण होता आणि त्यामध्ये किती काळा बाजार केला हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, नवसंजीवनी योजनेबाबत मी बोलणार आहे. या नवसंजीवनी योजनेमध्ये अती जोखमेच्या माता ग्रेड- 3 आणि ग्रेड - 4 च्या मुलांचे संरक्षण व औषधोपचार करण्यात येतो. अतिजोखमेच्या गर्भवती महिलांना प्रसूतीपूर्व तीन महिने आणि प्रसूतीनंतर एक महिना मातृत्व अनुदान पुरविणे. मानसेवी बालरोग तज्ज्ञांची नेमणूक करणे. दाईंच्या मासिक सभा घेणे. ग्रामीण रुग्णालयात पेडियॉट्रिक आयसीयूची स्थापना करणे. असे म्हटले आहे. या नवसंजीवनी योजनेचे, मातृत्व अनुदानाचे पैसे लोकांना मिळत नाहीत. या राज्यातील गर्भवती महिलांची संख्या किती आणि त्यापैकी किती गर्भवती महिलांना 400 रुपयांची औषधे व 400 रुपये रोख देण्यात आले हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. शासनाची माहेर योजना आहे. जननी सुरक्षा योजना आहे. मातृत्व अनुदान योजना आहे. पण या तीनही योजनाचा बोजवारा उडालेला आहे. शासनमार्फत सांगण्यात येते की, प्रत्येक गावामध्ये प्रत्येक प्रायमरी हेल्थ सेंटरमध्ये एनआयसीयू आहे म्हणजे पेडियॉट्रिक आयसीयू आहे. हे पेडियॉट्रिक आयसीयू 50 टक्के ठिकाणीच आहेत. धडगाव अक्कलकुवा या प्राथमिक

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

आरोग्य केंद्रामध्ये पेडियॅट्रिक आयसीयू नाहीत? वैद्यकीय शिक्षणमंत्री नंदूरबारचे आहेत पण तिकडे पेडियॅट्रिक आयसीयू देण्यात आलेले नाही. आजही नंदूरबारमधील अनेक गावांमध्ये जायला रस्ता नाही. जर डॉक्टरला जायचे असेल तर गाडी जात नाही. फिरती आरोग्य पथके बंद आहेत. सभापती महोदय, असे असेल तर या आदिवासींच्या बालकांची काळजी कोण घेणार आणि दावा करण्यात येतो की कुपोषणाचा दर दोन टक्क्याने कमी झाला आहे. आजही बालमृत्यूचे प्रमाण 53 टक्केच आहे. गेल्या वर्षी ते 55 टक्के होते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

गेल्या वर्षी आयएमआर 55 टक्के होता तो या वर्षी 53 टक्के आहे. हा आयएमआर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मॅनेज केला जातो असा माझा आरोप आहे. मूलं मेले आहे असे दाखवावयाचेच नाही, कारण 2 टक्के दर कमी करावयाचा आहे. त्यांचे एक बाल विकास केंद्र असते. त्या ठिकाणी ग्रेड 3 आणि ग्रेड 4 च्या मुलांना एका खोलीमध्ये ठेवले जाते. त्यांच्यावर आठ दिवस पोष्टीक अन्नाचा मारा केला जातो आणि त्यांची अशी धारणा आहे की, आठ-पंधरा दिवसांमध्ये या मुलांचे वजन वाढवावयाचे. म्हणजे त्याला ग्रेड 3 मधून ग्रेड 2 मध्ये आणावयाचे आणि ग्रेड 4 मधून ग्रेड 3 मध्ये आणावयाचे. त्या ठिकाणी एएनएम काय करतात ? त्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल असतो तो मॅनेज करतात. इलेक्ट्रॉनिक वेईंग मशीन मॅनेज करता येते. गेल्या वेळी ग्रेड 4 मध्ये किती वजन होते आणि किती वजन दाखविले की ग्रेड 3 मध्ये जाईल हे मॅनेज केले जाते. हे सगळे कागदावर आहे. शासन पैसे खर्च करते पण ते पैसे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नाहीत हा आमचा दावा आहे. ज्या सामान्य आदिवासींला हे पैसे मिळावयास पाहिजे त्या शेवटच्या घटकापर्यंत पैसे पोहोचत नाहीत असा आमचा दावा आहे.

सभापती महोदय, खावटी कर्ज हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दिले जाते. बाहेर गहू कोणत्या दराने खरेदी करतो हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. बाहेर गहू 500 रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करतो आणि खावटी कर्जात आपण 1850 रुपये प्रती क्विंटल दराने गहू खरेदी करतो. माझ्याकडे आकडेवारी आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना आव्हान देतो. मी सांगत असलेली माहिती चुकीची असेल तर आपण सांगावे. आपण बाहेर तांदूळ 600 रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करतो आणि खावटी कर्जामध्ये आपण 2225 रुपये प्रती क्विंटल दराने तांदूळ खरेदी करतो. तीच गोष्ट मिरची पावडरच्या बाबतीत आहे. तीच गोष्ट मिठाच्या बाबतीत आहे. तीच गोष्ट उडीद आणि डाळींच्या बाबतीत आहे. त्याची देखील खरेदी अशीच होते. या खावटी कर्जामध्ये जवळजवळ 20 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस आलेला आहे पण कोणावरही कारवाई झालेली नाही. कुपोषण होण्याचे कारण काय ? कुपोषणाने बालमृत्यू होतात. कुपोषणाचे मुख्य कारण आहे स्थलांतर. हे लोक उन्हाळ्यामध्ये स्थलांतर करतात आणि पावसाळ्यामध्ये परत येतात. त्यावेळी हे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत .....

लोक स्थलांतर का करतात ? कारण त्यांच्या हाताला आपण काम देऊ शकत नाही. कारण आपण आपली रोजगार हमी योजना बंद केलेली आहे. आज केंद्राची जी एमआरइजीएस राबवितो ती योजना फार डिफेक्टीव आहे. इकडे काम मागावयास माणूस आला की त्याला काम मिळत नाही. सेल्फवर एवढी कामे आहेत, एवढी कामे झाली असे कागदोपत्री दाखविले जाते. त्या माणसाला काम मिळत नाही. ती माणसे आपला संसार आणि आपल्या बाळाला घेऊन गुजरातमध्ये, मध्यप्रदेशमध्ये स्थलांतर करुन का जातात ? कारण एमआरइजीएस योजना डिफेक्टीव आहे.

सभापती महोदय, जर हे सर्व आपल्याला खरोखरच करावयाचे असेल तर आपण प्राथमिक आरोग्य केंद्रे सुधारली पाहिजेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये पेडियार्ट्रिशियन, फिजिशियन दिला पाहिजे. आपण त्या ठिकाणी साधा एमबीबीएस डॉक्टर देऊ शकत नाही. त्या ठिकाणी चांगली औषधे नसतात. औषधे मागवून ती बंद करुन ठेवतात आणि औषधे एक्स्पायर झाली की मेळघाटच्या जंगलामध्ये पुरतात. वन संरक्षण कायदा आदिवासींच्या विकासाच्या आड येतो. आदिवासी माणसे आज पोलिसांना फार घाबरतात. एखादे झाड तोडले किंवा एखादी छोटी फांदी जरी तोडली तरी पोलिसांकडून त्या आदिवासीचा मानसिक छळ सुरु होतो. त्यामुळे आदिवासी माणूस पोलिसांना जास्त घाबरतो. त्यामुळे तो अलिप्त राहतो. तो लोकांशी संबंध ठेवत नाही. तो पाड्यापाड्यांमध्ये राहतो. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर वन संरक्षण कायद्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत......

त्यांचे आरोग्य सुधारले पाहिजे. या आदिवासींना रोजगारबुडीचे 40 रुपये दिले जातात ते रोजच्या रोज मिळाले पाहिजेत. त्याचा मुलगा जर हॉस्पिटलमध्ये असेल तर त्याला ते उपयोगी पडू शकतात. ते आठवडयातून एकदा देऊन चालणार नाही. कारण त्याचे पोट हातावर चालते. आज त्याला 40 रुपये दिले तर त्याच्या घरची चूल पेटू शकते. माननीय मंत्री महोदय, आता तरी नियमात बदल करावा. नियम विकासासाठी असतात, नियम पैसे न देण्यासाठी नसतात. म्हणून सर्व अधिका-यांना जाहीरपणे विनंती आहे की, तुमच्या मानसिकतेमध्ये बदल करावा. एकही प्रकल्प अधिकारी संवेदनशील नाही. त्यांना आदिवासींविषयी कणव नाही, आदिवासींच्या प्रश्नांची जाण नाही, त्यांना योजना केवळ कागदावर कशा आणावयाच्या एवढेच माहीत आहे. या सर्वांना आश्रमशाळेतील जेवण द्यावे म्हणजे त्यांना आदिवासी काय खातात ते कळेल. त्यांच्या मुलांना तेथे पाठवावे म्हणजे फाटलेल्या वहया पुस्तकांच्या आधारे कसा अभ्यास करावयाचा ते समजेल. फाटलेले बूट कसे घालावयाचे आणि उघडयावर आंघोळ कशी करावयाची ते समजेल. जर खरोखर यामध्ये सुधारणा होणार असेल तर या चर्चेला अर्थ आहे. अन्यथा नेहमीप्रमाणे ही चर्चा वांझोटी ठरेल अशी माझ्या मनामध्ये शंका आहे, एवढे बोलून मी येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आदिवासींच्या संदर्भात अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक हे आदिवासी विभागात फिरतात, निरीक्षण करतात, त्या आधारावर त्यांनी आपले मत मांडले आहे. मी देखील या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, घटनेच्या 46 कलमात अशी तरतूद आहे की, "राज्य, जनतेतील दुर्बल घटक, विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यांपासून त्यांचे रक्षण करील." ही जबाबदारी राज्य शासनावर टाकलेली आहे. भाग चार - राज्य संस्थांची निदेशक तत्वे 41 ते 48 यामध्ये त्याचा समावेश आहे. म्हणून शासनाला ही जबाबदारी पार पाडावयाची आहे. जेणे करुन आदिवासींचे आर्थिक उन्नयन, शैक्षणिक उन्नयन चांगल्या प्रकारे होईल. 1992 साली या राज्याने एक धोरण स्वीकारले. आदिवासी खात्याला लोकसंख्येवर आधारित बजेट देण्याचे ते धोरण होते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरदचंद्र पवार आणि तत्कालीन आदिवासी विकास मंत्री श्री.मधुकरराव पिचड यांनी बजेटच्या 9 टक्के निधी देण्याचे धोरण स्वीकारले. आदिवासींचा निधीअभावी विकास होणार नाही यादृष्टीने ते धोरण होते. परंतु आजचे चित्र पाहिले तर आजअखेर या खात्याचा 8 हजार कोटींचा अनुशेष शिल्लक राहिलेला आहे. 9 टक्क्यांप्रमाणे आदिवासी विकास खात्याला रक्कम द्यावयास पाहिजे होती तेवढी दिलेली नाही. 2009-10 चे आकडे बोलके आहेत. वार्षिक योजना 37,915 कोटी आहे. 9 टक्क्यांप्रमाणे आदिवासी विकास खात्यासाठी 3,412 कोटी रुपये द्यावयास पाहिजे होते. परंतु 2,314 कोटी इतकी रक्कम प्रस्तावित केली होती. म्हणजे एका वर्षात 1,098 कोटींचा अनुशेष तयार झाला आहे. माझ्याकडे कार्यक्रम अंदाजपत्रक आहे. एका वर्षात शासन 1,098 कोटी रुपये आदिवासी विकास खात्यातून काढून घेत आहे. मग अशा परिस्थितीत घटनेच्या कलम 46 अन्वये त्यांच्यावरील अन्याय दूर कसा करणार ? असा मूलभूत प्रश्न मला पडतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी.........

सभापती महोदय, दारिद्र्य निर्मूलन हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. आदिवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था आहे. त्यांच्या सर्वेक्षणानुसार 91.11 टक्के आदिवासी दारिद्र्य रेषेखालील आहेत. फक्त 9 टक्के दारिद्र्य रेषेच्यावर आहेत आणि 91 टक्के आदिवासी आज देखील दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:20

(श्री. अरुण गुजराथी...

आदिवासीमधील अर्भक मृत्यू दर 73.6 टक्के आहे. वरील सर्वेक्षणानुसार 64 अदविासी महिला अशक्त आहेत. या सर्वेक्षणावरुन माननीय मंत्री महोदय सांगू शकतील काय की त्यांनी आदिवासींच्या संदर्भातील विकास चांगल्या प्रकारे केलेला आहे ? 90 टक्के आदिवासी दारिद्र्य रेषेखाली आहेत.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी तालुक्यांमध्ये आरोग्य विषयक काय परिस्थिती आहे ते मी आपणापुढे ठेवतो. एका वर्तमानपत्रातून आलेली ही आकडेवारी आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये 64 प्राथमिक आरोग्य केन्द्राची आवश्यकता आहे तसेच 48 केन्द्रे आणि 431 उपकेन्द्रांची आवश्यकता आहे. इमारतीमध्ये असलेली उपकेंद्रे 48 आहेत. 194 उपकेन्द्रांना इमारती नाहीत. या उपकेन्द्रासाठी शासन इमारत का बांधू शकले नाही याचा विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आश्रमशाळेबाबत तपशीलवार माहिती सभागृहाला दिलेली आहे त्यामुळे त्या विषयावर मी अधिक भाष्य करु इच्छित नाही. पण पाण्याची सोय नाही, टॉयलेट नाही, बाथरुम नाही अशी आश्रमशाळांची अवस्था आहे. 34 टक्के शासकीय आश्रमशाळांतून आणि 25 टक्के अनुदानित आश्रमशाळांतून विद्यार्थ्यांना कसे अन्न दिले जाते ? या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, या आश्रमशाळांना आपण अचानक भेट देऊन परिस्थिती पहावी. माझा मतदारसंघ आदिवासी आहे. त्या आश्रमशाळेतील मुलांच्या आहारासाठी जे अन्नधान्य पुरविले जाते त्यामधील डाळ कशी आहे, गहू कसा आहे हे पहा म्हणजे कळेल. सभापती महोदय, अशा प्रकारच्या धान्याचा पुरवठा कोण करतो ? कोणाच्या माध्यमातून इतक्या हलक्या दर्जाचे धान्य आश्रमशाळेमध्ये दिले जाते ? या गोष्टींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करणे हा महत्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, शिक्षण आणि रोजगाराच्या संबंधात बोलायचे झाले तर शिक्षित आदिवासी पैकी फक्त 4 टक्के बेरोजगारांना शासकीय नोकरीत सामावून घेतले जाते. आयटीआय झालेल्या 1392 बेरोजगारापैकी फक्त 14 आदिवासींना नोकरी दिली गेली. म्हणजे 1 टक्का आदिवासीला नोकरी दिली गेली. सभापती महोदय, अनुसूचित जमातीच्या शिक्षकाच्या 4 जागा असल्या तर 40 उमेदवार येतात. तरी देखील अनुसूचित जमातीचे शिक्षक मिळत नाहीत. मग शैक्षणिक संस्था

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:20

श्री. अरुण गुजराथी..

शासनाला असे पत्र लिहिते की आम्हाला जोपर्यन्त अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत तोपर्यन्त ही पदे खुल्यावर्गातून भरण्याची परवानगी द्यावी. शैक्षणिकदृष्टया आदिवासी किती मागे आहेत हे यावरुन दिसून येते.

सभापती महोदय, शाळातील गळतीचे प्रमाण पाहिले तर असे दिसून येते की, जर 100 मुलांनी शाळेत प्रवेश घेतला तर 10वी पर्यन्त 74 मुलांची गळती होते आणि फक्त 26 मुले 10वी पर्यन्त शिक्षण घेतात. 12वी पर्यन्त शिक्षण घेणा-या आदिवासी मुलांचे प्रमाण 5.23 टक्के आहे. मुलींचे प्रमाण 2.40 टक्के आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते हे कार्यक्षम आहेत. त्यांना काम करण्याची मोठी संधी आहे. मागच्या वेळी आदिवासींच्या संदर्भातील विकासाची जी काही टक्केवारी होती तिच्यामध्ये या वर्षी किती वाढ झाली हे त्यांनी सांगितले पाहिजे. एका वर्षात त्यांचा विकास होईल असे मी म्हणत नाही. परंतु किमान तीन-चार वर्षाच्या कालावधीत ही आदिवासींच्या विकासाच्या संदर्भातील टक्केवारी दुपटीने, तिपटीने वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकाला नोकरी द्या असे मी म्हणणार नाही. परंतु त्याला स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण द्या, तो स्वत:च्या पायावर कसा उभा राहील हे पहा. चीनमध्ये अशी एक म्हण आहे की, Do'nt give him fish, teach him how to fish. त्याला तुम्ही अनुदान द्या, खावटी कर्ज द्या असे मी म्हणणार नाही. पण त्याला व्यावसायिक शिक्षण द्या, तंत्रशिक्षण द्या जेणेकरुन तो आपला चरितार्थ चालवू शकेल. या गोष्टी आपण करायला पाहिजे.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

आपण आश्रमशाळांचे टाईमटेबल पाहिले तर ते एस.टी.च्या टाईमटेबलप्रमाणे असल्याचे दिसून येईल. तालुक्याच्या गावाहून पहिल्या एस.टी.ने निघालेला शिक्षक सकाळी ९.३० ते १०.०० वाजेपर्यंत जेव्हा पोहोचेल त्यावेळेस शाळेची सुरुवात होते. आपण शिक्षकांना सांगू शकत नाही. परंतु फार मोठे गाव असेल, तेथे एक-दोन कि.मी.वर राहणे शिक्षकांना शक्य नसेल तर सायकल पुरविण्यात यावी. वेळेवर शाळेत येण्यासाठी शिक्षकांना दुचाकी पुरविण्यात यावी. दुचाकी खरेदी करण्यासाठी कर्ज द्यावे किंवा ग्रँट देण्यात यावी. परंतु शाळा वेळेवर सुरु होणे महत्वाचे आहे. शिक्षक सकाळी ९.३०-१०.०० वाजता येतो आणि ११.०० वाजता निघून जातो. शिक्षण होणार कसे? एकूण जो निधी खर्च केला जातो त्यातील २० टक्के निधी वैयक्तिक लाभासाठी दिला जातो. त्यामध्ये शेळी, मेंढी, गायी, म्हशी पुरविणे, दीड पॉईंट विजेचे कनेक्शन उपलब्ध करुन देणे याचा समावेश होतो. शासनाने या सभागृहात शब्द दिला पाहिजे, राज्यातील आदिवासींचे एकही घर असे राहणार नाही, ज्याठिकाणी दीड पॉईंट विजेचे कनेक्शन नाही. हा फार चांगला उपक्रम आहे. यासाठी जास्त निधीची आवश्यकता नाही. विभागाकडे निधीची उपलब्धता आहे. परंतु आम्हाला हे करायचे आहे यादृष्टीने प्रयत्न केला तर एकही झोपडी वीज पुरवठ्याशिवाय राहणार नाही. आदिवासी हा हुशार आहे, ब्रिलियंट आहे. माननीय आदिवासी विकास राज्यमंत्री हे देखील हुशार आहेत. जास्त बोलू देत नाहीत. मी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मुद्दा मांडला होता की, जात पडताळणी प्रमाणपत्राबाबतची प्रकरणे चार महिन्याच्या आत तपासून घ्यावीत. त्यांनी ताबडतोब आकडेवारी दिली आणि सांगितले की, ३१ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. आदिवासी समाजाच्या लोकांना जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, दोन-तीन महिन्याचा विशेष कार्यक्रम राबवून ही सर्व प्रलंबित प्रकरण निकाली काढावीत. या संदर्भात तालुक्याच्या ठिकाणी विशेष कॅम्प घेता आला तर जरुर विचार व्हावा. अनुसूचित जाती-जमातीसाठी, ओबीसीसाठी दाखले मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आदिवासी समाजाला गॅसचे वाटप केले जाते. मध्यंतरी सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावीत हे आदिवासी विकास मंत्री असताना त्यांनी योजना आणली होती. आदिवासी मुलींना हवाई सुंदरीचे प्रशिक्षण देण्याची ती योजना होती. कितपत यश आले याची मला माहिती नाही. तसे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न झाला तर ती चांगली गोष्ट होईल. आदिवासी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.........

समाजातील मुलांना पोलीस भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे, त्यांना प्राधान्य दिले जाते, पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण दिले जाते. यापूर्वीच्या काळात आदिवासी समाजातील मुलांना प्रशिक्षण देऊन पोलीस सेवेमध्ये सामावून घेण्यात आले. कमी वजनाचा आणि भरदार छाती नसलेला पोलीस पाहिला तर तो निश्चितपणे आदिवासी समाजाचा आहे असे समजा. त्याची ऊंची जास्त नसते, छाती भरदार नसते. परंतु पोलीस आणि ड्रायव्हींगचे प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात तालुक्याच्या ठिकाणी पुढील एक-दोन कॅम्प घ्यावेत. पोलीस आणि ड्रायव्हींगच्या पदाबाबत प्रशिक्षण देऊन त्यांना सेवेमध्ये भरती करुन घेण्यात यावे. याशिवाय शिलाई मशिन चालविण्याच्या संदर्भात त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी फार निधीची आवश्यकता नाही. आम्हाला हे काम करायचेच आहे या दृष्टीकोनातून शासनाला पुढे जाता येईल. माझी शासनाला विनंती आहे की, एक मूल्यमापन समिती नेमण्यात यावी. मागील दहा वर्षाऐवजी गेल्या दोन वर्षाच्या काळात या खात्याच्या माध्यमातून किती विकास होणे गरजेचे होते आणि किती विकास झाला? लक्ष्यांक काय होते आणि किती साध्य झाले? आदिवासींना खावटी कर्ज दिले जाते. मध्यंतरीच्या काळात खावटी कर्ज माफ केले गेले. पुढील काळात खावटी कर्ज माफ होईल की नाही याची माहिती नाही. परंतु लोकांना असे वाटते की, कर्ज माफ होईल. अन्नधान्यासाठी कर्ज दिले जाते. ही अतिशय उत्तम योजना आहे. आदिवासींना या योजनेतून जून महिन्यापूर्वी धान्य दिले जाते. त्या धान्याची प्रत आश्रमशाळांना पुरविण्यात येणाऱ्या धान्यापेक्षा चांगली असते असा माझा अनुभव आहे.

सभापती महोदय, आदिवासींना विद्युत पंप दिले जातात, तेल पंप दिले जातात. परंतु फिजिबिलिटी नाही, व्यवहार्यता नाही त्यांना तेल पंप दिले जातात.

नंतर ४एस.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ......

काही वेळा वीज पंप देतो पण विहिरीला पाणी नसते, तर विहिर देतो तेव्हा विजेची सोय नसते. तसेच विहिर खोदण्यासाठी 100 फुटाची मर्यादा असते तेव्हा त्या भागात 200 ते 300 फुटापर्यंत पाण्याचा स्त्रोतच नसतो. आमच्या सातपुडा पर्वतात तर अशी परिस्थिती आहे की पावसाळ्यात सुध्दा गुरांना पिण्याच्या पाण्याची सोय नसते. मध्यंतरी शेतकरी 100-100 कि.मी. वरुन गुरांना डोंगरात चरण्यासाठी पाठवून देत होते, जेणेकरुन तेथे चारा तरी मिळेल. पाणी नाही म्हणून काही वेळा गुरे सुध्दा पाजू शकत नाही म्हणून वनतळी घेण्याच्या संदर्भात प्राधान्याने विचार करावा. प्रत्येक 5 किलोमीटरवर वनतळी असतील असा विचार झाला पाहिजे.

पुढील बाब कुपोषणाच्या बाबतीत आहे. बालमृत्यूच्या बाबतीत विचार केला तर ठाणे जिल्ह्यात दोन वर्षात 2342 बाल मृत्यू झाले. यात खरा आकडा काय असेल तो आपण पहावा पण एका चांगल्या वर्तमानपत्रातील ही आकडेवारी असून ते वर्तमानपत्र तरी चुकीची आकडेवारी देणार नाही असे वाटते. सन 2008 साली 1273 बालमृत्यू झाले असून त्यात 0 ते 1 वयोगटातील बालकांची संख्या 943 एवढी असून 1 ते 6 वयोगटातील मुले 330 अशी ही वर्गवारी करता येईल. याचा अर्थ दर महिन्याला 114 बालकांचे ठाणे जिल्ह्यात मृत्यू होतात अशी ही भयानक परिस्थिती आहे. यानंतर सन 2009 ची आकडेवारी मी देणार नाही. पण जगातील तीन कुपोषित बालकांमध्ये एक कुपोषित बालक हे आपल्या देशातील आहे. म्हणून कुपोषण ही केवळ आपल्या राज्याची किंवा देशाचीच समस्या नव्हे तर जागतिक स्वरुपाची समस्या आहे. तसेच भारतात दरवर्षी 5 लाख बालके कुपोषणाने मृत्युमुखी पडतात. यामध्ये सर्वात जास्त प्रमाण म्हणजे ग्रामीण भागात आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण दर हजारी 48 असे आहे. ही 48 बालके जन्मत:च मृत्युमुखी पडतात आणि शहरी भागात हे प्रमाण 31 एवढे आहे. म्हणजे शहरांमध्ये जन्मत:च मृत्यू होणाऱ्या बालकांचे प्रमाण हजारी 31 इतके आहे अशीही माहिती दिलेली आहे. माझ्याकडे या वर्तमानपत्राचे कात्रण आहे. राज्यात 11 महिन्यात 27580 बालकांचे मृत्यू होतात. एवढ्या प्रमाणात राज्यात जर मृत्यू होत असतील तर ही गंभीर बाब आहे. ही सर्व माहिती "दैनिक पुढारी" दि. 17 जून, 2010 मध्ये दिली आहे. राज्यात सन 2009-10 अखेर 27580 बालमृत्यू झाले असून त्यात प्रिमॅच्युअर बर्थ, कमी वजनाची बालके, बर्थ ड्रामा, रेस्पीरेटरी डिसीज, निओनॅटल हेपिटायटिस यामुळेही अनेक बालमृत्यू झालेले आहेत. तसेच दवाखान्यात डॉक्टर्स



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .......

असतात तर नर्सेस नसतात, नर्सेस असतात तर डॉक्टर नसतात, ड्रायव्हर असतो तर गाडी नसते आणि गाडी असते तर ड्रायव्हर नसतो आणि दोन्ही असतील तर पेट्रोल नसते या सर्व परिस्थितीची शहानिशा मंत्री महोदयांनी करावी व त्यात काय सुधारणा करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावेत अशीही माझी विनंती आहे. यासंदर्भात "न्युट्रिशनल क्रायसिस इन महाराष्ट्रा" यांचा हा अहवाल असून त्यासंबंधीची अधिकची माहिती घेऊन यामध्ये अजून किती चांगल्या प्रकारे काम करता येईल हे पहावे. वसतिगृहांबाबत विचार करता दरडोई आपण किती खर्च करतो हे देखील पहावे. कार्यक्रम अंदाजपत्रक पृ.क्र. 68 नुसार नंदुरबार जिल्ह्यात 28485, धुळे जिल्ह्यात 14100, उस्मानाबाद 3487, यवतमाळ मध्ये 1106 एका विद्यार्थ्यामागे एका वर्षासाठी हा खर्च केला जातो. अशा प्रकारचा असमतोल असणे योग्य नाही. हा फरक कमी कसा करता येईल तसेच राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये सारख्याच प्रमाणात न्याय कसा देता येईल याबाबत शासनाने प्रयत्न करावा. त्यानंतर वस्तीशाळांमध्ये शिक्षकाला प्रशिक्षणासाठी 1 हजार रुपये प्रतिमाह, सादिल खर्च 1 हजार रुपये प्रतिमाह, पाठ्यपुस्तकांसाठी 1050 आणि ........

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

वस्तीशाळेच्या शिक्षकाला दर महिन्याला 1000 रुपये मानधन दिले जात आहे. जर आपण वस्तीशाळेच्या शिक्षकास दर महिन्याला 1000 रुपये मानधन देत असू तो विद्यार्थ्यांना कसे काय शिक्षण देऊ शकेल याचा विचारच केलेला बरा.

महिला व बालविकासाच्या संदर्भात अहवालात त्यांनी 12 कारणे दिलेली आहेत. बालमृत्यू व अतिकुपोषणाचे प्रमाण जास्त असण्याची कारणे त्यांनी दिलेली आहे यामध्ये मुख्यत्वेकरुन जन्मत: मुलाचे वजन 2500 ग्रॅम पेक्षा कमी असणे, गरोदर मातांच्या आरोग्याची काळजी न घेणे, रक्तक्षय, उपचाराची तत्परता व गुणवत्ता नसणे, गरिबी अशी बरीच कारणे दिलेली आहेत. ही कारणे कशी कमी करता येईल यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रुग्णालयातील एका रुग्णाचा जेवणाचा खर्च किती याची माहिती त्यांनी दिलेली आहे. जवाहर येथे 52 रुपये, डहाणू 25 रुपये, तळोदा 42, कळवण 23 रुपये, पांढरकवढा येथे तर 10 रुपये असा जेवणाचा दर दिलेला आहे. मला वाटते जेवणाच्या खर्चामध्ये जी तफावत आहे ती कमी झाली पाहिजे.

आपल्या आदिवासी भूमीपुत्राला न्याय देण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आदिवासी च्या विकासासाठी 3750 कोटी रुपये या वर्षासाठी शासनाने दिलेले आहेत. 3750 रुपयांमधून एकही रुपया परत जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. व हा सर्व पैसा डिसेंबर-जानेवारी पर्यंत खर्च करुन परत पुरवणी मागण्यामध्ये आपण वित्त मंत्र्यांना सांगा की, आमचा निधी संपलेला आहे, आमचा अनुशेष 8000 कोटी रुपयांचा आहे त्यामुळे आम्हाला जादा निधी देण्याची गरज आहे असे झाले तर चांगल्या पध्दतीने आपण आदिवासींचा विकास करु शकू.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. 7.40 पर्यंत आपले भाषण सुरु राहील व त्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात येईल. राहिलेली चर्चा उद्या घेण्यात येईल तोपर्यंत आपण ऑन लेग राहणार आहात.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये या ठिकाणी अंतिम आठवडयाचा प्रस्ताव आणलेला असून या प्रस्तावात आदिवासींचा विषय आवर्जून आणलेला आहे. खरे म्हणजे अंतिम आठवडा प्रस्ताव राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात आणता आला असता तसेच अन्य अनेक विषयाच्या संदर्भात आणता आला असता. परंतु महाराष्ट्रातील जो शोषीत समाज आहे त्या समाजाकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष असल्यामुळेच जाणीवपूर्वक आदिवासी विद्यार्थी, त्यांचे आरोग्य, आश्रमशाळा, शालेय पोषण आहार, नव संजीवनी योजना अशा अनेक विषयांचा या प्रस्तावामध्ये जाणीवपूर्वक समावेश करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळेस आदिवासींच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती त्यावेळेस माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी उत्तर देतांना कबूल केले होती की, "कुंपणच शेत खात आहे." मंत्रीमहोदयांनी हे कबूल केल्यानंतर हा विषय तेथेच संपला. राज्याच्या योजनेच्या माध्यमातून आदिवासींसाठी पैसे जात असतांना कुंपणच शेत खात आहे हे राज्यकर्त्यांनी मान्य केले आहे. या राज्यामध्ये आदिवासींची संख्या 1 कोटीच्या घरामध्ये आहे. मागच्या आकडेवारी नुसार आदिवासींची लोकसंख्या 73 लक्ष होती परंतु गेल्या 10-15 वर्षामध्ये आदिवासींची लोकसंख्या 1 कोटीच्या वर गेलेली आहे. आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात म्हणजे 8-10 जिल्हयात आहे. ठाणे जिल्हयामध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. मोनोरेल, मेट्रोच्या संदर्भात आपण गप्पा मारतो परंतु मुंबईच्या जवळ म्हणजे 100-150 कि.मी. अंतरावरील ठाणे जिल्हयातील आदिवासी पाडयातील आमच्या आदिवासी बांधवाने साधी रेल्वे देखील अजून पर्यंत बघितलेली नाही, त्या रेल्वेमध्ये बसण्याची गोष्टच वेगळी. अशा प्रकारची ही विषमता आपल्याला मुंबईपासून 100-150 कि.मी. च्या अंतरावर बघावयास मिळते. हा जो असमतोल आहे त्यामुळे आदिवासी जनता अस्वस्थ झालेली आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आपल्याला बघावयास मिळतात.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, अनुच्छेद 46 मध्ये दुर्बल घटकांकडे लक्ष देण्यासाठी शासनाने कटिबद्ध असले पाहिजे, असे नमूद केले आहे. राज्यातील 9 टक्के लोकसंख्येवर अतिशय कमी खर्च होतो. आज या राज्यामध्ये 950 कोटी रूपयांचा अनुशेष आहे. आदिवासी लोकांपर्यंत पैसा न पोचता तो मधल्या मध्ये गायब होतो. त्यामुळे माझी पहिली मागणी आहे की, आदिवासींचे शोषण करणारी जी टोळी आहे, मग त्यामध्ये प्रशासनातील अधिकारी असतील, त्या भागातील एजंट असतील, मंत्रालयामध्ये बसलेली मंडळी असतील, पुरवठा करणारे ठेकेदार असतील, ती प्रथम उद्ध्वस्त करण्याची गरज आहे. ती अतिशय कडकपणे उद्ध्वस्त केली पाहिजे. आदिवासीं पर्यंत जे पैसे पोचायला पाहिजे ते पोचत नाही. जे पोचलेले आहेत ते मध्ये गायब होतात अशा प्रकारची स्थिती आहे.

**तालिका सभापती** : आता आपण ही चर्चा येथेच थांबवू या. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे ऑन लेग राहतील. आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून उद्या मंगळवार, दिनांक 27 जुलै 2010 रोजी, सकाळी 10.30 वाजता भरेल. सकाळी 10.30 ते 11.30 या वेळेत मराठी विषयाच्या प्रस्तावित चर्चेसंबंधी माननीय मंत्री उत्तर देतील आणि सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 7 वाजून 42 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 27 जुलै 2010 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/ KGS/ MMP/

19:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

20:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

वस्तीशाळेच्या शिक्षकाला दर महिन्याला 1000 रुपये मानधन दिले जात आहे. जर आपण वस्तीशाळेच्या शिक्षकास दर महिन्याला 1000 रुपये मानधन देत असू तो विद्यार्थ्यांना कसे काय शिक्षण देऊ शकेल याचा विचारच केलेला बरा.

महिला व बालविकासाच्या संदर्भात अहवालात त्यांनी 12 कारणे दिलेले आहेत. बालमृत्यू व अतिकुपोषणाचे प्रमाण जास्त असण्याची कारणे त्यांनी दिलेली आहे यामध्ये मुख्यत्वेकरुन जन्मत: मुलाचे वजन 2500 ग्रॅम पेक्षा कमी असणे, गरोदरमातांच्या आरोग्याची काळजी न घेणे, रक्तक्षय, उपचाराची तत्परता व गुणवत्ता नसणे, गरिबी अशी बरीच कारणे दिलेली आहेत. ही कारणे कशी कमी करता येईल यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रुग्णालयातील एक रुग्णाचा जेवणाचा खर्च किती याची माहिती त्यांनी दिलेली आहे. जवाहर येथे 52 रुपये, डहाणू 25 रुपये, तळोदा 42, कळवण 23 रुपये, पांढरकवढा येथे तर 10 रुपये असा जेवणाचा दर दिलेला आहे. मला वाटते जेवणामध्ये जी तफावत आहे ती कमी झाली पाहिजे.

आपल्या आदिवासी भूमीपुत्राला न्याय देण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आदिवासी च्या विकासासाठी 3750 कोटी रुपये या वर्षासाठी शासनाने दिलेले आहेत. 3750 रुपयांमधून एकही रुपया परत जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. व हा सर्व पैसा डिसेंबर-जानेवारी पर्यंत खर्च करुन परत पुरवणी मागण्यामध्ये आपण वित्त मंत्र्यांना सांगा की, आमचा निधी संपलेला आहे, आमचा अनुशेष 8000 कोटी रुपयांचा आहे त्यामुळे आम्हाला जादा निधी देण्याची गरज आहे असे झाले तर चांगल्या पध्दतीने आपण आदिवासींचा विकास करु शकू.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. 7.40 पर्यंत आपले भाषण सुरु राहील व त्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात येईल. राहिलेली चर्चा उद्या घेण्यात येईल तोपर्यंत आपण ऑन लेग राहणार आहात.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये या ठिकाणी अंतिम आठवडयाचा प्रस्ताव आणलेला असून या प्रस्तावात आदिवासींचा विषय आवर्जून आणलेला आहे. खरे म्हणजे अंतिम आठवडा प्रस्ताव राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात आणता आला असता तसेच अन्य अनेक विषयाच्या संदर्भात आणता आला असता. परंतु महाराष्ट्रातील जो शोषीत समाज आहे त्या समाजाकडे राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष असल्यामुळेच जाणीवपूर्वक आदिवासी विद्यार्थी, त्यांचे आरोग्य, आश्रमशाळा, शालेय पोषण आहार, नव संजीवनी योजना अशा अनेक विषयांचा या प्रस्तावामध्ये जाणीवपूर्वक समावेश करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळेस आदिवासींच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती त्यावेळेस माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी उत्तर देतांना कबूल केले होती की, "कुंपणच शेत खात आहे." मंत्रीमहोदयांनी हे कबूल केल्यानंतर हा विषय तेथेच संपला. राज्याच्या योजनेच्या माध्यमातून आदिवासींसाठी पैसे जात असतांना कुंपणच शेत खात आहे हे राज्यकर्त्यांनी मान्य केले आहे. या राज्यामध्ये आदिवासींची संख्या 1 कोटीच्या घरामध्ये आहे. मागच्या आकडेवारी नुसार आदिवासींची लोकसंख्या 73 लक्ष होती परंतु गेल्या 10-15 वर्षामध्ये आदिवासींची लोकसंख्या 1 कोटीच्या वर गेलेली आहे. आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात म्हणजे 8-10 जिल्हयात आहे. ठाणे जिल्हयामध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. मोनोरेल, मेट्रोच्या संदर्भात आपण गप्पा मारतो परंतु मुंबईच्या जवळ म्हणजे 100-150 कि.मी. अंतरावरील ठाणे जिल्हयातील आदिवासी पाडयातील आमच्या आदिवासी बांधवाने साधी रेल्वे देखील अजून पर्यंत बघितलेली नाही, त्या रेल्वेमध्ये बसण्याची गोष्टच वेगळी. अशा प्रकारची ही विषमता आपल्याला मुंबईपासून 100-150 कि.मी. च्या अंतरावर बघावयास मिळते. हा जो असमतोल आहे त्यामुळे आदिवासी जनता अस्वस्थ झालेली आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आपल्याला बघावयास मिळतात.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही